महापालिका क्षेत्र हे ७९.४० चौ.कि.मी. मध्ये विभागलेले असुन या क्षेत्रामध्ये २ रेल्वे स्टेशन व ४ प्रभाग कार्यालये अस्तित्वात आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या अंदाजे ८,५०,००० इतकी आहे. शहरातील नागरिकांना आवश्यक सेवा या मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय येथे असलेल्या नागरिक सुविधा केंद्रामार्फत दिल्या जातात. याकरिता नागरिकांना मुख्यालयात यावे लागते. जन्म—मृत्यु दाखले, कर भरणा, तक्रार निवारण, विविध परवाने, ना हरकत दाखले इत्यादी सेवा प्रभाग कार्यालये त्याचप्रमाणे नागरिकांची

जास्तीत जास्त वर्दळ असलेली ठिकाणे उदा. रेल्वे स्टेशन, गार्डन, मार्केट, अशा ठिकाणी उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता कर पाणीपट्टी व स्थानिक संस्था कर यांच्या प्रभावी वसूली करिता शहरातील वर नमुद ठिकाणी बिल पेमेंट किऑस सुविधा केंद्रे उभारणे आवश्यक आहे. यामुळे नागरिकांना विविध सेवा, दाखले व तक्रार निवारण, मालमत्ता कर, पाणीपट्टी कर भरणा हे त्यांच्या जवळील क्षेत्रांमध्येच उपलब्ध होतील.



सदर सेवा या पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप व बांधा वापरा हस्तांतरीत करा या माध्यमातुन प्रभाविपणे देणे शक्य आहे. सदर योजनेमुळे महापालिकेमार्फत दिल्या जाणा–या सेवा, सेवांचा दर्जा व जनमानसातील महापालिकेची प्रतिमा उंचावणे शक्य होईल.

त्याचप्रमाणे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअतंर्गत करावयाच्या प्रशासकिय सुधारणांच्या अनुषंगाने सदर योजनेमुळे मालमत्ता व पाणी पट्टी करांच्या वसूलीमध्ये वाढ होणार आहे. ई गर्व्हनस् प्रकल्पासाठी जे.एन्.एन्.यु.आर.एम्. सर्व्हिस लेव्हल बेंच मार्कचे पालन देखिल यामुळे होणार आहे. त्याचप्रमाणे जे.एन्.एन्.यु.आर.एम्. ई गर्व्हनस् सर्व्हिस लेव्हल बेंच मार्कमधे सि. एफ.सी. किऑस सुविधा केंद्राव्दारे नागरिकांना विविध सेवा त्यांच्या जवळील क्षेत्रांमध्येच उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

## ई–गव्हर्नंस कार्ययोजना –

मिरा भाईदर महानगरपालिकेत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाविपणे वापर करुन विविध विभागांच्या कामकाजात सुसुत्रता व पध्दती निश्चित करता येईल. विभागप्रमुखांसाठी डिसीजन सपोर्ट सिस्टम तयार होईल. विभागातील कर्मचा–यांमध्ये प्रत्येक कामकाजाची पध्दती निश्चित होईल जेणेकरुन या सर्वांचा लाभ महापालिका कर्मचारी व थेट नागरिकांना देखिल होईल. महापालिकेच्या विविध कामांचा डेटाबेस तयार होईल. सदर डेटा हा विभागप्रमुखांना पुढिल निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

यापुढे नागरिकांना इंटरनेट, कॉल सेंटर, किऑस, आय.व्ही.आर.एस, एस.एम.एस व्दारे सेवा व तक्रांरीवरील कार्यवाही, मालमत्ता पाणीपट्टी कर थकबाकी, स्थानिक संस्था कर भरणा इत्यादी सेवा देणे शक्य होईल.

## किऑक्स सेंटर द्वारे दिल्या जाणा-या सेवा

१) अ)मालमत्ता कर वसुली

ब) ड्युप्लिकेट बिल

क) असेसमेंट उतारा

ड) मालमत्ता हस्तांतरण

इ) थकबाकी नसलेबाबत दाखला

फ) व इतर सेवा

२) पाणी पट्टी कर वसुली व इतर सेवा

३) जन्म-मृत्यू दाखले

४) स्थानिक संस्था कर वसुली

५) नागरिकांच्या तक्रारी स्विकारणे

६) सी.सी.टी.व्ही कनेक्शनद्वारे मनपा मुख्यलयातून मॉनेटरिंग.

७) किऑक्स सेंटरची - वेळ सकाळी १० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत (सुट्टीच्या दिवशीही सुरु)

**प्रस्तावित निर्णय –**

महापालिकेतील विविध विभागाअतंर्गत माहिती तत्रंज्ञानाचा वापर करुन कामकाजात सुसुत्रता, नियम व पध्दती आणणे. त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्रातील प्रभाग कार्यालये व नागरिकांची जास्तीत जास्त वर्दळ असलेली ठिकाणे उदा. रेल्वे स्टेशन, गार्डन, मार्केट, चौक अशा ठिकाणी नागरिकांना बिल पेमेंट किऑस प्रकल्पाव्दारे विविध मुल्यवर्धीत सेवा उपलब्ध करून देणे. याकामी प्रति किऑस्क सेंटरसाठी प्रति माह अंदाजे रू. २०००० ते रू.२२००० पर्यंत खर्च अपेक्षित आहे. तसेच किऑस्क सेटरंवरील जाहिरात प्रसिध्द करणेकामी मिळणाया उत्पन्नात मनपाचा हिस्सा ४० टक्के असावा. एम.टी.एन.एल. बिल पेमेंट, मोबाईल रिचार्ज, रिलायन्स बिल पेमेंट व इतर मुल्यवर्धीत सेवेमधील उत्पन्नात मनपाचा हिस्सा २० टक्के असावा. ठेकेदाराला संबधित कामाचा अनुभव असावा व ठेकेदाराला सब कॉन्ट्रक्ट देता येणार नाही. यासाठी महापालिकेने निश्चित केलेल्या संगणकीकरण या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या आधीन राहुन सदर ई–गव्हर्नस प्रकल्प पब्लिक प्रायव्हेट पार्टन्रशिप व बांधा वापरा हस्तांतरीत करा या माध्यमातुन किऑक्स प्रणाली राबविणेस ही सभा मंजरी देत आहे. त्याचबरोबर पुढील कार्यवाहीकरीता आवश्यक बाबी निश्चित करणे किऑक्स सेंटरची ठिकाणे निश्चित करणेसाठी मा. महापौर हयांच्या अध्यक्षतेखाली, मा. आयुक्त व पदाधिकारी व संबधित विभागाचे अधिकारी हयांच्या समवेत हि प्रणाली अंमलबजावणी करणेत यावी.

सूचक :– सौ. प्रभात पाटील    अनुमोदक :– (आसिफ शेख)

**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०६/२०११



प्रकरण क्र. ३८ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १५/०६/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- जन्म मृत्यु विभाग संगणकमध्ये नोंद बाबत

(सदर विषयावर चर्चा झाली.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २०/०६/२०११



**दुःखवटा ठराव क्र. ३९ :-**

मिडडे चे जेष्ठ पत्रकार जे.डी. आणि मनसेचे खडकवासलाचे आमदार श्री. रमेश वांजळे साहेब तसेच हमारा बाजारचे श्री. मोहनजी अग्रवाल यांचे भ्राता श्री. जगदीश अग्रवाल यांचे निधन झालेले आहे. त्याचा शोकप्रस्ताव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०७/२०११

**सभा तहकुबी ठराव क्र. ४० :-**

आजची सभा ३ दिवसांसाठी तहकुब करण्यात येत असून ती सभा ३ दिवसानंतर घेण्यात यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

98/107

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २९/०७/२०११

(दि. २०/०७/२०११ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ३९ :- दि. १४/०९/२०१०, दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० ची तहकुब सभा), १२/११/२०१० व ०२/१२/२०१० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ४१ :-

दि. १४/०९/२०१०, दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० ची तहकुब सभा), १२/११/२०१० व ०२/१२/२०१० रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

99 108

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २९/०७/२०११
## (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ४० :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आगरी समाज उन्नती संस्था - आ.क्र. १२२ ही जागा संस्थेस मिळणेबाबत.**

ठराव क्र. ४२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आ.क्र.१२२ ही जागा संस्थेसाठी मागणी केलेली आहे.

मागणी केलेली जागा सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असल्याचे संस्थेने अर्जात नमूद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. १२२ हे आरक्षण "Play Ground & Social Forestry" (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या नावाने प्रस्ताविक असून आरक्षणाखालील क्षेत्र ४६७००.०० चौ.मी. आहे. यापैकी ३०५३३.६० चौ.मी. महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

आगरी समाज उन्नती समाज संस्थेस जागा देण्याबाबत (१) मा. श्री. तुळशीदास म्हात्रे, महापौर, (२) मा. आ. श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा, (३) मा. खा.डॉ. संजीव नाईक, (४) मा. श्री. मुझफ्फर हुसैन, माजी आमदार, (५) मा. श्री. जगन्नाथ पाटील, माजी खासंदार, (६) मा. आ. श्री. रामनाथ मोते या लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेली आहे.

मागणी केलेली जागा ही खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या वापरासाठी असल्यामुळे खेळाचे मैदान हे सार्वजनिक वापरासाठी सर्वांसाठी खुले ठेवण्यात यावे व अनुज्ञेय होणारे बांधकाम क्षेत्राचा वापर संस्थेने करावा. तसेच खेळाचे उपक्रमासाठी आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार पूर्वमंजूरी घेवून बांधकाम करणे आवश्यक राहील.

संस्था वापर करण्याऱ्या बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या भूखंड क्षेत्राचे भाडे संस्थेकडून प्रचलित नियमावलीनुसार वसूल करावे लागेल. तसेच खेळाचे मैदानाची देखभाल व दुरुस्ती संस्थेने विनाअट करणे बंधनकारक राहील.

आरक्षणाखालील जागेत नियमानुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम करण्यासाठी होणारा खर्च संस्थेस करावा लागेल.

आगरी समाज उन्नती संस्था यांना आ.क्र.१२२ मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागेपैकी दोन एकर जागा (मैदान व सामाजिक वनीकरणाची जागेमधून क्षेत्र निश्चित करुन) ३० वर्षांसाठी भाड्याने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेने ह्या समाजास दिलेली जागा रिमार्केशन करुन द्यावी.

सदर जागेचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार भाडे प्रशासनाने ठरवून त्यात प्रत्येक ५ वर्षात १०% वाढ करण्यात यावी. हा प्रस्ताव शासनाकडे पाठवून प्रस्ताव मान्य झाल्यावर भूखंडाचा ताबा दिल्यापासून भाडे आकारण्यात यावे. सदर भूखंडावर नियमानुसार अनुज्ञेय बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी. सदर भूखंडाबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार ही सभा मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. एस.ए.खान** **अनुमोदक :- आसिफ शेख**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १२२ ही जागा संस्थेसाठी केलेली आहे. सदर आरक्षण क्र. १२२ हे आरक्षण खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या नावाने प्रस्तावित असल्यामुळे महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६५ च्या कलम ३७/१ आरक्षणात फेरबदल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

—१/८/११

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

100
108

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०७/२०११ (दि.२०/७/११ ची तहकुब)

**प्रकरण क्रमांक :** ४१ :- मिरा भाईंदर शहरात गर्भलिंग चिकीत्सा रोखुन मुलींच्या भोरभुऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणेबाबत.

**ठराव :** ४३

लिंग निदान प्रतिबंधक कायद्यात कारवाईच्या स्पष्ट तरतूदी आहेत. परंतु त्याची नीट अमंलबजावणी होत नाही. या रोगावर कायद्याबरोबरच इतर उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या शहरामधील चार सोनोग्राफी केंद्राना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने सील केलेले आहे. अजूनही बरीचशी सोनोग्राफी केंद्रे या प्रकारामध्ये गुंतली असल्याची शक्यता आहे. त्यांच्यावरही कडक कारवाई करणेत यावी. तसेच शहरातील महिलांना गर्भ धारणा झाल्यानंतर ६० दिवसांच्या आंत महानगरपालिकेमध्ये त्याची नोंदणी करणेस बंधनकारक करावे. व तरच त्यांना जन्म नोंदणीचा दाखला देण्यात यावा. यासारख्या उपाययोजनांचा कायद्याच्या दृष्टीने सखोल अभ्यास करुन त्या दृष्टीने उपाययोजना करावी. पहिले अपत्य मुलगी असल्यास व दुसरे अपत्य मुलगी झाल्यास त्या मुलीच्या नावे महापालिकेने १८ वर्षासाठी रोख रक्कम २० हजार फीक्स डिपॉझीट स्वरुपात ठेवावे. प्रसुती पुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्याच्या अमंलबजावणीसाठी बेकायदा कृत्य करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

असा मी ठराव मांडत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

| सूचक | | अनूमोदक |
|---|---|---|
| अनिल दिवाकर सावंत | महापौर | शफीक अहमद सादत खान |
| नगरसेवक | मिरा-भाईंदर महानगरपालिका | नगरसेवक |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका | | मिरा-भाईंदर महानगरपालिका |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०७/२०११

**प्रकरण क्र. ४२ :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांना डोमिसाईल सर्टीफिकेट महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयातून उपलब्ध होणेकरीता महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव देणेबाबत.

**ठराव क्र.४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ठाणे जिल्ह्यातील सर्वांत जास्त झपाट्याने वाढते शहर आहे. सध्या या शहराची लोकसंख्या सुमारे १२ लाखापर्यंत झाली आहे. महानगरपालिका क्षेत्रात मुंबई शहरातून, उपनगरातून व उत्तर भारत, गुजरात, बंगाल, राजस्थान व देशातील अनेक शहरातून येणाऱ्या नागरिकांची संख्या सर्वांत जास्त आहे. महानगरपालिकेमध्ये जन्म मृत्यू दाखला, आस्थापना प्रमाणपत्र, सध्या विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र उपलब्ध होत आहे. त्यामुळे जनतेला सहजरित्या प्राप्त होत असल्याने, याच धर्तीवर 'डोमिसाईल सर्टीफिकेट' हे सध्या तहसिलदार कार्यालयातून देण्यात येते. परंतु भारतात सर्वाधिक लोकसंख्येच्या मानाने जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र पाहता हा सर्वांत मोठा जिल्हा आहे. या ~~जिल्ह्यात~~ एकच तहसिलदार कार्यालय असल्याने गरजूना ते मिळण्यास फार वेळ लागतो. जिल्ह्याच्या तहसिलदार कार्यालयात जाण्या-येण्याकरीता आर्थिक बाब जास्त खर्च होते. हेच डोमिसाईल सर्टिफिकेट जर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयामध्ये उपलब्ध होऊ शकले तर, त्याचा लाभ सर्व मिरा भाईंदर वासियांना मिळू शकेल व त्याचा चांगला प्रतिसाद जनतेकडून मिळू शकेल. मुंबई महानगरपालिकेतर्फे डोमिसाईल सर्टिफिकेट महानगरपालिकतर्फे देणे बाबतचा प्रस्ताव पारित करून शासनाकडे पाठवला आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने देखील डोमिसाईल सर्टीफिकेट प्रभाग कार्यालयातून देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-**

**अनुमोदक :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

~~१०२~~ ११०

## मा. महासभा दि. २९/०७/२०११
## (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ४३ :-** **अग्निशमन दलात अधिकारी व कर्मचारी यांची नव्याने केलेली भरती प्रक्रिया रद्द करून रितसर चौकशी करण्या बाबतचा प्रस्ताव.**

**ठराव क्र :-** ४५

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागात सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडीस हे कार्यरत आहेत. महानगरपालिकेने अग्निशमन विभागाअंतर्गत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशाचे अनुषंगाने मंजुर पदे महानगरपालिकेच्या सेवाशर्ती नियम -२००५ अंतर्गत नमुद तरतुदीप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे १९९६ च्या निकालाचे अनुषंगाने व्यापक प्रसिध्दी वृत्तपत्रात व सेवायोजन कार्यालये, महानगरपालिकेचे संकेतस्थळ इ. मध्ये पदे भरण्याची जाहिर प्रसिध्दी करून उमेदवाराचे अर्ज मागविण्यांत आले होते. मुदतीत महानगरपालिकेस प्राप्त अर्जदाराची स्पर्धात्मक परिक्षेद्वारा, लेखा परिक्षा घेवून लेखी परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची शारिरीक क्षमता चाचणी परिक्षा व तोंडी परिक्षा मिळून एकत्रीत गुणाची सरासरी पहाता गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवाराची अंतिम निवड यादी महानगरपालिकेने जाहिर प्रसिध्द करून उमेदवारांना नेमणुक केली त्या नेमणुकीस मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. महासभेने याबाबत संबंधित उमेदवारांचे शैक्षणिक पात्रतेचा त्यांच्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र वेरिफिकेशन करून आणण्यात यावी व त्यानंतर त्यांना त्या पदावर नेमणूक करावी. असेही स्पष्टपणे ठरावात नमूद केले होते. दाखले खोटे आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत ठरावात नमूद केलेले आहे. अशाप्रकारे निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रा व्यतीरीक्त अन्य शासनमान्य संस्थातुन किमान सहा महिन्याचे अग्निशमन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची प्रशिक्षण दरम्यान संस्थेची नोंदणी वैध व शिकविण्यांत येत असलेला पाठयक्रम राज्य/केंद्र शासनाचे प्रमाणित केल्याप्रमाणेच असल्याचे पडताळणीचे अटीवर तसेच सदर उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण संस्थेजवळ आवश्यकता असल्यास अग्निशमन पाठयक्रम प्रशिक्षणास पाठविण्याचे तसेच प्रशिक्षण यशस्वी पूर्ण करण्याच्या अटीवर मंजुरी दिलेली आहे. अशाप्रकारे महासभेने मंजुरी दिल्यानंतर कामावर हजर असलेल्या उमेदवारांना काही येत नसल्याबाबत जाहिर दुरचित्रवाणीसमोर वक्तव्ये करणे किंवा पदाधिकारी, नगरसेवक यांना लेखी पत्र देणे हि बाब गैरशिस्तीची असुन अधिका-याने विहीत मार्गाने मा. उपायुक्त, मा. आयुक्त, मा.प्रधान सचिव अशा क्रमवारीने त्यांचेवर अन्याय होत असेल तर दाद मागणेची पध्दत आहे. परंतु त्यांचेवर कोणताही अन्याय झालेला नसताना केवळ दृष्ट हेतुने महानगरपालिकेस बदनाम करण्याचा कट केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त,अपील व वर्तणुक) नियम -**१९७९ चे कलम -३** अन्वये अधिका-यांवर काही बंधने निश्चित केली आहेत. त्याचा भंग अधिका-यास करता येत नाही परंतु श्री. क्लासो फर्नांडीस, सहा. अग्निशमन अधिकारी यांनी शिस्त व वर्तणुक नियमाचा भंग केलेला असुन त्यांचे या वर्तनामुळे महानगरपालिकेची सर्वत्र बदनामी झालेली आहे. तरी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त, अपिल व वर्तणुक) नियमाचा भंग करणा-या अधिका-यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम - ५६ अन्वये चौकशीसाठी निलंबित करण्यांत यावा व

ज्यांनी ज्यांनी प्रशासनाची व मनपाची खोटी बदनामी केली त्यांच्यावर प्रशासनाने कायदेशीर कारवाई करावी. व संपूर्ण कारवाई झाल्यानंतर अहवाल मा. महासभेपुढे ठेवावा असा ठराव मांडत आहे. ४०३ ।।।

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १) मिलन वसंत म्हात्रे | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र |
| २ | पाटील उमाताई शाम | | २ | वर्षा गिरधर भानुशाली |
| ३ | वेतोस्कर राजेश शंकर | | ३ | राजु यशवंत भोईर |
| ४ | सुनिता कैलास पाटील | | ४ | मोहन महादेव जाधव |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | | ५ | सिंह मदन उदितनारायण |
| ६ | शशिकांत जगन्नाथ भोईर | | ६ | म्हात्रे कल्पना महेश |
| ७ | सुनिता शशिकांत भोईर | | ७ | पाटील शरद केशव |
| ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ९ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | | ९ | बाविघर सिसिलीया विजय |
| १० | जंगम लक्ष्मण गणपत | | १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ११ | सपार उमा विश्वनाथ | | ११ | पांडे स्नेहा शैलेश |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | १२ | दुबे रामनारायण सदानंद |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | १३ | यादव मिरादेवी रामलाल |
| १४ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर |
| १५ | शफीक अहमद सादत खान | | १५ | पाटील अनंत रामचंद्र |
| १६ | प्रमोद जयराम सामंत | | १६ | पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १७ | मर्लिन मर्विन डिसा | | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| १८ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| १९ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २० | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २१ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २२ | भट दिप्ती शेखर | | | |
| २३ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २४ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| २५ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| २६ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| २७ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| २८ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| २९ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३० | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३१ | हेलन गोविंद जॉर्जी | | | |
| ३२ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | | | |
| ३३ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | | |
| ३४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ३५ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ३६ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ३७ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ३८ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ३९ | टेरी पॉल परेरा | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१०५/११२

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २९/०७/२०११
## (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ४४ !-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगीरी केल्याबद्दल केंद्रशासनाने त्यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केलेले असल्याने महानगरपालिकेद्वारे मानचिन्हे व मानपत्रे देवून जाहिर नागरी सत्कार करणेबाबत.

**ठराव क्र. ४६ !-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमुद केलेल्या नागरीकांना साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कामगीरी केल्याबद्दल केंद्रशासनाने त्यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केलेले आहे.

१) श्री. अखलाक खान शहरयार - सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार (उर्दु) सन – २०१०

२) श्री. सलाम बीन रज्जाक - साहित्य अकादमी पुरस्कार (उर्दु) २ वेळा

३) श्री. लक्ष्मण दुबे - साहित्य अकादमी (सन २०१०-११) (सिंधी)

४) श्री. वकार कादरी - साहित्य अकादमी (मराठी ते उर्दु भाषांतर)

सदर साहित्यीक मिरा भाईंदर शहरातील रहिवासी असून त्यांना महापालिकेद्वारा मानचिन्हे व मानपत्रे देवून त्यांचा जाहीर नागरी सत्कार करणेबाबतच्या प्रस्तावास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. तसेच या नागरी सत्कारास मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री सांस्कृतिक कार्य, मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य, मा. मंत्री उत्पादन शुल्क, उपारंपारिक उर्जा तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा, संपर्क मंत्री, स्थानिक आमदार (मिरा भाईंदर) यांना निमंत्रण करावे, याकरिता येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह व अनुमोदक श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की आपल्या शहरात भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे राहणारे श्री. सुधाकर मिश्रा ह्यांना

१) महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार – २००९-१०

२) तुलसी सन्मान उत्तर प्रदेश सरकार - २००७

३) कबीर सन्मान उत्तरप्रदेश सरकार - २००५

ह्यांनासुध्दा साहित्य क्षेत्रात विशेष कामगीरी बद्दल बरेच पुरस्कार मिळालेले आहे. तरी त्यांचे नांव समाविष्ठ करण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि २९/०७/२०११ (दि. २०/८/११ ची तहकुब)

प्रकरण क्रमांक : ४५ :- मिरा भाईंदर शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या शाळांमध्ये स्वच्छतागृहाची व्यवस्था सुधारणेबाबत.

ठराव क्र. ४७

मिरा भाईंदर शिक्षण मंडळा अंतर्गत शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यंत मुले-मुली शिक्षण घेत असतात. या शाळांमध्ये स्वच्छता गृहांची नीट सोय नसल्यामुळे मुलांचे विशेषतः मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण घटते. यावर महानगरपालिकेने कार्यवाही करणे अत्यंत गरजेचे आहे. काही शाळांची प्रत्यक्ष पहाणी केली असता, वरील विषया संबंधी प्रशासन किती उदासीन आहे, याची कल्पना येते.

तरी याविषयी खालील उपाययोजना मिरा भाईंदर शिक्षण मंडळा अंतर्गत शाळांमध्ये व खाजगी शाळांमध्ये तातडीने कराव्यात व तशा स्पष्ट सुचना संबंधीत विभागांना द्याव्यात.

१. महापालिकेच्या शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावीत.
२. महापालिकेच्या शाळांमध्ये कायमस्वरुपी सफाई कामगारांची नेमणुक करावी.
३. महापालिकेच्या शाळांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रणा बसवून पीण्याच्या पाण्याची सोय करावी.
४. महापालिकेच्या शाळांमध्ये कायमस्वरुपी सुरक्षा रक्षकांची नेमणुक करावी.
५. ज्या शाळांमध्ये वर्गांची पडझड झालेली आहे, अशा शाळांमध्ये बांधकाम विभागाला त्वरीत ओदश देऊन त्या ठिकाणी ताबडतोब दुरुस्ती करावी.

असा मी ठराव मांडत आहे

सूचक

अनिल दिवाकर सावंत
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

अनुमोदक

जुबेर इनामदार
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २९/०७/२०११
## (दि. २०/०७/२०११ रोजीची तहकुब सभा)

106
११५

**दु:खवटा ठराव क्र. ४८ :-**

दि. १३/०७/२०११ रोजी मुंबई शहरामध्ये तीन बॉम्बस्फोट झाले. या स्फोटामध्ये आपल्या शहरातील तीन नागरीक ह्या बॉम्बस्फोटामध्ये हिमंत भाई गदिया, उपतभाई नवडीया आणि संदीप जैन मृत झालेले आहेत तसेच एस.व्ही. रोडला दास म्हणून व्यक्ति एक्सपायर झाले. तसेच काशी गावात जे १० जण मृत झाले. त्यांना सुध्दा ह्या सभेत श्रध्दांजली अर्पण करावी. आणि या मिरा भाईंदर शहरातील स्थानिक समाज सेवक श्री. जनार्दन नारायण रकवी ह्यांची वहिनी सुलोचना मधुकर रकवी ह्यांना ही श्रध्दांजली अर्पण करत आहे. तसेच आपल्या समाजातील सभागृहातील नगरसेवक माजी नगराध्यक्ष स्वर्गीय डॉ. प्रफुल्ल काशीनाथ पाटील ह्यांच्या मातोश्री कमला बाई काशीनाथ पाटील ह्यांचे निधन झालेले आहे. तसेच थोर समाजसेविका साधनाताई आमटे ह्या बाबासाहेब आमटेच्या पत्नी होत्या ज्यांनी नंदनवनामध्ये कुष्ठरोग्याची अतोनात सेवा केली त्यांचा शोकप्रस्ताव मांडतो. तसेच आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये सेवा निवृत्त झालेले माजी आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक ह्यांच्या आईचे सुध्दा निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडतो.

**सुचक :- श्री. राजु वेतोस्कर** **अनुमोदक :- श्री. मिलन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

४०७
७१५

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०८/२०११.

प्रकरण क्र. ४६ :- दि. १६/१२/२०१०, २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा), दि. १८/०१/२०११ व दि. ०१/०२/२०११ (दि. १८/०१/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ४९ :-

दि. १६/१२/२०१०, २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा), दि. १८/०१/२०११ व दि. ०१/०२/२०११ (दि. १८/०१/२०११ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- (आसिफ शेख) अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

+०८ ११६

## मा. महासभा दि. २०/८/२०११

**प्रकरण क्र. ४७ :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. ३७ च्या पालिका सदस्य श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांच्या अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशांकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेणे.**

**ठराव क्र. :-** ५०

मिरा भाईंदर नगरपालिकेच्या सन २००० च्या सार्वत्रिक पोट निवडणुकीद्वारे श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांची दि. ५/३/२००० ते २७/२/२००२ तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीद्वारे दि. २८/८/२००२ ते २७/८/२००७ पर्यंत नगरसेवक म्हणून निवड झाली होती. तद्‌नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणुकीद्वारे प्रभाग क्र. ३७ साठी श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांची दि. २८/८/२००७ रोजी नगरसेवक म्हणून नेमणूक झालेली आहे.

नगरसेवक मिलन वसंत म्हात्रे यांनी मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१, मॅक्सवेल हॉटेल जवळ, हनुमान मंदिर नंतर डाव्या हातास असलेल्या सरकारी जागा अनधिकृतपणे बळकावून त्या सरकारी जागेत अतिक्रमण करुन बंगला, प्लश स्विमिंग पुल, गोडाऊन, स्टोर रुम, स्वच्छतागृह, शौचालय, बॉउंड्री वॉलचे बांधकाम, मोठे लोखंडी गेट टाकून अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १० (१ड) नुसार श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी तक्रारदार श्री. मिलन वसंत म्हात्रे व नगरसेवक श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी आयोजित करुन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करुन दि. १९/५/२०११ रोजी श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार न्यायाधिशास असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेण्यास मा. महासभेपुढे ठेवण्यास आदेश पारीत केले आहेत.

Cont....२...

सदर आदेशात तत्कालीन आयुक्त यांनी मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या सरकारी जागेत श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांच्या नावे असलेल्या बांधकाम दि. ३/१२/१९९७ रोजीच्या कर आकारणीच्या नोटीसी नुसार सन १९९७ मधील असल्याचे दिसून येत आहे. परंतु श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा सन २०००-२००२ व २००२-२००७ पर्यंत नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यामुळे सदरचे बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांनी ते नगरसेवक असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे.

तसेच श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांच्या पत्नी श्रीमती नीला स्टिवन मेंडोन्सा यांच्या नावे मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या जागेवर असलेल्या बांधकामासंदर्भात कर विभागाने सादर केलेल्या मालमत्तेचे प्रपत्रनुसार सदरचे बांधकाम सन १९९८-९९ पूर्ण झाल्याचे नमुद केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे. तसेच मौजे उत्तन डोंगरी, सर्व्हे क्र. ३५१ या जागेवरील श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांच्या नावे असलेली मालमत्ताचे बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांनी कधी बांधलेले आहे याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर न केल्यामुळे श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असताना केले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही.

तरी वरील नमुद केलेले बांधकाम श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे असे स्पष्ट सिध्द न झाल्यामुळे, या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता व चर्चेअंती सदरच्या प्रकरणात कारवाई करण्यासाठी ही सभा सदरचा प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

**सुचक :-** श्री. आसिफ शेख

**अनुमोदन :-** श्री. भगवती शर्मा

ठराव बहुमताने मंजूर

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-** मा. आयुक्त सो., यांजकडे माहितीसाठी सादर...

118

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०८/२०११

ठराव क्र.५५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य मा. श्री. परशुराम दामोदर पाटील यांचे आज दि. २०/०८/२०११ रोजी दुःखद निधन झाल्याची बातमी सभागृहात कळल्याने संपूर्ण सभागृह त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी असून परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व सदगती देवो तसेच या संकटसमयी त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची परमेश्वर शक्ती प्रदान करो हीच इश्वरचरणी प्रार्थना तसेच सुरु असलेला सभापटलावरील विषय पुर्ण झाल्यानंतर सभेत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात व उर्वरीत विषयाकरीता सभा तहकुब करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे.

सुचक :- श्री. आसिफ शेख      अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात |
|---|---|---|---|
| १ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र |
| २ | शेट्टी गणेश गोपाळ | २ | वर्षा गिरधर भानुशाली |
| ३ | व्यास सुधा वासुदेव | ३ | सिंह मदन उदितनारायण |
| ४ | नयना गजानन म्हात्रे | ४ | म्हात्रे कल्पना महेश |
| ५ | तिवारी दिव्या अशोक | ५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ६ | वैती नर्मदा यशवंत | ६ | बाविघर सिसिलीया विजय |
| ७ | पाटील जयंत महादेव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ८ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ८ | पांडे स्नेहा शैलेश |
| ९ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ९ | दुबे रामनारायण सदानंद |
| १० | पाटील मिलन गोविंदराव | १० | यादव मिरादेवी रामलाल |
| ११ | फॅरो ग्रिटा स्टिफन | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर |
| १२ | शेख आसिफ गुलाब | १२ | पाटील अनंत रामचंद्र |
| १३ | हेलन गोविंद जॉर्जी | १३ | पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १४ | बर्नड अल्बर्ट डिमेलो | १४ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| १५ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | १५ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| १६ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | १६ | मिलन वसंत म्हात्रे |
| १७ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | |
| १८ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | |
| १९ | शर्मा भगवती तुगनचंद | | |
| २० | पाटील वंदना मंगेश | | |
| २१ | चक्रे वंदना रामदास | | |
| २२ | माळी हेमा रविंद्र | | |
| २३ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | |
| २४ | अनिता जयवंत पाटील | | |
| २५ | टेरी पॉल परेरा | | |
| २६ | भोईर राजु यशवंत | | |
| २७ | जाधव मोहन महादेव | | |

ठराव बहुमताने मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/८/२०११

**प्रकरण क्र. ४८ :- मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. २७ च्या पालिका सदस्य सौ. नयना गजानन म्हात्रे यांच्या अर्नहतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशांकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** ५२

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे सौ. नयना गजानन म्हात्रे यांची दि. २८/८/२००२ ते २७/८/२००७ पर्यंत नगरसेविका म्हणून निवड झाली होती. तद्नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीद्वारे प्रभाग क्र. २७ साठी सौ. नयना गजानन म्हात्रे यांची दि. २८/८/२००७ रोजी नगरसेविका म्हणून नेमणूक झालेली आहे.

तक्रारदार श्री. अरविंद एस गुप्ता यांनी मौजे मुर्धा, तलाठी सजा भाईंदर, सर्व्हे क्र. ३६ जुना, सी.टी.एस.नं १११ या शासकिय जागेवर तळ अ १ मजल्याचे अनधिकृत बांधकाम सौ. नयना म्हात्रे व त्यांचे पती श्री. गजानन म्हात्रे यांनी केल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(१ड) नूसार सौ. नयना म्हात्रे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी तक्रारदार श्री. अरविंद गुप्ता व नगरसेविका सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी आयोजित करून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून दि. १९/५/२०११ रोजी सौ. नयना म्हात्रे यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार न्यायाधिशास असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण मा. न्यायाधीशाकडे (वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, ठाणे) पाठविण्यासाठी निर्णय घेण्यास मा. महासभेपुढे ठेवण्यास आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशात तत्कालीन आयुक्त यांनी मौजे मुर्धा, सी.टी.एस.नं. १११ या सरकारी जागेत सौ. नयना म्हात्रे यांनी यांच्या नावे कर आकारणी केलेले बांधकाम विभागीय कार्यालय राई-मुर्धा यांच्या अहवालान्वये सदरची मालमत्ता सन १९९५ पूर्वीचे असल्याचे दिसून येत असून सौ. नयना म्हात्रे सन २००२-२००७ व २००७-२०१२ पर्यंत नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत.

त्यामुळे सदरचे बांधकाम त्या नगरसेविका असताना केल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत नाही असे नमुद केले आहे. तसेच मौजे मुर्धा, सर्व्हे क्र. ३६ या जागेवरील श्री. गजानन म्हात्रे यांच्या नावे असलेली मालमत्ताचे बांधकाम सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे पती श्री. गजानन म्हात्रे यांनी कधी बांधलेले आहे याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर न केल्यामुळे सौ. नयना म्हात्रे यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सदरचे बांधकाम नगरसेविका पदी असताना केले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही.

तरी वरील नमुद केलेले बांधकाम सौ. नयना गजानन म्हात्रे यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे असे स्पष्ट सिध्द न झाल्यामुळे, या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता व चर्चेअंती सदरच्या प्रकरणात कारवाई करणेसाठी ही सभा सदरचा प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

सुचक ______________________ अनुमोदक ______________________

श्री. मिलन पाटील सौ. वंदना चक्रे

ठराव बहुमताने मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- मा. आयुक्त सो. यांजकडे माहीतीसाठी सादर...

~~११३~~ १२१

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२०११

## (दि. २०/०८/२०११ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ४९ :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेची उद्याने, चौपटी येथे इलेक्ट्रॉनिक खेळणी बसविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ५३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची उद्याने, चौपाटी येथे इलेक्ट्रॉनिक खेळणी बसविणे, याबाबत नेमकी कोणती मैदाने, कोणती उद्याने याच्या सविस्तर माहितीसह पुनःश्च हा विषय विषयपत्रिकेवर आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/८ /२०११.

(दि. २०/८/२०११ ची तहकुब सभा)

प्रकरण क्र. :- ५०

ठराव क्र. : ५४

विषय :- भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालयासाठी IPHS नुसार आवश्यक पदनिर्मितीच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. १९२, १९३ पेणकरपाडा गाव, मिरारोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय बांधण्यात आलेले आहे. सदर रूग्णालयाच्या कर्मचारी आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक जॉवप्र.२०००१/सीआर-९३/जार्वक/आ-४, दि. २३.१२.२००२ नुसार मा. महासभा दि. ०१.०७.२००८ (दि. १९.०६.२००८ तहकुब सभा) प्रकरण क्र. २४, ठराव क्र. २५ अन्वये ४५ पैकी ३५ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये सूचविलेला आकृतीबंध शहरी आरोग्य सेवांचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health Standards नुसार सूचविलेल्या मानकांचा विचार करता, सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अशा अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्ता राखणे शक्य होणार नाही. तसेच रूग्णांच्या जीविताचा प्रश्न असल्याने याबाबत तडजोड करणे योग्य होणार नाही.

Indian Public Health Standards नुसार प्रत्येकी ८ खाटांमागे एका पाळीसाठी (८ तासांची पाळी) १ अधिपरिचारिका (स्टाफ नर्स) आवश्यक आहे. तसेच एकूण अधिपरिचारिकांच्या २५ टक्के अधिपरिचारिका राखीव (Reserve) म्हणून असणे आवश्यक आहे. भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय ५० खाटांचे असल्याने सदर रूग्णालयासाठी Indian Public Health Standards नुसार व २५ टक्के राखीव पदे धरून २४ अधिपरिचारिका आवश्यक आहेत. तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी ४ अधिपरिचारिका व ३ शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची पदे आवश्यक आहेत. तसेच सदर रूग्णालयात अहोरात्र अपघात विभाग चालविण्यासाठी तसेच वॉर्डमधील रूग्णांच्या देखभालीसाठी एकूण ६ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहेत. अशाप्रकार वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ६ पदे, अधिपरिचारिका यांची एकूण २८ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची एकूण ३ पदे आवश्यक आहेत. त्यापैकी वैद्यकीय अधिकारी यांची ४ पदे अधिपरिचारिका यांची १२ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांचे १ पद आधीच मंजूर असल्याने वैद्यकीय अधिकारी यांची २, अधिपरिचारिकांची १६ तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक परिचर यांची २ पदे आवश्यक आहेत.

अशाप्रकारे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | वेतन श्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | १५६००-३९१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारिका | १६ | ९३०० ३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | ५२००-२०२०० | १८०० |

वरील प्रमाणे पदनिर्मिती करून स्थायी आस्थापनेवर उपरोक्त अधिकारी व कर्मचारी वर्गाची नमणूक केल्यास त्यांच्या वार्षिक वेतनापोटी अंदाजे रू. ६०,५७,२४०/- खर्च अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे योग्य राहील. सदर पदांसाठी ठोक मानधन पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रस्तावित पद संख्या | प्रस्तावित ठोक मासिक वेतन | एकूण वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | रू. २५,०००/- | रू. ६.०० लक्ष |
| २. | अधिपरिचारिका | १६ | रू. १२,०००/- | रू. २३.०४ लक्ष |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | रू. ६,०००/- | रू. १.४४ लक्ष |
| | एकूण | २० | | रू. ३०.४८ लक्ष |

वरीलप्रमाणे करारतत्वावर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नेमल्यास त्यांच्या ठोक मानधनासाठी प्रत्येक वर्षाकाठी रू. ३०.४८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तरी भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय येथे अखंडपणे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी प्रस्तावित पदे नमूद केलेल्या संख्येनुसार मंजूर करणेस, तसेच मंजूर पदांचा प्रस्ताव मा. शासनाकडे पद निर्मितीसाठी पाठविणेस, शासनाकडून पदमंजूरी मिळून स्थायी आस्थापनेवर पदे भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच स्थायी आस्थापनेवर पदभरती होईपर्यंत करारतत्वावर ठोक मानधनावर सदर पदे भरण्यास ही महासभा मंजुरी देत आहे तसेच उपरोक्त प्रस्तावास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सूचक :- (सौ. प्रभात पाटील)

अनुमोदक :- (आसिफ शेख)

**मा. महापौर**
मिरा भाईंदर महानगरपालिका

H6/124

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०९/२०११
## (दि. २०/०८/२०११ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ५१ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल पेमेंट किऑस्क प्रकल्पाद्वारे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, स्थानिक संस्था कर वसुली व इतर सेवासुविधांच्या कार्यपध्दती राबविणेबाबत नेमलेल्या समितीच्या अहवालावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

(सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

+7 १८५

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०९/२०११
## (दि. २०/०८/२०११ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ५२ :-** सन्मा. सदस्य श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे यांचे दिनांक १२/०८/२०११ रोजीच्या -- पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. झंकार कंपनी जवळील कल्वर्टची रुंदी वाढविणे बाबत..

**ठराव क्र. :-** ५५

मिरा भाईंदर शहरात पावसाळ्यात सर्वत्र पाणी साचुन तसेच संजय गांधी उद्यान परिसरातून पाणी येऊन शहरात जलमय परिस्थिती निर्माण होते. शहरातून पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद नाले व उघाड्या यांची शहरात उणीव दिसून येते. हे शहर खाडी लगत असल्याने भरतीच्या वेळी पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होतो.

या करीता शहरात कच्चे पक्के नाले वाढवणे, उघाड्या वाढवीणे व दुरुस्त्या करणे हे उपाय आहेत. केवळ एखादी उघाडी किंवा नाला मोठा वा रुंद करुन हा प्रश्न सुटणार नाही करीता या संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन त्याचा अहवाल मा. महासभे पुढे सादर करण्यात यावा. ह्या शहराचा सर्व्हे एखाद्या नामांकित एजन्सी मार्फत करण्यात यावा आणि तो मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा व त्यानुसार ह्या शहरातील पावसाच्या पुराचा पाण्याचा प्रश्न निकालात काढण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | राजु यशवंत भोईर | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | सिंह मदन उदितनारायण | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | पाटील शरद केशव | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ८ | कुरेशी याकुब ईस्माईल | ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ९ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | मुंज वासुदेव भास्कर | | | |

118 126

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १८ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| १९ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २० | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २३ | भट दिप्ती शेखर | | | |
| २४ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलिम दाऊद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| २९ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३० | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३१ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३२ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | | | |
| ३३ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| ३४ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३५ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३६ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३७ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | | | |
| ३८ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ३९ | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४० | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४१ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४२ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४३ | टेरी पॉल परेरा | | | |

ठराव बहुमताने मंजुर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२०११

## (दि. २०/०८/२०११ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ५३ :-** **सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचे दिनांक १२/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.**

---

**पर्युर्षण सनात ३ दिवस कत्तलखाने (चिकन मटन) शॉप बंद ठेवणेबाबत.**

**ठराव क्र. :- ५६**

दि. २०/०८/२०११ च्या मा. महासभेमध्ये लक्षवेधीमार्फत मांडलेल्या सुचनेप्रमाणे पर्युषण पर्व काळामध्ये दि. २५/०८/२०११ ते दि. ०१/०९/२०११ या काळावधीमध्ये मांस, मटण, मच्छी विक्रीची दुकाने व कत्तलखाने बंद ठेवणेबाबत निर्णय झाला होता. त्यानुसार पुढील वर्षात देखील त्याचप्रकारे काळ, वेळ पाहून कत्तलखाने व मांस, मच्छी विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावीत असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- सौ. प्रभात पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | सिंह मदन उदितनारायण | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | पाटील शरद केशव | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ८ | कुरेशी याकुब ईस्माईल | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | मुंज वासुदेव भास्कर | | | |
| १७ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १८ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| १९ | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २० | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २१ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २६ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २७ | शेख सलिम दाऊद | | | |
| २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| ३० | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३१ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३२ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३३ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | | | |
| ३४ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| ३५ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३७ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३८ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | | | |
| ३९ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४० | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४१ | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४२ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४३ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४४ | टेरी पॉल परेरा | | | |
| ४५ | राजु यशवंत भोईर | | | |

ठराव बहुमताने मंजुर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०९/२०११
## (दि. २०/०८/२०११ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ५४ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १२/०८/२०११ (नगरसचिव कार्यालयास प्राप्त दि. १३/०७/२०११) रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका पर्यावरण अहवालाबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल सभेस गैरहजर असल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.२९ / ९ /२०११

विषय :- अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल महापालिकेतर्फे सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देवुन गौरविण्याबाबत.

ठराव क्र. ( ५० )

दि. २३/०९/२०११ रोजी भाईदर पुर्व विभागातील खारी गांव येथे लता बिल्डींग या इमारतीचे दोन स्लॅब कोसळुन झालेल्या अपघातस्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहचुन घडलेल्या दुर्घटने प्रंसगी अत्यंत गंभीर व तणावग्रस्त परिस्थितीत आपल्या प्राणांची पर्वा न करता अत्यंत निष्ठेने कर्तव्य बजावून चार व्यक्तींचे प्राण वाचविण्यास मदत केली आहे. तसेच मिरा भाईदर अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या तत्परतेमुळे जखमींवर वेळीच उपचार करणे शक्य झाले. मिरा भाईदर अग्निशमन दलाची सदरची कार्यवाही गौरवास्पद असुन त्यांना प्रोत्साहन म्हणुन त्यांनी कर्तव्य निष्ठेने पार पाडलेल्या त्यांच्या कर्तव्याकरिता मिरा भाईदर महानगरपालिकेतर्फे अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देवुन गौरविण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक:- शशिकांत ल. भोईर

अनुमोदक :- प्रेमनाथ मा. पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २९/०९/२०११.

प्रकरण क्र. ५५ :- दि. १५/०२/२०११, १७/०२/२०११, दि. ३०/०३/२०११ व दि. २०/०४/२०११ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ५८ :-

दि. १५/०२/२०११, १७/०२/२०११, दि. ३०/०३/२०११ व दि. २०/०४/२०११ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदन :- (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २९/०९/२०११

१३४

**प्रकरण क्र. (५६) : विकास कामांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र.** ५१ :

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) येथे शितलनगर हा ६९०.०० मीटर लांबीचा व १८.०० मीटर रुंदीचा विकास आराखडयातील रस्ता आहे. सदर रस्ता हा नादुरुस्त असून रस्त्यावर पावसाळयात पूर्णपणे पाणी साठत आहे. सदर रस्ता १० वर्षांपूर्वी विकासकामार्फत तयार करण्यात आलेला आहे. तेव्हापासून फक्त दुरुस्ती कामे करण्यात येतात. सद्यस्थितीत भुयारी गटार योजने अंतर्गत रस्ता खोदल्याने रस्त्याच्या मधोमध ८.०० मीटर रुंदीचे खडीकरण व ग्राउटींग करण्यात आलेले आहे. उर्वरीत रुंदीचा व डांबरीकरणाचा रस्ता तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु.६८,४८,३००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

२) मिरारोड (पूर्व) सिनेमॅक्स ते रामदेव पार्ककडे जाणारा रस्ता हा ४०० मीटर लांब व १८.०० मीटर रुंदीचा आहे. सदर रस्ता भुयारी गटार योजने अंतर्गत खोदल्याने सद्यस्थितीत रस्त्याच्या मध्यभागी ६.०० मीटर रुंदीचा खडीकरण व ग्राउटींग करण्यात आलेले आहेत. उर्वरीत रुंदीचा रस्ता खराब असून त्यावर खडीकरण व संपूर्ण रुंदीवर डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु.७२,१६,९००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) घोडबंदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ ते सी.एम.आय. कंपनीमार्फत नादुरुस्त झालेला असून ५५५.०० मीटर लांब व ९.०० मीटर रुंदीचा खडीकरण, ग्राउटींगसह डांबरीकरण करावयाचा आहे. त्याकरीता रु.६४,५१,७००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील तिन्ही रस्त्याच्या कामांकरीता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना ही महासभा प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे.

सुचक :- सही→ सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २९/०९/२०११



**प्रकरण क्र. (५७) : महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. ६० :

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असून राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडिल पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि. ३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देताना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

वरीलप्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे महारष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन १०९७/प्र.क्र.-२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असून, गेल्यावर्षी मा. महासभा दि. २२/१२/२०१० ठराव क्र. ६७ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- ,महापालिका शिक्षकांना रु. ५८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २०१०-११ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- |

126 134

सन २०११-१२ च्या अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरिता तरतुद लेखाशिर्ष “संकीर्ण” ‘फ’ (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे, तर शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकात महसुली (४) सानुग्रह अनुदान (दिवाळी) या लेखाशिर्षकाखाली एकूण १३.०० लाखाची तरतूद केलेली आहे. अशाप्रकारे एकूण १२३.०० लाखाच्या तरतूदीतून महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००९-१० | सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचाऱ्यांना देण्यांत आलेले अनुदान (२००९-१०) | |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४१ | रु. ५८३०/- | ८४,०१,०३०/- |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९९ | रु. ५८३०/- | ११,६०,१७०/- |
| ३ | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना | २ | रु. ३६३०/- | ७,२६०/- |
| ४ | संगणक चालक, लघुलेखक | ८७ | रु. ३६३०/- | ३,१५,८१०/- |
| ५ | बालवाडी शिक्षिका | ७ | रु. ११००/- | ७,७००/- |
| | | | एकूण | ९८,९१,९७०/- |

वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु.९५.६२ लाख खर्च झालेला आहे. सन २०१०-११ या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान गतवर्षाप्रमाणेच मंजूरी दिल्यास एकूण रक्कम रु.९८.९१ लाख खर्च अपेक्षित आहे. तरी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसह शिक्षकांस (संगणक चालक लघुलेखक बालवाडी शिक्षक) दिवाळी निमित्त सन २०१०-११ साठी गतवर्षीप्रमाणेच सानुग्रह अनुदानास ही सभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे.

सुचक :- (प्रभात पाटील)

अनुमोदक :- (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

१३५

मा. महासभा दि. २९/०९/२०११

**प्रकरण क्र. (५८) : मानधनावरील संगणक चालक/लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.**

**ठराव क्र. ६७ :**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यांत आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यांत आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकेमार्फत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्त्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखक यांची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाहीत. त्यामुळे संगणक चालकाचे काम मंजूर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद आहे. तद्नंतर मा. महासभा दि.२०/०३/२०१०, ठराव क्र.६५ अन्वये मंजूरी दिल्यानुसार संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि.१८/८/२०१० रोजी पाठविला होता परंतु त्यास अद्याप मंजूरी प्राप्त नाही.

मा. महासभा दि.२२/१२/२०१०, ठराव क्र.६८ अनुसार महापालिका मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु. ६,५००/- तसेच लघुलेखक यांना रु. ७,५००/- प्रति महिना ठोक मानधनावर दि.३१/११/२०१० पासून पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यांत आलेली असून सदरची मुदत दि.३०/१०/२०११ रोजी संपत आहे. महापालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखक यांची पदे मंजूर नाहीत. त्यामुळे महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत संगणक चालक यांना रु. ~~६~~ ८,५००/- तसेच लघुलेखक यांना रु. ~~६~~ ९,५००/- प्रति महिना ठोक मानधनावर दि.०१/११/२०११ पासून पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे. तसेच संगणक चालकांच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि.१८/६/२०१० रोजी पाठविला होता, त्यास अद्याप मंजूरी प्राप्त नाही त्याच पाठपुरावा चालू ठेवावा.

सुचक :- (सौ. प्रभात पाटील)

अनुमोदक :- (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २९/०९/२०११

**प्रकरण क्र. ५९ :-** **सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक १९/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.**
**मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे चालणाऱ्या लॉजींग बोर्डींगबाबत.**

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे लॉजींग-बोर्डींग चालविण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. या संदर्भात मा. महासभा दि. १६/०१/२००९ मध्ये लक्षवेधीद्वारे चर्चा होऊन अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी व यानंतर शहरामध्ये लॉजींग-बोर्डींगचे परवाने देवू नयेत, असे सर्व सदस्यांच्या मते ठरविण्यात आले. तसेच तत्कालीन मा. महापौरांनी तसे आदेश दिले. तसेच मा. पोलीस अधिक्षक, भा.प्र.से. ठाणे ग्रामीण यांनी जावक क्र. अशाप/क्र.आर/४०५/वे.व्यवसाय/५१२-२००८, दि. १३/०३/२००८ या पत्राद्वारे लेखी स्वरुपात महापालिकेला अनधिकृत लॉजींग-बोर्डींगची (२४) यादी देऊन त्यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ आणि नियम (एम.आर.टी.पी.ॲक्ट) कलम ५२,५३,५४,५५ व ५६ अन्वये कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश दिलेत.

तरी सुध्दा महानगरपालिकेने अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर कारवाई केलेली नाही. तसेच दि. १६/०१/२००९ नंतर २७ नवीन लॉजींग-बोर्डींगना नवीन परवाने दिले व परवाने देतेवेळी त्यातील बऱ्याचशा लॉजींग-बोर्डींग व्यवसायधारकांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर असुन शहरातील सामाजिक जीवन बिघडवणारी आहे. १६/०१/२००९ नंतरचे परवाने रद्द करावेत.

तरी अनधिकृत लॉजींग-बोर्डींग परवाना आस्थापनांवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी, त्यांचे परवाने रद्द करावेत. नळ जोडणी खंडीत करावी व रिलायन्स एनर्जीला वीज जोडणीसाठी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करावे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. शफिक अहमद सादत खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मे. सेव्हन इलेवन हॉटेल्स प्रा. लि. यांना मनपा जा.क्र. मनपा/परवाना/२४/२०११-१२, दि. २७/०४/२०११ अन्वये दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व या हॉटेल्ससाठी दिलेला विद्युत पुरवठा व पाणी कनेक्शन त्वरीत काढून टाकावे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरारोड व भाईंदरमध्ये अनधिकृत हुक्का पार्लरचेही परवाने रद्द करण्यात यावेत व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

उपरोक्त सुचनेत नमुद प्रस्ताव हा अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर कायम स्वरुपी प्रतिबंधात्मक कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच श्री. सुरेश येवले यांनी मिरा भाईंदर शहराचा प्रमुख काशिमिरा गावाकडे जाणारा छत्रपती शिवाजी महाराज मार्ग या प्रमुख मार्गालगत असलेल्या दोन्ही बाजु असलेल्या नऊ (९) फुट रुंद रस्त्यावर नव्याने किंवा जुनी अतिक्रमणे कायमस्वरुपी तोडण्याकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर दिलेल्या डिव्हीजनबेंच निर्णयाचे पालन करावे ही माझी सुचना आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. टेरी परेरा यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

हॉटेल स्वीट ड्रीम मिरारोड स्टेशन समोरील लॉजींग-बोर्डींग, रेड नाईट व रेड हॉर्स बार, दहिसर चेकनाका हॉटेल मंथरा ते पेणकरपाडा पर्यंत असलेले लॉजींग-बोर्डींग तसेच काशिमिरा परिसरातील व वर्सोवा पर्यंत असलेले सर्व लॉजींग-बोर्डींग व बार अधिकृत किंवा अनधिकृत? याबाबत चौकशी करुन अनधिकृत असल्यास सदर लॉजींग-बोर्डींगवर तातडीने कारवाई करुन परवाना रद्द करावा.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. कल्पना म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर परिसरात बेकायदेशीर ब्ल्यु फिल्म सेंटर चालु आहेत, त्यावर त्वरीत कारवाई होऊन त्यांचे परवाने रद्द करावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१२५ | १३७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २९/०९/२०११

**प्रकरण क्र. ६० :-** **भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट जंक्शन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे स्मारक उभारणेबाबत.**

**ठराव क्र. ६३ :-**

शहरात सन्मा. स्वातंत्र्यसैनिक व मान्यवर सत्पुरुष, राष्ट्रपुरुष ह्यांचे पतुळे बसवणे किंवा स्मारके उभे करण्याविषयी अनेक नगरसेवक व विविध सेवा समित्या ह्यांकडून प्रस्ताव येत असतात. मागण्या होत असतात. आपल्या कार्यालयात तसा पत्रव्यवहार झाला असेल. शहरात राष्ट्रपुरुष, स्वातंत्र्यसैनिक ह्यांची स्मारके व्हायला हवीत. परंतु, त्याचबरोबर त्यांची देखभाल होणे गरजेचे आहे. त्याच बरोबर त्यांची विटंबना होणार नाही ह्याची काळजी घेणे पण आवश्यक आहे. ह्याकरीता शहरात नगरसेवक व इतर संस्था ह्यांनी आणलेले प्रस्ताव एकत्र करुन ते सभेपुढे आणावे. तसेच स्मारकांची देखभाल व सुरक्षा ह्याच्यासाठीच्या उपाय योजना आखून, त्यासंबंधी कायदे/नियम बनवून सर्वसंपन्न प्रस्ताव मा. महासभेपुढे आणावा, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | वर्षा गिरधर भानुशाली | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | सिंह मदन उदितनारायण | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | पाटील शरद केशव | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | सुनिता शशिकांत भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | १५ | मिलन वसंत म्हात्रे | |
| १६ | वासुदेव भास्कर मुंज | | | |
| १७ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | | | |
| १८ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १९ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| २० | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २१ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २२ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २३ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलीम दाऊद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| ३० | नयना गजानन म्हात्रे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३२ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३३ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३५ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३७ | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३९ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | | |
| ४० | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ४१ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४२ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४३ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ४४ | टेरी पॉल परेरा | | | |

ठराव बहुमताने मंजूर
ठराव वाचून कायम करण्यांत आला.

महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. २९/०९/२०११

**प्रकरण क्र. ६१ :-** **महानगरपालिका क्षेत्रात नामकरण फलक लावणे व नामकरण केलेली नावांची दप्तरी नोंद घेणे.**

**ठराव क्र.६४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात वेळोवेळी रस्त्यांना व चौकांना नावे देण्याचे प्रस्ताव मंजुर केले आहेत. महानगरपालिकेने कोणत्या रस्त्यांना, चौकांना, कार्यालयांना कोणती नावे दिली आहेत, ह्याबाबत सर्वच सभासदांना माहिती नाही. त्यामुळे सभासद एकाच नावाची अनेकदा मागणी करीत असतात. त्यामुळे प्रशासनास विनंती आहे की, महानगरपालिका क्षेत्रात आत्तापर्यंत कोणत्या रस्त्यांना कोणते नाव दिले आहे, कोणत्या चौकाला कोणाचे नाव दिले आहे ह्याची संपूर्ण माहिती सभेपुढे ठेवण्यात यावी. त्यानंतर सभासदांचे नवीन नामकरणांचे प्रस्ताव स्विकारावेत. परिपूर्ण अशी माहिती सभागृहासमोर ठेवून नामफलकांची कार्यवाही करण्यात यावी, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | वर्षा गिरधर भानुशाली | मिलन वसंत म्हात्रे |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | सिंह मदन उदितनारायण | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | पाटील शरद केशव | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | सुनिता शशिकांत भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | वासुदेव भास्कर मुंज | | | |
| १७ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | | | |
| १८ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १९ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| २० | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २१ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २२ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २३ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलीम दाऊद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| ३० | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३१ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३२ | वैती नर्मदा यशवंत | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३४ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३५ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३६ | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३७ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३८ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | | |
| ३९ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४१ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४२ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ४३ | टेरी पॉल परेरा | | | |

ठराव बहुमताने मंजूर
ठराव वाचून कायम करण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

133 151

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २९/०९/२०११

ठराव क्र. ६५ :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये बरेचशे बदल झालेले असुन या बदलांबाबत, महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त परिपत्रक, सभाशास्त्र नियम, घटना दुरस्ती बदल, पर्यावरण तसेच विकास नियमावलीमध्ये बदल याबाबतचे जी.आर./आदेश हे शासकीय भाषेमध्ये व इंग्रजीमध्ये असतात. यामुळे या जी.आर./आदेशांचा बोध सभासदांना होत नाही. कायदेविषयक माहिति याचा देखील अर्थ लागत नाही. याकरिता या सर्वांचे ज्ञान व मार्गदर्शन तज्ञ मार्गदर्शकाकडून होणे आवश्यक आहे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत अभ्यास दौऱ्याचे आयोजन केल्यास तज्ञ मार्गदर्शकांमार्फत शासनाकडील जी.आर./परिपत्रक/आदेशांबाबत ज्ञान व मार्गदर्शन प्राप्त होईल.

सन २०१२ मध्ये महापालिकेची सार्वत्रिक निवडणुक प्रस्तावित असल्याने या अभ्यास दौऱ्यातून सन्मा. सदस्यांना बरीचशी माहिती उपलब्ध होऊन ज्ञानात भर पडणार आहे व सभा कामकाजात त्याचा उपयोग होणार आहे.

तरी सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून पुढील कार्यवाही सचिव विभागामार्फत करण्यात यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदन:- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात अला**

**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

152

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३१/१०/२०११.

प्रकरण क्र. ६२ :- दि. ३०/०५/२०११ व दि. २०/०६/२०११ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ६६ :-

दि. ३०/०५/२०११ व दि. २०/०६/२०११ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील

अनुमोदन :- (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३१/१०/२०११

**प्रकरण क्र. ६३ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांच्या नेमणूकीकरिता तसेच स्थायी समितीच्या दोन (२) सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये दोन (२) सदस्यांची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.

२) श्री. दिनेश दगडू नलावडे — २) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३) श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे — ४) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
५) श्रीम. सुधा वासुदेव व्यास — ६) श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा
७) श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे — ८) श्री. मोहन महादेव जाधव

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे

१) श्रीम. पांडे स्नेहा शैलेश — २) श्री. दुबे रामनारायण एस.

**ठराव क्र. ६७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदयांपैकी निम्मे आठ सदस्य माहे ऑक्टोबर २०११ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत. तसेच तीन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना संयुक्त लोकशाही आघाडीचे ५, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २, व अपक्ष १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. तसेच भारतीय जनता पक्षाच्या २ व संयुक्त लोकशाही आघाडीच्या १ अशा एकुण तीन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजिनामा दिलेल्या तीन सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शफिक अहमद सादत खान | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. जुबेर इनामदार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्री. अनिल दिवाकर सावंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. मधुसुदन पुरोहित | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. नयना म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. बर्नड डिमेलो | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ७. | श्रीम. नर्मदा वैती | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | श्री. मोहन जाधव | अपक्ष |

स्थायी समिती सदस्या श्रीम. मुसर्रतबानो शेख यांनी त्यांचा स्थायी समिती सदस्य पदाचा राजिनामा दिलेला आहे. यापूर्वी राजिनामा दिलेले दोन सदस्य व श्रीम. मुसर्रतबानो शेख असे एकुण स्थायी समितीच्या तीन (३)

सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्यांची उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक करणेत येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | भारतीय जनता पक्ष |
| २. | श्रीम. कल्पना म्हात्रे | भारतीय जनता पक्ष |
| ३. | श्रीम. मर्लिन डिसा | संयुक्त लोकशाही आघाडी |

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर तथा पिठासीन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

137
145

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ३१/१०/२०११.**

**प्रकरण क्र. ६४ :-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.**

**ठराव क्र. ६८ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. १७/१०/२००७ ठराव क्र. ६ अन्वये वृक्षप्राधिकरण समिती गठित करण्यात आलेली होती. त्यामध्ये एकूण सदस्य संख्या १५ असावी असे ठरविण्यात आले आहे. नगरविकास विभागाकडील पत्र क्र. टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र. १९३/२००६/नवि-११, दि. १४ डिसेंबर २००९ अन्वये वृक्ष प्राधिकरणावर अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत अशासकीय संस्थेची सक्रिय सदस्य असेल तसेच तिला वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि वृक्ष संरक्षण इत्यादी यामध्ये रुची असेल आणि तसेच तीला या क्षेत्रातील किमान १० वर्षाचा अनुभव प्राप्त असेल असा प्रतिनिधी नामनिर्देशित केलेला असेल व एक सदस्य हा या समितीचा अध्यक्ष असेल. कलम ३(२) अन्वये या समितीचे अध्यक्ष हे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त असतील.

यापूर्वी वृक्ष प्राधिकरण समितीवर तौलानिक संख्याबळानुसार संयुक्त लोकशाही आघाडी ६+१ नामनिर्देशित सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३, भारतीय जनता पार्टी २, शिवसेना १ व अपक्ष १ अशी सदस्य नेमणूक केलेली होती.

मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२८, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य वृक्ष प्राधिकरण समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

त्यानुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. पाटील उमाताई शाम | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. वेतोस्कर राजेश शंकर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. पुजारी कांचन शेखर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. कल्पना हरिहर ठाकूर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. प्रमोद जयराम सामंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ९. | श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | श्रीम. मिरादेवी यादव | भारतीय जनता पक्ष |
| ११. | श्रीम. सिसीलीया बावीघर | भारतीय जनता पक्ष |
| १२. | श्री. अनंत रामचंद्र पाटील | शिवसेना |
| १३. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | अपक्ष |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**नामनिर्देशित सदस्याची नेमणुक पुढील महासभेमध्ये करण्यात येईल. गठित झालेली समिती आपले कार्य / कामकाज सुरु ठेवील.**

**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३१/१०/२०११

**प्रकरण क्रमांक ( ६५ )** : महापौर चषक आयोजित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक** ( ६९ )

मिरा भाईंदर शहरातील शालेय विदयार्थी, नागरीक व वरीष्ठ नागरीक यांच्या सहभागाने त्यांना प्रोत्साहन देणेसाठी तसेच शहरात उत्साहाचे व खेळाचे वातावरण निर्माण करण्याकरीता महापौर चषक क्रिडा स्पर्धा करण्याची आवश्यकता आहे.

सदर महापौर चषक स्पर्धेचे आयोजन करणेकरीता मा. महापौर, यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी व अधिकारी यांची एक समिती नेमून खेळाचे प्रकार ठरविण्यास व तारखा निश्चित करण्यास रु. २०.०० लक्ष खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर स्पर्धेकरीता सर्व कामे जाहीर निविदा मागवून करावी तसेच रोख बक्षिसे देखिल देण्यात यावी.

**सुचक :-** सौ. प्रभात पाटील

**अनुमोदन :-** (आसिफ शेख)

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

CHM/DK/2011-12/MT 7

# मिरा भाईंदर महानगरपालिका

१४७

## मा. महासभा दि. ३१/१०/२०११.

प्रकरण क्र. :- ६६ दि. - **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल पेमेंट किऑक्स प्रकल्पाद्वारे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व स्थानिक संस्था कर वसुली कार्यपद्धती राबविणेबाबत...**

ठराव क्र. :- ७०

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत मालमत्ता कर, पाणीपट्टी कर वसुली इ. करवसुलीची कार्यवाही महानगरपालिकेच्या विविध वसुली क्षेत्रातील कार्यालये व प्रभाग कार्यालयांतून करण्यात येते. त्यापैकी प्रभाग कार्यालय क्र. २, ३, व ४ रेडिओ फ्रिक्वेन्सी डिवाईस मार्फत संगणकीय आज्ञावलीशी जोडलेले आहेत. सदर कार्यालयांतून संगणकाद्वारे वसुली करुन नागरीकांना संगणकीकृत पावत्या देण्यात येतात.

परंतु प्रभाग कार्यालय १ व ग्रामीण भाग जसे चेणे, वर्साचे, उत्तन, डोंगरी, राई, मुर्धे इ. ठिकाणी आजतागायत संगणकीकृत वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करता आले नाही. करिता मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे किओस्क (KIOSK) प्रणाली यंत्रणा राबविणेकरिता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला. सदर यंत्रणा राबविणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही या टिप्पणी व्दारे प्रस्तुत करण्यात येत आहे.

१. Franchisee ने नोंदणी करणेकामी त्यांचेकडुन एक रकमी नोंदणी फी वसुल करण्यात येईल.

२. महानगरपालिका सदर प्रणाली कार्यान्वित करणे करीता Franchisee अधिकृत करेल.

३. सदर Franchisee कडून प्रथम टप्प्यामध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुली करणेत येईल.

४. सदरची KIOSK ची संख्या ही एकुण प्रभागाची (वॉर्ड) जनसंख्या व त्याचे एकुण क्षेत्रफळ यावर आधारित राहील.

५. सदर यंत्रणा राबविणेकरिता अधिकृत करण्यात आलेल्या Franchisee कडे कमीत कमी एक संगणक, इंटरनेट सुविधा व एक प्रिंटर यांची आवश्यकता आहे. तसेच स्वतःची जागा असणे आवश्यक राहील. परंतु Franchisee कडे स्वतःचा दुकानगाळा असेल तर अस्तित्वातील दुकानगाळ्यात देखील सदर Setup करता येईल.

६. सदर यंत्रणा राबविणेकरिता अधिकृत करण्यात आलेल्या Franchisee करीता महानगरपालिकेव्दारे स्वतंत्र लॉगीन आयडी ची सोय करुन देण्यात येईल. पासवर्ड सुरक्षिततेची जबाबदारी त्याची स्वतःची राहील.

७. याकरीता सदर Franchisee महापालिकेकडे अनामत रक्कम जमा करेल.

८. याकरीता सदर Franchisee ला प्रत्येक बीलाच्या रु. २००० पर्यंत रकमेवर ०.५ % सेवा आकार व रु. २००० चे वरील रकमेवर रु. २५ इतका सेवा आकार थेट देयक भरणाऱ्याकडून घेता येईल.

९. Franchisee ने जमा केलेल्या अनामत रकमेतून त्यांचेजवळ जमा झालेली कराची रक्कम संगणक प्रणालीद्वारे वजा होईल व प्रत्येक वेळेस वसुल करावयाचे रकमेपोटी आगाऊ अनामत रक्कम जमा करणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.

१०. वॉर्ड किंवा वॉर्डच्या समुहाची लोकसंख्या ~~[illegible]~~ ९५००० वा त्याहून जास्त असेल अशा ठिकाणी दोन KIOSK प्रस्तावित केले जातील. भौगोलिक दृष्ट्या सलग वॉर्डची ~~[illegible]~~ ९५००० लोकसंख्येपर्यंत एक KIOSK प्रस्तावित करण्यात येत आहे.

११. Franchisee कडे जमा होणाऱ्या कराचा भरणा हा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन (ONLINE PAYMENT) प्रणालीशी निगडीत असेल. याकरीता सध्या अचल (STATIC) असलेले महानगरपालिकेचे संकेतस्थळ हे चल (DYNAMIC) स्वरुपात करणे आवश्यक आहे.

१२. कर भरणा व्यतिरीक्त जन्म व मृत्यू दाखले च अन्य सुविधांकरीता Franchisee व्दारे माफक सेवा आकार घेणेत येईल. हा आकार महानगरपालिकेने विहीत केलेल्या दरांव्यतीरिक्त असेल. प्रती प्रमाणपत्र हा आकार रु. ५/- इतका असेल.

१३. सदस्यांच्या कामाकरिता व्यक्तिंना प्राधान्य देण्यात यावे.

वरील प्रमाणे प्रस्तावास हि सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- प्रभात पाटील

अनुमोदक:- (आसिफ शेख)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा.महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका १५१

## मा. महासभा दि. ३१/१०/२०११

प्रकरण क्र. (६७) : सार्व. जागा व मोकळया जागेचा व्यावसायिक वापर होत असल्याने त्यावर कर आकारणी करणेसाठी वार्षिक भाडे मुल्य दरास फेर विचार होणेबाबत.

संदर्भ : मा. महासभा ठराव क्र. २७, दि.२०/०२/२००८

ठराव क्र. ७९ :

महानगरपालिका हद्दीत मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी मिरा-भाईंदर शहरामध्ये ६ विभाग करण्यांत आले असून मालमत्ता, इमारतीच्या प्रकारानुसार भाडेमुल्य दर मा. महासभा ठराव क्र. ४३ दि.२१/०८/२००६ अन्वये मंजूर दर निश्चित करण्यांत आलेले आहेत. (सोबत ठराव प्रत) महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने ज्या मोकळया जागांचा व्यावसायिक वापर होत आहे व अन्य व्यावसायिक वापर करीत असलेल्या मोकळया जागेवर कर आकारणी करण्याच्या दृष्टीने वार्षिक भाडेमुल्याचे सुधारित दर (वाढीव) निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव व मा. महासभा प्रकरण क्र. २८ दि. २०/०२/२००८ रोजी विचारार्थ ठेवणेत आले असता ठराव क्र. २७ दि. २०/०२/२००८ अन्वये खालीलप्रमाणे वार्षिक भाडेमूल्य सुधारित दरास मंजूरी देण्यांत आली आहे. (सोबत ठराव प्रत)

तथापि महानगरपालिकेने विविध विकास कामांकरीता कर्ज घेतले असून सदर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम व बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे डी.पी.आर. मंजूर होण्यापूर्वी केंद्र शासन व राज्य शासन महानगरपालिका यांच्यात त्रिपक्षीय समंजस्य करार (एम.ओ.यु.) झालेले आहेत. त्यात कराधन पध्दतीत सुधारणा करण्याच्या अटीचा समावेश आहे. त्यामुळे वरील ठरावानुसार व्यावसायिक वापरातील मोकळया जागांकरीता निश्चित करण्यांत आलेल्या दरात सुधारणा करणे गरजेचे असून सदर दरात रु. १.०० प्र.चौ.फु. ऐवजी रु. ~~१०~~ ५/- प्र.चौ.फु. एवढी वाढ केल्यास याद्वारे महानगरपालिकेस चांगले उत्पन्न मिळू शकेल.

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशिल | वार्षिक भाडे मुल्याकरीता सध्याचे मंजूर दर (प्र.चौ.फु., प्र.महिना) | प्रस्तावित करावयाचे दर (प्र.चौ.फु., प्र.महिना) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | हॉटेल, सार्व. हॉल,मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्व. जागा, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या जागा. | रु. १.०० प्र.चौ.फुट | रु.५.०० प्र.चौ.फुट |

वरीलप्रमाणे (कॉलम ४ नुसार) भाडेमूल्याच्या दरास ही सभा मंजूरी देत आहे. ही वाढ २०१२ पासून लागू करण्यात येईल.

सुचक :- (सही) सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- (सही) (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

(सही)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका १५०

मा. महासभा दि. ३१/१०/२०११

**प्रकरण क्र. ६८ :- मिरा भाईदर महानगरपालिकेस "अतिरिक्त आयुक्त" पद मंजूरीस व प्रस्ताव शासनास पाठविणे बाबत..**

ठराव क्र. :- ७२

दि. ४ मे २००६ शासन निर्णयान्वये शासनाने महानगरपालिकेकरिता आकृतीबंध निश्चित केलेला आहे. त्या आकृतीबंधानुसार फक्त "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिकांसाठी "अतिरिक्त आयुक्त" हे पद समाविष्ठ आहे. तर "ड" वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये "अतिरिक्त आयुक्त" हे पद समाविष्ठ नाही.

महानगरपालिकेत शासनाच्या विविध योजना, विविध प्रकल्प राबविले जात असून त्या अंतर्गत सुधार कार्यक्रमही राबविले जातात. या प्रकल्पांची योग्य रितीने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्तांना पार पाडावी लागते. तसेच केंद्र शासन /राज्य शासन मार्फत विविध योजनेअंतर्गत महानगरपालिकांना निधि उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी योग्य रीतीने व वेळेत करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्तांची आहे तसेच या प्रकल्पाअंतर्गत केंद्र शासन/राज्य शासन स्तरावर होणाऱ्या बैठकाना आयुक्तांना हजर रहावे लागते अश्यावेळी महानगरपालिकेची दैनंदिन विविध कामे पार पाडण्यासाठी आयुक्तांना कामकाजात मदतनीस /सहाय्यक म्हणून अतिरिक्त आयुक्त दर्जाच्या वरीष्ठ अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. तसेच आयुक्तांचे रजा कालावधीत सुध्दा अतिरिक्त कार्यभार देताना अडचणीचे होते म्हणून या महापालिकेत सुध्दा अतिरिक्त आयुक्त पद निर्माण होणे आवश्यक आहे.

अतिरिक्त आयुक्त पद महानगरपालिका आस्थापनेवर मंजूर करणे बाबत शासन निर्णय क्र. एमसीओ१२११/प्र.क्र.१४/नवि १४ दि. २८ मार्च २०११ अन्वये "ड" वर्ग महानगरपालिकेच्या आकृतीबंधात समाविष्ठ करण्यात आले आहे त्यामुळे मिरा भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पुढील नमुद तपशिल प्रमाणे पद मंजुरीस मान्यता देण्यात येते.

| सेवा संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत | शैक्षणीक व इतर अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकिय सेवा (श्रेणी-१) | अतिरिक्त आयुक्त | प्रतिनियुक्तीने | शासन निर्णय क्र.संकिर्ण -१००५/वर्गीकरण/प्र.क्र. ३७९/०५/नवि-२४ दि. ४ मे २००६ नुसार शासनाच्या नगरविकास विभागाचा अधिकारी प्रतिनियुक्तीवर |

तरी शासन निर्णय दि. २८ मार्च २०११ अन्वये "ड" वर्ग महानगरपालिकेस अनुज्ञेय असेलेले अतिरिक्त आयुक्त हे पद या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजूर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सन २०११ मधील आस्थापना खर्च ३५ टक्के आहे. "अतिरिक्त आयुक्त" या पदासाठी वार्षिक वेतनाचा खर्च रु. ५,७३,६२४/- एवढा होणार असून पद मंजूरीमुळे ०.०३ टक्के एवढी आस्थापना खर्चात वाढ होणार आहे. या वाढीव खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत असून पद मंजूरीचा प्रस्ताव शासनास पाठविणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

सूचक (सौ. प्रभात पाटील)

अनुमोदन (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचुन कायम करण्यात आला.

**महापौर**
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.२१/१०/२०११ १४५(ग)

प्रकरण क्र. ( ६९ ):- महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविणेबाबत...

संदर्भ:- १) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०, दि.३१/०८/२००९

ठराव क्र. ( ७३ ) :-

मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी संदर्भिय पत्रान्वये अग्निशमन सेवेसाठी फी आकारणे, आग सुरक्षा निधी चालु करणे व पदनिर्मिती करणे याबाबत प्रस्ताव मागविला आहे.

मा. महासभा दि १७/०३/२००७ प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. ९३ अन्वये अग्निशमन सेवेसाठी फी आकारण्यात येते तसेच आग सुरक्षा निधी नावाने स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता आवश्यक वाहनांचा तपशिल पुढील प्रमाणे

तक्ता "अ":-

| वाहने | आवश्यक वाहने | उपलब्ध वाहने | तफावत |
|---|---|---|---|
| फायर टेंडर | ९ | ६ | ३ |
| जीप | २ | २ | -- |
| एकुण | ११ | ०८ | ०३ |

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र. क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये आवश्यक अग्निशमन स्थानकांचा तपशील पुढीलप्रमाणे

तक्ता "ब":-

| आवश्यक स्थानके | उपलब्ध स्थानके | तफावत |
|---|---|---|
| ५ | ३ | २ |

सद्य:स्थितीत सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता **शासन निर्णय, नगर विकास विभाग** क्र. अशस-१४०७/३६०/प्र. क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ **अन्वये** उपरोक्त नमुद तक्ता **"अ"** व **"ब"** नुसार **आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचा तपशिल पुढील प्रमाणे**

तक्ता क्र. "क" (तक्ता क्र. १ ते २)

| अ. क्र. | पदाचे नाव | आवश्यक कर्मचारी | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | पदनिर्मीती करिता आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ | - | ०१ | - |
| २ | उप मुख्य /सहाय्यक अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ | ०१ | - | - |
| ३ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ५ (निवास व्यवस्था असल्यास) | ०३ | - | ०३ | ०२ |
| ४ | उप अग्निशमन अधिकारी | ५ (निवास व्यवस्था असल्यास) | ११ | ०९ | ०२ | - |
| ५ | प्रमुख अग्निशामक - विमोचक | ३० (२७ + १०%) | २० | १४ | ०६ | १० |
| ६ | चालक यंत्रचालक | ५९ (५४ + १०%) | २३ | १७ | ०६ | ३६ |
| ७ | चालक | ०७ (०६ + १०%) | - | - | - | ०७ |
| ८ | अग्निशामक-विमोचक | २१५ (१९५ + १०%) | ४६ | ४५ | ०१ | १६९ |
| | एकुण | ३२३ | १०५ | ८६ | १९ | २२४ |

१४५१/१२

उपरोक्त तक्त्या क्र. "ब" मध्ये नमुद केल्यानुसार ०२ अग्निशमन स्थानकांची तफावत निदर्शनास येत आहे सदर पैकी आरक्षण क्र. १३२ व ॲमिनिटी ओपन स्पेस मौजे नवघर सर्वे क्र. ४३० पै. ४३१, ४३२, ४३३पै. या दोन ठिकाणी अग्निशमन स्थानके उभारणे प्रस्तावित आहेत. सदर बाबत आरक्षण क्र. १३२ मौजे भाईदर तळ + १ पार्ट + २ मजले अग्निशमन इमारत बांधणेकामी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार रू. १,३२,१०,३०४/- एवढा खर्च अपेक्षित आहे. अग्निशमन स्थानकांच्या सदर नमुद खर्चाच्या रक्कमेच्या महानगरपालिकेच्या हिश्शाची रक्कम (६५%) एवढी वार्षिक अंदाजपत्रकात तरतुद करावयाची आहे तसेच महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरिल २० चौ. कि. मी. क्षेत्रात अग्निशमन सेवा मोफत उपलब्ध करुन द्यावयाची आहे तथापी वाणीज्य व औद्योगिक आस्थापनाकरीता मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दि. १७/०३/२००७ अन्वये अग्निशमन फि आकारणी करण्यास मान्यता असावी.

उपरोक्त तक्ता क्र. "क" मध्ये नमुद केल्यानुसार सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता व शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र. क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये २२४ पदांची आवश्यकता आहे सन २०१०-११ या वर्षामध्ये अंदाजपत्रकानुसार तसेच लेखा विभागामधील माहितीनुसार रु. ९८५.०६ लाख रक्कम जमा असुन त्यापैकी रु. २१७.०० लाख एवढा खर्च झालेला आहे. तसेच सदर पदनिर्मितीकरिता जो काही खर्च होणार आहे तो अग्निशमन दलाकडून वसुल केला जाणाऱ्या महसुलातून केला जाणार आहे.

तरी वरील बाबी लक्षात घेता हि मा. महासभा

१) अंदाजपत्रकानुसार अग्निशमन स्थानक बांधणेकामी बांधकाम विभागामार्फत तयार केलेल्या अंदाज पत्रकास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

२) सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात अग्निशमन स्थानक बांधण्याकरिता रु. १,३२,१०,३०४/- ऐवढया रक्कमेच्या ६५ % ऐवढया रक्कमेची तरतूद करणेस मा. महासभा मंजूरी देत आहे.

३) महानगरपालिका हद्दीबाहेर २० चौ. कि. मी. क्षेत्रात मोफत अग्निशमन सेवा उपलब्ध करून देण्यास तसेच वाणिज्य व औद्योगिक तसेच रस्त्यावरील वाहन जळीत प्रसंगी मा. महासभा ठराव क्र. ९३ दि. १७/०३/२००७ नुसार अग्निशमन फि आकारणेस हि मा. महासभा मंजूरी देत आहे.

४) गोषवाऱ्यात नमुद पदनिर्मीतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस हि मा. महासभा मंजूरी देत आहे.

५) सोबत जोडलेल्या ठरावाच्या मसुदयास हि मा. महासभा मंजूरी देत आहे.

६) १०० रू. च्या स्टॅम्प पेपरवर शासनास हमीपत्र लिहून देण्यास हि मा. महासभा मंजूरी देत आहे.

सुचक :- (सौ. प््रभात पाटील)

अनुमोदक :- (आसिफ शेख)

महापौर

१५८ (३)

# ठरावाचा मसुदा

विषय :- राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदांमधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" राबविणेबाबत

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र. क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये शासनाने राज्यातील महानगरपालिका मधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" राबविणेबाबत मान्यता दिलेल्या शासन निर्णयावर चर्चा होवुन मा. महासभा पुढील बाबींना मान्यता देत आहे.

१) महानगरपालिकेने महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार वरिल योजनेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिका स्वतःच्या क्षेत्राबाहेरिल २० चौ. कि मी. क्षेत्रात विनामुल्य अग्निशमन सेवा उपलब्ध करुन देण्यास तयार असून त्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी सुमारे एक ते दीड एकर जमिनीची आवश्यकता असून महानगरपालिकेच्या नावे उपलब्ध असलेल्या आरक्षण क्र. १३२ येथील १३७५.७२ चौ. मी. जागा महानगरपालिका अग्निशमन केंद्रासाठी उपलब्ध करुन देत आहे. तसेच सर्व्हे क्र. ४३० पै. ४३१, ४३२, ४३३पै. मौजे नवघर येथील १३२७.७७ चौ. मी. जागा ही ॲमिनिटी ओपन स्पेस म्हणून विकासक स्व खर्चाने अग्निशमन स्थानक उभारुन महापलिकेस उपलब्ध करुन देणार आहेत. या ठिकाणी अग्निशमन केंद्र बांधण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

३) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानात सहभागी होण्यासाठी आवश्यक तो सविस्तर प्रकल्प अहवाल (Detial Project Report) आवश्यक त्या कागदपत्रांसह भरून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या संदर्भातील हमीपत्र (Undrttaking) भरून देण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

४) महानगरपालिका वरील दि. ३१/०८/२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (I) अ (i) नुसार महानगरपालिका आपल्या हिश्श्याची रक्कम भरण्याचे मान्य करीत असुन त्या रकमेची तरतुद अर्थसंकल्पात करून तसे प्रमाणपत्र D.P.R. सोबत जोडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महानगरपालिका शासनाने विहीत केलेल्या सुत्रानुसार अनुदान उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिका अग्निशमन केंद्र २४ तास ३ पाळीमध्ये चालु ठेवण्यसाठी वरील शासन निर्णयातील परिशिष्ट –ड (भाग - २) नुसार आवश्यक ते मनुष्यबळ उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. मनुष्यबळावर येणाऱ्या आवर्ती खर्च महानगरपालिका करण्यास तयार आहे.

६) महानगरपालिका वरील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (I) अ (V) (२) नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसुची –दोन मधील भाग-एक व दोन नुसार फी आकारणी बंधनकारक असून महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दि. १७/०३/२००७ अन्वये अग्निशमन फि आकारणी करीत आहे. तसेच वरील अधिनियमाच्या कलम २५ नुसार आग सुरक्षा निधी (Fire Proteciton fund) स्थापन करणे बंधनकारक आहे व त्यानुसार बँक ऑफ बडोदा या बँकेत आग सुरक्षा निधी खाते उघडण्यात आले आहे.

७) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या अनुदानातून अग्निशमन वाहन व सहउपकरणे शासनामार्फत निश्चित करण्यात येत असलेल्या दरकरारानुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) अग्निशमन वाहनाचा वापर केवळ अग्निशमन व विमोचन या कार्यासाठीच करण्यात यावा व अग्निशमन वाहनाचा शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०८/४३५/नवि -२४, दि. १७/०८/२००८ नुसार गैरवापर करण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

९) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ दि. ०६/१२/२००८ पासुन व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ दि. २३/०६/२००९ मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१/०१/२०१० पासुन लागू झाले असुन त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

अग्निशमन अभियान राबविणेकामी हि मा. महासभा उपरोक्त नमुद अटीशर्तीस मान्यता देत आहे.

सुचकः- सौ. प्रभात पाटील    अनुमोदक :- श्री. आसिफ शेख

सही/-

महापौर

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ३१/१०/२०११

प्रकरण क्र ७० :- सन्मा. सदस्य श्री. आसिफ गुलाब शेख यांचे दिनांक २०/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दि. ०१/०६/१९९५ पूर्वीच्या धोकादायक इमारतींना वाढीव चटईक्षेत्र देणेकरीता मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

(सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३१/१०/२०११

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये प्रस्ताव )

**प्रकरण क्र. ७१ :-** **जागतिक पोलिस स्पर्धेत ३ सुवर्णपदक विजेत्या खेळाडू कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांचा यथोचित सन्मान करुन रोख पारितोषीक देणेबाबत.**

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाटेबंदर, उत्तन, भाईंदर (प.) येथील रहिवाशी व रेल्वे पोलिस दलामध्ये उपनिरिक्षक या पदावर कार्यरत कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांनी माहे सप्टेंबर २०११ मध्ये न्युयॉर्क (अमेरिका) येथे आयोजित जागतिक पोलिस आणि फायर गेम्स स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करताना १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक तसेच ४ X १०० मीटर रिले स्पर्धेमध्ये सुवर्णपदक जिंकलेली आहेत. या स्पर्धेमध्ये धावण्याच्या सर्व प्रकारामध्ये सुवर्णपदक जिंकुन कुमारी हेमा नाझरेथ भंगा यांनी आपल्या देशासोबत महाराष्ट्र राज्य व मिरा भाईंदर शहराचे संपूर्ण जगामध्ये नाव उज्वल केले आहे. तसेच कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन १२ सुवर्ण, ६ रौप्य व ३ कांस्य पदके अशी एकूण २१ पदके जिंकलेली आहेत. करिता कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्या मिरा भाईंदर शहरातील रहिवाशी असल्याने त्यांना योग्य ते रोख पारितोषीक देऊन यथोचित सत्कार करणे आवश्यक आहे. तसेच मा. स्थायी समिती सभा दि. १३/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांचे अभिनंदन केलेले आहे.

तरी कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांना महानगरपालिका सर्वसाधारण फंडातून (जनरल फंड) रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) रोख पारितोषीक देवुन पूढील महासभेत त्यांचा जाहिर सत्कार करणेत यावा असा मी ठराव मांडीत आहे.

सुचक :- 

अनुमोदन :- 

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

148 756

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.३१/१०/२०११.

## ।। ठराव ।।

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण २ (१) (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्र. ७१(अ):- भाईंदर (पूर्व ) व भाईंदर (पश्चिम) भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वमार्ग छेदून टाकावयाच्या कामाबाबत प्रकरण क्र. २९ ठराव क्र. ३० मा. महासभा दि. ३०/५/२०११ मध्ये दुरूस्ती करणेबाबत.

ठराव क्र. ७५

भाईंदर (प.) येथील ५० तासांवर गेलेला पाणी पुरवठा परिस्थितीत सुधारणा करणेसाठी पाण्यासाठीच्या १४०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे काम महानगरपालिकेने सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजूर केलेल्या निविदाधारकांकडून रेल्वे रुळाखालून टाकण्याचे काम मे. घई कंस्ट्रक्शन प्रा. लि. पुणे यांचेकडून करून घेण्यास व रेल्वे परवानगी शुल्क तसेच याकामासाठी तांत्रिक सल्लागार मे. राईटस् लि. यांची बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे नेमणूक करणे यासह रेल्वे परवानगी शुल्क भरणे इत्यादी पोटी येणारा रु.४,९७,३८,४८५/- एवढया खर्चास मा. महासभा ठराव क्र . ३० दि. ३०/०५/२०११ रोजी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

वस्तुस्थिती पाहता सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजूर केलेल्या निविदेअंतर्गत कामांच्या अंदाजपत्रकात रेल्वे क्रॉसिंगसाठी लागणाऱ्या एम.एस. पाईपलाईन टाकणे संबंधीत बाबींचा अंतभार्व नाही. त्यामुळे सदर काम करताना अतिरीक्त बाबी (Extra Item) होणार आहे व महानगरपालिकेस अतिरीक्त खर्च होणार आहे. त्यामुळे सदर रेल्वे क्रॉसिंगचे काम सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजुर असलेले निविदे अंतर्गत न करता स्वतंत्र निविदा मागविण्यास मान्यता मिळावी. जेणेकरुन सदर काम सुधारीत अंदाजपत्रकानुसार विहीत वेळेत पुर्ण होणे शक्य होईल.

तरी उपरोक्त नुसार मे. घई कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिलेला कार्यादेश रद्द करून रेल्वे क्रॉसिंगच्या कामाची स्वतंत्र निविदा मागविण्यास व सदर ठरावामध्ये दुरूस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील　　अनुमोदक :- Mrs Catleen A. Pereira

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

149 | 157

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/११/२०११.

प्रकरण क्र. ७२ :- दि. २०/०७/२०११ व दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ७६ :-

दि. २०/०७/२०११ व दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील

अनुमोदन :- (आसिफ सेख)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. ११/११/२०११

प्रकरण क्र. (७३) : मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्तेच्या पट्टीयोग्य मुल्याच्या (Ratable Value) आधारे बसविता येणाऱ्या मालमत्ता कराच्या पध्दतीऐवजी मालमत्तेच्या भांडवली मुल्यावर (Capital Value) आधारित मालमत्ता कर प्रणालीची अंमलबजावणी करणेबाबत.

ठराव क्र. ७७ :

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत मा. महासभा ठराव क्रमांक ६८, दि.३१/०३/२०१० अन्वये सर्वसाधारणपणे निवासी वापर असलेल्या मिळकतींना ४२% पर्यंत व बिगर निवासी वापर असलेल्या मिळकतींना ५६% पर्यंत दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कराचे नांव | कराचे दर | |
|---|---|---|---|
| | | निवासी | बिगर निवासी |
| १ | घरपट्टी | ३०% | ३०% |
| २ | वृक्षकर | १% | १% |
| ३ | मनपा शिक्षण कर | २% | २% |
| ४ | मनपा अग्निशमन कर | १% | १% |
| ५ | मलप्रवाह सुविधा लाभकर/विशेष स्वच्छता कर | ८% | ८% |
| | **शासन कर** | | |
| ६ | शिक्षण कर | १% ते ६% | २% ते १२% |
| ७ | रोजगार हमी कर | --- | १% ते ३% |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध विकास कामांकरीता अनेक कर्जे घेतली आहेत हे खर असले तरी पाणी आणि आरोग्य हया दोन सुविधा नागरिकांना संतोष देण्या इतपत आपण देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. तरी देखील सन २०१०-११ मध्ये आपण मलप्रवाह सुविधा लाभ कर आणि विशेष स्वच्छता कराच्या रुपात प्रत्येकी ८% वाढ केली आहे. भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणालीचा महानगरपालिकेस पूर्णपणे अभ्यास झाल्याचे गोषवाऱ्यातून सिध्द होत नाही. तसेच ही प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेने अवलंबल्याचे दिसत नाही.

नागरिकांना सोयी सुविधा पुरवण्याच्या बाबतीत महानगरपालिका कमी पडत असताना भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणे हे वस्तूस्थितीला धरुन होणार नसल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

154

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/११/२०११

प्रकरण क्र. (७४) : मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप-आयुक्ताची पदे मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.

ठराव क्र. ७८ :

शासन निर्णय दि.३१ ऑक्टोबर २००२, अन्वये उपायुक्तांची तिन पदे मंजूर आहेत परंतु शासन परिपत्रक दि.०४ मे २००६ अन्वये "ड" वर्ग महानगरपालिकेस निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार दोनच उपायुक्त पदे निश्चित केलेली आहेत. सदर दोन्ही पदे भरलेली असून एक पद शासनाकडून प्रतिनियुक्तीने व एक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त कार्यरत आहेत. त्यामुळे तिन मंजूर पदांपैकी एक उपायुक्तांचे पद दि.०४/०५/२००६ च्या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने भरलेले नाही. यामुळे सदरचे मंजूर पद रद्द झालेले आहे अशी धारणा असून ती पुर्नजिवीत करणेस तसेच उपायुक्ताचे नव्याने एक पद मंजूर करणे आवश्यक नाही तसेच महानगरपालिकेच्या सन-२०११ मधील आस्थापनेवरील खर्च ३५ टक्के आहे. हयापेक्षा अधिक खर्च आस्थापनेवर करणे उचित वाटत नाही, त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

सुचक :- (सही) सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- (सही) (आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

(सही)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ११/११/२०११



प्रकरण क्र. ७५ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ग्रंथपाल पद मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.

(सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/११/२०११

167

प्रकरण क्र. ७६ :- जागतिक पोलीस स्पर्धेत तीन सुवर्ण पदक विजेत्या खेळाडू कु. हेमा नाझरेथ भंगा ह्यांचा यथोचित सन्मान करुन रोख पोरितोषीक देणेकरीता विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

(सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि ११/११/२०११

151
162

**प्रकरण क्र. ७७ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दि.०१/०६/१९९५ पूर्वीच्या धोकादायक इमारतींना वाढीव चटईक्षेत्र देणेकरिता मंजूर विकास नियंत्रण निमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत**

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास नियंत्रण नियमावली विनीयम ३२(७) प्रमाणे दि.०१/०६/१९८५ पूर्वीच्या धोकादायक तथा मोडकळीस आलेल्या इमारतींकरीता जुन्या विद्यमान इमारतींचे चटईक्षेत्र + वाढीव १.० चटई क्षेत्र निर्देशांक व जास्तीत जास्त २.५ चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची तरतूद आहे.

तथापी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ग्रामपंचायत कालावधी पूर्वी व तद्नंतर बनविण्यात आलेल्या इमारतींचे चटईक्षेत्र जास्तीचे आहे. म्हणून विद्यमान मंजूर तरतूद अपूरी आहे. सबब मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या धोकादायक तथा मोडकळीस आलेल्या इमारतींकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये नियमावलीत नवीन प्रस्तावित फेरबदलानुसार दि.०१/०६/१९८५ ऐवजी दि.०१/०६/१९९५ पूर्वीच्या इमारतींकरीता इमारतीमध्ये वापरलेले चटईक्षेत्र + १.० चटई क्षेत्र व कमाल मर्यादा ३.० चटई क्षेत्र याप्रमाणे तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

प्रस्तावित फरबदलाबाबत आवश्यक वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन महानगरपालिकेने प्रस्ताव मा.शासनास दि. २१/१२/२०१० रोजी अंतिम मंजुरी करिता सादर केलेला आहे. व दि.१६/०९/२०११ रोजी सादर फेरबदल प्रस्तावास मंजूरी मिळणेकरीता शासनास विनंतीपत्र देण्यात आलेले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी मिरा भाईंदर महानगरपालिकेस लागू करणेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१०-११, दि.०६/१०/२०१० अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. सदरच्या प्रस्तावात विद्यमान बांधकाम क्षेत्र + १.० याप्रमाणे चटईक्षेत्राची तरतूद असणे आवश्यक असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रात ६० पेक्षा जास्त अती धोकादायक घोषित केलेल्या आहेत. इमारतीस धोकादायक असल्याची नोटीस देवून इमारती खाली करण्यासाठी महानगरपालिकेकडून इमारत खाली करुन इमारत तोडण्याचे आदेश रहिवाश्यांस दिल्यानंतर धोकादायक इमारतीतील रहिवाशी इमारत खाली करत नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने धोकादायक घोषित केलेल्या इमारती रिकामी करुन घेणे महानगरपालिकेस शक्य होत नाही. मात्र अचानकपणे इमारत पडून दुर्घटना होते. मृत्यु व मानवास दुखापत होते. अशी घटना घडल्यानंतर घटनेवर मात करण्यासाठी / घटना घडू नये म्हणून उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेकडे पर्याय राहत नाही. सबब महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक घोषित इमारतीचा पूर्नविकास करण्यासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करणे आवश्यक आहे.

१) दि.०१/०६/१९९५ पूर्वी बांधण्यात आलेल्या विद्यमान इमारतीस महानगरपालिकेने धोकादायक घोषित केल्यानंतर धोकादायक इमारतीचा पूर्नविकास करावयाचा असल्यास पूर्नविकासासाठी विद्यमान चटईक्षेत्र + १ याप्रमाणे चटईक्षेत्र असणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस व फेरबदलाचे सूचना

हरकती घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ज्या गावात क्षेत्रात १/२ चटईक्षेत्र अनुयोज्ञ आहे त्या गावात क्षेत्रात १ चटईक्षेत्र करावे. ज्या गावात नियोजित प्राधिकरण (Planning Authority) महानगरपालिका आहे, जेणे कारणे गावात व इतर रहिवासियांना सुविधाचा फायदा होईल असे मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. मिलन पाटील व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मुंबई उपनगरीय क्षेत्रासाठी शासनाने अनुज्ञेय चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ याप्रमाणे मंजूर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हद्दीवाढ होण्यासाठी चारही बाजूने क्षेत्र उपलब्ध नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, डोंगरी, चौक, तारोडी, पाली ही महसूल गावे एम.एम.आर.डी.ए. या विशेष नियोजन प्राधिकरणाकडे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उर्वरीत क्षेत्र सॉल्टपॅन व सि.आर.झेड. ने ५०% पेक्षा जास्त बाधीत होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रहिवासी क्षेत्र उपलब्ध नाही. तसेच डी.डी.आर. जनरेट करण्यासाठी आरक्षणेही उपलब्ध नाहीत. विकास थांबलेल्या अवस्थेत आहे.

शासनाने मुंबई उपनगरीय क्षेत्रासाठी चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ लागू केला आहे. हा नियम लागू करतांना प्रिमीयम आकारणी करण्यात येणार आहे. हाच नियम मिरा भाईंदर महानगरपालिकास लागू केल्यास विकासाला चालना मिळेल व महानगरपालिकेस उत्पन्नही प्राप्त होवू शकेल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ लागू करणेसाठी सुधारणा सूचवत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक सौ. नयना म्हात्रे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक मिठागर, शेतकरी, कोळी बांधव व इतर समाजाचे स्थानिक आहेत. पुर्व काळापासून काही गावठण व मौजे महसुल गावात महसुल विभागाकडून, भुमापन विभागाकडून तत्कालीन ग्रामपंचायत, नगरपरिषद कडून सर्व्हे (मोजमाप) करण्यात आलेली नाही. गावातील जुन्या घरांना सिटी सर्व्हे नंबर नसल्याने घर बांधताना किंवा पुर्ननिर्माण करताना अनेक अडचणी येतात. जुन्या ग्रामपंचायत काळीन घरांना घर नंबर आहेत व त्यांच्याकडे ग्रामपंचायत काळीन घरपट्टी पावती आकारणी केलेल्या पावत्या आहेत. पण इमारत जर्रर जुनी किंवा मोडकळीस आल्यामुळे त्या घरातील / इमारती मधील रहिवाशी स्थलांतरीत झाल्यामुळे ती जागा मोकळी झालेली आहे. काही इमारतींच्या बाबतीत ई.एल.यु. नकाशाप्रमाणे वाढीव एफ.एस.आय. देताना विद्यमान चटईक्षेत्र १.० + चटईक्षेत्र देण्यात यावे.

| २७ | पाटील शरद केशव | २७ | मिलन वसंत म्हात्रे |
| २८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | |
| २९ | बाविघर सिसिलीया विजय | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | |
| ३१ | पाडे स्नेहा शैलेश | | |
| ३२ | दुबे रामनारायण सदानंद | | |
| ३३ | यादव मिरादेवी रामलाल | | |
| ३४ | पाटील प्रविण मोरेश्वर | | |
| ३५ | पाटील अनंत रामचंद्र | | |
| ३६ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | |
| ३७ | पाटील संध्या प्रफुल्ल | | |
| ३८ | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ३९ | व्यास सुधा वासुदेव | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

~~१८४~~ १९२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र. ९३ :- परवाना फी शुल्क फेरबदल करणे बाबत.**

**ठराव क्र. ९७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसास / उद्योग धंदे चालू असून या आस्थापनांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. परवाना शुल्क वसुली कामी अभिकर्ता न नेमता महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करावी.

परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजुर केलेले आहेत. इतर महानगरपालिकेच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना दर जास्त असल्याने व्यवसायधारक परवाना घेण्यास टाळाटाळ करत असतात. त्याकरीता यापूर्वी पारीत झालेल्या दरामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे क्षेत्रफळानुसार दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | आस्थापनाचे क्षेत्रफळ | दर (रु.) |
|---|---|---|
| १ | २५० चौ. फुटा पर्यंत | २५०/- |
| २ | २५१-५०० चौ. फुटा पर्यंत | ५००/- |
| ३ | ५०१-१००० चौ. फुटा पर्यंत | १०००/- |
| ४ | १००१-२५०० चौ. फुटा पर्यंत | २०००/- |
| ५ | २५०१-५००० चौ. फुटा पर्यंत | ४०००/- |
| ६ | ५००१-१०००० चौ. फुटा पर्यंत | ६०००/- |
| ७ | १०००१- चौ. फुटा पर्यंत | ८०००/- |

**सुचना :-**

अ) मोकळया खाजगी जागेत जे व्यवसाय करतात त्यासाठी रु.१०००/- प्रति वर्ष याप्रमाणे परवाना फी आकारण्यात यावी.

ब) निवासासह वाणिज्य वापर करत असल्यास वाणिज्य जागेच्या क्षेत्रफळानुसार परवाना फी आकारण्यात यावी.

क) ज्या व्यवसाय धारकांचे व्यवसायासह इतर ठिकाणी महानगरपालिका हद्दीत गोडाऊन असेल अशा व्यवसाय-धारकांनी सदर व्यवसायास परवाना घेतेवेळी अर्जात नमुद केलेल्या गोडाऊनला परवाना फी आकारु नये.

ड) हयापूर्वी व्यवसायधारकांनी घेतलेल्या परवानाचे नुतनीकरण करताना वरील सुधारीत दराने थकित रक्कम वसुली करावी.

वरील प्रमाणे महसुली उत्पन्नाच्या दृष्टीने कमीत कमी कागदपत्रे करारनामा/भाडे करारनामा, टॅक्स पावती, जागेचा पुरावा यापैकी कोणतेही कागदपत्र घेण्यात यावेत. शहरातील विविध सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांकडून नविन परवाना व परवाना नुतनीकरण एक वर्ष किंवा किमान तीन वर्षापर्यंत देण्यात यावा. वरील सुचनांसह परवाना शुल्क फेरबदल करुन घेण्याच्या धोरणात्मक निर्णयास ही सभा मंजुरी देत आहे.

**सूचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | नलावडे दिनेश दगडू | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | सुनिता कैलास पाटील | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | सुनिता शशिकांत भोईर | |

193

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | सपार उमा विश्वनाथ | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १३ | राजेंद्र भंवरलाल जैन | १३ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | शफीक अहमद सादत खान | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | प्रमोद जयराम सामंत | |
| १६ | चक्रे वंदना रामदास | १६ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १७ | माळी हेमा रविंद्र | १७ | विजया हेमचंद्र वैती | |
| १८ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १८ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | भट दिप्ती शेखर | |
| २० | टेरी पॉल परेरा | २० | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २१ | अनिल दिवाकर सावंत | |
| २२ | वर्षा गिरधर भानुशाली | २२ | शेख सलिम दाऊद | |
| २३ | राजु यशवंत भोईर | २३ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २४ | जाधव मोहन महादेव | २४ | पुरोहित मधुसूदन मनोहरलाल | |
| २५ | सिंह मदन उदितनारायण | २५ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २६ | म्हात्रे कल्पना महेश | २६ | मिलन वसंत म्हात्रे | |
| २७ | पाटील शरद केशव | | | |
| २८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | | |
| २९ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३२ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३३ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३४ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३५ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३६ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३७ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३९ | व्यास सुधा वासुदेव | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

+88 P14

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.30/12/२०११

**प्रकरण क्र. (९४) :- शहर स्वच्छता आराखडा (C.S.P.)**

**ठराव क्र. (९६)**

केंद्र शासनाचा राष्ट्रीय स्वच्छता धोरणाअंतर्गत महाराष्ट्रातील १९ महानगरपालिकानां शहर स्वच्छता आराखडा तयार करावयाचा आहे, त्यात मिरा भाईंदर महापालिकेचा समावेश आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने तयार केलेला **"शहर स्वच्छता प्रारुप आराखडा"** यापूर्वीच अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्था ह्यांच्यामार्फत राज्य व केंद्र शासनास सादर केलेला आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार प्रारुप शहर स्वच्छता आराखडयात योग्य ते बदल करुन **"सुधारीत शहर स्वच्छता आराखडा"** राज्य शासनास सादर करावयाचा आहे.

शहर स्वच्छता आराखडयात खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

१) महापालिका क्षेत्रात उघडयावर शौचास बसण्याची प्रथा बंद करणे

२) मल: निसारण व्यवस्था

३) पाणीपुरवठा व्यवस्था

४) घनकचरा व्यवस्थापन

५) पावसाळी पाण्याचा निचरा

६) पर्यावरण

महापालिकेच्या **"शहर स्वच्छता आराखडा"** एकूण रू. ५९५.९३ कोटीचा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहर स्वच्छता आराखडयास दरवर्षी शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या दरवर्षीच्या हिस्स्याची रक्कम, अंदाजपत्रकात तरतूद करण्यास व **"सुधारीत शहर स्वच्छता आराखडयास"** मा. महासभा आर्थिक, प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :-** (सही)
सौ. प्रभात पाटील

**अनुमोदन :-** (सही)
(डॉ. आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजूर

(सही)

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

195

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र.: (९५) "घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

**ठराव क्र :-** ९९

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- (डॉ. आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचुन कायम करण्यात आला

मा. महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

188
196

१५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## *घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन*

# *उपविधी.*

189
197

# मिरा भाईंदर महानगरपालिका उपविधी

हे उपविधी "मिरा भाईंदर स्वच्छता आणि आरोग्य उपविधी २०१०"म्हणून ओळखले जातील आणि ते..............................पासुन अमंलात येतील.

हे उपविधी मिरा भाईंदर महापालिका हद्दीत प्रत्येक सार्वजनिक ठिकाणांवर आणि नागरी घनकचरा निर्माण करणा-या प्रत्येकास आणि कोणत्याही व्यक्तींच्या मालकीच्या किंवा ताब्यात असलेल्या प्रत्येक इमारत,दुकाने, आस्थापना, कार्यालये औद्योगिक वसाहती, व्यापारी संकुले / मॉल्स, शैक्षणिक संस्था,इ. लागु आहे.

या उपविधीमधील आणि त्या सोबत जोडलेल्या अनुसुचितील खालील शब्दांचे अर्थ त्यामधील व्याख्या केल्याप्रमाणे असतील जसे :-

**"अंगण"** :- कोंणत्याही जागेच्या समोरील अथवा लगतची सार्वजनिक जागा आणि यामधील पदपथ आणि तळी तसेच तळ्याच्या किंवा पदपथाच्या कडेला बसविलेली दगडी कडे पर्यंतची जागा व त्या नंतरचा रस्त्याचा जलवाहक भाग याचा समावेश होतो.

**"उपायुक्त"** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेच्या संबधित विभागाचे उपायुक्त.

**"अभिकर्ता / गुमास्ता प्रतिनिधी"** :- म्हणजेच मिरा भाईंदर महापालिकेच्या वतीने रस्ते झाडणे, कच-याचे संकलन, दंड आकारणे इ. कर्तव्य किंवा कामे करण्यासाठी नेमणूक केलेली किंवा परवानगी दिलेली कोणतीही व्यक्ती / संस्था.

**"जैविक विघटनशील कचरा"** :- म्हणजे वनस्पती आणि प्राणीजन्य कचरा उदा. स्वंयपाकघरातील कचरा, अन्न व फुले, फळांची साले यांचा कचरा, अस्ताव्यस्त पडलेली पाने व बागेमधील कचरा, प्राणी मात्रांचे शेण, मलमुत्र, मासे, मटनाचा कचरा, भाजी मार्केटमधुन निघणारा कचरा, व इतर कोणत्याही प्राणीजन्य विघटनशिल कचरा किंवा ज्याचे जैविक विघटन होते असा कोणताही कचरा.

**"जैविक वैद्यकीय कचरा"** म्हणजे मानवाचे किंवा प्राण्याचे / जनावरांच्या / पक्ष्यांच्या रोगाची चिकित्सा, औषधोपचार, प्रति बंधात्मक उपाययोजना करताना, संशोधन कार्य, जीवशास्त्रीय चाचण्या, यातुन निर्माण झालेले पदार्थ किंवा उपविधिच्या अनुसुची (४) मध्ये नमुद केलेला कोणताही जैविक वैद्यकीय कचरा.

**"बायो- मिथेनेशन"** म्हणजे मिथेन वायुची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यासाठी सुक्ष्म जिवांच्या प्रक्रियेव्दारे सेंद्रिय घटकांचे विघटन करण्याची एक प्रक्रिया.

**"अधिकांश कचरा उत्पादक"** :- अधिकांश कचरा उत्पादक म्हणजे मालक भोगवटादार,गृहनिर्माण संस्था किंवा संकुलाचा मालक किंवा भोगवटादार यांच्या वतीने प्रतिनिधीतत्व करणारे दुसरी कोणतीही व्यक्ती उपहार गृह, हॉटेल्स, बाजार, दवाखाने, औद्योगिक मालमत्ता आणि व्यापारी संकुले / मॉल्स, शैक्षणिक संस्था यामधील कोणत्याही सरकारी किंवा सार्वजनिक कार्यालयाची इमारत किवा अन्य वापरकर्ते जसे क्लब, जिमखाने,विवाहकार्यालये, शैक्षणिक संकुले, इस्पितळे, तसेच संबधित विभागाच्या मा.आयुक्त यांनी नेमलेल्या पालिकेच्या अधिकृत प्रतिनिधींने विर्निदेर्श पुर्वक शोधुन काढलेली आणि अधिसुचित केलेली करमणुक/मनोरंजक संकुले याचा देखील अधिकांश कचरा उत्पादक म्हणून समावेश असेल.

**"मा. आयुक्त यांनी नेमणुक केलेले अधिकारी / विभाग प्रमुख"** :- म्हणजेच महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख अथवा मा. आयुक्त यांनी या उपविधीच्या अंमलबजावणीसाठी नेमलेला कोणताही अधिकारी.

**"संकलन"** :- विहित / निर्देशित संकलन केंद्र आणि कोणत्याही ठिकाणाहुन उचलण्यात आणि हलविण्यात आलेला नागरी घनकचरा.

० **"उगम स्थानाचे संकलन"** :- म्हणजेच मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे थेट एखाद्या इमारतीच्या आवारातुन किंवा इमारतीच्या समुहाच्या आवारातुन सकंलित केलेला नागरी घनकचरा यास घरोघरी संकलन किंवा केंद्रा-केंद्रागणिक संकलन असेही संबोधिले जाईल.

१ **"कंपोस्ट खत निर्मिती"** :- म्हणजे सेंद्रिय घटकांचे सुक्ष्म जीवांच्या मदतीने विघटन करावयाच्या नियंत्रीत प्रक्रियामध्ये गांडुळ शेती म्हणजे गांडुळाच्या उपयोग करुन जैविक विघटनशील कच-याचे खतामध्ये रुपांतर करण्याची प्रक्रिया समाविष्ट आहे.

१२ **"सार्वजनिक सेवा"** :- म्हणजेच रस्ते झाडून,गटार सफाई करुन किंवा झांडाचा सुरक्षा मार्ग स्वच्छ करुन, सार्वजनिक ठिकाणे, नागरी घनकचरा संकलन करुन समाजास सार्वजनिक सेवा.

१३ **बांधकाम आणि निष्कासने यामधून निर्माण होणारा कचरा"** :- म्हणजे इमारतीचे बांधकाम,नुतनीकरण,दुरुस्ती आणि निष्कासने / प्रचालने यामधुन निर्माण होणारा इमारत साहित्यातील कचरा दगड विटा, माती, डबर इ.

१४ **दत्तक वस्ती योजना** :- म्हणजे झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी समाजिक संस्थामार्फत पुढाकार घेऊन चालवलेली मिरा भाईंदर महापालिकेने स्वीकृत केलेल्या योजनेस दत्तक वस्ती योजना म्हणतात.

१५ **"कचरा हस्तांतरण"** :- म्हणजेच कोणत्याही प्रकारचा घनकचरा मिरा भाईंदर महापालिकेच्या कामगाराकडे स्वाधीन करणे किंवा असा कचरा स्विकारण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने नेमणूक केलेले अधिकृत किंवा परवाना दिलेली कोणतिही अन्य व्यक्ती अथवा हे करण्यासाठी मिरा भाईंदर

महापालिकेने पुरवठा केलेल्या वाहनांचा किंवा मिरा भाईंदर महापालिकेने अधिकृत किंवा परवाना दिलेल्या अन्य कोणाहीकडून पुरविण्यात आलेल्या कोणत्याही वाहनात कचरा टाकणे.

६ **"सुका कचरा"** :- या उपविधीचे नियम ५.१ (६) मध्ये नमुद केलेल्या नागरी घनकच-याचे प्रकार

७ **"सुका कचरा वर्गीकरण केंद्र"** :- म्हणजे सुका कचरा स्विकारण्यास आणि वर्गीकरण करण्यासाठी अधिकृत करण्यात आलेल्या महापालिका किंवा शासनाच्या कोणत्याही जागेवरील किंवा सार्वजनिक जागेवरील कोंणतीही नियोजित जमीन, छपरी, छप्पर असलेले अथवा इतर बांधकाम.

८ **"उद्याने व बगीच्या मधील मोठ्या प्रमाणातील कचरा"** :- म्हणजे बागा, उद्याने, वाहतुकीचे बेटे, इ मध्ये निर्माण होणा-या मोठ्या प्रमाणावरील कचरा, यांमध्ये ज्या कच-याचे दैनंदिन कचरा संकलन पध्दतीत जैविक विघटनशील कच-यासाठी समावेश होत नाही. अशा गवताची छाटणी आणि झाडाची छाट्णी, फ़ांद्या, डहाळ्या, लाकडाचे ढळण, पेंढा, किंवा झडलेली पाने आणि झाडांची कापणी इत्यादी सारख्या कार्बनयुक्त घटकांचा समावेश असलेल्या कच-याचा समावेश होईल.

९ **"कचरा निर्माता"** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात नागरी घनकच-याची निर्मिती करणारी कोणतीही व्यक्ती.

० **"घंटागाडी"** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेने प्रत्येक कचरा संकलन केंद्रावरुन नागरी घनकचरा संकलित करण्यासाठी पुरविलेली घंटा बसविलेली गाडी.

१ **"धोकादायक कचरा"** :- जो कचरा त्याच्या भौतिक, रासायनिक, विषारी, स्फ़ोटक गुणाधर्मामुळे आरोग्याला किंवा पर्यावरणाला स्वंतत्ररित्या किंवा एकत्रितरित्या धोका करणारा किंवा धोका करु शकणारा / विशिष्ट परिस्थितीत विपरीत परिणाम करु शकणारा किंवा स्फ़ोटक, गंजणारा, किंवा विषारी कचरा. या उपविधीतील अनुसुची तीन मध्ये नोंद केलेला आणि धोकादायक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम १९८९ मधील व्याख्या क्र. १४ मध्ये सविस्तरपणे नमुद केलेला घनकच-याचा समावेश होईल.

२ **"घरगल्ली"** :- म्हणजे नाली म्हणून उपयोगात आणण्यासाठी किंवा संडास, मलमुत्र,किंवा मलकुंड, किंवा दुर्गंधीयुक्त अगर प्रदुषित पदार्थासाठी ठेवलेले इतर पात्र याकडे जाण्यासाठी महापालिकेच्या कर्मचा-यासाठी किंवा ती साफ़ करण्यासाठी अगर त्यातील घाण काढुन नेण्याकरिता नेमलेल्या व्यक्तीस जाऊ देण्यासाठी बांधलेला अलग राखलेला किंवा उपयोगात आणलेला एखादा मार्ग किंवा जमीनीची पट्टी.

३ **"जड घनकचरा"** :- म्हणजे प्रक्रियेनंतर उरलेला कोणताही घनकचरा ज्यातील रासायनिक, भौतिक आणि जैविक घटकांचा आरोग्यकारी भुमी भरणीकरिता उपयोग होतो.

४ **“भुमीभरण”** :- म्हणजे अंतिम घनकचरा टाकण्याची कचरा विल्हेवाटीची जागा,जेथे भुजल,सांडपाणी,आणि हवेबरोबर उडणारी धुळ, वा-याने उडणारा कचरा, दुर्गंधी, आगीपासुनचे उपद्रव, पक्षांची दहशत उपद्रव किटक किंवा कुडतरणारे प्राणी, हरितगृहातुन बाहेर टाकला जाणारा ग्रीन हाऊस गॅस, घसरणीचे अस्थैर्य आणि झीज यांच्या प्रदुषणापासून सरक्षंण करणा-या सुविधेच्या संकल्पनेसह केलेली उपाययोजना.

५ **“केरकचरा”** :- म्हणजे सर्व प्रकारचा कचरा ज्या कच-यामुळे अस्वच्छता निर्माण होते किंवा नागरिकांच्या आरोग्यास सुरक्षितेत किंवा कल्याणास तसेच पर्यावरणास धोका किंवा उपद्रव निर्माण होतो असा कचरा फ़ेकण्यास किंवा जमा करण्यात आलेल्या या नियमावली खाली प्रतिबांधित करण्यात आलेल्या अन्य कोणताही कच-याचा समावेश होतो.

६ **“कचरा अस्ताव्यस्त टाकणे”** :- म्हणजे कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा अशा पध्द्तीने टाकणे की ज्यामुळे कचरा पडेल उतरेल, उडून जाईल, झिरपेल, किंवा अन्यथा निसटेल, किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा उतरवण्यासाठी उडून जाण्यासाठी, वाहून जाण्यासाठी झिरपण्यासाठी किंवा निसटण्यासाठी कारणीभुत ठरेल मोकळीक किंवा मुभा दिली जाईल.

७ **“महापालिका आयुक्त”** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेचे आयुक्त किंवा उपायुक्त/ आयुक्त आणि आवश्यक त्या संदर्भात आयुक्तांचे महानगरपालिका संबधित अधिकार निहित करण्यात किंवा सोपविण्यात आले आहेत असा कोणीही अधिकारी.

८ **“महापालिका”** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिका आणि आवश्यक त्या संदर्भात तिचे प्रतिनिधी.

९ **“नागरी घनकचरा”** :- यामध्ये मिरा भाईंदर महापालिकेच्या हद्दीत निर्माण होणारा इमारत, सोसायटी, गृह संकुलने औद्योगिक आस्थापना, कचरा, भाजी मार्केट व्यापारी संकुलने आणि अन्य कारणांनी निर्माण होणा-या घन किंवा अर्ध घन कच-याचा समावेश होतो.

० **“उपद्रव”** :- म्हणजे ज्याच्यायोगे चक्षुंद्रियास, घ्राणेंद्रियास, किंवा श्रवणेंद्रियास मानवी शरीरास इजा धोका त्रास किंवा पिडा होते किंवा होण्यास संभव आहे किंवा जे जिवितास धोकादायक किंवा मालमत्तेस अपायकारक आहे किंवा अपाय होण्याचा सभंव आहे अशा कोणत्याही कृत्याचा वर्तनाचा, जागेचा किंवा वस्तुंचा समावेश होतो.

१ **“सार्वजनिक उपद्रव”** :- म्हणजे सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही दुर्लक्षित कृतीमुळे उदभवणारा उपद्रव.

२ **“उपद्रव शोधक”** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेचे या उपविधीनुसार सार्वजनिक उपद्रवाची कृत्ये इ. शोधुन काढण्यासाठी नेमणुक केलेले कर्मचारी.

३ **“ताबेदार”** :- यामध्ये कोणत्याही कारणासाठी ठराविक काळासाठी एखादी जमीन किंवा इमारत

इमारतीचा काही भाग ताब्यात असणा-या किंवा वापर करणा-या कोणत्याही व्यक्तींचा समावेश होतो.

४ **"मालक"** :- याचा कोणताही परिवास्तुच्या संदर्भातील अर्थ म्हणजे जी व्यक्ती उक्त परिवास्तुचे भाडे घेते ती किंवा परिवास्तु भाड्याने दिली असती तर जिला तिचे भाडे घेण्याचा हक्क असता ती व्यक्ती व त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होतो.

जो मालकाच्या वतीने असे भाडे घेतो तो अभिकर्ता किंवा विश्वस्त.

जो धार्मिक किंवा धर्मदाय प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही परिवास्तुचे भाडे घेतो किंवा अशी परिवास्तु ज्याच्याकडे सोपविली आहे. किंवा तिच्याशी ज्याचा संबध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त.

उक्त परिवस्तुचा ताबा घेण्यास किंवा तिचा मालक म्हणुन समपहर्ता असलेल्या हक्कांचा वापर करण्यास सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक समपहर्ता किंवा व्यवस्थापक.

५ **"व्यक्ती"** :- एखादी व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती आणि यामध्ये दुकान किंवा आस्थापना किंवा फ़र्म किंवा कंपनी किंवा संस्था किंवा कायद्याने संस्थापित केलेल्या किंवा न केलेल्या व्यक्तींचा संघ आणि त्यांचे प्रतिनिधी व अभिहस्तांकिती इ.

६ **"केंद्रा-केंद्रागणिक संकलन"** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेने नियोजित केलेल्या विशिष्ट कचरा उचलावयाच्या केंद्रावरुन नागरी घनकचरा संकलित करावयाची पध्द्त प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने त्याने संकलित केलेला आणि साठविलेला कचरा घंटा गाडीत किंवा मिरा भाईंदर महापालिकेने नेमलेल्या अन्य कोणत्याही वाहनात टाकण्यासाठी तो या कचरा उचलवयाच्या केंद्रापर्यत आणावयाचा आहे.

७ **"आवार"** :- महापालिका क्षेत्रातील इमारती इमारतीमधील खोल्या, घर, पडघर, छ्परी, तबेला, झोपडी, दगड, विटा,चिखल, लाकुड, धातु, किंवा अशा प्रकारच्या अन्य कोणत्याही साहित्याचा वापर करुन उभारलेली संरचना आणि कोणत्याही मुदतीकरिता बांधकाम करण्यात आलेली किंवा वास्तव्य व्यवसाय, उद्योग सेवा सरकारी किंवा अन्य कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी कारणासाठी जसे लग्न, मेजवान्या, बैठका, प्रदर्शने आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम किंवा स्वरुपासाठी तात्पुरत्या वापरली न जाणारी खुली अथवा बंदिस्त जागा याचा समावेश होतो. यामध्ये ठराविक काळाकरिता वाहने उभी करण्यासाठी, रस्त्यावर विक्री करण्यासाठी,कामाच्या जागी साहित्य साठवुन ठेवण्यासाठी किंवा वाहनाच्या रहदारी व्यतिरिक्त एखाद्या सार्वजानिक किंवा खाजगी कारणास्तव वापरण्यासाठी महापालिका आयुक्तांनी परवानगी दिलेल्या सार्वजनिक रस्त्यावरील एखाद्या भागाचा देखील समावेश होतो.

८ **"प्रक्रिया"** :- म्हणजे ज्या प्रक्रियेव्दारे घनकच-यावर पुर्न चक्रांकन किंवा तो भुभरणीसाठी योग्य बनविण्याकरिता उपचार केले जातात अशी कोणतीही शास्त्रोक्त प्रक्रिया.

९ **"सार्वजनिक जागा"** :- यांमध्ये कोणताही रस्ता/गल्ली/उपरस्ता/गल्ली/रेल्वे पुल, पायवाट, बोळ किंवा मार्गिका, महामार्ग, साकव, पुल, नागरिकांना जाण्यायेण्याचा अधिकार असलेला रहदारीचा किंवा रहदारी नसलेला चौक,किंवा मार्ग आणि अशा जागी की ज्या ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना मार्ग आहे. जसे उद्यान, बागा, मनोरंजनाची मैदाने, खेळाची मैदाने ,समुद्रकिनारे, तळी, तलाव, सार्वजानिक चौक, आणि सहल करण्याची जागा सरकारी आणि महापालिकेच्या इमारती, सार्वजनिक रुग्णालये, बाजार, कत्तलखाने, न्यायालये. इ. याचा समावेश होतो.

० **"कचरा कुंडी"** :- म्हणजे कोंणत्याही प्रकारच्या नागरी कच-याची साठवण करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने वेळोवेळी सुचित व नमूद केल्याप्रमाणे वापरण्यात येणारे डब्बे किंवा पिंशव्यासह कोणतीही पेटी.

१ **"पुर्न चंक्राकन"** :- म्हणजे मुळ उत्पादकाशी मिळते जुळते असणारे किंवा नसणारे नवीन उत्पादन निर्माण करण्याकरिता वर्गीकरण करण्यात आलेल्या जैविक अविघटनशिल घनकच-याचे कच्चा मालात रुपांतर करावयाची प्रक्रिया.

१.१ **"आरोग्य राखणे"** :- रोगांचा प्रादुर्भाव किंवा पर्यावरणाधीन आजार उदभवु नयेत म्हणुन स्वच्छता आणि रोग प्रतिबंधात्मक काम करुन आरोग्य व पर्यावरण अबाधित राखणे.

२ **"कचरा"** :- जैविक / अजैविक स्थिर अशा वेगवेगळ्या उद्योगातुन प्रक्रियेतुन तयार झालेला घन किंवा अर्ध घनकचरा ज्याचा वापर किंवा पुर्न प्रक्रिया सद्य स्थितीत करु शकत नाही अशा वस्तु.

३ **"अनुसुची"** :- म्हणजे या उपविधीसोबत जोडलेली अनुसूची.

४ **"उगमस्थान"** :- म्हणजे कच-याची निर्मिती जेथे होते असे कोणतेही ठिकाण.

५ **"स्थिर जैविक विघटनशील कचरा"** :- म्हणजे जैविक विघटनशिल कच-यावरील यांत्रिक /जैविक उपचारानंतर उरणारा रोगमुक्त जैविक स्थिर कचरा जो पुढील बंधनाशिवाय वापरता येऊ शकतो.

६ **"साठवणूक"** :- म्हणजे कच-याची विशिष्ट प्रकारच्या कुंडीत तात्पुरती साठवणूक जेणेकरुन कचरा अस्ताव्यस्त पसरण्यास भटकी जनावरे व किटकांना आकर्षित करण्यास व प्रमाणाबाहेर किळसवाणा दुर्गंध येण्यास प्रतिबंध होईल.

७ **"उद्यान अधिक्षक"** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेचे उद्यान अधिक्षक.

८ **"वाहतूक"** :- परिवहन म्हणजे नागरी घनकच-याचे विशिष्ट रचनेच्या वाहतुक पध्दतीने एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी केलेली आरोग्यपुर्ण वाहतुक जेणेकरुन किळसवाणा दुर्गंध, कचरा अस्ताव्यस्त पसरणे, सांडणे किंवा अप्रेक्षणीय दृश्य यांना प्रतिबंध होईल.

९ **"विभाग"** :- म्हणजे विशेष उल्लेख नसल्यास मिरा भाईंदर महापालिकेचा प्रशासकीय विभाग.

० **"विभाग कार्यालय"** :- म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेचे उपायुक्त विभाग प्रमुख असलेले प्रशासकीय विभागाचे कार्यालय

**या उपविधीत वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा वा शब्दसमुहाचा अर्थ उपरोक्त व्याख्येत समाविष्ट नसल्यास त्याचा अर्थ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा पर्यावरण अधिनियन १९८६ व नागरी घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियामावली २००० तसेच महाराष्ट्र जैविक अविघटनशिल कचरा नियंत्रण कायदा २००६ ने निर्देशित केलेले, महाराष्ट्र जैविक, अविघटनशिल कच-यासंबधिचे महापालिका हद्दीत संकलन ,वर्गीकरण व विल्हेवाटीचे नियम,२००६ मध्ये ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तो अर्थ विशिष्ट संदर्भात घ्यावा.**

**साफ अंगणाची हमी देण्यासाठी अस्वच्छता पसरविण्यास आणि कचरा टाकण्यास प्रतिबंध:-**

१ **सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे** :- कोणत्याही व्यक्तीने अधिकृत सार्वजनिक अथवा खाजगी कचरा कुंड्या व्यतीरिक्त अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा, बांधकामातील टाकाऊ साहित्य, ड्रेब्रिज, रॅबीट, माती टाकता किंवा जमा करता कामा नये. तसेच गुरांचे तबेले, गोठे यातुन निघणारे टाकाऊ पदार्थ शेण, मलमुत्र इ. सार्व जागेत, सार्व गटारात नाल्यात सोडता येणार नाही. कारखान्यातील टाकाऊ माल सार्वजनिक जागेत, रस्त्यावर, गटारात, नाल्यात टाकता येणार नाहीत.

२ **खाजगी मालमत्तेच्या ठिकाणी कचरा टाकणे** :- कोणत्याही व्यक्तीने अधिकृत खाजगी किंवा सार्वजनिक कचरा कुंड्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्याप्त, मोकळ्या किंवा रिकाम्या जागी मालमत्तेच्या वास्तव असलेल्या अथवा नसलेल्या ठिकाणी कचरा टाकु किंवा जमा करु नये.

३ **वाहनांतुन फेकला जाणारा कचरा** :- वाहनातील वाहन चालक, किंवा प्रवासी कोणीही व्यक्ती चालत्या किंवा स्थिर वाहनातुन कोणत्याही रस्त्यावर, मार्गावर, पदपथ, खेळाची मैदाने, उद्याने, रहदारीच्या जागा, किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी कचरा फ़ेकणार किंवा जमा करणार नाही.

४ **वाहतुकीच्या वाहनातून सांडणारा कचरा** :- कोणतिही व्यक्ती, कचरा वाहतुकीसाठी त्यात भरलेला केरकचरा साडण्यास, उडुन जाण्यास, अथवा रस्ता, पदपथ, रहादारीच्या जागा, खेळाची मैदाने, उद्यान किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी जमा होण्यास प्रतिबंध होईल अशा पध्दतीने रचना असलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर वाहन चालविणार किंवा हलविणार नाही.

५ **सार्वजनिक उपद्रव निर्माण करणे** :- कोणीही व्यक्ती खालील विशिष्ट कारणांसाठी पुरविण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधा किंवा सुखसोयी वगळता अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी आंघोळ

करणे, थुंकणे, मलमुत्र, विर्सर्जित करणे, प्राणी किंवा पक्ष्यांना खाण्यास देणे, वाहने,भांडी किंवा अन्य कोणतीही वस्तु दुरुस्त करणे / धुणे, ही कामे करणार किंवा कोणत्याही प्रकारची साठवण ठेवणार नाही. खाजगी इमारत, सोसायटी, घरे, औद्योगिक आस्थापना, शाळा आदी इमारतींचे मलमुत्र परस्पर महापालिका गटारात सोडता येणार नाही. सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय, हॉटेल्स, यांच्याकडील टाकाऊ अन्नपदार्थ मनपा गटारात रस्त्यावर किंवा उघड्यावर टाकता येणार नाहीत.

**साफ अंगणाची हमी** :- प्रत्येक मालक अथवा भोगवटादार निवासी जागेव्यतीरिक्त स्वच्छ अंगण परिरक्षित ठेवण्यास जबाबदार राहिल.

## "नागरी घनकच-याचे वर्गीकरण साठवण, पुरवठा आणि संकलन" :-

### सहा विशिष्ट प्रकारात कच-याचे वर्गीकरण :-

### कच-याचे वर्गीवारीचे प्रकार :-

**नागरी घनकच-याची निर्मिती करणा-या प्रत्येकाने खाली निर्देशित केलेल्या सहा वेगवेगळ्या प्रकारामध्ये कच-याचे वर्गीकरण करुन तो वेगवेगळा पाठविला पाहिजे व असा वर्गीकरण केलेला कचरा अधिकृत साठवणी केंद्राकडे नेण्यासाठी तयार ठेवला पाहिजे.**

जैविक विघटनशिल (ओला) कचरा

**घरगुती विशिष्ट घातक घनकचरा**

**जैविक वैद्यकीय कचरा**

**बांधकाम आणि निष्कांसन यातुन निर्माण होणारा कचरा**

**झाडांच्या छाटणीसह उद्यान आणि बाग कामातुन निर्माण होणारा कचरा**

**पुनर्चक्रांकन करण्याजोग्या आणि पुन चक्रांकन न करण्याजोग्या कच-यासह इतर सर्व अजैविक विघटनशिल कचरा (सुका कचरा)**

महापालिका आयुक्त ह्या उपविधीच्या अंमलबजावणीसाठी प्रथमतः उपरोक्त वर्गीकरण मर्यादित करुन तसेच कचरा निर्माण करणा-यां मधील जागरुकतेची पातळी व शहरातील पायाभूत आधाराची उपलब्धता विचारात घेऊन स्वंतत्रपणे विविध टप्पे अधिसुचित करतील.

.१. कच-याची कोणत्याही प्रकारची मानवी हाताळणी न करता किंवा तो न सांडता त्याचे सुरक्षितरित्या आणि सहजपणे संकलन व्हावे म्हणुन विविध प्रकारच्या घनकच-याची साठवण आणि पुरवठा करण्यासाठी महापालिका आयुक्त अनिवार्य रंगसहित किंवा अन्य विहित कचरा कुंड्यांचा तपशील वेळोवेळी स्वतंत्रपणे अधिसुचित करतील आणि तो विविध प्रकारचा घनकचरा निर्माण करणा-यास बांधिल राहिल.

197/10
204

**वर्गीकरण करण्यात आलेल्या कच-याचा पुरवठा** :- कुठल्याही जमिनीवर अथवा मालमत्तेमध्ये जमा झालेला कचरा गोळा करुन व त्याचे वर्गीकरण करुन तो महापालिकेने कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या कर्मचा-यांकडे सुर्पुद करणे. अथवा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या वाहनात टाकणे हे त्या जमिनीच्या अथवा मालमत्तेच्या मालकाचे अथवा भोगवटादाराचे कर्तव्य राहिल.

**जैविक विघटनशिल कचरा** :- म्हणजे वर्गीकरण करण्यात आलेला जैविक विघटनशिल नागरी घनकचरा (सुची २ मधील स्पष्टीकरणात्मक यादीप्रमाणे) जर कचरा निर्माण करणा-याकडून त्याचे खत करण्यात आले नाही तर त्याने असा कचरा त्याच्या जागेत साठवावा. आणि प्रत्येक कचरा निर्माण करणा-यांनी हा कचरा घंटा गाडीत किंवा मोठ्या प्रमाणावर जैविक विघटनशिल कचरा संकलित करणा-या वाहनांत किंवा मा. आयुक्त यांनी वेळोवेळी अधिसुचित केल्याप्रमाणे मिरा भाईंदर महापालिकेने ठरविलेल्या ठराविक वेळी कचरा दिला जात आहे, याची खातर जमा करावी.

**सर्व कचरा निर्माण करणा-याकडून खत निर्मिती** :- कच-याचे परिवहन कमी करण्यासाठी कच-यापासून स्थानिक खत निर्मिती करण्यास उत्तेजन देण्यास येईन.

**विर्निदिष्ट घरगुती धोकादायक कचरा** :- (अनुसुची ३ मध्ये दिलेल्या यादीनुसार) प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा धोकादायक कचरा साठवुन तो कचरा संकलित करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारिक करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाव्दारे साप्ताहिक/ठराविक कालावधीने पुरविण्यात येणा-या संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र सरकार किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंड्ळाकडून अनिवार्य करण्यात आल्या प्रमाणे अशा कच-याची पध्दतशील विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरिता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे.

**प्रक्रिया न केलेला जैविक वैद्यकिय कचरा** :- (अनुसुची ४ मध्ये दिलेल्या यादीनुसार) प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा कचरा विंनिर्दीष्ट प्रकारच्या बंधिस्त कचरा पेटीत साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियत्रण मंडळाकडून प्राधिकारित करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाव्दारे साप्ताहिक / ठराविक कालावधीत पुरविण्यात येणारा कचरा संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून जैविक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियमावली १९९८ नुसार अनिवार्य करण्यात आल्या प्रमाणे अशा कच-याची पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरिता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे.

**बांधकाम आणि निष्कांसनातुन निर्माण होणारा कचरा** :- बांधकाम तसेच निष्कांसनातुन निर्माण होणारा कचरा मिरा भाईदर महापालिकेने असा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीने निर्देशित केलेल्या ठिकाणी व निर्देशित केलेल्या वेळात साठविला व सुपुर्द केला पाहिजे. छोट्याप्रमाणावर म्हणजे धरगुती पातळीवर असा कचरा निर्माण करणा-यांनी त्याचे जागीच वर्गीकरण करुन

महापालिकेच्या मदत क्रमांकावर दुरध्वनी करुन अथवा असा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या व्यक्ती अथवा संस्थेशी संपर्क साधुन हा कचरा सुपुर्द करावा व त्याच्या वाहतुकीचे शुल्कही संबधितांना द्यावे. महापालिकेच्या मदत क्रमांकाचे तपशिल महापालिकेच्या प्रभाग कार्यालयामध्ये उपलब्ध होतील.

## "इतर सर्व अविघटनशील (सुका) कचरा" :-

(अ) **पुनर्चक्रांकित आणि अपुर्नचक्रांकित** :- या उपविधीतील नियम क्र १ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा साठवुन तो अशा प्रकारचा कचरा संकलित करण्यासाठी मा. आयुक्त यांनी वेळोवेळी अधिसुचित केलेल्या ठिकाणी आणि वेळी मिरा भाईंदर महापालिकेकडून किंवा तिच्या प्रतिनिधीकडून पुरविण्यात आलेल्या (सुका) कचरा संकलित करावयाचा वाहनामध्ये किंवा अनुज्ञप्ती मिळालेल्या सुका कचरा वेगवेगळा करावयाच्या केंद्रावर नेऊन घ्यावा. अविघटनशिल सुक्या कच-याची हाताळणी महाराष्ट्र अविघटनशिल घनकचरा (महापालिका हद्दीत योग्य व शासकीय पध्द्तीने संकलन साठवणुक व विल्हेवाटीचे नियम) २००६ चे नियम ३ व २ व १ नुसारच झाली पाहिजे.

**मोठी उद्याने आणि बाग बगीच्या मधील कचरा** :- हा कचरा एकत्रित न करता ठेवला पाहिजे आणि त्याची उगमस्थानी खतात रुपांतर केले पाहिजे, संकलन अनुसुचिसह झाडाची छाटणी आणि साठवण करणे, आणि ते नेऊन टाकणे यासाठी उद्यान अधिक्षक किंवा संबधित उपायुक्तांची सुचना/मार्गदर्शन तत्वे अधिसुचित करावीत, ज्या ठिकाणी खतनिर्मिती करणे शक्य होणार नाही त्या ठिकाणी मिरा भाईंदर महापालिका वेळोवेळी अधिसुचित करण्यात येणारे योग्य शुल्क आकारुन वर्गीकरण करण्यात आलेल्या उद्याने आणि बाग बगीचा कचरा संकलित करणे, आणि त्याचे परिवहन करणे चालू ठेवील.

**कचरा जाळणे** :- रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजानिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा घनकचरा जाळण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

## "मिरा भाईंदर महापालिकेच्या बंधनकारक जबाबदा-या" :-

१ **घनकचरा परिवहन कंत्राटदार मिरा भाईंदर महापालिकेचे कर्मचारी यांच्या विरुध्द कारवाई** :- जर कंत्राटदाराच्या कोंणत्याही कामगाराने किंवा मिरा भाईंदर महापालिकेच्या कोणत्याही कर्मचा-याने कोणत्याही संकलन केंद्रावरील वर्गीकृत कचरा एकत्रित केला किंवा अधिसुचीतील विर्निदिष्ट वेळेप्रमाणे कचरा उचलला नाही किंवा या उपविधीमधील तरतुदींचे उल्लंघन केल्यास महानगरपालिका घनकचरा परिवहन कंत्राटदार आणि महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख अथवा मा. आयुक्तांनी नेमलेला कोणताही अधिकारी त्यांच्याविरुध्द कारवाई करेल.

२ **मुलभुत संरचनाची उपलब्धी** या उपविधीचे पालन करण्यास नागरिकांना सहकार्य देण्यासाठी महानगरपालिका पुरेशा मुलभुत सुविधा पुरवेल. कचरा संकलन सेवेबरोबरच नागरिकांचा सल्ला घेऊन जिथे शक्य व आवश्यक असेल तिथे कचरा डब्बे, कोरडा कचरा वर्गीकरण केंद्र, खतनिर्मिती केंद्र

स्थापन करण्यात येतील. झोपडपट्टी भागात सार्वजनिक भागांवर मलमुत्र विर्सजन, धुणे व आंघोळ करणे असे उपद्रव रोखण्यासाठी स्थानिक सामाजिक संस्थांच्या सहभागाने पुरेशी सार्वजनिक शौचालये पुरविली जातील.

२ **नागरी आधारभुत माहिती** :- मिरा भाईंदर महापालिका कच-यापासून खतनिर्मिती तसेच सुक्या कच-याचे पुर्न : चक्रीकरण यां संबधीची माहीती सुका कचरा साठवुन केंद्रामार्फ़त व पालिकेच्या संकेत स्थळामार्फ़त उपलब्ध करुन देईल.

३ **जैविक विघटनशिल पुजा साहित्य** :- मिरा भाईंदर महापालिका इच्छुक संस्थाना समुद्र किनारा, तलाव, डोह, आदी जलश्रोतालगतच्या ठराविक ठिकाणाहुन जैविक विघटनशिल पुजा साहित्य (फ़ळे, पाने, फ़ुले इ) त्यासाठी बनविलेल्या खास पात्रात किंवा कलशात संकलन करण्यासाठी अधिकृत करेल या कलशामधील गोळा केलेल्या साहित्यापासून प्रामुख्याने योग्य स्थळी खतनिर्मिती करण्यात येईल.

४ **ठिकठिकाणी जाऊन कचरा गोळा करण्याची सेवा** :- महापालिका कच-याच्या ठराविक ठिकाणाहुन ठराविक वेळी संकलनासाठी आवश्यक असलेली घंटागाडी उपलब्ध करुन देईल, या गाडीत कचरा आणुन टाकण्याची जबाबदारी कचरा उत्पादकाची आहे. या विशिष्ट वर्गीकरणातील कच-यासाठी वेगवेगळ्या विभागावर घंटागाडीच्या वेळी कचरा स्विकारण्याची ठिकाणी आणि मार्ग निश्चित करुन संबधित उपायुक्तांनी/ विभाग प्रमुखांनी पूर्व सुचित करायचे आहे.

५ **उगमस्थानीच कचरा संकलन** :- इमारत अथवा अनेक इमारतींच्या आवारात असलेल्या निश्चित केलेल्या विशिष्ट कचरा कुंडीतील कचरा ठराविक वेळी महापालिकेचा वाहनांना/कामगारांना उपायुक्तांनी पुर्व निर्देशित केलेल्या वेळी प्रवेश दिल्यास नागरी घनकच-याचे उगमास्थळ जवळच मार्गीका उपलब्ध करुन दिल्यास संकलन करण्याची सुविधा महापालिकेतर्फ़े पुरविण्यात येईल.

६ **भूमिभरणामध्ये येणा-या कच-याची माहिती** :- मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध भूमीभरणामध्ये येणा-या वेगवेगळ्या कच-याचे प्रमाण दर्शविणारी माहिती दर महा मिरा भाईंदर महापालिकेतर्फ़े प्रसिध्द केली जाईल. सदर माहिती विभाग कार्यालय तसेच मिरा भाईंदर महापालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

८ **सार्वजनिक जागेतील सामुदायिक कचरा कुंड्या** :-

) जो पर्यंत उगमस्थानी कचरा संकलन करण्यासाठी अथवा ठिकठिकाणी जाऊन ठराविक कालातंराने कचरा गोळा करण्यासाठी घंटा गाडीची व्यवस्था मिरा भाईंदर महापालिका करित नाही तो पर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणून सार्वजानिक जागा अथवा सार्वजनिक रस्त्यावरील विविध ठिकाणी कचरा कुंड्या पुरविण्याचे व त्यांची देखभाल करण्याचे काम मिरा भाईंदर महापालिकेतर्फ़े पालिकेने नेमलेल्या प्रतिनिधी मार्फ़त केले जाईल. त्या संबधीची माहिती संकेत स्थळावर मिरा भाईंदर महानगरपालिकेने प्रसिध्द केली पाहिजे.

कचरा उत्पादन करणा-यांनी कच-याचे वर्गीकरण करुन तो सार्वजनिक कचरा कुंडीत टाकला पाहिजे व त्यानंतर तो मिरा भाईंदर महापालिकेतर्फे संकलित केला जाईल. ह्या कचराकुंड्याची देखभाल मिरा भाईंदर महानगरपालिका अथवा अभिकरणातर्फे केला केली जाईल. जेणेकरुन वर्गीकरणाची पुर्तता होईल व सार्वजनिक उपद्रव अथवा आरोग्यास धोका निर्माण होणार नाही. याची दक्षता/खात्रीपुर्वक पुर्तता करता येईल. प्रत्येक सार्वजनिक कुंडीमध्ये जैविक विघटनशिल व अविघटनशिल कच-यासाठी कमीत कमी दोन स्वतंत्र कचरा कुंड्या असतील. अशा सर्व जागांचे तसेच कचरा उचलण्याचे वेळापत्रक व व्यवस्थेचा तपशिल विभाग कार्यालयात व महापालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

) कोंणत्याही क्षणी सार्वजानिक कुंड्या भरुन वाहणार नाही अथवा खुल्या वातावरणात कचरा उघड्यावर पडणार नाही तसेच मोकाट जनावरे, पक्षी, कचरा गोळा, करणारे इ कडून कचरा पसरंविण्यास प्रतिबंध करण्याची खबरदारी उपायुक्तांनी घ्यावयाची आहे.

९ **सुका कचरा प्रतवारी निवड केंद्रे :-** पुर्न चक्रीकरण व अपुर्नचक्रीकरणाचे कच-यास वर्गीकरण व नियमन करणे सोपे जावे म्हणून मिरा भाईंदर महापालिकेतर्फे शक्य तेथे व आवश्यक तेवढे कोरड्या कच-याची प्रतवारी केंद्रे उपलब्ध करुन देण्यात येतील ही केंद्रे महापालिकेच्या सरकारी किंवा इतर कोणाच्याही मालकीच्या पण कच-याची प्रतवारी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या जागेवर किंवा पत्र्यांचे शेड, झोपडी अशा सार्वजनिक ठिकाणच्या सुयोग्य जागी असतील. कचरा गोळा करणा-याच्या नोंदणीकृत सहकारी संस्थेतर्फे पुर्नचक्रीकरण प्रक्रिया, परवानाधारक किंवा महापालिकेने नियुक्त केलेल्या इतर यंत्रणेमार्फ़त चालवण्यात येतील. प्रतवारीनंतर उरलेला अविघटनशील कचरा वेळोवेळी संकलित करुन प्रक्रियेसाठी किंवा नष्ट करण्यासाठी नेण्यात येईल अशा केंद्रातील कचरा जवळून जाणा-यांना दिसणार नाही अशा पध्दतीने या केंद्रांना कुंपण घालण्यात येईल/झाकण्यात येतील.

१० **कचरा संकलनाचे वेळापत्रक आणि मार्गिका :-** वेगवेगळ्या प्रकारच्या कच-याचे संकलन मार्ग आणि वेळापत्रक निश्चित करुन त्याची पुर्व सुची उपायुक्ता मार्फ़त देण्यात येईल. तपशिलावर माहिती संबधित विभाग कार्यालयात तसेच महापालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याच बरोबर बांधकाम आणि निष्कासन कचरा बागा आणि उद्यानातील कचरा संकलनाची व्यवस्था/विभाग प्रमुख, उद्यान अधिक्षक किंवा संबधित उपायुक्ता मार्फ़त नागरिकांनसाठी आणि मोठ्या कचरा उत्पादकासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१ **अचानक तपासणी :-** उपायुक्त अथवा महापालिकेच्या अधिकृत अधिकारी अथवा प्रतिनिधी यांना आवश्यक तितक्या मदतनीसासह दिवस भरातल्या कोणत्याही वेळी कोणत्याही विभागात कोणत्याही जागी प्रवेश करुन मिरा भाईंदर महापालिकेने या उपविधी करणे सोपविली कोणतिही जबाबदारी पार

पाडण्यासाठी व ती कोणत्या प्रकारे पार पाडावी हे ठरवण्यासाठी तसेच या उपविधींच्या कलमांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत आहे. किंवा नाही हे पाहण्यासाठी तपासणी करता येईल.

२ **प्रत्येक विभागातील उपद्रव शोधक पथके** :- मा. आयुक्त यांनी नेमणुक केलेले सार्व आरोग्य विभागाचे उपायुक्त, विभागप्रमुख/ सहा.सार्व.आरोग्य अधिकारी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख उपद्रव शोधकांची सध्याची व्यवस्था बळकट करुन योग्य गणवेश व वाहने उपद्रव शोधकांना उपलब्ध करुन देतील.

१३ **प्रसिध्दी नागरिकांना द्यावयाच्या माहितीची सेवा** :- मिरा भाईंदर महापालिका या उपविधीतील तरतुदीबाबत फ़लक, जाहिराती छापील, हस्तपत्रक, रस्त्यावरील सुचना आकाशवाणी व दुरदर्शन वर्तमानपत्रातील लेख आणि अन्य कोंणत्याही योग्य माध्यामाव्दारे प्रसिध्दी देईल. जेणेकरुन सर्व नागरिकांना त्याचा वैधानिक कर्तव्याबाबत आणि मिरा भाईंदर महापालिकेच्या पुनःचक्रांकन कचरा आणि कचरा होऊ न देण्याचा सेवा आणि दंड या बाबत माहिती उपलब्ध होईल.

१४ **नियुक्त अधिकारी आणि कालबध्द अहवाल :-** मा. आयुक्त यांनी नेमणुक केलेले अधिकारी, सार्व आरोग्य अधिकारी, विभाग प्रमुख आणि उपायुक्त आपल्या अखत्यारीत अधिकारी नियुक्त करतील. हा अधिकारी महापालिकेच्या या उपविधीमध्ये दिलेल्या अनिवार्य जबाबदा-यांच्या अमंलबजावणीस उत्तरदायी असेल. या जबाबदा-या व सुक्ष्म नियोजन साठी संबधित आर्थिक वर्षाच्या वेळापत्रकानुसार पार पाडण्यात येतील.

१५ **पारदर्शकता आणि सार्वजनिक सुगमता** :- मिरा भाईंदर महापालिकेच्या पारदर्शकता आणि सार्वजनिक सुगमतेचा अधिकतम खातरजमा करण्याच्या उद्देशाने जी माहिती मिरा भाईंदर महापालिकेस प्रसिध्द करावयाची आहे. ही माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिंध्द केली जाईल.

१६ **प्रशासकीय यंत्रणाची समन्वय** :- या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने महा पालिका सर्व शासकीय यंत्रणाशी, प्राधिकरणाशी संबधित यंत्रणेच्या कार्यक्षेत्रात होणा-या कांमाबाबत समन्वय साधेल.

**“मिरा भाईंदर महापालिकेच्या किंवा काही विनिर्दिष्ट प्रकारच्या / परिस्थिती बाबतीत कचरा निर्माण करणा-यांच्या बंधनकारक जबाबदा-या काही विशिष्ट परिस्थितींचे स्वरुप लक्षात घेऊन खालील जबाबदा-या विर्निदिष्टपणे अनिवार्य करण्यात आलेल्या आहेत” :-**

१ **झोपडपट्ट्या :-**

.१ आतापर्यंत न पोहोचलेल्या झोपडपट्ट्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन कामासाठी प्रभाग अधिकारी दत्तक वस्ती योजना राबविण्याची कार्यवाही करतील

.२ शक्य त्या ठिकाणी आवश्यक असलेल्या झोपडपट्टीच्या जवळपास विभक्तीकरण केलेला कचरा उचलण्यासाठी निश्चित वेळापत्रकानुसार महापालिकेची घंटागाडी पुरविण्यात येईल.

.३ काही विशिष्ट ठिकाणी आवश्यकतेनुसार घंटागाडीची व्यवस्था करण्याच्या कालावधीपर्यंत, सार्वजनिक रस्त्यावर आवश्यक ठिकाणी मनुष्यबळासह कचराकुंड्या ठेवण्यात येतील व त्या महापालिकेतर्फे परिरक्षित केल्या जातील. अशा ठिकाणी विभक्तीकरण केलेल्या कच-याची साठवणूक करता येईल, व महापालिका असा विभक्तीकरण केलेला कचरा उचलण्याची व्यवस्था करेल.

.४ स्थानिक नगरसेवक / नागरिक संघटणा, शासकीय /अशासकीय संस्था /सामुदायिक संस्था यांच्या सहकार्याने तसेच झोपडपट्ट्यांच्या आत स्वच्छता राखण्यासाठी वेळोवेळी दत्तक वस्ती योजनाच्या नियंत्रणाचा सामाजिकृत संस्थांच्या मदतीने महापालिका स्वच्छता अभियाने राबविल.

. कोंबड्या, मासळी, कत्तलीचा कचरा (विवक्षित कत्तलखाने व मंड्या सोडून इतर जागेवरचा)

.१. **विवक्षित कत्तलखाने व मंड्या सोडून इतर मालक /भोगवटादार जे कोंबड्या, मासळी आणि कत्तलीचा** कचरा/ निर्माण करतील असे मालक/भोगवटादार यांनी निर्माण केलेला कचरा आरोग्य दृष्ट्या बंदिस्त, सुरक्षित ठिकाणी/ साठवतील आणि निश्चित केलेल्या ठिकाणी या कामासाठी पुरविण्यात आलेल्या हवाबंद स्वरुपात आरोग्यकारक स्थितीमध्ये महापालिकेने पुरविलेल्या वाहनांवर ठरविलेल्या स्थळी व वेळात जमा करावे. अशा स्वरुपात कच-यासाठी नियमित कचरा कुंड्याचा वापर करु नये. तसे केल्यास अशा कत्तलखाने व कोंबड्याच्या खुराड्याचे मालक यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

.२ **मिरा भाईंदर महापालिकेचे बाजार विभाग :-** बाजारांमध्ये कमाल आरोग्यकारक स्थिती राखण्यासाठी, बाजारांची स्वच्छता राखण्यासाठी त्यांचे पुनरारेखन करुन बाजारामध्ये स्वच्छता व आरोग्यदायक स्थिती राखण्यासाठी जबाबदार राहिल.

३. **विक्रेते / फ़ेरीवाले** :- सर्व विक्रेते / फ़ेरीवाले त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर कचरा वेगवेगळा ठेवण्यासाठी योग्य त्या डब्यांची व्यवस्था करणे बंधनकारक आहे. असा वेगवेगळा केलेला कचरा महानगरपालिकेने उपलब्ध केलेल्या घंटागाडीमध्ये किंवा जवळच्या सार्वजनिक कचराकुंडीमध्ये नेऊन टाकण्याची जबाबदारी संबधित विक्रेता / फ़ेरीवाल्यांचा असेल अन्यथा ते दंडसुचीमध्ये नमुद केलेल्या दंडासाठी पात्र होतील. प्रत्येक फ़ेरीवाला त्याच्या आजुबाजुचे अंगण साफ़ ठेवण्यांस जबाबदार राहिल.

**"घरगल्ल्या" :-**

३.१ घरगल्ल्या असलेल्या परिक्षेत्रातील प्रत्येक मालक / भोगवटादार घरगल्ल्यात कचरा पडणार नाही. याची दक्षता घेण्यास जबाबदार असतील. तसेच महापालिकेने पुरविलेल्या गाड्यामध्ये निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार महानगरपालिकेच्या गाडीमध्ये विभक्तीकरण केलेला घनकचरा टाकण्यास

जबाबदार असतील.

.२ अशा परिक्षेत्रातील जे मालक / भोगवटादार घरगल्ल्यामध्ये स्वच्छतेसाठी महापालिकेची सेवा उपभोगु इच्छित असतील त्यांनी महापालिकेच्या संबधित विभाग कार्यालयाकडे अर्ज करणे व महापालिकेने सुचित केल्यानुसार वेळोवेळी कचरा निर्मुलन आकार भरणे बंधनकारक आहे. अशा प्रसंगी संबधित मालक / भोगवटादार त्या ठिकाणाचा कचरा काढण्यासाठी योग्य मार्गिका उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असतील.

**मालकीच्या /पाळीव प्राण्यापासून होणारा कचरा:-** सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर पाळीव प्राण्यांनी केलेला कचरा काढणे व ती जागा स्वच्छ ठेवणे तसेच त्याच्या स्वःताच्या सांडपाणी व्यवस्थेत त्या कच-याची योग्य विल्हेवाट शक्यतो करणे ही त्या पाळीव प्राण्यांच्या मालकाची जबाबदारी असेल.

**"सार्वजनिक मेळावे व कार्यक्रम" :-**

.१ ज्या ज्या ठिकाणी पोलिस अथवा महापालिकेची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल, जसे मिरवणुका, प्रदर्शने, सर्कशी ,जत्रा, राजकीय मोर्चे,व्यापारी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम निषेध मोर्चे आणि धरणे इ. सार्वजानिक मेळावे व कार्यक्रम त्या त्या ठिकाणाची आणि त्या ठिकाणी असलेले सर्व उपांगाची काळजी घेण्याची व त्या परिक्षेत्रात स्वच्छता राखण्याची जबाबदारी अशा कार्यक्रमाच्या व मेळाव्याच्या संघटकाची /आयोजकाची राहिल.

.२ **परताव्याची स्वच्छता अनामत रक्कम** :- अशा प्रकारच्या कुठल्याही सार्वजानिक कार्यक्रमाचे अथवा मेळाव्याचे आयोजक संबधित विभाग कार्यालयाकडे कार्यक्रमाच्या कालावधी पुर्ण होईपर्यंत परताव्याची अनामत रक्कम जी सदर कार्यक्रमाची जागा पुर्णपणे स्वच्छ करुन कार्यक्रमाच्या जागी निर्माण झालेला कचरा विवक्षित ठिकाणी पोहोचल्याची उपायुक्तांनी खातरजमा केल्यानंतर परत दिली जाईल. ही अनामत रक्कम ठेवतील फ़क्त स्वच्छतेसाठी असुन त्यात परिवास्तुच्या नुकसानीचा अंर्तभाव नाही. जर अशा संघटनांना/ आयोजकांना/मेळाव्यांना / कार्यक्रमाच्या प्रसंगी महापालिकेच्या सेवा उपभोगाच्या असतीलच तर त्यांनी संबधीत विभाग कार्यालयाकडे अर्ज करणे व महापालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार योग्य ती रक्कम भरणे आवश्यक आहे.

**खाजगी मालमत्तेवरील कचरापेट्या** :- खाजगी परिक्षेत्रातील प्रत्येक मालकांना / भोगवाटादारांना सार्वजनिक रस्त्यावरुन अथवा पदपथावरुन चालताना दिसणार नाहीत. अशा पध्दतीने त्यांच्या आवारात कचरा पेट्या ठेवणे व परिरक्षित करणे आवश्यक आहे.

**रस्त्यावर वाहने उभे करण्याचे प्रश्न** :- सार्वजनिक जागी अथवा रस्त्यावर रात्रीच्या वेळी तसे व्यापारी भागामध्ये दिवसा वाहने उभी करण्याने वाहनाखालील जागा अथवा रस्त्याचा भाग साफ़ करणे

शक्य होत नाही. अशां ठिकाणी त्या मोटारिंच्या अथवा अन्य वाहनांच्या मालकास सफ़ाई करावी लागेल अथवा सुची (१) नुसार विहित दंड भरावा लागेल.

**इतर सार्वजनिक जागा** :- शासनाच्या / निमशासनाच्या संविधीक निगमाच्या मालकीच्या ताब्यात असलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक जागेत हया उप विधीचे अमंलबजावणी करण्यास ते जबाबदार असतील.

**भितीवर भित्तीपत्रके अथवा चित्रे लावणे** :- कोणत्याही व्यक्तीने मिरा भाईंदर महापालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय झाडे, किंवा रस्त्यावरील खांबावर भित्तीपत्रके फ़लक, अथवा चित्रे चिटकवण्यास किंवा टांगण्यास सक्त मनाई आहे.

## "या उपविधीचे पालन न केल्यास होणा-या शिक्षा" :-

या उपविधी मधील तरतुदीचे उल्लघंन केल्यास

**अथवा पालन न केल्यास या उपविधीसोबत जोडलेल्या सुची (१) प्रमाणे दंड भरावा लागेल.** सदर दंड न भरल्यास त्या व्यक्तीस भितीं स्वच्छ करणे अथवा रस्ते झाडणे अशा स्वरुपाची उपद्रवक शोधकांनी अथवा अन्य संबधित अधिकारी व्यक्तीने सुचविलेल्या किमान एक तासाची **सार्वजनिक सेवा** करावी लागेल.

या उपविधीमधील तरतुदींचे उल्लघन करणारे वर्तन चालुच ठेवले तर पुढच्या प्रत्येक नियम बाह्य वर्तनासाठी दर दिवशी **रु.१००/-** प्रमाणे मुळ दंडाच्या व्यतिरिक्त दंड आकारला जाईल.

# अनुसुची क्र :- १
## उपविधीतील नियमांचे उल्लघंन केल्याबाबत प्रस्तावित दंड रक्कम
## उपविधी क्र. ४.१
## (रस्त्यावर कचरा टाकणे,थुंकणे,प्रार्त:विधी करणे)

| अ.क्र | स्वरुप | दंडाची रक्कम रु. |
|---|---|---|
| ४.१ | कोणत्याही व्यक्तीने अधिकृत सार्वजनिक अथवा खाजगी कचरा कुंड्य व्यतीरिक्त अन्य कोणत्याही सार्वजनिक गटारात, नाल्यात इमारतीचे, सोसायटीचे, घराचे सांडपाणी, मलमुत्र, सेप्टीक/चेंबर्स मध्ये न सोडता थेट गटारात सोडणे तसेच गुरांचे तबेले, गोठे यातुन निघणारे टाकाऊ पदार्थ शेण, मलमुत्र इ. सार्व जागेत सार्व गटारात नाल्यात सोडता येणार नाही. कारखान्यातील टाकाऊ माल सार्वजनिक जागेत, रस्त्यावर, गटारात, नाल्यात टाकता येणार नाहीत. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु. ५००/- |
| ४.२ | वाहनातील वाहन चालक, किंवा प्रवासी कोणीही व्यक्ती चालत्या किंवा स्थिर वाहनातुन कोणत्याही रस्त्यावर, मार्गावर, पदपथ, खेळाची मैदाने, उद्याने, रहदारीच्या जागा, किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी कचरा फ़ेकणार किंवा जमा करणार नाही. फ़ेरीवाल्यामार्फ़त उघड्यावर खाद्यपदार्थ बनविणे खाद्यपदार्थाची विक्री करणे, फ़ेरीवाल्यांतर्फ़े सार्वजनिक रस्त्यावर खाजगी व सार्व ठिकाणी कचरा जमा करणे वा टाकणे या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु. ५००/- |
| ४.३ | कोणत्याही व्यक्तीने अधिकृत खाजगी किंवा सार्वजनिक कचरा कुंड्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्याप्त मोकळ्या किंवा रिकाम्या जागी मालमत्तेच्या वास्तव्य असलेल्या अथवा नसलेल्या ठिकाणी कचरा टाकु किंवा जमा करु नये. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु. ५००/- |
| ४.४ | कोणतिही व्यक्ती, कचरा वाहतुकीसाठी त्यात भरलेला केरकचरा सांडण्यास, उडुन जाण्यास, अथवा रस्ता, पदपथ, रहादारीच्या जागा, खेळाची मैदाने, उद्यान किंवा अन्य सार्वजानिक ठिकाणी जमा होण्यास प्रतिबंध होईल अशा पध्द्तीने रचना असलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर वाहन चालविणार किंवा हलविणार नाही. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु. ५००/- |
| | कोणीही व्यक्ती खालील विशिष्ट कारणांसाठी पुरविण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधा किंवा सुखसोयी वगळता अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे, थुंकणे, मलमुत्र, विर्सर्जित करणे, प्रात:विधी करणे, प्राणी किंवा पक्ष्यांना खाण्यास देणे, भांडी किंवा अन्य कोणतिही वस्तु दुरुस्त करणे / धुणे ही कामे करणार किंवा कोणत्याही प्रकारची साठवण ठेवणार नाही. खाजगी इमारत, सोसायटी, घरे, औद्योगिक आस्थापना, शाळा आदी इमारतींचे मलमुत्र परस्पर महापालिका गटारात सोडता येणार नाही. सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय, हॉटेल्स, यांच्याकडील टाकाऊ अन्नपदार्थ मनपा गटारात रस्त्यावर किंवा उघड्यावर टाकता येणार नाहीत. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दिन रु. १०००/- |
| ४.६. | प्रत्येक मालक अथवा भोगवटादार निवासी जागेव्यतीरिक्त स्वच्छ अंगण परिरक्षित ठेवण्यास जबाबदार राहिल. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु.१०००/- |
| ४.७. | सार्वजनिक ठिकाणी भांडी धुणे,वाहने धुणे,वाहने दुरुस्त करणे, रस्त्यावर वाहने उभी करणे, सार्वजनिक ठिकाणी अथवा मोकळ्या जागेवर गॅरेज चालविणे, या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु.५००/- |
| ४.८. | घर, इमारती, सोसायटी,चाळ च्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ न ठेवणे या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | दंड रु.१०००/- |

# अनुसुची क्र :- १

## उपविधीतील नियमांचे उल्लघंन केल्याबाबत प्रस्तावित दंड रक्कम

## उपविधी क्र. ५.१

### घनकच-याचे वर्गीकरण करणे, साठवण करणे,गोळा करणे, वाहतुक करणे.

| अ.क्र | स्वरुप | दंडाची रक्कम रु. २००/- |
|---|---|---|
| ५.१ | कच-याची कोणत्याही प्रकारची मानवी हाताळणी न करता किंवा तो न सांडता त्याचे सुरक्षितरित्या आणि सहजपणे संकलन व्हावे म्हणुन विविध प्रकारच्या घनकच-याची साठवण आणि पुरवठा करण्यासाठी महापालिका आयुक्त अनिवार्य अधिसुचित करतील आणि तो विविध प्रकारचा घनकचरा निर्माण करणा-यास बांधिल राहिल. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |
| ५.२ | कुठल्याही जमिनीवर अथवा मालमत्तेमध्ये जमा झालेला कचरा गोळा करुन व त्याचे वर्गीकरण करुन तो महापालिकेने कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या कर्मचा-यांनकडे सुपुर्त करणे. अथवा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या वाहनात टाकणे हे त्या जमिनीच्या अथवा मालमत्तेच्या मालकाचे अथवा भोगवटादाराचे कर्तव्य राहिल.या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |
| ५.३ | म्हणजे वर्गीकरण करण्यात आलेला जैविक विघट्नशिल नागरी घनकचरा (सुची २ मधील स्पष्टीकरणात्मक यादीप्रमाणे) जर कचरा निर्माण करणा-याकडून त्याचे खत करण्यात आले नाही तर त्याने असा कचरा त्याच्या जागेत साठवावा. आणि प्रत्येक कचरा निर्माण करणा-यांनी हा कचरा घंटा गाडीत किंवा मोठ्या प्रमाणावर जैविक विघटनशिल कचरा संकलित करणा-या वाहनांत किंवा संबधित उपायुक्त यांनी वेळोवेळी अधिसुचित केल्याप्रमाणे मिरा भाईंदर महापालिकेने ठरविलेल्या ठराविक वेळी कचरा दिला जात आहे, याची खातर जमा करावी. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |
| ५.४ | कच-याचे परिवहन कमी करण्यासाठी कच-यापासून स्थानिक खतनिर्मिती करण्यास उत्तेजन देण्यात येईल.या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |
| ५.५ | (अनुसुची ३ मध्ये दिलेल्या यादीनुसार) प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा धोकादायक कचरा साठवुन तो कचरा संकलित करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारिक करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाव्दारे साप्ताहिक/ठराविक कालावधीने पुरविण्यात येणा-या संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंड्ळाकडून अनिवार्य करण्यात आल्या प्रमाणे अशा कच-याची पध्दतशील विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरिता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. ५००/- |
| ५.६ | (अनुसुची ४ मध्ये दिलेल्या यादीनुसार) प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा कचरा विनिर्दीष्ट प्रकारच्या बंधिस्त कचरा पेटीत साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदषण नियत्रण मंडळाकडून प्राधिकारित करण्यात आलेल्या | प्रति दंड रु. १००/- |

| | | |
|---|---|---|
| | अन्य कोणत्याही अभिकरणाव्दारे साप्ताहिक / ठराविक कालावधीत पुरविण्यात येणारा कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियमावली १९९८ नुसार अनिवार्य करण्यात आल्या प्रमाणे अशा कच-याचे पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरिता नियोजन केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | |
| ५.७ | बांधकाम तसेच निष्कासनातुन निर्माण होणारा कचरा मिरा भाईदर महानगरपालिकेने असा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीने निर्देशित केलेल्या ठिकाणी व निर्देशित केलेल्या वेळात साठविल्या व सुपुर्द केला पाहिजे.छोट्याप्रमाणावर म्हणजे घरगुती पातळीवर असा कचरा निर्माण करणा-यांनी त्याचे जागीच वर्गीकरण करुन महापालिकेच्या मदत क्रमांकावर दुरध्वनी करुन अथवा असा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या व्यक्ती अथवा संस्थेशी संपर्क साधुन हा कचरा सुपुर्द करावा व त्याच्या वाहतुकीचे शुल्कही संबधितांना द्यावे. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |
| ५.१० | रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजानिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा घनकचरा जाळण्यास प्रतिबंध.या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |

अनुसुची क्र.:- १

# उपविधीतील नियमांचे उल्लघंन केल्याबाबत प्रस्तावित दंड रक्कम

## उपविधी क्र. ७

| अ.क्र | स्वरुप | दंडाची रक्कम रु. २००/- |
|---|---|---|
| ७.२ | विवक्षित कत्तलखाने व मंड्या सोडून इतर मालक /भोगवटादार जे कोंबड्या मासळी आणि कत्तलीचा कचरा, निर्माण करतील असे मालक/भोगवटादार यांनी निर्माण केलेला कचरा आरोग्यदृष्या बंदिस्त, सुरक्षित ठिकाणी, साठवतील आणि निश्चित केलेल्या ठिकाणी या कामासाठी पुरविण्यात आलेल्या हवाबंद स्वरुपात आरोग्यकारक स्थितीमध्ये महापालिकेने पुरविलेल्या वाहनांवर ठरविलेल्या स्थळी व वेळात जमा करावे. अशा स्वरुपात कच-यासाठी नियमित कचरा कुंड्याचा वापर करु नये. तसे केल्यास अशा कत्तलखाने व कोंबड्याच्या खुराड्याचे मालक यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. ५००/- |
| ७.३ | सर्व विक्रेते / फ़ेरीवाले त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर वेगवेगळा ठेवण्यासाठी योग्य त्या डब्यांची व्यवस्था करणे बंधनकारक आहे. असा वेगवेगळा केलेला कचरा महापालिकेने उपलब्ध केलेल्या घंटागाडीमध्ये किंवा जवळच्या सार्वजनिक कचराकुंडीमध्ये नेऊन टाकण्याची जबाबदारी संबधित विक्रेता / फ़ेरीवाल्यांचा असेल अन्यथा ते दंडसुचीमध्ये नमुद केलेल्या दंडासाठी पात्र होतील. प्रत्येक फ़ेरीवाला त्याच्या आजुबाजुचे अंगण साफ़ ठेवण्यांस जबाबदार राहिल. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. २००/- |
| ७.४ | घरगल्ल्या असलेल्या परिक्षेत्रातील प्रत्येक मालक / भोगवटादार घरगल्ल्यात कचरा पडणार नाही. याची दक्षता घेण्यास जबाबदार असतील. तसेच महापालिकेने पुरविलेल्या गाड्यामध्ये निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार महापालिकेच्या गाडीमध्ये विभक्तीकरण केलेला धनकचरा टाकण्यास जबाबदार असतील. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |
| ७.५ | सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर पाळीव प्राण्यांनी केलेला कचरा काढणे व ती जागा स्वच्छ ठेवणे तसेच त्याच्या स्व:ताच्या सांडपाणी व्यवस्थेत त्या कच-याची योग्य विल्हेवाट शक्यतो करणे ही त्या पाळीव प्राण्यांच्या मालकाची जबाबदारी असेल. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. ५००/- पर्यंत |
| ७.६.२ | ज्या ठिकाणी पोलिस अथवा महापालिकेची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल, जसे मिरवणुका प्रदर्शने, सर्कशी ,जत्रा, राजकीय मोर्चे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आणि धरणे इ. सार्वजानिक मेळावे व कार्यक्रम त्या त्या ठिकाणाची आणि त्या ठिकाणी असलेले सर्व उपागांची काळजी घेण्याची व त्या परिक्षेत्रात स्वच्छता राखण्याची जबाबदारी अशा कार्यक्रमाच्या व मेळाव्याच्या संघटकाची ,आयोजकाची राहिल. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. ५००/- |
| ७.७ | खाजगी परिक्षेत्रातील प्रत्येक मालकांना / भोगवटादारांना सार्वजनिक रस्त्यावरुन अथवा पदपथावरुन चालताना दिसणार नाहीत. अशा पध्दतीने त्यांच्या आवारात कचरा पेट्या ठेवणे व परिरक्षित करणे आवश्यक आहे. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत | प्रति दंड रु.५००/- पर्यंत |
| ७.१० | कोणत्याही व्यक्तीने मिरा भाईंदर महापालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय झाडे, किंवा रस्त्यावरील खांबावर भित्तीपत्रके फ़लक, अथवा चित्रे चिटकवण्यास किंवा टांगण्यास सक्त मनाई आहे. या उपविधीतील नियमांचे उल्लघनाबाबत. | प्रति दंड रु. १००/- |

## "जैविक विघटनशिल आणि पुर्नःचक्रांकन करता येण्याजोगा कच-याची यादी".

### "जैविक विघटनशिल कचरा" :-

१. जैविक विघटनशिल कचरा म्हणजे झाडाची पालापाचोळा प्राण्यांच्या हाडांचा पासून तयार झालेला कचरा होय.

२. घरगुती कच-यामध्ये प्रामुख्याने चहाची वापर केलेली चहापावडर, अंड्याची खवले, नासलेली फ़ळे आणि भाज्या, उरलेले जेवण, बगीचे उद्याने यामधुन निर्माण होणारा पाला पाचोळा, जनावरांचे मलमुत्र,कागदी कचरा, घरगुती नारळ साफ़ केल्यावर त्याच्या सालापासुन होणारा कचरा इ. समावेश होतो.

### "पुर्नःचक्रांकन करता येण्याजोगा कचरा" :-

पुर्नःचक्रांकन कचरा म्हणजे सुक्या कच-यावर प्रक्रिया करुन त्यापासून नवीन उत्पादक बनविणे असे उत्पादक जे मुळ वस्तुपासून पुर्णपणे वेगळे असेल. या मध्ये प्रामुख्याने वर्तमानपत्रे, पुस्तके, मॅगझिन्स, काच, स्टिलच्या वस्तु, प्लास्टीक, कापड, चामडे, रबर, फ़र्निचर इ. गोष्टींचा समावेश होतो.

### घरगुती विशिष्ट घातक घनकचरा :-

१. रोजच्या वापरात येणा-या बॅट-या
२. गाड्यांची बॅटरी, गाडीचे इतर सामान
३. औषधी वस्तु , ब्युटीपार्लर मध्ये वापरली जाणारी उत्पादने
४. विजेचे दिवे, ट्युबलाईट आणि मोठे फ़ोकस
५. मुदत संपलेली औषधे व गोळ्या
६. प्लास्टीकच्या वस्तु बनविताना वापरण्यात येणारे द्रव्य पदार्थ
७. फ़ोटोग्राफ़ी करिता वापरण्यात येणारे रीळ
८. घरगुती फ़र्निचर मध्ये वापरण्यात येणारे पदार्थ म्हणजे कापुस इ
९. थर्मामिटर आणि पा-याच्या इतर वस्तु.

**जैविक वैद्यकिय कचरा :-** जैविक वैद्यकिय कचरा म्हणजे प्राण्यांचे किंवा मानवाच्या शस्त्रक्रिया करताना निर्माण होणारा वैद्यकिय कचरा

१. उपयोगी नसलेल्या धातुच्या वस्तु यामध्ये प्रामुख्याने शस्त्रक्रियेत वापरण्यात येणारी ब्लेड, काचेच्या वस्तु,
२. मुदत संपलेली गोळ्या व औषधे इतर पदार्थ इ.
३. शस्त्रक्रियेमध्ये उपयोगात आणलेली बॅंडेज, कापडी पट्ट्या, प्लास्टर करताना निघणारे पदार्थ इ.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

217

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

प्रकरण क्र.: (९६) **"सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणेबाबतचे उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

ठराव क्र: ( ७०७ )

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणेबाबतचे उपविधी २०१०" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केली असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- ______________________
सौ. प्रभात पाटिल

अनुमोदक :- ______________________
(डॉ. आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

218

# मिरा भाईदर महानगरपालिका

# सांसर्गिक, साथीच्या व स्थानिक रोगांच्या लागणीची सूचना देणे

## उपविधी, २०10

डॅग्यु. लेप्टो – २००९ - Upawidi

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८(३१) च्या तरतुदीनुसार दुर्धर नसेल अशा सांसर्गिक, साथीच्या किंवा स्थानिक रोगाचा प्रादुर्भाव झाल्यासंबंधी द्यावयाच्या सुचनेसंबंधीचे मिरा भाईंदर महानगरपालिकाने तयार केलेले उपविधी.

या उपविधींना राज्य शासनाने नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. ------------------ दि. __________ ने मान्यता दिली.

(प्रारूप) उपविधी

१. संक्षिप्त नामाभिधान व प्रारंभ

(१) हि उपविधी " मिरा भाईंदर महानगरपालिका (सांसर्गिक, साथीच्या व स्थानिक रोगांच्या लागणीची सूचना देणे) उपविधी २००५" या नामाभिधानाने ओळखली जाईल.

(२) राज्य शासनाच्या राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ती अमंलात येईल.

२. व्याख्या :-

(i) संदर्भात किंवा अर्थात काही प्रतिकूल नसल्यास या उपविधीत -

(अ) "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा ५९)

(ब) "महानगरपालिका" म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका.

(क) "सांसर्गिक (Infectious), साथीचा (Epidemic), स्थानिक रोग (Endemic) म्हणजे पटकी (Cerebrospinal Fever), कुष्ठरोग, Polymeletis, फुफ्फुसांचा किंवा आतड्यांचा क्षयरोग, Rabies, Puerperal Fever, Typhus, Relapsing Fever, इन्फ्लुएंझा, पिवळा ताप, Continuous Pyrexia of unknown organ or more than four days duration Encephalitis, किंवा राज्य शासनाने राजपत्रात घोषित केलेल्या दुसरा कोणताही धोकादायक आजार.

(ड) "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" म्हणजे अधिनियमाच्या कलम ४५ च्या तरतुदीनुसार नियुक्त केलेला महानगरपालिकेचा अधिकारी, यात वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने

या उपविधींच्या तरतुदीखालील अधिकार वापरण्यासाठी लेखी आदेशाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महापालिका अधिकाऱ्याचा व कर्मचाऱ्याचा समावेश असेल.

(इ) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

(फ) "वैद्यकीय व्यवसायी" म्हणजे इंडियन मेडिकल असोसिएशन वा तत्सम संस्थेकडून नोंदणी करून त्याआधारे रोगनिदान व औषधोपचार करणारी व्यक्ति.

(ii) ज्या शब्दांची/वाक्यसमुहांची व्याख्या या उपविधींत देण्यात आलेली नसेल त्या शब्दांचा/ वाक्यसमुहांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा असल्याचे समजण्यात येईल.

३. <u>सांसर्गिक/साथीच्या/स्थानिक (Endemic) रोगांच्या लागणीची सूचना देणे</u>

(१) महानगरपालिकेच्या भौगोलिक सीमेत व्यवयास करणाऱ्या कोणत्याही वैद्यकीय व्यवसायीला कोणत्याही निवासी जागेत (रूग्णालये वगळून) कोणतीही व्यक्ती सांसर्गिक / साथीच्या / स्थानिक रोगाने ग्रस्त असल्याची माहिती मिळाल्यास वा अशा रोगांने एखादी व्यक्ती ग्रस्त असावी असे वाटत असल्यास किंवा तसा संशय असल्यास आणि,

(२) एखादा कारखाना, शैक्षणिक अथवा सार्वजनिक संस्थेच्या व्यवस्थापकास त्याच्या व्यवस्थापनाखालील इमारतींमध्ये राहणारी कोणतीही व्यक्ती सांसर्गिक वा साथीच्या वा स्थानिक रोगाने ग्रस्त असल्याची माहिती असेल किंवा तशी असल्याचा संशय असेल आणि,

(३) कोणत्याही इमातीचा मालक, भोगवटादार तसेच कुटुंबप्रमुख यापैकी कोणालाही आपल्या इमारतीत राहणारी कुटुंबातील व्यक्ती सांसर्गिक / साथीच्या वा स्थानिक रोगाने ग्रस्त असल्यास माहिती असेल वा ग्रस्त असल्याचा संशय असल्यास,

असा वैद्यकीय व्यवसायी / कारखाना / शैक्षणिक / सार्वजनिक संस्थेचा व्यवस्थापक / इमारतीचा मालक/ भोगवटादार / कुटुंबप्रमुख त्याबद्दलची माहिती शक्य तितक्या तातडीने वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यास लेखी कळवील. तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने मागणी केल्यास रोगग्रस्त व्यक्तीचे नाव, वय, पत्ता माहित झाले असल्यास रोगाचे नाव, कोणत्या तारखेपासून रोगग्रस्त आहे व त्या तारखेनंतर कोणकोणत्या ठिकाणांना त्या व्यक्तीने भेट दिली ही व वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक वाटणारी अधिक माहिती पुरवावी लागेल.

284

४. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात महानगरपालिकेच्या भौगोलिक सीमेतील सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना वरील नियम ३ मध्ये नमुद केलेल्या व्यक्तीकडून माहिती वेळेत प्राप्त करण्याकरीता महानगरपालिका फोन रेकॉर्डींग सिस्टिम उपलब्ध करुन घेईल.

५. **उपविधींच्या तरतुदींचा भंग करण्याबद्दल शास्ती -**

या उपविधींच्या तरतुदींचा भंग करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस सिध्दापराधानंतर –

(अ) रूपये १००/- पर्यंत दंड व पहिल्या शिक्षेनंतर असा भंग चालू राहिल्यास अशा प्रत्येक दिवसासाठी रूपये २०/- पर्यंत दंड होऊ शकेल.

(ब) वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याकडून तरतुदींचा भंग न करण्याबद्दल मिळालेल्या लेखी सूचनेनंतरही असा भंग करणे चालू राहिल्यास त्या प्रत्येक दिवसासाठी रूपये २०/- पर्यंत दंड होऊ शकेल.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

२१२

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

प्रकरण क्र.: (१७) "फेरीवाला परवाना व बैठक परवानगी उपविधी २०१०" मसुद्यास अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.

ठराव क्र :- (७०१)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "फेरीवाला परवाना व बैठक परवानगी उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- (सही) सौ. प्रभात पाटील

अनुमोदक:- (सही) (डॉ. आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला.

(सही)
मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

97

२४९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन)

## उपविधी २०१०

# प्रास्ताविक

शहरी भागातील असंघटीत कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे व त्याचबरोबर शहरातील नागररिकांना त्यांच्या दैनंदिन गरजांची पुर्तता होणेसाठी त्याचबरोबर कल्याणकारी राज्यांची कल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणे आणि शहर वाहतूकीच्या दृष्टीने सर्वांनाच सोयीचे वाटणे व ते अधिक आखिव - रेखीव, सुनियोजित व सुंदर बनविण्यासाठी फेरीवाल्यासंबंधीचे धोरण उपयोगी ठरणार आहे.

फेरीवाले व नागरिक हे परस्पर एकमेकांवर अवलंबून असणारे घटक असून, नागरीकांना फेरीवाल्यांकडून काही प्रमाणात स्वस्त व सहज वस्तू उपलब्ध होतात. आणि फेरीवाल्यांचीही उपजिवीका त्यावरच चालते. शहराच्या लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेली बेरोजगारी विचारात घेता स्वयंरोजगार म्हणून फेरीवाल्यांची संख्या गेल्या १० ते १५ वर्षात झपाट्याने वाढलेली आहे.

भारतीय राज्यघटनेने नागरीकांना त्यांच्या उपजिविकेसाठी व्यवसाय करण्यासाठी मुभा दिलेली असून फेरीवाल्यांना वाहतूकीस / पादचा-यांना अडथळा होणार नाही अशा योग्य जागा देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या नगर विकास व दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने सन २००४ साली नागरी क्षेत्रातील रस्त्यावरील किरकोळ विक्रेत्यांबाबत जाहीर केलेले " राष्ट्रीय फेरीवाला धोरण " आणि हया संदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील फेरीवाला व्यावसायीकांसाठी " महानगरपालिका / नगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९ " तयार करुन शासन निर्णय क्रमांक राफेधो-०३०९/प्र.क्र.२०/नवि-३४, दिनांक ०२ मार्च २००९ अन्वये महापालिकेकडे अंमलबजावणीसाठी पाठविलेले आहेत.

या उपविधींची अंमलबजावणी केल्यानंतर शहरातील असंघटीतपणे रस्त्यावर व्यवसाय करणा-या फेरीवाल्यांना सुनियोजित ठिकाणी व्यवसाय करता येईल. तसेच जे फेरीवाले इतरत्र बेकायदेशिरपणे व्यवसाय करतील त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येईल. त्यामुळे शहरातील रस्ते , पदपथ हे वाहतुकीसाठी , पादचा-यांसाठी मोकळे होतील.

सद्या महानगरपालिकेमध्ये फेरीवाल्यांसंबंधी उपविधी नसल्यामुळे फेरीवाले व्यावसायीकांवर नियंत्रण करणे कठीण जाते. म्हणून राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार व केलेल्या आदर्श उपविधीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी फेरीवाला व्यवसायासंबंधीचे उपविधी करणे योग्य होईल म्हणून सदरचे उपविधी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

स्वाक्षरीत/-
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# भाग - १

## १.१ संक्षिप्त नामाभिधान -

(अ) हे उपविधी " मिरा भाईंदर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) उपविधी २०१०" या नावाने संबोधण्यात येतील.

(ब) हे उपविधी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात लागू राहील.

(क) हे उपविधी राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

## १.२ व्याख्या -

**(अ) विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास या नियमात -**

(१) **"फेरीवाला"** म्हणजे आपला माल कोणत्याही पक्क्या संसाधनाशिवाय परंतु सार्वजनिक/खाजगी जमिनीवर एखाद्या तात्पुरत्या स्थिर संरचनेच्या आधारे किंवा फिरत्या गाडीच्या आधारे किंवा डोक्यावर भार वाहून फेरीने लोकांना वस्तुची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती.
(**टीप** - फेरीवाल्यांच्या व्याख्येमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापुर्वी दिलेले अपंगाकरिता PCO बुथ, चर्मउद्योग, आरे-सरिता दूध केंद्र तसेच इतर पक्के स्टॉल यांचा समावेश नाही.)

(२) **"स्थिर फेरीवाला"** म्हणजे एकतर नेमून दिलेल्या सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील एका जागेवर बसून मालाची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती.

(३) **"फिरता फेरीवाला"** म्हणजे ढकल गाडीवरून किंवा हातगाडीवरून किंवा सायकलवरून किंवा वाहनातून किंवा आपल्या डोक्यावरील टोपलीतून मालाची विक्री करत एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी जाणारी व्यक्ती.

(४) **"व्यक्ती"** म्हणजे वय वर्ष १८ पुर्ण झालेली व्यक्ती.

(५) **"कुटूंब"** म्हणजे पती-पत्नी व त्यांची १८ वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले.

(६) **"फेरीवाला क्षेत्र - I "** म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून फिरता फेरीवाला व स्थिर फेरीवाला यांना व्यवसायासाठी दिर्घकाळासाठी किंवा तात्पुरते अनुज्ञेय म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र.

२/-

(७) **"फेरीवाला क्षेत्र -II"** म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेने घोषित केलेले असे क्षेत्र की, ज्या क्षेत्रामध्ये फक्त फिरता फेरीवाला व्यवसाय करू शकतील. या क्षेत्रामध्ये ना-फेरीवाला क्षेत्र व फेरीवाला क्षेत्र-I व्यतिरिक्त क्षेत्राचा समावेश असेल.

(८) **"ना-फेरीवाला क्षेत्र"** म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीत फेरीवाला व्यवसाय करण्याकरिता प्रतिबंधीत म्हणून जाहिर केलेले क्षेत्र.

(९) **"अधिकृत फेरीवाला"** म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे फेरीवाला म्हणून नोंदणी केली आहे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत घोषित फेरीवाला क्षेत्रात किंवा खाजगी ठिकाणी संबंधित मालमत्ताधारकाच्या मान्यतेने स्वतः व्यवसाय करीत आहे, अशी व्यक्ती.

(१०) **"अनाधिकृत फेरीवाला"** म्हणजे अधिकृत फेरीवाला व्यतिरिक्त इतर फेरीवाले.

(११) **"किऑस्क"** म्हणजे असा सुशोभित केलेला खोका की ज्यामध्ये मध्यभागी बसून व्यवसाय करता येतो.

(१२) **"निराधार महिला"** म्हणजे जिला उपजिविकेसाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही आणि जिच्या कुटूंबात कमवती व्यक्ती नाही अशी स्त्री.

(१३) **"मागासवर्गीय"** म्हणजे ज्या व्यक्तीला अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती / इतर मागासवर्ग/ भटक्या जाती / विमुक्त भटक्या जमाती / विशेष मागास वर्ग याचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जातीचे वैध प्रमाणपत्र दिले आहे अशी व्यक्ती.

(१४) **"अपंग"** म्हणजे ज्या व्यक्तीकडे ४० टक्क्याहून अधिक अपंगत्व असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र आहे अशी व्यक्ती.

**(ब)** या नियमात वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा किंवा वाक्यसमुहांच्या स्वतंत्र व्याख्या देण्यात आलेल्या नाहीत, ते ***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ या*** अधिनियमात ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तोच त्यांचा अर्थ गृहीत धरण्यात येईल.

३/-

# भाग-२

## फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमनासाठी संस्थात्मक रचना

## २. मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला समिती.

### २.१ महानगरपालिका शहर फेरीवाला समिती स्थापन करणे -

महानगरपालिका खालीलप्रमाणे शहर फेरीवाला समिती स्थापन करील :-

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | महापौर |
| २.सदस्य | : | उपमहापौर |
| ३. सदस्य | : | स्थायी समिती सभापती |
| ४. सदस्य | : | सभागृह नेता |
| ५. सदस्य | : | विरोधी पक्ष नेता |
| ६. सदस्य | : | आयुक्त |
| ७. सदस्य | : | पोलीस उप अधिक्षक |
| ८. सदस्य | : | आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी |
| ९. सदस्य | : | सार्वजनिक जमीनीची मालकी असणारे प्राधिकरणाचे प्रतिनिधी. |
| १०. सदस्य | : | संघटना (बाजार, व्यापारी, रहिवासी कल्याण, इ.) चे ३ प्रतिनिधी (पैंकी १ महिला) |
| ११. सदस्य | : | ४ फेरीवाला संघटनेचे प्रतिनिधी ( पैंकी २ महिला) |
| १२. सदस्य | : | लीड बॅकेचे व्यवस्थापक |
| १३. सदस्य | : | कमाल ४ सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी (पैंकी किमान २ महिला) |
| १४. सदस्य सचिव | : | उप आयुक्त (फेरीवाला/अतिक्रमण) |

४/-

शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २० टक्के एवढे फेरीवाल्यांचे प्रतिनिधी व १० टक्के सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी असतील व सदर प्रतिनिधींचे नामनिर्देशन आयुक्त करतील. तसेच समितीच्या एकुण सदस्यांपैकी एक तृतींश महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात. समितीच्या सभेसाठी एकूण सदस्यांपैकी किमान एक तृतींश सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. परंतु, आवश्यकतेनुसार तातडीची बैठक अध्यक्षांना बोलविता येईल.

## २.२ मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या -

मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला समितीच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालीलबाबींचा समावेश असेल :-

१) फेरीवाल्यांकरिता शहरात जागांचे नियोजन करणे तसेच स्थिर फेरीवाल्यांकरिता फेरीवाला निहाय वाटप करावयाच्या जागेचे क्षेत्रफळ व स्वरूप ठरविणे.

२) स्थिर व फिरता फेरीवाल्यांच्या नोंदणी संख्येची शिफारस महानगरपालिकेला करणे.

३) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मान्यतेने फेरीवाल्यांकरिता नोंदणी शुल्क व इतर शुल्क निश्चित करणे.

४) कमाल ५ वर्षे या मर्यादेच्या अधीन राहून फेरीवाल्यांकरिता नोंदणीचा कालावधी ठरविणे.

५) फिरता फेरीवाले व स्थिर फेरीवाले यांनी विक्री करावयाच्या मालाचा प्रकार ठरविणे.

६) फेरीवाला क्षेत्र-I, फेरीवाला क्षेत्र-II व ना-फेरीवाला क्षेत्राची शिफारस महानगरपालिकेला करणे.

७) फिरता फेरीवाल्यांकरिता माल वाहतुकीच्या वाहनाचा आकार, प्रकार, रचना ठरविणे.

८) फेरीवाला क्षेत्रामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सोयी/सुविधांबाबत धोरण ठरविणे.

९) फेरीवाल्यांकरिता सामाजिक सुरक्षिततेबाबत व कल्याणकारी धोरण ठरविणे.

१०) आठवडी बाजाराबाबत धोरण ठरविणे.

११) अटी व शर्तीचे भंग करणाऱ्या फेरीवाल्यांकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाचे धोरण ठरविणे.

१२) फेरीवाल्यांचे विनियमन करणाऱ्या इतर मुद्यांबाबत धोरण ठरविणे.

५/-

## २.३ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती

**मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीची स्थापना करणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका खालीलप्रमाणे प्रत्येक प्रशासकीय प्रभागासाठी प्रभाग फेरीवाला समिती स्थापन करील:-

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | प्रभाग समिती अध्यक्ष |
| २.सदस्य | : | त्या प्रभागातील सर्व नगरसेवक |
| ३. सदस्य | : | वरिष्ठ पोलीस निरिक्षक |
| ४. सदस्य | : | पोलीस निरिक्षक (वाहतुक) |
| ५.सदस्य | : | वैद्यकीय अधिकारी |
| ६. सदस्य | : | अतिक्रमण अधिकारी |
| ७. सदस्य | : | उप अभियंता (स्थापत्य) |
| ८. सदस्य | : | कनिष्ठ अभियंता (नगर रचना) |
| ९. सदस्य | : | स्थानिक पातळीवरील फेरीवाला संघटनेचे ४ प्रतिनिधी (पैंकी २ महिला) |
| १०. सदस्य सचिव | : | विभाग अधिकारी |

प्रभाग फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैंकी किमान १० टक्के एवढे फेरीवाल्यांचे प्रतिनिधीत्व असेल. सदर प्रतिनिधींचे नामनिर्देशन आयुक्त करतील. समितीच्या एकूण सदस्यांपैंकी एक तृतींश महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात. समितीच्या सभेसाठी एकूण सदस्यांपैंकी किमान एक तृतींश सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. परंतु, आवश्यकतेनुसार तातडीची बैठक अध्यक्षांना बोलविता येईल.

## २.४ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या -

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालीलबाबींचा समावेश असेल:-

१) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्र-I, फेरीवाला क्षेत्र -II व ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरिता शहर फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.

२) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्राकरिता क्षेत्रनिहाय नकाशे व पीच (बैठक) ची संख्या निश्चित करणे.

३) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्रामध्ये क्षेत्रनिहाय विक्री करावयाच्या मालाचे प्रकार निश्चित करणे.

४) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे आठवडी बाजाराची जागा, दिवस व वेळ निश्चित करणे.

५) फेरीवाला क्षेत्र तसेच ना-फेरीवाला क्षेत्रामध्ये नियंत्रण ठेवणे.

६) स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे सोडत पध्दतीने वाटप करताना सोडत करावयाची आवश्यकता असल्यास किमान ३ व्यक्तींचे पंच मंडळ घोषित करणे. या पंच मंडळाचा अध्यक्ष विभाग अधिकारी असेल.

७) नागरीकांकडून फेरीवाल्यांच्या विरूध्द प्राप्त झालेल्या तक्रारींवर शाहनिशा करून उचित कार्यवाही करणे. (दंड, नोंदणी रद्द करणे, नोंदणी निलंबित करणे इ.)

८) प्रत्येक फेरीवाला क्षेत्राकरिता फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती स्थापन करणे.

## २.५ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती

**मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची स्थापना करणे -**

मिरा भाईंदर महानगरपालिका खालीलप्रमाणे प्रत्येक प्रशासकीय प्रभागासाठी प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती स्थापन करील.

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | विभाग अधिकारी |
| २.सदस्य | : | उप अभियंता (स्थापत्य) |
| ३. सदस्य | : | पोलीस निरिक्षक (वाहतुक) |
| ४. सदस्य | : | वरिष्ठ पोलीस निरिक्षक |
| ५.सदस्य | : | कनिष्ठ अभियंता (नगर रचना) |
| ६. सदस्य | : | अतिक्रमण निष्कासन अधिकारी |

**२.६ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या -**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालीलबाबींचा समावेश असेल:-

१) प्रभागातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे तसेच सर्वेक्षण करतांना सर्वेक्षण नमून्यामध्ये फेरीवाल्यांच्या मालाचा प्रकार, तो किती वर्षापासून व्यवसाय करतो, व्यवसायाचे ठिकाण इत्यादीबाबतची माहिती भरून घेणे, व त्याबाबतचे तत्सम पुरावे घेणे.

२) फेरीवाल्यांसाठी प्रभागात जागांचा शोध घेणे. फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरिता प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेल्या फेरीवाला क्षेत्रांना क्रमांक देणे.

३) फेरीवाला क्षेत्रांकरिता क्षेत्रनिहाय नकाशे व पीच (बैठक) ची संख्या निश्चित करून प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.

४) फेरीवाला क्षेत्रामध्ये क्षेत्रनिहाय विक्री करावयाच्या मालाचे प्रकार निश्चित करण्याकामी शिफारस करणे.

५) आठवडी बाजाराची जागा, दिवस व वेळ निश्चित करण्याबाबत प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.

## २.७ फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती -

प्रत्येक फेरीवाला क्षेत्रासाठी खालीलप्रमाणे फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात येईल:-

१) प्रत्येक फेरीवाला क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांची संस्था स्थापन करण्यात येईल. सदर संस्थेची नोंदणी सहकार कायद्याखाली किंवा संस्था नोंदणी अधिनियमाखाली करण्यात येईल.

८/-

२) संबंधित फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक फेरीवाल्याने या संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

३) सदर संस्थेचे सभासद त्यांच्या सदस्यांपैकी एक कार्यकारी समिती किंवा फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती निवडतील, त्यापैकी शक्यतो एक महिला असावी. त्या समितीमध्ये अध्यक्ष, सचिव व खजिनदार असे पदाधिकारी असतील . त्यांचा कार्यकाल ३ वर्षापर्यंत असू शकेल. एकदा निवडून आलेले पदाधिकारी लगतच्या पुढील कालावधीकरिता निवडीस पात्र राहणार नाहीत.

## २.८ फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व जबादाऱ्या -

फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालीलबाबींचा समावेश असेलः-

१) फेरीवाला क्षेत्राकरिता प्रतिमहा आलेले पाणी/विद्युत बिल देयकाची रक्कम सर्व सभासदांकडून समान पध्दतीने जमा करून संबंधीत सेवा प्राधिकरणाकडे भरणा करणे.

२) फेरीवाला क्षेत्राची साफसफाई, विद्युत व्यवस्था, पाणी पुरवठा व्यवस्था व सर्वसाधारण व्यवस्था पहाणे व फेरीवाला क्षेत्रातील सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणे इत्यादीवर नियंत्रण ठेवणे.

३) फेरीवाला क्षेत्राच्या बाहेर घोषित केलल्या ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांनी व्यवसाय करू नये व फक्त नोंदणीकृत फेरीवालेच फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करतील हे कटाक्षाने पहाणे.

४) फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती सदस्यांकडून संबंधित फेरीवाल्यांच्या संस्थेने ठरविल्याप्रमाणे सभासद वर्गणी फेरीवाल्यांच्या भागभांडवलाकरिता जमा करेल.

९/-

# भाग-३
## फेरीवाल्यांची नोंदणी

**३.१ फिरत्या फेरीवाल्यांकरिता नोंदणीची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी व शर्ती -**

फिरत्या फेरीवाल्यांची फेरीवाला नोंदणी खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल :-

१) मिरा भाईंदर महानगरपालिका, फेरीवाला नोंदणीसाठी आव्हान करण्याकरिता वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करेल.

२) फेरीवाल्यांच्या नोंदणीकरिता महानगरपालिका क्षेत्रात अर्जदार विहित नमुन्यात प्रभाग फेरीवाला समितीकडे तसेच नगरपालिका क्षेत्रात शहर फेरीवाला समितीकडे अर्ज करेल.

३) फेरीवाल्याचे वास्तव्य मिरा भाईंदर शहरातील असावे व फेरीवाला नोंदणी करण्याकरिता अर्जदाराने अर्जासोबत रहिवासाचा दाखला जोडणे आवश्यक राहील.

४) फेरीवाल्याचे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मतदार यादीत नाव असावे.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठ विलेले नोंदणी शुल्क अर्जदार नोंदणीच्यावेळेस भरेल. दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव असलेल्या कुटूंबातील अर्जदार व्यक्तीने नोंदणी शुल्क भरणे आवश्यक राहणार नाही.

६) फेरीवाला नोंदणी करण्याकरीता अर्जदाराने अर्जासोबत स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र जोडणे आवश्यक राहील.

७) फेरीवाल्यांचा नोंदणीचा कालावधी कमाल ५ वर्षाचा राहील व त्यानंतर नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक राहील.

८) नोंदणीकृत फेरीवाल्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल.

**फिरत्या फेरीवाल्यांच्या नोंदणीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती -**

१) प्रत्येक नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्याने ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने अंगावर लावणे बंधनकारक राहील.

२) फिरत्या फेरीवाल्यांना ना फेरीवाला क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात संतत फिरून व्यवसाय करणे बंधनकारक राहील.

३) फिरता फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय मिरा भाईंदर महानगरपालिका विहित करेल त्या वेळेतच करता येईल.

४) नोंदणीकृत फिरता फेरीवाल्याला कोणत्याही अन्नपदार्थ शिजवता वा तयार करता येणार नाही. फिरत्या फेरीवाल्याला नोंदणी पत्रात नमूद केलेल्या वस्तूंचीच विक्री करता येईल.

५) नोंदणीकृत फेरीवाल्याला डोक्यावर टोपली/पाटी ठेवून किंवा सायकलने किंवा मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या आकाराच्या व रचनेच्या हातगाडीतून किंवा अन्य वाहन इत्यादीमधून व्यवसाय करता येईल. मात्र त्या वाहनांवर फेरीवाला नोंदणी क्रमांक लिहिणे बंधनकारक राहील.

६) फिरता फेरीवाला कचरा रस्त्यामध्ये कोठेही न टाकता तो मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कचरा कुंडीत टाकेल.

७) नोंदणीकृत फिरता फेरीवाला ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करताना आढळल्यास त्याची नोंदणी रद्द करण्यात येईल व तो या उपविधीच्या तरतुदीप्रमाणे व संबंधित मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल.

## ३.२ स्थिर फेरीवाल्यांकरिता नोंदणीची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी व शर्ती -

१) मिरा भाईंदर महानगरपालिका स्थिर फेरीवाला नोंदणीसाठी आव्हान करण्याकरिता वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करेल.

२) मिरा भाईंदर महानगरपालिकेत स्थिर फेरीवाल्यांच्या नोंदणीकरिता अर्जदार विहित नमुन्यात प्रभाग फेरीवाला समितीकडे अर्ज करेल.

३) स्थिर फेरीवाला नोंदणी करण्याकरिता अर्जदाराने अर्जासोबत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात १५ वर्षे वास्तव्य करित असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

४) फेरीवाल्याचे मिरा भाईंदर महानगरपालिका मतदार यादीत नाव असावे.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठरविलेले नोंदणी शुल्क अर्जदार नोंदणीच्यावेळेस भरेल. दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव असलेल्या कुटूंबातील अर्जदार व्यक्तीस नोंदणी शुल्क भरणे आवश्यक नाही. तथापि, इतर शुल्क भरावे लागेल.

६) स्थिर फेरीवाला नोंदणी करण्याकरीता अर्जदाराने अर्जासोबत स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र जोडणे आवश्यक राहील.

७) स्थिर व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत फेरीवाल्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल.

**स्थिर फेरीवाल्यांच्या नोंदणीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती -**

१) नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्याने ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने अंगावर लावणे बंधनकारक राहील.

२) नोंदणीकृत स्थिर फेरीवाला व्यवसायाच्या जागी हजर नसताना व्यवसाय सांभाळण्यासाठी तो त्याचे कुटुंबातील आणखी एका व्यक्तीचे नाव अर्जात नमूद करू शकेल. त्या व्यक्तीने नोंदणीच्या कोणत्याही अटींचा केलेला भंग हा नोंदणीकृत फेरीवाल्यानेच केला आहे, असे समजण्यात येवून नोंदणीकृत फेरीवाला त्यासाठी कारवाईस पात्र राहील.

३) स्थिर फेरीवाल्यास देण्यात आलेली बैठकीची जागा (पीच) ही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीची राहील. त्या जागेबाबत नोंदणीधारकाला कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. ही जागा कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करण्याचा नोंदणीधारकाला अधिकार असणार नाही.

४) स्थिर फेरीवाला फेरीवाला क्षेत्रात मिरा भाईंदर महानगरपालिकेने नेमून दिलेल्या जागेवरच विक्रीचा माल ठेवून पुर्णपणे तात्पुरत्या स्वरूपात ठराविक वेळेसाठी दैनिक भाडेतत्वावर व्यवसाय करेल.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेने पदपथावर घोषित केलेले तात्पुरता फेरीवाला क्षेत्र यामध्ये मिरा भाईंदर महापालिकेने ठरवून दिलेल्या संरचनेच्या किऑस्क मध्ये विक्रीचा माल ठेवून स्थिर फेरीवाल्यास व्यवसाय करता येईल किंवा मिरा भाईंदर महापालिका जमीनीवर आखून दिलेल्या पीच वर घडीच्या टेबल वर विक्रीचा माल ठेवून व्यवसाय करता येईल. मात्र, विक्रीची वेळ संपल्यानंतर घडीचा टेबल व माल परत घेवून जाणे बंधनकारक राहील.

६) विशेष सुरक्षा कारणासाठी २४ तासांची नोटीस देवून पीचच्या जागेचा वापर थांबविण्याचा आयुक्ताना अधिकार असेल.

७) स्थिर फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय मिरा भाईंदर महानगरपालिकेने विहित केलेल्या वेळेतच करता येईल. तसेच ग्राहकांशी सभ्य भाषेत व्यवहार करणे व चांगली वर्तणूक ठेवणे स्थिर फेरीवाल्यास बंधनकारक राहील.

१२/-

८) स्थिर फेरीवाल्यास गिऱ्हाइकांचे लक्ष वेधण्यासाठी मोठ्याने ओरडण्याचा, गिऱ्हाइकाच्या अंगाला स्पर्श करण्याचा, ध्वनीवर्धकाचा, उघडझाप करण्याऱ्या व तीव्र उजेडाच्या दिव्यांचा वापर करण्याचा अधिकार असणार नाही.

९) स्थिर फेरीवाल्यास केवळ नोंदणीपत्रात नमूद केलेल्या वस्तूच विक्रीसाठी ठेवता येतील.

१०) ज्या अटींवर नोंदणी देण्यात आलेली आहे, त्यापैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास नोंदणी रद्द केली जाईल. मात्र नोंदणी रद्द करण्यापुर्वी नोटीस देवून नोंदणीधारकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल. ज्या नोंदणीधारकाची नोंदणी रद्द झालेली आहे त्याची पुन्हा नोंदणी करण्यात येणार नाही.

११) स्थिर फेरीवाला मयत/विकलांग झाल्यास त्याची स्थिर फेरीवाला नोंदणीची विक्री करता येणार नाही. परंतु, त्याची नोंदणी त्यांच्या वारसाकडे हस्तांतरीत करता येईल.

१३/-

# भाग-४

## फेरीवाला व्यवसाय क्षेत्राचे नियोजन

### ४.१ फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर करणे.

### ४.११ फेरीवाला क्षेत्र जाहीर करणे-

**४.१११ निकष -**

फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याकरिता खालील निकष वापरावेत.

१) फेरीवाला क्षेत्र -I

i) सर्वसाधारणपणे परिच्छेद-४.२ मध्ये नमूद केल्यानुसार स्थिर फेरीवाला व्यवसायासाठी विशिष्ट पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या जागा फेरीवाला क्षेत्र-I म्हणून घोषित करण्यात येतील.

ii) रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही अशा परिच्छेद ४.१२ मध्ये समाविष्ट होणार नाहीत असे पदपथावर ही तात्पुरते फेरीवाला क्षेत्र-I घोषित करता येईल. मात्र, जसे-जसे परिच्छेद-४.२ नुसार स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायासाठी जागा निर्माण होतील तसेतसे तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I टप्प्याने संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

२) फेरीवाला क्षेत्र -II

रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही व ना-फेरीवाला क्षेत्रा व्यतिरिक्त रस्त्यांवर फेरीवाला क्षेत्र-II जाहिर करता येईल. या रस्त्यांवर फिरता फेरिवाल्यांनो फिरून व्यवसाय करण्यास मुभा राहील व कोणत्याही परिस्थित त्यांना स्थिर स्वरूपात व्यवसाय करण्यास मज्जाव राहील.

१४/-

४.११२ कार्यपध्दती -

**अ) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याची कार्यपध्दती -**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "फेरीवाला क्षेत्र" जाहीर करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती असेल:

१) प्रथम प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीमार्फत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येईल.

२) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीमार्फत स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरिता जागांचेही सर्वेक्षण करण्यात येईल.

३) सर्वेक्षणानुसार स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरिता सुचविण्यात आलेल्या ठिकाणांबाबत प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती सहाय्यक संचालक, नगररचना यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याकरिता प्रस्ताव पाठवेल.

४) सहाय्यक संचालक, नगररचना यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती प्रस्ताव प्रभाग फेरीवाला समितीकडे सादर करेल. प्रभाग फेरीवाला समिती फेरीवाला क्षेत्राची शिफारस करण्यापूर्वी दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देईल व ३० दिवसांत नागरीकांच्या हरकती व सूचना मागवेल.

५) नागरीकांच्या हरकती व सुचनांवर प्रभाग फेरीवाला समिती सुनावणी घेईल व प्रस्ताव शहर फेरीवाला समितीकडे शिफारसीसह पाठवेल.

६) शहर फेरीवाला समितीकडून स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरिता सुचविण्यात आलेल्या ठिकाणांचा प्रस्ताव महानगरपालिका ठराव करून अंतिम मंजूरीकरिता शासनाकडे पाठवेल.

७) अंतिम मंजूरी मिळाल्यानंतर आयुक्त स्थिर व फिरता फेरीवाल्यांची ठिकाणे दोन स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून प्रसिध्दी करेल.

८) प्रत्येक घोषित केलेल्या फेरीवाला क्षेत्रात त्याच्या तपशीलासह "फेरीवाला क्षेत्र" असे नामफलक लावण्यात येईल

१५/-

**ब) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्थिर व फिरता फेरीवाल्यांच्या नोंदणीची संख्या निश्चित करण्याची कार्यपध्दती :-**

१) शासनाच्या मान्यतेने फेरीवाला क्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आलेली ठिकाणे व परिच्छेद क्र. ४.२ नुसार स्थिर फेरीवाला व्यवसायासाठी विशेष पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या किंवा निर्माण होवू शकणाऱ्या जागा यांच्या आधारे प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती प्रभागासाठी स्थिर व फिरता फेरीवाल्यांची नोंदणीची कमाल संख्या प्रभाग फेरीवाला समितीमार्फत शहर फेरीवाला समितीला सूचविल.

२) शहर फेरीवाला समितीकडून स्थिर व फिरता फेरीवाल्यांची नोंदणी करण्याकामी सूचविण्यात आलेली नोंदणीची कमाल संख्या महानगरपालिका ठराव करून अंतिम मंजूरीकरिता शासनाकडे पाठवेल

## ४.१२ ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर करणे-

### ४.१२१ ना-फेरीवाला क्षेत्रसाठी निकष -

ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याकरिता खालील निकष वापरण्यात येतील :-

१) २ मीटर पेक्षा कमी रूंदीचे पदपथ.

२) गर्दीच्या ठिकाणी, वाहतुकीची कोंडी होत असलेली ठिकाणे

३) कोणताही वाहन वाहतुकीचा पूल

४) गोपनीयता व सुरक्षितता या कारणासाठी निश्चित केलेले क्षेत्र.

५) दुकानाच्या समोरील पदपथ.

६) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बाजारापासून १०० मीटर अंतरापर्यंतचे क्षेत्र

६) धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, रेल्वे स्थानके यांचे हद्दीपासून सर्व बाजूने १०० मीटर अंतरापर्यंतचे रस्ते व पदपथ, परंतु धार्मिक स्थळाच्या शेजारी खालील व्यवसाय करणाऱ्या स्थिर फेरीवाल्यांकरिता जागा आरक्षित करता येईल.

i. हार-तुरे

ii. नारळ, अगरबत्ती, मेणबत्ती विक्री.

iii. पुजा साहित्य

१६/-

**४.१२२ ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याचे प्राधान्यक्रम -**

ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर करतांना खालील प्राधान्यक्रम पाळण्यात येईल.

१) गोपनीयता व सुरक्षितता या कारणासाठी निश्चित केलेली ठिकाणे.

२) संवेदनशील ठिकाणे. उदा. धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था, रेल्वे स्थानके इत्यादी.

३) गर्दीच्या ठिकाणी, वाहतुकीची कोंडी होत असलेली ठिकाणे

४) दुकानासमोरील पदपथ.

**४.१२३ कार्यपध्दती -**

**अ) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ना-फेरीवाला क्षेत्र जाहिर करण्याची कार्यपध्दत -**

परिच्छेद **४.१२३** च्या प्राधान्यक्रमानुसार ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरिता खालील कार्यपध्दती अंवलंबविण्यात येईलः-

i) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती परिच्छेद **४.१२१** च्या निकषानुसार त्यांच्या कार्य क्षेत्रात ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावयाच्या क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल प्रभाग फेरीवाला समितीस सादर करेल. प्रभाग फेरीवाला समिती आपल्या शिफारसीसह महानगरपालिका शहर फेरीवाला समितीकडे प्रस्ताव सादर करेल.

ii) प्रभाग फेरीवाला समिती ना-फेरीवाला क्षेत्राची शिफारस करण्यापूर्वी दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देईल व ३० दिवसांत नागरीकांच्या हरकती व सुचना मागवेल.

iii) नागरीकांच्या हरकती व सुचनांवर प्रभाग फेरीवाला समिती सुनावणी घेईल व प्रस्ताव शहर फेरीवाला समितीकडे संमतीसाठी पाठवेल.

iv) शहर फेरीवाला समिती महानगरपालिकेच्या मंजूरीने ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर करेल.

१७/-

v) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूरीनंतर आयुक्त दोन स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून मंजूर ना-फेरीवाला क्षेत्राची यादी प्रसिध्द करेल.

vi) प्रत्येक घोषित केलेल्या ना-फेरीवाला क्षेत्रात त्याच्या तपशीलासह "ना -फेरीवाला क्षेत्र" असे नामफलक लावणे बंधनकारक राहील.

**४.१२४. टप्प्या-टप्प्याने ना-फेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी -**

महानगरपालिका किंवा नगरपालिकाने वरील कार्यपध्दती नुसार ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करतांना खालील प्रमाणे टप्पा-टप्प्याने कार्यवाही करावयाची आहे :-

अ) प्रथम परिच्छेद **४.१२१** च्या निकषानुसार जे रस्ते ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावे लागतील त्यांची यादी तयार करण्यात येईल व परिच्छेद **४.१२२** प्रमाणे अशा रस्त्यांचे प्राथम्यक्रम ठरविण्यात येईल.

ब) सदर रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांची यादी तयार करण्यात येईल व या फेरीवाल्यांच्या यादीमधून स्थिर फेरीवाल्यांकरिता परिच्छेद **५.१** नुसार पात्र असणाऱ्या स्थिर फेरीवाल्यांची यादी वेगळी करण्यात येईल.

क) या स्थिर फेरीवाल्यांच्या यादीतील पात्र स्थिर फेरीवाल्यांना परिच्छेद **४.२** नुसार उपलब्ध होणाऱ्या जागांमध्ये तसेच ज्या पदपथांना परिच्छेद **४.१२१** च्या निकषांची बाधा येत नाही अशा पदपथांवर "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I" घोषित करून परिच्छेद **५.१** मध्ये विहित प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल.

वरीलप्रमाणे उपलब्ध जागा परिच्छेद **४.१२४(ब)** प्रमाणे पात्र असणाऱ्या स्थिर फेरीवाल्यांच्या संख्येच्या तुलनेत अपुऱ्या असल्यास परिच्छेद **४.१२२** मध्ये कमी प्राधान्यक्रमाचे जे ना-फेरीवाला क्षेत्र आहेत अशा क्षेत्रांना निव्वळ तात्पुरत्या स्वरूपामध्ये "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I" असे घोषित करता येऊ शकेल.

१८/-

ड) जे फेरीवाले परिच्छेद **५.१** मधील स्थिर फेरिवाल्यांच्या प्राधान्यक्रमात बसत नाहीत अशा फेरीवाल्यांची फिरता फेरीवाला म्हणून नोंदणी करता येईल व असे केल्यानंतर सदरचा रस्ता ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल.

इ) जे रस्ते परिच्छेद **४.१२२** मधील प्राधान्यक्रमानुसार अग्रक्रमाने ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावयाचे आहेत ते वरील प्रक्रियेनुसार प्रथम "ना-फेरीवाला क्षेत्र" म्हणन घोषित करण्यात येतील व त्या ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या परिच्छेद **५.१** प्रमाणे पात्र स्थिर फेरीवाल्यांचा परिच्छेद **४.२** प्रमाणे उपलब्ध होणाऱ्या जागा देण्यासाठी प्रथम विचार करण्यात येईल. त्यानंतर टप्प्या-टप्याने परिच्छेद **४.२** प्रमाणे जागा उपलब्ध झाल्यावर उत्तोत्तर ना-फेरीवाला क्षेत्र घोषित केले जाईल.

ई) परिच्छेद **४.२** नुसार स्थिर फेरीवाल्यासाठी टप्प्या-टप्प्याने अधिक जागा उपलब्ध होताच पदपथांवर तात्पुरता फेरीवाला क्षेत्रात बसविलेल्या स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्यात येईल.

फ) उपरोक्त प्रक्रियेची अंमलबजावणी करून परिच्छेद **४.१२१** च्या निकषात येणारे रस्ते ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल.

१९/-

## ४.१३ फेरीवाल्यांचे विनियमनाकरिता कृती आराखडा -

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियम खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

१) सर्वेक्षणाच्या माध्यमातून फेरीवाल्यांची गणना करण्यात येईल.

२) गणना केलेल्या फेरीवाल्यांची व्यवसाय निहाय परिच्छेद **४.२१ मधील क्र. ३** प्रमाणे वर्गवारी केली जाईल.

३) प्रथम प्राधान्याने घोषित करण्यात येणारे ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना त्वरीत परिच्छेद क्र. **४.२** नुसार उपलब्ध नागरी जागांमध्ये परिच्छेद **५.१** मधील प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल. यानंतर शिल्लक राहीलेल्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना परिच्छेद क्र. **५.१** मधील प्राधान्यक्रमानुसार तूर्तास घोषित केलेल्या "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I" मध्ये स्थलांतरीत करण्यात येईल.

४) स्थिर फेरीवाल्यांकरिता अधिक अधिक जागा परिच्छेद **४.२** प्रमाणे तयार करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रयत्न करतील. टप्प्या-टप्प्याने उपलब्ध होणाऱ्या अशा नागरी जागांमध्ये तात्पुरत्या फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना टप्प्या-टप्प्याने परिच्छेद **५.१** मधील प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल. रस्ते व पदपथ फेरीवाले मुक्त राहण्याच्या उद्देशाने टप्प्या-टप्प्याने सर्व घोषित केलेले तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I यांचा बदल ना-फेरीवाला क्षेत्रात करण्याच्या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

२०/-

## ४.२ फेरीवाल्यांच्या व्यवसायाकरिता नवीन जागा निर्माण करणे.

### ४.२१ स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन -

१) सर्वसाधारपणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात, तात्पुरता फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र वगळता, रस्ता व पदपथावर स्थिर फेरीवाल्यांना व्यवसाय करणे अनुज्ञेय असणार नाही.

२) नवीन विकास आराखडा तयार करतेवेळेस तसेच शहराच्या नवीन भागाच्या विकासाच्या वेळेस नियोजनामध्ये फेरीवाल्यांच्या जागेचे नियोजन करण्यात येईल.

३) स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन करते वेळेस शक्यतो फेरीवाल्यांचे तीन प्रकारची वर्गवारी करण्यात येईल.

अ) तयार खाद्यपदार्थ किंवा खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करून विक्री करणारे फेरीवाले.

ब) भाजीपाला, फळे, दूध, अंडी इत्यादी विक्री करणारे फेरीवाले.

क) इतर फेरीवाले (उदा. रेडीमेड गारमेंट, कटलरी इ.)

**अ) तयार खाद्यपदार्थ किंवा खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करून विक्री करणारे फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन-**

**१) <u>फूड प्लाझा तयार करणे</u> -**

अ) महत्वाच्या ठिकाणी उदा. रेल्वे स्टेशन, बस स्थानके, शाळा, महाविद्यालये, सिनेमागृह इत्यादी जवळ "फूड प्लाझा" तयार करण्यात येतील. जे प्राधिकरणे किंवा खाजगी मालक याकरिता जागा उपलब्ध करून देतील अशांना त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या जागेबद्दल हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R.) किंवा प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देता येईल.

ब) खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करून विक्री करणारे फेरीवाल्यांची जागा ही तयार खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांच्या जागेपेक्षा जास्त राहील.

२१/-

क) फूड प्लाझा मध्ये सामायिक सोयी सुविधा करण्यात येतील. उदा. खाण्यासाठीची जागा, हात धुण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कचरा कुंडी इत्यादी.

(टीप :- याकरिता महानगरपालिकेच्या विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंबंधीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. )

२) **"रात्रीकालीन फूड कोर्ट " -**

ज्या रस्त्यांवर संध्याकाळ नंतर रहदारीचे प्रमाण नाही अशा रस्त्यांची रात्रीकालीन फूड कोर्टसाठी निवड करण्यात येईल. या रस्त्यांवर रात्री ८.०० नंतर महानगरपालिका मान्यता दिलेल्या आकार/प्रकारच्या वाहनांमार्फत नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ विक्री करता येईल.

३) **" सप्ताहांत फूड कोर्ट " -**

सार्वजिक सुट्टीच्या दिवशी तसेच सप्ताहाच्या अखरेचे दोन दिवसांकरिता (शनिवार, रविवार) शहरातील काही भागांतील रस्ते व पदपथ सप्ताहांत फूड कोर्ट करिता राखीव ठेवता येतील. या रस्त्यांवर रात्री ८.०० नंतर महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या आकार/प्रकारच्या वाहनांमार्फत नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ विक्री करता येईल.

२२/-

**ब) भाजीपाला, फळे, दूध, अंडी इत्यादी विक्री करणारे फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन -**

१) महानगरपालिका क्षेत्रात नवीन पालिका बाजार बांधताना किंवा जुन्या बाजारांचा पुनर्विकास करतेवेळेस नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन करण्यात येईल. याकरिता वाढीव एफ.एस.आय. उपलब्ध करून एकूण चटई क्षेत्राच्या ५० टक्के जागेमध्ये फेरीवाल्यांचे नियोजन करण्यात येईल.

या नियोजनामध्ये इमारतीच्या सर्वात वरचा मजला फूड कोर्टकरिता राखीव ठेवण्यात येईल. इतर मजल्यांमध्ये ५० टक्के जागा ही दैनंदिन गरजेच्या वस्तू विक्री करणाऱ्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवून उर्वरित जागा इतर व्यावसायीकांना / दुकानदारांना देण्यात येईल, जेणेकरून नागरीक तेथे आकर्षित होतील.

(टीप :-याकरिता महानगरपालिकेच्या विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंबंधीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. )

२) महापालिका यांच्या क्षेत्रातील जुन्या इमारतींचे पुनर्विकास, झोपडपट्टी पुनर्विकास आणि नागरी नूतणीकरण योजना (Urban Renewal Scheme) इत्यादी योजनांमध्ये नागरीकांच्या सोयीच्या दृष्टीने इमारतीमध्ये खालील दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या विक्रीकरिता राखीव गाळे बांधणे अनुज्ञेय असेल.

१) भाजीपाला व फळे

२) दूध, ब्रेड व अंडी

३) किरणा माल

४) इस्त्रीवाला किंवा औषधे .

सदर गाळे नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करण्याची लेखी हमी दिल्यास या गाळ्यांकरिता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय राहील.

(टीप :-याकरिता महानगरपालिकेच्या विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंबंधीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. )

२३/-

३) खाजगी इमारतींना बांधकाम परवानगी देते वेळेस त्यातील रहिवाशांना सोयीच्या दृष्टीने खालील दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या विक्रीकरिता गाळे बांधणे अनुज्ञेय असेल. सदरचे गाळे खालील वस्तूंच्या विक्रीकरिता राखीव राहतील.

१) भाजीपाला व फळे

२) दूध, ब्रेड व अंडी

३) किरणा माल

४) इस्त्रीवाला किंवा औषधे .

सदर गाळे नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करण्याची लेखी हमी दिल्यास या गाळ्यांकरिता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय राहील.

(टीप :-याकरिता महानगरपालिकेच्या विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंबंधीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. )

४) महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या क्षेत्राच्या अभिन्यासामध्ये सोडावयाच्या सुविधा क्षेत्रावर बांधकाम करताना अनुज्ञेय चटई क्षेत्राच्या २० टक्के बांधकाम क्षेत्र दैनंदिन गरजेच्या वस्तू विक्री केंद्रासाठी अनुज्ञेय असेल व त्याच्या ५० टक्के क्षेत्र हे दैनंदिन गरजेच्या वस्तू विक्री करणाऱ्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्याकरिता राखीव ठेवण्यात येईल.

(टीप :-याकरिता महानगरपालिकेच्या विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंबंधीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. )

५) महापालिका क्षेत्रात अस्तित्वात असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांच्या मोकळ्या जागेत नोंदणीकृत फेरीवाल्यांकरिता काही वेळ व्यवसाय करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांच्या परवानगीने मुभा देता येईल.

२४/-

**क) इतर फेरीवाले (उदा. रेडीमेड गारमेंट, कटलरी इ.) करिता जागेचे नियोजन करणे -**

१) महानगरपालिका क्षेत्रातील रहदारीच्या रस्त्यांवर स्काय वॉक व सब-वे तयार करण्यात येतात. सदरचे स्काय वॉक व सब-वे चे नियोजन करतांना कायदेशीर बाबी तपासून व जागेची प्रत्यक्ष स्थिती विचारात घेवून फेरीवाल्यांकरिता जागा निर्माण करण्याची शक्यता तपासण्यात येईल.

२) महानगरपालिकेच्या क्षेत्रात भूयारी वाहनतळाचे बांधकाम करतांना वाणिज्यीक वापरासाठी अनुज्ञेय असणाऱ्या क्षेत्राच्या ५ टक्के इतकी जागा फेरीवाल्यांकरीता राखीव ठेवण्यात येईल. मात्र, अशा ठिकाणी प्रकाश, खेळती व शुध्द हवा मिळेल अशी रचना वाहनतळाची करणे क्रमप्राप्त राहील.

(टीप :-याकरिता महानगरपालिकेच्या विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंबंधीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. )

## ४.३ फेरीवाला क्षेत्रात पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा -

फेरीवाला क्षेत्र -I मध्ये फेरीवाला भूखंडात महानगरपालिकेकडून खालील सोयी सुविधा पुरविण्यात येतील:-

१) घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येईल.

२) स्वच्छता राखण्यासाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणेत येईल.

३) विज पुरविणेत येईल.

४) पिण्याच्या पाण्याची सोय करणेत येईल.

५) ऊन, पाऊस , धूळ व वारा इत्यांदीपासून संरक्षण होण्यासाठी सार्वजनिक आच्छदनाची व्यवस्था करणेत येईल.

६) फेरीवाला भूखंडाच्या बाजूने संरक्षक भिंत बांधण्यात येईल.

महानगरपालिकांना उपरोक्त सोयी-सुविधा पुरविण्याकरिता आलेला खर्च महानगरपालिकेला संबंधित फेरीवाल्यांकडून वसूल करण्यात येईल.

२५/-

## भाग- ५

# स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायाकरिता जागा वाटप करणे

### ५.१ स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याकरिता प्राधान्यक्रम-

१) प्रथम घोषित करण्यात येणारे ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणारे फेरीवाले.

२) महानगरपालिकेच्या विकास योजनेअंतर्गत ताब्यात घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या जागांवर व्यवसाय करणारे पात्र स्थिर फेरीवाले.

३) तात्पुरता स्वरूपात फेरीवाला क्षेत्र - I म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रामध्ये व्यवसाय करणारे स्थिर फेरीवाले.

उपरोक्त प्रमाणे प्रत्येक स्थलांतरणाच्या प्रसंगी स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याकरिता खालीलप्रमाणे क्रमवारी ठेवण्यात येईल:-

अ) प्रथम महाराष्ट्र राज्यात १५ वर्षाच्या वास्तव्याचा पुरावा असलेल्या पूर्वीपासूनच्या परवानाधारक फेरीवाल्यांचा त्यांच्या परवानाच्या दिनांकानुसार प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल. यानंतर जागा शिल्लक असल्यास,

ब) महाराष्ट्र राज्यात १५ वर्षाचे वास्तव्य असलेले इतर फेरीवाले यांचा विचार करण्यात येईल.

### ५.२ जागा वाटपासाठी समांतर आरक्षण

उपरोक्त प्राधान्यक्रमानुसार स्थिर फेरीवाल्यांना जागा वाटप करतेवेळी खालील प्रमाणे समांतर आरक्षण राहील.

अ) अपंग व्यक्ती - ३%
ब) मागासवर्गीय - २०%
क) दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती - १०%

या प्रत्येक प्रवर्गामध्ये ३०% महिला आरक्षण ठेवण्यात येईल व त्यात निराधार विधवा महिलांना प्राधान्य देण्यात येईल.

२६/-

**५.३ परवानाधारक स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याची कार्यपध्दती.**

१) महाराष्ट्र राज्यात १५ वर्षांचे वास्तव्य असलेल्या परवानाधारक स्थिर फेरीवाल्यांची त्यांच्या परवानाच्या दिनांकाच्या आधारे जेष्ठता सुची तयार करण्यात येईल व ज्येष्ठतेनुसार जागा वाटपाकरिता त्यांचा विचार करण्यात येईल.

२) शहर फेरीवाला समिती यांनी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र घोषित केल्यानंतर फेरीवाला क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या पूर्वीपासूनच्या परवानाधारक फेरीवाल्यांना जागांचे वाटप करतांना शक्यतो त्याच ठिकाणी किंवा त्याच प्रभागात जागा देण्यात येईल.

३) जे ना-फेरीवाला क्षेत्रात परवानाधारक फेरीवाले व्यवसाय करित आहेत त्यांचे स्थलांतर शक्यतो त्याच प्रभागातील फेरीवाला क्षेत्रामध्ये करण्यात येईल. फेरीवाल्यांची संख्या जागेच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास जागेचे वाटप सोडत पध्दतीने करण्यात येईल.

**५.४ सोडत पध्दतीने जागा वाटप करणे.**

१) ज्या फेरीवाला क्षेत्रामध्ये जागेच्या संख्ये पेक्षा अर्जांची संख्या जास्त असल्यास सोडत पध्दतीने अर्जदाराची नावे निश्चित करण्यात येतील.

२) एखाद्या अर्जादारास मिळालेली जागा नको असल्यास पुन्हा नव्याने सोडत काढण्याची वेळ येवू नये यासाठी जागेच्या संख्येपेक्षा ५ टक्के अधिक अर्जदारांची नावे सोडतीत निश्चित करून ती नावे प्रतिक्षा यादीवर ठेवली जातील.

३) सदरची सोडत पंचमंडळामार्फत करण्यात येईल.

४) प्रत्यक्ष सोडत सुरू करण्यापुर्वी उपस्थितांसमोर व पंचमंडळामार्फत सोडतीचे प्रात्यक्षिक दाखविले जाईल.

५) सोडतीचा निकाल, फलकावर तात्काळ प्रदर्शित केला जाईल. प्रतिक्षा यादीचा निकालही प्रदर्शित केला जाईल.

६) पंचमंडळ प्रात्यक्षिकापासून ते निकाल प्रदर्शित करण्यापर्यंतच्या सर्व बाबींची तपशीलवार नोंद करून त्या अभिलेखावर सह्या करतील.

७) पंचमंडळाने अंतिम केलेला निकाल प्रभाग/ विभाग कार्यालयाच्या सूचनाफलकावर प्रसिध्द केला जाईल.

८) पंचमंडळाचा अध्यक्ष याबाबतची माहिती लेखी स्वरूपात प्रभाग फेरीवाला समितीस कळवेल.

२८/-

## भाग-६

### १४. सामाजिक सुरक्षितता

**अ) भागभांडवलाकरिता मदत.**

फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती त्यांच्या सभासदांची वर्गणी एकत्र करून बॅकेत जमा करील व त्यातून विविध नागरी सोयींच्या देयकांची रक्कम संबंधित प्राधिकरणाकडे जमा करील. फेरीवाल्यांच्या गरजेनुसार फेरीवाल्यांना भागभांडवालाकरिता जिल्ह्याच्या लीड बॅकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करून देण्यास महानगरपालिका मदत करतील.

**ब) विमा संरक्षण.**

१) फेरीवाल्यांकरिता अपघाती विमाचे संरक्षण असावे.

२) फेरीवाल्यांकरिता आरोग्य विमाचे संरक्षण असावे.

३) फेरीवाल्यांकरिता मालाचे व विक्री वाहन संरक्षणार्थ विमा असावा.

वरीलप्रमाणे विमा संरक्षणाकरिता फेरीवाल्याची नोंदणी करतांना नोंदणी शुल्कामध्येच महानगरपालिका यांच्याकडून विमाची रक्कम भरणा करून घेण्यात येईल किंवा फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीमार्फत स्वतंत्रपणे विमाची रक्कम जमा करून घेवून सर्व फेरीवाल्यांचे एकत्रित विमा काढण्यात येईल.

**क) आरोग्य तपासणी.**

महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांची वैद्यकीय तपासणी किमान वर्षातून एकदा करण्यात येईल. तथापि, शहर फेरीवाला समितीला आवश्यकतेनुसार फेरीवाल्यांची वैद्यकीय तपासणीचा कालावधी कमी करता येईल.

२९/-

**ड ) प्रशिक्षण व कौशल्यात वाढ -**

फेरीवाले हे अतिशय लहान उद्योजक असल्याने त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधण्यासाठी त्यांचे तांत्रिक व व्यावसायिक कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था महानगरपालिका यांच्या मार्फत करण्यात येईल.

## १५. महसुल गोळा करणे.

१) प्रभाग फेरीवाला समिती खालीलप्रमाणे शुल्क आकारेल :-

अ) नोंदणी शुल्क (फी)

ब) मासिक परिरक्षण आकार : हे व्यवसायाचे स्थान /प्रकार यानुसार वेगवेगळे असतील.

क) दंड

२) सदर गोळा केलेला महसूल हा महानगरपालिका निधीत जमा होईल. या निधीचा वेगळा लेखा ठेवण्यात येईल. या निधीच्या अनुषंगाने फेरीवाला समित्यांच्या कामकाजाचे अर्थसंकल्प तयार करण्यात येईल.

# भाग-७

## १६. संनियंत्रण -

१) सदर उपविधीची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याकरिता महानगरपालिका शहरातील ना-फेरीवाला क्षेत्रातील रस्त्यांची विभागणी बीट निहाय करेल.

२) प्रत्येक बीटवर पर्यवेक्षण ठेवण्यासाठी महानगरपालिका पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांची नेमणूक करेल.

३) नोंदणी न करणाऱ्या फेरीवाल्यांविरूध्द संबंधित महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात येईल.

४) ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांविरूध्द संबंधित महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात येईल.

५) ना-फेरीवाला क्षेत्रातून महानगरपालिकेने जप्त केलेले सामान परत मिळणार नाही व अशा सामानाचा लिलाव महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

## १७. शास्ती -

या उपविधीच्या भंग करण्याबद्दल अपराध्यास -

अ) नोंदणी न करता व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यास, अपराध सिध्दीनंतर, सहा महिने पर्यंत साध्या कैदेची आणि रूपये पाच हजार पर्यंत इतक्या दंडाची शिक्षा होईल.

ब) ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यास, अपराध सिध्दीनंतर, सहा महिने पर्यंत साध्या कैदेची आणि रूपये पाच हजार पर्यंत इतक्या दंडाची शिक्षा होईल.

३१/-

क) वरील (अ) व (ब) व्यतिरिक्त या उपविधीतील अन्य तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग करण्याबद्दल अपराध्यास पाचशे रूपयांपर्यंत असू शकेल अशा दंडाची शिक्षा होईल, आणि भंग करणे चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिल्यांदा भंग केल्याबद्दल दंड झाल्यानंतर ज्या दिवशी भंग करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. वरीलप्रमाणे दंड करण्यापुर्वी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून किंवा त्याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून संबंधित फेरीवाल्यास लेखी नोटीस देण्यात येईल व त्यांचे म्हणणे नोटीसीत विहित करण्यात आलेल्या कालावधीत प्राप्त झाल्यास त्याचा विचार करून दंडाविषयी योग्य तो निर्णय घेण्यात येईल. असा दंड करण्याशिवाय आणखी, आपल्या अधिकाराच्या कक्षेत असेल तेथवर, अपकृती सुधारण्यास दोषी फेरीवाल्यास भाग पाडता येईल.

## १८. निर्वाचनाच्या शक्ती -

या उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ लावण्यासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास अशा ठिकाणी महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

*****

क) वरील (अ) व (ब) व्यतिरिक्त या उपविधीतील अन्य तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग करण्याबद्दल अपराध्यास पाचशे रूपयांपर्यंत असू शकेल अशा दंडाची शिक्षा होईल, आणि भंग करणे चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिल्यांदा भंग केल्याबद्दल दंड झाल्यानंतर ज्या दिवशी भंग करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. वरीलप्रमाणे दंड करण्यापुर्वी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून किंवा त्याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून संबंधित फेरीवाल्यास लेखी नोटीस देण्यात येईल व त्यांचे म्हणणे नोटीसींत विहित करण्यात आलेल्या कालावधीत प्राप्त झाल्यास त्याचा विचार करून दंडाविषयी योग्य तो निर्णय घेण्यात येईल. असा दंड करण्याशिवाय आणखी, आपल्या अधिकाराच्या कक्षेत असेल तेथवर, अपकृती सुधारण्यास दोषी फेरीवाल्यास भाग पाडता येईल.

## १८. निर्वाचनाच्या शक्ती -

या उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ लावण्यासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास अशा ठिकाणी महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र.: (९८) "जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

ठराव क्र :- (१०२)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- ______________ सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- (डॉ. आशिष शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा ५९) च्या कलम ४५८ च्या पोट कलम (३८) च्या तरतुदीनूसार मिरा भाईदर महानगरपालिकेने केलेले नियमन.**

**(प्रारूप) नियमन**

**१. संक्षिप्त नामाभिधान व नियमन लागू होण्याचा दिनांक :-   /   /**

(अ) हे नियमन **"मिरा भाईदर महानगरपालिका (जुन्या/वापरलेल्या वस्तूंच्या व्यवसायाचे) नियमन २०१०"** या नावाने संबोधण्यात येतील.

(ब) राज्य शासनाच्या मान्यतेनंतर, शासन राजपत्रात त्यांची प्रसिध्दी झाल्याच्या दिनांकापासून ते अंमलात येतील.

(क) पुढील वर्षाच्या नुतनीकरणासाठी मुळ परवानगी व नुतणीकरणासाठी आयुक्ताने अधिनियमाच्या कलम ३८६ (२) तरतुदीनुसार वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क महापालिका कार्यालयात जमा केल्याच्या पुराव्यासह नमुना क्र. १ मधील अर्ज १ डिसेंबर या कालावधीत सादर करावा लागेल.

(ड) विहित कालावधीत आवश्यक त्या शुल्कासह नुतणीकरणासाठीचा अर्ज दाखल केल्यास नुतणीरण प्राप्त होईपर्यंत लेखी परवानगीधारक लेखी परवानगीसह व्यवसाय करीत असल्याचे समजण्यात येईल.

**२. व्याख्या :-**

**(अ)** संदर्भात किंवा अर्थात काहीही प्रतिकूल नसल्यास, या नियमनात वापरण्यात आलेल्या शब्दाचा अर्थ त्यांचेसमोर नमुद केल्याप्रमाणे असेल.

(१) "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा ५९)

(२) "आयुक्त" म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ च्या तरतुदींनूसार नेमणूक करण्यात आलेला अधिकारी यात आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचाही समावेश होतो.

(३) "जुन्या/वापरलेल्या वस्तू" यात जुने कपडे, चिंध्या, हाडे, बांधकामात वापरलेले सामान (विद्युत जोडण्यांसह), वृत्तपत्रे, पुस्तके वा इतर कागद, निकामी दिवे, रबरी टयुबस, रबरी टायर, रबरी नळया, प्लास्टिक पिशव्या वा प्लास्टिकच्या इतर वस्तू, बसण्यासाठी वापरले जाणारे सोफा, खुर्च्या, टेबले, सतरंज्या, लोखंडी वा ॲल्युमिनियम पाईप, पाण्याचे विविध प्रकारचे नळ, इत्यादी सर्वसाधारणपणे भंगार या शब्दाने ओळखल्या जाणाया वस्तुंचा समावेश असेल.

(४) "साठा करण्याची जागा" म्हणजे जुन्या वापरलेल्या वस्तुंचा साठा करण्याची जागा.

(५) "नमुना" म्हणजे या नियमनास जोडण्यात आलेला नमुना.

(ब) ज्या शब्दांचा वा वाक्यसमुहांचा अर्थ या नियमनात देण्यात आलेला नाही त्यांचा अर्थ ते अधिनियमात ज्या अर्थाने वापरले असतील तसा असल्याचे समजण्यात येईल.

(क) हे नियमन अस्तित्वात येण्याचे तारखेपूर्वी जुन्या/वापरलेल्या वस्तूंचा साठी करून त्यांचा खरेदीविक्री करणाऱ्या व्यक्तिलाही हे नियमन अंमलात आल्यावर ३० दिवसांत या नियमनांच्या तरतुदींप्रमाणे परवानगी घ्यावी लागेल.

३. <u>लेखी परवानगीसाठी अर्ज करण्याची रीत :-</u>

(अ) नियमन (३) च्या तरतुदींप्रमाणे लेखी परवानगी घेण्यासाठी अर्ज या नियमनासोबत जोडण्यात आलेल्या नमुना क्र. १ मध्ये करावा लागेल.

(ब) अर्ज करतांना आवश्यक ती सर्व कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल. अपूर्ण आलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही.

(क) अर्जाच्या छाननीची फी रुपये १००/- महापालिका कार्यालयात भरल्याची पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल. अर्ज मंजूर अथवा नामंजूर झाला तरीही या रक्कमेचा परतावा दिला जाणार नाही.

४. **<u>अर्जाची चौकशी :-</u>**

(अ) नियमन ३ च्या तरतुदींनूसार प्राप्त झालेल्या अर्जाची आयुक्त चौकशी करील. साठा करण्याच्या जागेचे निरिक्षण करताना, नियमन ८ मध्ये नमुद केलेल्या अटींची पूर्तता होत नसल्याचे दिसून आल्यास आयुक्तांकडून अर्ज नाकारण्यात येईल. कोणत्या कारणासाठी अर्ज नाकारण्यात आला ते अर्जदाराला लेखी कळविण्यात येईल.

(ब) ती कारणे दूर केल्याचे अर्जदाराने लेखी कळविल्यास अर्जाची पुन्हा चौकशी करून आयुक्त निर्णय घेईल. मात्र दुसऱ्या वेळीही अर्ज नाकारला गेल्यास अर्जदाराला पुनरीक्षणासाठी आयुक्ताकडे अर्ज करण्याची मुभा असेल. या अर्जावर आयुक्ताने दिलेला निर्णय अंतिम असेल.

५. **<u>लेखी परवानगी :-</u>**

(अ) नियमन ५ च्या अधीन नियमन ३ प्रमाणे केलेल्या अर्जास अनुसरून आयुक्ताने लेखी परवानगी देण्याचा निर्णय घेतल्यास त्यानूसार अर्जदारास पत्राने कळविण्यात येईल.

(ब) अर्जदार त्यानंतर लेखी परवानगीसाठी अधिनियमच्या कलम ३८६ (२) प्रमाणे आयुक्ताने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क जमा करून त्याबाबतचा पुरावा सादर

करील; परंतू वर्षातील कोणत्याही दिवशी परवानगी दिली तरी पूर्ण वर्षाची फी जमा करावी लागेल. तसेच प्रत्येक वर्षाची फी आगाऊ जमा करावी.

(क) लेखी परवानगी नमुना क्र. २ मध्ये देण्यात येईल.

६. <u>लेखी परवानगीची मुदत व नूतनीकरण :-</u>

(अ) लेखी परवानगीची मुदत प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंतची असेल.

(ब) लेखी परवानगी धारकांची वर्तवणूक समाधानकारक असल्यास लेखी परवानगीचे नुतनीकरण करण्यात येईल.

**स्पष्टीकरण** :- लेखी परवानगी धारकाने जोपर्यंत लेखी परवानगीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करत नाही तोपर्यंत त्याची वर्तवणूक समाधानकारक आहे असे समजण्यात येईल.

(क) पुढील वर्षाच्या नुतनीकरणासाठी मुळ परवानगी व नूतनीकरणासाठी आयुक्ताने अधिनियमाच्या कलम ३८६(२) च्या तरतुदीनूसार वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क महापालिका कार्यालयात जमा केलेल्या पुराव्यासह नमुना क्र. १ मधील अर्ज १ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत सादर करावा लागेल.

७. <u>लेखी परवानगी अहस्तांतरीणीय असणे :-</u>

नियमन ५ नूसार दिलेली अथवा नियमन ६ नूसार नुतनीकरण केलेली लेखी परवानगी हस्तांतर करता येणार नाही; परंतू असे की लेखी परवानगी धारकाच्या मृत्यू प्रसंगी त्याच्या विधी संमत वारसांना लेखी परवानगी त्यांच्या नावांतर हस्तांतर करुन घेता येईल. तथापि लेखी परवानगीमध्ये लेखी परवानगी धारकाच्या

गैरहजेरीत व्यवसाय चालू ठेवण्यासाठी नमुद केलेल्या व्यक्ती लेखी परवानगी धारक असे समजण्यात येतील.

८. **लेखी परवानगीच्या अटी व शर्ती :-**

लेखी परवानगी खालील अटी व शर्तींवर देण्यात येईल.

(१) परवानगीपत्र व्यवसायाच्या जागेत सहजपणे दिसेल अशा ठिकाणी फ्रेम करून लावणे आवश्यक असेल.

(२) परवानगीपत्रात नमुद करण्यात आलेल्या वस्तूंचाच साठा परवानगी दिलेल्या जागेत करता येईल. अशा जागेच्या बाहेर अगर सार्वजनिक रस्त्यावर वस्तू ठेवता कामा नये.

(३) कोणत्याही वस्तुंचा साठा जमिनीवर करता येणार नाही. त्यासाठी लोखंडी/लाकडी/दगडांची मांडणी वापरणे आवश्यक असेल. लहान वस्तुंचा साठा लोखंडी/ पत्र्याच्या पिंपात करता येईल.

(४) मनपाच्या मालकीच्या कोणत्याही जुन्या वस्तुचा साठा परवानाधारक यांना करता येणार नाही.

(५) आगीपासून संरक्षण मिळावे यासाठी :-

(अ) जागेत विजेचा वापर केला असल्यास विजवाहक तारा उघडया न ठेवता नळीतून ओढलेल्या असणे आवश्यक असेल.

(ब) सामान साठवणूकीच्या जागी मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिलेल्या सुचनांप्रमाणे अग्निप्रतिबंधक व्यवस्था कायम कार्यान्वित ठेवावी लागेल. तसेच, या व्यवस्थेचा उपयोग करण्याची प्राथमिक माहीती, परवानगीधारकाला असणे आवश्यक असेल.

(६) परवानगी दिलेल्या जागेचा कोणालाही वस्तीसाठी वापर करता येणार नाही व त्या जागेत कोणत्याही कारणासाठी आग पेटविण्यास/जाळ करण्यास बंदी असेल.

(७) परवानगी दिलेल्या जागेत कोणत्याही ज्वलनशील पदार्थ ठेवता येणार नाही.

(८) जुन्या/वापरलेल्या वस्तुंचा साठा करण्यापूर्वी त्यावर वाळवी/उंदीर/झुरळे/डांस प्रतिबंधक फवारणी करणे आवश्यक राहील. तसेच संपूर्ण जागेत दर सहा महिन्यांनी अशी फवारणी करून त्याबाबतचा पुरावा आयुक्ताकडे सादर करावा लागेल.

(९) परवानगीच्या सर्व अटी व शर्ती परवानगीधारक व त्याचे गैरहजेरीत व्यवसाय सांभाळण्यासाठी आयुक्ताने परवानगीपत्रात नमुद केलेल्या व्यक्तींवर बंधनकारक असतील व या अटींचा कोणीही भंग केला तरी तो परवानगीधारकाकडूनच झाला आहे, असे मानण्यात येईल.

(१०) परवानगी धारकाला साठा करावयाच्या जागेत पुरेसा उजेड व खेळत्या हवेची व्यवस्था करावी लागेल.

(११) जुन्या वस्तूंचा साठा करण्यामुळे वा त्यांच्या खरेदी विक्रीच्या व्यवसायामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना कोणताही त्रास होता कामा नये.

(१२) आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही वेळेस जागेची आणि योग्य सुविधा ठेवण्याच्या तपासणीसाठी जागेत शिरकाव करता येईल.

९. **परवानगी रद्द करणे :-**

नियमन ८ मधील कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्याचे आढळून आल्यास आयुक्त लेखी परवानगी रद्द करू शकेल. मात्र तसे करण्यापूर्वी लेखी नोटीस देउन परवानगी धारकास त्याची बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. आयुक्ताने यावर दिलेला निर्णय अंतिम असेल.

परवानगीच्या अटी व शर्तींचा भंग झाल्यास आयुक्तांना जुन्या वस्तुंचा साठा करणाऱ्या आस्थापना सील लावुन बंद करण्याचे अधिकार राहतील.

१०. **व्यवसाय बंद करणे :-**

(अ) जुन्या/वापरलेल्या वस्तुंचा साठा करण्याचे तसेच खरेदीविक्रीचा व्यवसाय बंद करण्याचे परवानगीधारकाने ठरविल्यास किमान १ महिना अगोदर लेखी पत्राने आयुक्ताला माहीती दयावी लागेल व व्यवसाय प्रत्यक्ष बंद केल्यावर मुळ परवानगीपत्र परत करावे लागेल.

(ब) परवानगीच्या कालावधीत परवानगीधारकाचा मृत्यू झाल्यास परवानगीधारकाच्या वारसाचे नाव परवानगी चालू ठेवली जाईल. मात्र त्यासाठी वारसाला योग्य प्रमाणपत्रांसह आयुक्ताकडे परवानगीधारकाच्या मृत्यूच्या तारखेपासून ३० दिवसांत अर्ज करावा लागेल. एकापेक्षा अधिक वारसे असल्यास त्या सर्वांच्या सहमतीने परवानगीवरील नावात बदल केला जाईल.

११. **शास्ती :-**

या नियमाच्या तरतुदींचा उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस अधिनियमाच्या कलम ४६८ अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा होउु शकेल.

(अ) अपराधसिध्दीनंतर रूपये ५००/- पर्यंत दंडाची शिक्षा,

(ब) पहिल्यांदा सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर उल्लंघन करणे चालू राहणाऱ्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २०/- पर्यंत दंडाची शिक्षा,

(क) उल्लंघन करणे बंद करण्याविषयी आयुक्ताकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर उल्लंघन करणे/ चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी रूपये २०/- पर्यंत दंडाची शिक्षा,

(ड) असा दंड करण्याशिवाय आणखी आपल्या अधिकाराच्या कक्षेत असेल तेथवर, अपकृति सुधारण्यास भाग पाडता येईल.

२६९

१२. <u>निरसन :-</u>

या नियमाच्या प्रारंभापूर्वी, या संबंधीच्या नियमन अंतर्गत केलेल्या अगर वगळलेल्या गोष्टी व्यतिरिक्त पूर्वीच्या उपविधी नियमित होतील.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

268

# नमुना – १

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

"मिरा-भाईंदर महानगरपालिका (जुना/वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन) उपविधी २०१०"

**महापालिका हद्दित जुन्या / वापरलेल्या वस्तुंचा साठा करुन खरेदी विक्री व्यवसाय करण्यासाठी जागा वापराकरीता लेखी परवानगी / नुतणीकरणासाठी अर्ज.**

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव : - ____________________

व पत्ता :- ____________________

____________________

२. दुरध्वनी / मोबाईल : - ____________________

अ) ज्या ठिकाणी जुन्या / वापरलेल्या वस्तुचा साठा करावायाचा त्या जागेचा पपत्ता (सर्वे / सिटी सर्वे क्रमांक /हिस्सा क्र./इ. तपशिलासह) ____________________

ब) जागेची लांबी / रुंदी / उंची : लांबी____ रुंदी____ उंची____

३. जागेच्या मालकाचे नाव : ____________________

____________________

____________________

४. वरील (२) मध्ये नमुद केलेली जागा अर्जदाराचे मालकी नसल्यास जागेच्या मालिकाचे ना-हरकत प्रमाणपत्र. ____________________

५. वरील (२) मध्ये नमुद केलेली जागा अर्जदाराच्या मालकीची असल्यास त्याबाबतचा पुरावा. होय / नाही

____________________

६. साठा करावयाच्या वस्तुंची नावे ____________________

प्रत्येक प्रकाराची संख्या :- (__) (__) (__) (__) (__)

७. साठवणुकीची काय व्यवस्था आहे? ____________________

८. अ) जागेत विजेचा वापर आहे काय? ____________________

ब) असल्यास विजवाहक तारा उघडया आहेत काय? ____________________

९. साठा करावयाच्या जागेपासून ५० फुट अंतरात ज्वलनशील पदार्थाचा ____________________

साठा आहे काय? ______________________

१०. जागेत वाळवी /किटक / उंदिर प्रतिबंधक उपाययोजना करुन घेतील आहे काय (पुरावा सादर करावा.) ______________________

११. जागेत हवा खेळती राहण्याची काय व्यवस्था आहे? ______________________

१२. परवानगीधारकाचे गैरहजेरीत काम पाहणा-या दोन व्यक्तिंची नाव व राहण्याचे पत्ते. १) ____________ २) ____________

## प्रतिज्ञापत्र

मी ______________________ राहणार ______________________ सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कि, या अर्जात देण्यात आलेली माहिती संपुर्णपणे खरी व बरोबर आहे.

मी "मिरा-भाईंदर महानगरपालिका (जुन्या /वापरलेल्या वस्तुंच्या व्यवसायाचे नियमन) उपविधी २०१०" वाचले असुन उक्त उपविधीतील लेखी परवानगी देण्याविषयीच्या अटी व शर्ती मला पुर्णपणे मान्य आहेत. मी अर्जात दिलेली माहिती चुकीची वा खोटी आढळ्यास ही परवानगी रद्द केली जाउु शकते याची मला जाणीव आहे.

**दिनांक : -**

**स्थळ :-**

साक्षीदारचे नाव - अर्जदाराचे नाव व सही

(नाव :- ______________________ ) (नाव :- ______________________)

➢ **अर्जासोबत सादर करावायाची कागदपत्रे :-**

(१) अर्जदार व कॉलम क्रमांक १२ मध्ये नाव असलेल्या व्यक्तिंच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोंच्या प्रत्येकी दोन प्रती.

(२) जागा मालकीची असल्यास त्याबाबतचा पुरावा किंवा मालकीची नसल्यास जागेच्या मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, करारपत्र वगैरे,

मात्र, लेखी परवानगीच्या नुतणीकरणासाठी अर्ज असल्यास जागेच्या मालकीत फरक झाला असल्यासच हे प्रमाणपत्र आवश्यक असेल.

270 (72)

# नमुना -२

"मिरा-भाईंदर महानगरपालिका (जुन्या / वारलेल्या वस्तुंच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१० )"
महापालिका हद्दित जुन्या वापरलेल्या वस्तुंचा साठा करुन खरेदी विक्री व्यवसाय करण्यासाठी जागा वापराकरीता

<u>लेखी परवानगी</u>

श्री./सौ.______________________,राहणार,____________

______________________________ यांना "मिरा-भाईंदर महानगरपालिका (जुन्या / वारलेल्या वस्तुंच्या व्यवसायाचे नियमन) उपविधी २०१०" या उपविधी ६ अनुसार मिरा-भाईंदर हद्दीत खाली नमुद केलेल्या जागेत जुन्या/वारलेल्या वस्तूंचा साठा करुन खरेदी विक्री व्यवसाय करण्यासाठी जागा वापराकरीता ही लेखी परवानगी देण्यात येत आहे.

| ज्या जागेत जुन्या/ वापरलेल्या वस्तु ठेवावयाच्या त्या जागेचा तपशिल (पत्ता) | परवानगी देण्यात आलेल्या जुन्या / वापरलेल्या वस्तुंचा प्रकार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

परवानगीधारकाच्या गैरहजेरीत व्यवसाय चालू ठेवण्यासाठी बसणाया व्यक्तीचा तपशिल :-

नाव व पत्ता :-

______________________________

______________________________

______________________________

______________________________

नाव व पत्ता :-

______________________________

______________________________

______________________________

______________________________

ही लेखी परवानगी मागील बाजुस दिलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# लेखी परवानगीच्या अटी व शर्ती.

(१) परवानगीपत्र व्यवसायाच्या जागेत सहजपणे दिसेल अशा ठिकाणी फ्रेम करून लावणे आवश्यक असेल.

(२) परवानगीपत्रात नमुद करण्यात आलेल्या वस्तूंचाच साठा परवानगी दिलेल्या जागेत करता येईल. अशा जागेच्या बाहेर अगर सार्वजनिक रस्त्यावर वस्तू ठेवता कामा नये.

(३) कोणत्याही वस्तुंचा साठा जमिनीवर करता येणार नाही. त्यासाठी लोखंडी/लाकडी/दगडांची मांडणी वापरणे आवश्यक असेल. लहान वस्तुंचा साठा लोखंडी/ पत्र्याच्या पिंपात करता येईल.

(४) मनपाच्या मालकीच्या कोणत्याही जुन्या वस्तुचा साठा परवानाधारक यांना करता येणार नाही.

(५) आगीपासून संरक्षण मिळावे यासाठी :-

(अ) जागेत विजेचा वापर केला असल्यास विजवाहक तारा उघड्या न ठेवता नळीतून ओढलेल्या असणे आवश्यक असेल.

(ब) सामान साठवणूकीच्या जागी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिलेल्या सुचनांप्रमाणे अग्निप्रतिबंधक व्यवस्था कायम कार्यान्वित ठेवावी लागेल. तसेच, या व्यवस्थेचा उपयोग करण्याची प्राथमिक माहीती, परवानगीधारकाला असणे आवश्यक असेल.

(६) परवानगी दिलेल्या जागेचा कोणालाही वस्तीसाठी वापर करता येणार नाही व त्या जागेत कोणत्याही कारणासाठी आग पेटविण्यास/जाळ करण्यास बंदी असेल.

(७) परवानगी दिलेल्या जागेत कोणत्याही ज्वलनशील पदार्थ ठेवता येणार नाही.

(८) जुन्या/वापरलेल्या वस्तुंचा साठा करण्यापूर्वी त्यावर वाळवी/उंदीर/झुरळे/डांस प्रतिबंधक फवारणी करणे आवश्यक राहील. तसेच संपूर्ण जागेत दर सहा महिन्यांनी अशी फवारणी करून त्याबाबतचा पुरावा आयुक्ताकडे सादर करावा लागेल.

(९) परवानगीच्या सर्व अटी व शर्ती परवानगीधारक व त्याचे गैरहजेरीत व्यवसाय सांभाळण्यासाठी आयुक्ताने परवानगीपत्रात नमुद केलेल्या व्यक्तींवर बंधनकारक असतील व या अटींचा कोणीही भंग केला तरी तो परवानगीधारकाकडूनच झाला आहे, असे मानण्यात येईल.

(१०) परवानगी धारकाला साठा करावयाच्या जागेत पुरेसा उजेड व खेळत्या हवेची व्यवस्था करावी लागेल.

(११) जुन्या वस्तूंचा साठा करण्यामुळे वा त्यांच्या खरेदी विक्रीच्या व्यवसायामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना कोणताही त्रास होता कामा नये.

आयुक्त

२७२

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र.: (९९) "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११" मसुद्यास अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

ठराव क्र :- (७०३)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११ व कारखान्यांचे नियमन नियम २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी व नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने सदर उपविधी व नियमांमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११ व कारखान्यांचे नियमन नियम २०११" या मसुद्यांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन सदरची उपविधी व नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- (सौ. प्रभात पाटील)

अनुमोदक :- (डॉ. आशिष शेट्ये)

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला.

मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

ष्ट प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता जागांचे नियमन) उपविधी २०११

..... ................ दिनांक.....................

ांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४३ चा मुंबई ४९) च्या कलम ४५८, ४५९ व ४६० अन्वये प्रदान आलेल्या अधिकारांचा व त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कलम३७६ व ३८६ ला अनुसरुन पालिका विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्याकरिता जागांचे नियमन करण्यासंबंधी खालील उपविधी करीत आहे. हे उप-क्त कलम ४६० द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि या द्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे -भाईंदर महानगरपालिका उक्त प्रारुप उप-विधी राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवस झाल्यावर किंवा त्यानंतर येईल.

क्त प्रारुपांच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या काही हरकती किंवा सूचना आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका डे प्राप्त होतील त्या महानगरपालिकेकडून विचारात घेण्यात येतील.

### प्रारुप उप-विधी

ंक्षिप्त नाव व प्रारंभ - (१) या उप-विधीस, मिरा - भाईंदर महानगरपालिका (विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता नियमन) उप-विधी, २०११ असे म्हणता येईल.

राजपत्रात अंतिम रित्या प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

व्याख्या - (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या उपविधींमध्ये, -

(अ) "अधिनियम" म्हणजे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ;

(ब) "प्राधिकृत अधिकारी" म्हणजे, अधिनियमाच्या कलम ६९ पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताने अधिनियमाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्तव्ये बजावण्याकरिता प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी;

(क) "आयुक्त" म्हणजे महानगरपालिकेचा आयुक्त आणि या संज्ञेत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश राहील ;

(ड) "महानगरपालिका" म्हणजे मिरा-भाईंदर शहराची महानगरपालिका ;

(ई) "लायसन्सधारक" म्हणजे विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागांचा वापर करण्याकरिता उप-विधी ३ अन्वये जिला लायसन्स देण्यात आले असेल अथवा उप-विधी ४ अन्वये जिच्या लायसन्सचे नवीकरण करण्यात आले असेल अशी व्यक्ती आणि यात त्या लायसन्समध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले तिचे सेवक व अभिकर्ते यांचा अंतर्भाव होतो;

(फ) "कलम" म्हणजे, अधिनियमाचे कलम;

(ग) "विनिर्दिष्ट प्रयोजने" म्हणजे, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणतेही प्रयोजन; आणि

(ह) "अनुसूची" म्हणजे, या उप-विधींसोबत जोडण्यात आलेली अनुसूची.

) या उप-विधीत वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न दिलेले शब्द व शब्दप्रयोग यांचे अर्थ हे, त्यांना अधिनियमात अनुक्रमे दिलेल्या अर्थांप्रमाणेच असतील.

लायसन्स--(अ) आयुक्ताला, अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी आगाऊ फी देण्यात आल्यावर, जर कोणतीही व्यक्ती या उप-विधींमध्ये अंतर्भूत असलेल्या आवश्यक शर्तींची पूर्तता करीत असेल तर, नगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही जागांचा विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्याची इच्छा असलेल्या अशा व्यक्तीला या उप-विधींना जोडलेल्या नमुन्यात लायसन्स देता येईल. असे लायसन्स एक वर्षाच्या मुदतीकरिता देता येईल. लायसन्सची मुदत प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपेल.

(ब) अर्ज करण्यात आलेले लायसन्स देण्यास आयुक्ताला नकार देता येईल. जर लायसन्स देण्यास नकार देण्यात आला असेल तर, नकार देण्याचे कारण नकाराच्या आदेशात नमूद करणत येईल.

(क) विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागांचा वापर बंद करण्यात आल्याची लेखी नोटीस आयुक्तांना देण्यात आली नसल्यास अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या फीमध्ये सूट अथवा फीचा परतावा महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही आणि अशी नोटीस ज्या दिवशी देण्यात येईल, त्याच्या अगोदरच्या कोणत्याही मुदतीकरिता अशी सूट अथवा परतावा प्रभावी होणार नाही. कोणत्याही प्रकरणात तीन महिन्यांपेक्षा कमी असेल अशा मुदतीसाठी महानगरपालिकेकडून सूट अथवा परतावा कोणत्याही बाबतीत देण्यात येणार नाही;

परंतु, लायसन्सच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केल्यामुळे जेव्हा लायसन्स निलंबित करण्यत आले असेल अथवा ते ण्यात आले असेल त्याबाबतीत, कोणताही परतावा अनुज्ञेय असणार नाही.

. **लायसन्सचे नवीकरण.--** जोपर्यंत लायसन्सधारकाची वागणूक समाधानकारक असेल तोपर्यंत त्याच्या जागांच्या ायसन्सचे आगामी वर्षाकरिता नवीकरण करण्यात त्यास परवानगी देण्यात येईल.

करण - लायसन्सधारक जो पर्यंत लायसन्सच्या अथवा ह्या उपविधीच्या शर्तींचा कोणत्याही प्रकारे भंग करीत नाही तो पर्यंत त्याची ागणूक समाधानकारक आहे असे समजण्यात येईल.

. **अर्ज.** --(अ) विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागांचा वापर करण्याच्या नवीन लायसन्ससाठी करावयाचा अर्ज जागांचा वापर स सुरु करण्याच्या प्रस्तावित दिवसापूर्वी ३० दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपूर्वी आणि अशा लायसन्सचे नवीकरण साठी प्रत्येक वर्ष संपण्यापूर्वी ३० दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपूर्वी लेखी करण्यात येईल.

ब) विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणाऱ्या प्रत्येक जागेचा मालक अथवा भोगवटादार हा हे उप-विधी अंमलात च्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत अशा जागेच्या संबंधात लायसन्सकरिता आयुक्ताकडे लेखी अर्ज करील.

क) परवानगीकरिता करावयाचा प्रत्येक अर्ज लेखी असेल आणि ज्याकरिता अशा जागेचा वापर करण्यात येणार असेल ते र्दिष्ट प्रयोजन आणि विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्याचा हेतू असलेल्या जागेचे वर्णन त्यात नमूद करण्यात येईल आणि रपालिकेकडून फर्मावण्यात येईल अशी इतर माहिती त्यात देण्यात येईल आणि असे नकाशे सोबत जोडण्यात येतील.

६. **लायसन्स हस्तांतरणीय नसणे--** (अ) उप-विधी ३ अन्वये देण्यात आलेले अथवा उप-विधी ४ अन्वये नवीकरण करण्यात आलेले लायसन्स हस्तांतरणीय असणार नाही. परंतु आयुक्तांच्या मान्यतेने नियुक्त करण्यात आलेले व लायसन्समध्ये नावे असलेले लायसन्सधारकाचे सर्व सेवक व अभिकर्ते त्या लायसन्स अन्वये लायसन्सधारक असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, लायसन्सधारक मरण पावल्यास त्याच्या कायदेशीर वारसांना ते लायसन्स स्व:ताच्या नावे हस्तांतरित करुन घेण्याचा हक्क असेल ;

आणखी असे की, लायसन्सधारक मरण पावल्यास जी त्याची कायदेशीर वारस होईल अशा कोणत्याही व्यक्तीच्या नावे लायसन्स स्वत:च्या हयातीत हस्तांतरित करण्याची मुभा लायसन्सधारकाला देता येईल.

(ब) विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणारी जागा अथवा तिचा कोणताही भाग लायसन्सधारकाला पोट-भाड्याने देता येणार नाही.

(क) या उपविधीचा भंग करुन लायसन्सचे हस्तांतरण करण्यात आल्यास त्यामुळे लायसन्स रद्द करण्यात येईल आणि लायसन्स फी जप्त केली जाईल आणि हस्तांतरिती किंवा त्याच्यामार्फत किंवा नियंत्रणाखाली हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर या अधिनियमान्वये खटला भरला जाऊ शकेल.

७. **लायसन्समध्ये अंतर्भूत असणाऱ्या बाबी.--** (१) उप-विधी ३ अन्वये देण्यात आलेल्या अथवा उप-विधी ४ अन्वये नवीकरण करण्यात आलेल्या लायसन्समध्ये, लायसन्सधारकाचे नाव आणि त्याच्या सेवकांची अथवा अभिकर्त्यांची नावे, जागेचे वर्णन, ज्यासाठी जागेचा वापर करण्यात येणार असेल ते प्रयोजन अथवा ती प्रयोजने आणि त्यात कामावर घेण्यात येणाऱ्या व्यक्तींची संख्या, विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(२) ज्यांच्या अधीन लायसन्सधारकाला विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागेचा वापर करता येईल अशा शर्ती व निर्बंध आणि ज्या अन्वये लायसन्स देण्यात येते त्या शर्ती पुढीलप्रमाणे असतील :-

(अ) विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणाऱ्या जागेत ठळक जागी लायसन्स लावून ठेवण्यात येईल ;

(ब) लायसन्समध्ये विनिर्दिष्ट करण्यात आली असतील त्या खेरीज इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी लायसन्सधारक त्या जागेचा वापर करणार नाही ;

(क) विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणारी जागा लायसन्सधारक नेहमीच स्वच्छ ठेवील.

(ड) लायसन्सधारक, विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणाऱ्या जागेची तपासणी करण्याकरिता आयुक्ताला कोणत्याही वेळी सर्व सवलती देईल. ;

(ई) लायसन्सधारक, विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागेचा वापर स्वत: अथवा आयुक्ताच्या मान्यतेने लायसन्समध्ये वेळोवेळी नामित करण्यात येतील अशा सहय्यकांमार्फत, सेवकांमार्फत अथवा अभिकर्त्यांमार्फत करील ;

परंतु, असे सहाय्यक, अभिकर्ते अथवा सेवक हे, लायसन्सधारकांवर बंधनकारक असलेल्या सर्व शर्तींचे पालन करतील.

(फ) लायसन्सधारक, अधिनियमाच्या अथवा या उप-विधीच्या उपबंधान्वये आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन काटेकोरपणे करील.

(३) खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्ती व निर्बंध लायसन्सच्या मागच्या बाजूवर छापण्यात येतील.

८. **लायसन्सच्या शर्तीचा भंग.--** (अ) कोणत्याही व्यक्तीला देण्यात आलेल्या लायसन्समधील शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा ती व्यक्ती भंग करील तर, आयुक्तांना योग्य वाटेल अशी चौकशी करण्यात आल्यानंतर स्थायी समितीकडून तिचे लायसन्स निलंबित अथवा रद्द केले जाण्यास आणि अधिनियमान्वये ती व्यक्ती खटला भरला जाण्यास पात्र असेल.

(ब) या उप-विधीच्या खंड (अ) अन्वये कोणतीही कारवाई करण्यापूर्वी, त्या खंडान्वये करण्याचे प्रस्तावित केलेल्या कारवाईविरुद्ध त्याचे कारण दाखविण्याची संधी लायसन्सधारकाला देण्यात येईल.

९. **तपासणी.--** लायसन्सधारक, जेव्हा जेव्हा आयुक्ताकडून फर्मविण्यात येईल तेव्हा तेव्हा, या अधिनियमाचे कलम ३७६ पोट-कलम (७) च्या प्रयोजनांस्तव विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणाऱ्या जागेची तपासणी करु देईल आणि जागेची अथवा जागेच्या कोणत्याही भागाची साकल्याने तपासणी करणे शक्य व्हावे यासाठी, आवश्यक असलेली प्रत्येक सवलत देईल.

१०. **माहिती सादर करणे.--** लायसन्सधारक, वेळोवेळी विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापरलेल्या जागेबाबत आयुक्ताला अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याला हवी असेल अशी माहिती सादर करील.

११. **पिण्याचे पाणी इत्यादि दूषित करण्यास प्रतिबंध.--** लायसन्सधारक, विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणाऱ्या जागांमधील केरकचरा, माणसांना पिण्यासाठी अथवा घरगुती वापरासाठी पुरविण्यात येणारे अथवा तसे वापरण्यात येणारे किंवा वापर होण्याचा संभव असलेले कोणतेही पाणी अथवा गुरेढोरे अथवा चार पायांच्या इतर जनावरांडून वापरण्यात येणारे अथवा त्यांच्याकडून वापर होण्याचा संभव असलेले अथवा दूध, अन्न आणि तत्सम गोष्टींसाठी वापरण्यात येणारी अथवा वापरण्याचा हेतू असलेली भांडी साफ करण्यासाठी अथवा धुण्यासाठी असलेले कोणतेही पाणी, दुषित होईल अशा स्थितीत अथवा अशा रीतीने ठेवण्याची व्यवस्था करणार नाही.

१२. **प्रभावी जलनिस्सारण आणि निचरा. --** लायसन्सधारक, विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेतून योग्य प्रकारे निचरा होण्याची व्यवस्था करील आणि उक्त जागेवरील अथवा उक्त जागेशी संबंधित असलेल्या निचरा नळांचे अथवा जलनिस्सारण साधनांचे आयुक्त आथवा प्रधिकृत अधिकारी यांचे समाधान होईल अशा प्रकारे परिरक्षण ते नेहमी सुस्थितीत व प्रभावीपणे चालू राहतील अशा प्रकारे करण्याची व्यवस्था करील.

१३. **राहत्या जागांपासून अशा जागा दूर असल्या पाहिजेत.--** विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारी जागा, ही निवासी जागेपासून आयुक्त प्रत्येक बाबतीत निश्चित करील अशा अंतराच्या आत वसलेली असणार नाही. असे अंतर ठरवून देताना आयुक्त ज्या प्रकारच्या वस्तू ठेवण्यासाठी अथवा ज्या प्रयोजनांसाठी जागेचा वापर कर याचा हेतू असेल त्या वस्तूंचा प्रकार विचारात घेईल :-

परंतु, जागेचा वापर कोणाकडून करण्यात येणार असला तरी, आयुक्तांकडून अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेले अंतर कायम राहील.

१४.**अग्निशमन साधनसामुग्री.--** लायसन्सधारक, सर्व वेळी सर्व अग्निशमन साधनसामुग्री घेईल व ती चालू स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील आणि आगीस प्रतिबंध होणारी सर्व उपाययोजना करील आणि तसेच अधिनियमाच्या कलम ३७६ ए अन्वये आयुक्तांकडून काढण्यात आलेल्या लेखी नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा उपाययोजनाही करील.

१५.**जागेवर अनुपस्थित असणे.--** विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणाऱ्या जागेचा मालक हा त्याने आपल्या अनुपस्थितीत आपला धंदा चालवण्यासाठी कोणतीही इतर व्यक्ती नामनिर्दिष्ट केली नसेल आणि त्या व्यक्तीचे नाव लायसन्समध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले नसेल तोपर्यंत, लागोपाठ चौदा दिवसांपेक्षा अधिक काळ लायसन्स दिलेल्या जागेवर स्वत: अनुपस्थित राहणार नाही.

१६.*मानवी वास्तव्यास प्रतिबंध.--* लायसन्सधारक हा, लायसन्स दिलेल्या जागेचा कोणताही भाग मानवी वास्तव्यासाठी अथवा स्वयंपाकासाठी वापरणार नाही अथवा तसा वापर करण्यास परवानगी अथवा अनुज्ञा देणार नाही आणि ज्यास प्राधिकृत करण्यात आले आहे त्या व्यतिरिक्त अग्नी अथवा उघडी ज्योत त्यात पेटवण्यात येणार नाही अथवा पेटवण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

१७.**त्या जागेच्या बाहेर वस्तू ठेवण्यावर प्रतिबंध.--** लायसन्सधारक लायसन्स दिलेल्या जागेबाहेरील कोणत्याही जागी अथवा सार्वजनिक रस्त्यावर -

(अ) (एक) जी वस्तू त्या जागेमध्ये ठेवण्यासाठी लायसन्स देण्यात आलेले आहे त्या वस्तूंच्या संबंधात आवश्यक असलेली कोणतीही वस्तू ठेवणार नाही अथवा ठेवण्यास परवानगी देणार नाही; अथवा

(दोन) ज्यासाठी जागेचे लायसन्स देण्यात आले आहे, अशी कोणतीही निर्मितीची, कार्याची अथवा धंद्याची कार्यवाही चालू ठेवणार नाही अथवा चालू ठेवण्यास परवानगी देणार नाही.

(ब) ज्यात अशा वस्तूंपैकी कोणत्याही वस्तू ठेवण्यात आलेल्या असतील अशा कोणत्याही कक्षात अथवा बंदिस्त जागेत त्यांच्याच ...नीची कोणतीही कार्यवाही चालू ठेवणार नाही अथवा चालू ठेवण्याची व्यवस्था करणार नाही अथवा ती चालू ठेवण्यास परवानगी ... नाही.

१८.**स्वच्छता.--** लायसन्सधारक, प्रत्येकीला घट्ट बसणारे झाकण बसवलेल्या मान्यता दिलेल्या आकाराच्या पुरेशा संस्थेच्या, धातूच्या स्वच्छता - कचरापेट्या पुरवील व त्यांची चांगल्या प्रकारे दुरुस्ती करुन त्या सुस्थितीत ठेवील व त्यांचा वापर करील आणि लायसन्स दिलेल्या जागेतील टाकाऊ पदार्थ व केरकचरा त्यात टाकील. लायसन्सधारक, धंद्यातील टाकाऊ पदार्थ, म्हणजेच, स्वच्छता - कचरापेटीतील पदार्थ, धंद्यातील टाकाऊ पदार्थ टाकण्यासाठी आयुक्ताकडून नेमून देण्यात आलेल्या उकिरड्याच्या जागी दिवसातून निदान एकदा तरी हलवील व तेथे नेऊन टाकील किंवा याला पर्याय म्हणून, लायसन्सधारक हा धंद्यातील टाकाऊ पदार्थ उकिरड्यांच्या जागी हलविण्यासाठी व तेथे टाकण्यासाठी महानगरपालिकेकडून पुरविण्यात येणाऱ्या वाहतुकीच्या सवलतीचा फायदा ठरवून दिलेली रक्कम देऊन घेईल.

१९.**वस्तूला योग्य खूणचिठ्ठी लावणे.--** अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाच्या संबंधात वापर करण्यात येणाऱ्या वस्तूंच्या बाबतीत लायसन्सधारक हा, अशा वस्तूचे नाव, त्यातील घटक द्रव्य व असल्यास, तिचे जोखमीचे स्वरुप यांचा निर्देश करण्यासाठी अशा प्रत्येक वस्तूच्या आवेष्टनावर अथवा पात्रावर खूणचिठ्ठी लावील.

२०.**संरचनात्मक बदल करण्यास मनाई.--** आयुक्ताच्या पुर्वसंमतीखेरीज लायसन्सधारक हा लायसन्स दिलेल्या जागेत, कोणतेही संरचनात्मक बदल करणार नाही अथवा त्यात कोणतीही संरचनात्मक भर घालणार नाही.

२१.**लायसन्स दिलेल्या जागा सोडणे.--** कोणताही लायसन्सधारक हा, लायसन्स चालू असतानाच्या मुदतीत उक्त जागा रिकामी करण्याचे अथवा तिचा ताबा सोडण्याचे ठरवील त्याबाबतीत, आपण तसे करण्याच्या बेतात आहोत किंवा आपण तसे केले आहे असे आयुक्ताला तात्काळ कळवील.

२२.**जागेच्या बाहेर फलक लावणे.--** लायसन्सधारक हा, अशा जागेच्या बाहेर एखाद्या ठळक ठिकाणी फलक लावील, या [illegible]वर तो, त्या जागेमध्ये अथवा जागेवर ठेवलेल्या वस्तूंचे, अथवा तेथे चालू असलेल्या धंद्यातील कार्यवाहीचे अथवा एखाद्या क्रियेचे [illegible] त्या जागेच्या संबंधातील नगरपालिकेचा लायसन्स क्रमानक कोणताही असल्यास, आणि जागेच्या मालकाचे अथवा भोगवटादाराचे अथवा प्रभावी व्यक्तींचे नाव व तिचा स्थानिक पत्ता, या गोष्टींचा निर्देश करील.

२३.**आरोग्य विघातक इंधन वापरण्यास मनाई.--** लायसन्सधारक हा, पेटवण्यात आल्यानंतर किंवा तत्पूर्वी आरोग्यविघातक अशी दुर्गंधी अथवा धूर ओकणारा कोणताही पदार्थ इंधन म्हणून वापरणार नाही.

२४.**जागेला रंगसफेदी करणे.--** लायसन्सधारक हा, प्रत्येक वर्षी निदान दोनदा म्हणजे एप्रिल व ऑक्टोबर या महिन्यांमध्ये आणि प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तसे फर्माविण्यात आले असल्यास त्यापेक्षा जास्त वेळा, लायसन्स दिलेल्या जागेच्या आतील प्रत्येक भाग व छत यांची कळीच्या चुन्याने रंगसफेदी करवून घेण्याची व्यवस्था करवील.

२५.**शुद्ध पाण्याचा पुरवठा.--** लायसन्सधारक हा, पुरेशा प्रमाणात शुद्ध व आरोग्यप्रद पाण्याची त्या जागेत सोय करील आणि अशी जागा आवश्यक असेल तितक्या वेळा किंवा प्रत्येक चोवीस तासांमध्ये निदान एकदा तरी पुर्णपणे स्वच्छ करुन घेण्याची व्यवस्था करील आणि त्या जागेत कोणत्याही प्रकारची घाण अथवा टाकाऊ पदार्थ साचू देण्यास प्रतिबंध करील.

[illegible]६.**वायुजीवन व दिवाबत्ती.--** लायसन्सधारक हा, लायसन्स दिलेल्या जागेवर अथवा त्या जागेच्या संबंधात वायुवीजन व दिवाबत्ती यांच्या योग्य साधनांची तरतूद करील आणि ही साधने सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

२७.**तपकीर, लाख अथवा लाखेच्या कांड्या यांच्या निर्मितीसाठी वापरावयाच्या जागेच्या संबंधात जादा शर्ती.--** ज्या लायसन्सधारकाला तपकीर,लाख, अथवा लाखेच्या कांड्यांच्या निर्मितीसाठी असलेल्या जागेच्या संबंधात लायसन्स देण्यात आलेले असेल असा लायसन्सधारक हा, उप विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) यांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) त्या जागेचा जो भाग तपकीर, लाख अथवा लाखेच्या कांड्यांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येत असेल असा भाग कोणताही सार्वजनिक बोळ अथवा रस्ता अथवा सार्वजनिक वास्तव्याचे कोणतेही ठिकाण यांच्याशी अगदी लागून असणार नाही ;

(ब) अशा प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी जागा अथवा तिचा कोणताही भाग ज्वालाग्राही सामग्रीने बांधण्यात येणार नाही. अशा प्रत्यक जागेत मुक्त वायुवीजन व उजेड यांची तरतूद प्रधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशाप्रकारे करण्यात येईल ;

(क) प्रत्येक भट्टी किंवा विस्तव पेटवण्याचे ठिकाण हे अशाप्रकारे बांधण्यात येईल की, त्यातील सर्व धूर, वाफ व इतर उपद्रवी वायू हे उचित व कार्यक्षम अशा धुराड्यामधून किंवा निर्गमार्गातून जवळपासच्या जागांना उपद्रवकारक ठरणार नाही अशा पुरेशा उंचीवर बाहेरच्या हवेत सोडला जाईल. एखादी भट्टी अथवा विस्तव पेटवण्याचे ठिकाण हे, जर त्या भट्टीच्या अथवा विस्तव पेटवण्याच्या ठिकाणाच्या किंचित वर मधोमध ३० सें. मी. पेक्षा कमी नसेल एवढ्या व्यासाचे भोक असलेली कमान असेल आणि तेथून धुराड्याच्या बांधकामास सुरवात केली असेल आणि धुराडे भोवतालच्या इमारतीच्या छपरांच्या वर ५० सेंटिमीटरपेक्षा कमी नसेल इतक्या उंचीपर्यंत बांधण्यात आले असेल तर ते वरील शर्तीनुसार बांधण्यात आले आहे असे समजण्यात येईल ;

(ड) लायसन्सधारक हा धूर, वायु, वाफ, धूळ अथवा इतर अशुद्ध द्रव्ये यांच्यापासून होणाऱ्या उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी आयुक्तांकडून अथवा प्रधिकृत अधिकाऱ्याकडून फर्माविण्यात येईल अशा इतर उपाययोजनाही करील ;

(इ) थुंकण्याच्या प्रयोजनासाठी ठेवली असतील अशी पात्रे अथवा ठिकाणे यांखेरीज अशा जागेत कोणतीही व्यक्ती थुंकणार नाही.

**२८.विटा, मातीची भांडी, चुना अथवा टाईल्स यांच्या निर्मितीसाठी अथवा त्या तयार करण्यासाठी वापर करावयाच्या जागेच्या संबंधातील जादा शर्ती.--** ज्या लायसनसधारकाला विटा, मातीची भांडी, चुना आणि टाईल्स यांची कोणत्याही प्रकारच्या प्रक्रियेने निर्मिती करण्यासाठी अथवा त्या तयार करण्यासाठी वापर करावयाच्या जागेच्या संबंधात लायसन्स देण्यात आलेलेल असेल असा लायसन्सधारक हा उप-विधी ३ ते २५ (दोन्ही धरून) यांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्तीव्यतिरिक्त, पुढील जादा शर्तींचे पालन करी :-

(अ) लायसन्सधारक हा सर्ववेळ लायसन्स दिलेल्या जागेमध्ये कामावर नेमलेल्या कोणत्याही श्रमिकाला इजा पोहोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस होणारा उपद्रव किंवा त्रास यास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करण्याच्या किंवा तो कमीत-कमी करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत अधिकारी वेळोवेळी फर्मावील अशी सर्व साधने व उपयंत्रे यांचा वापर करील व ती अशा जागेत सुस्थितीत आणि कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा कोणत्याही वेळी, विटा, टाईल्स, मातीची भांडी अथवा चुना तयार करण्यासाठी अथवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी माती, चिखल आणि तत्सम गोष्टी काढण्यासाठी अशा जागेच्या कोणत्याही भागात उत्खनन करविणार नाही.

(क) लायसन्सधारक हा, जेणेकरुन लोकांना अपाय अथवा त्रास होईल अशा प्रकारे कोणत्याही नदीत; प्रवाहात, जलप्रवाहात, विहीरीत, तळ्यात, रस्त्यात अथवा इतर कोणत्याही ठिकाणी कोणतेही निखारे, राख, विटा, दगड, केरकचरा, धूळ, घाण अथवा इतर पदार्थ फेकण्यास अथवा टाकू देण्यास अथवा फेकण्याची अथवा टाकण्याची कृती करण्यास परवानगी देणार नाही अथवा तसे करविण्याची व्यवस्था करणार नाही अथवा अशी कृती खपवून घेणार नाही.

(ड) लायसन्सधारक हा भट्टीपासून १५ ते २४ मीटर अनतराच्या आत असेल अशा जागी पाण्याचा नळ बसवून घेईल.

**२९.शिळे, मांस, रक्त, हाडे उकळवणे अथवा साठवून ठेवणे अथवा चरबी किंवा गंधक वितळविणे अथवा साबण बनविणे अथवा कापूर, कॅटगट, चरबी, शिरस तयार करणे अथवा मेणबत्त्या बनविणे यांसाठी वापर करावयाच्या**

जागेच्या संबंधातील जागा शर्ती.-- ज्याला शिळे मांस, रक्त, हाडे उकळविणे अथवा साठवून ठेवणे अथवा चरबी किंवा गंधक विळवणे अथवा साबण बनवणे यासाठी वापर करावयाच्या जागेचे लायसन्स देण्यात आले असेल असा लायसनधारक हा, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) यांत विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींव्यतिरिक्त पुढील जागा शर्तीचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागेच्या कोणत्याही भागात पडून असलेले किंवा ठेवण्यात आलेले सर्व टाकाऊ पदार्थ, तुकडे अथवा प्राणी अथवा इतर पदार्थ प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा घट्ट आच्छादन असलेल्या योग्य प्रकारच्या अशोषक व अभेद्य पात्रांमध्ये गोळा करवण्याची व ठेवण्याची व्यवस्था करील. असे सर्व टाकाऊ पदार्थ २४ तासांतून निदान एकदा तरी हलवण्याची व प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात येईल अशा रीतीने त्यांची विल्हेवाट लावण्याची तो व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, अशा जागेतील प्रत्येक कढई व प्रत्येक पिंप, टाकी, कुंड, तवा, हौद, बाक, मेज, टब, पात्र अथवा भांडे अथवा इतर पात्रे यांचा आतला व बाहेरचा भाग आवश्यक असेल तितक्या वेळा किंवा कामाचा प्रत्येक दिवस संपल्यावर निदान एकवेळ तरी काळजीपूर्वक स्वच्छ करुन घेण्याची व्यवस्था करील आणि असे पिंप, टाकी, कुंड, तवा, हौद, बाक, मेज, टब, पात्र भांडे अथवा इतर पात्रे यांमध्ये अथवा त्यावर कोणतीही घाण साचू देण्यास प्रतिबंध करील ;

(क) लायसन्सधारक हा, अशा जागेत आलेली आणि त्याच्या धंद्यात तात्काळ वापरण्यासाठी आवश्यक नसलेली सर्व सामग्री, त्यामधून अपकारक अथवा अपायकारक दुर्गंध पडण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील.

(ड) लायसन्सधारक हा, धंद्याच्या प्रक्रियेत ज्या वस्तूंवर प्रक्रिया करण्यात येत असेल त्या वस्तूंमधून किंवा एखाद्या पिंपात, टाकीत, कुंडात, कढईत, हौदात किंवा इतर प्रकारच्या भांड्यात ठेवलेल्या पदार्थांपासून निघणारे सर्व वायू, वाफ, धूर किंवा धूळ निरुपद्रवी व्हावेत यासाठी तरतूद केलेल्या सर्व साधनांचा व उपयंत्रांचा वापर करील व ती सर्व वेळी, सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(इ) लायसन्सधारक हा, अशा जागेतील प्रत्येक इमारत व प्रत्येक मजल्याच्या भिंतीच्या आतील प्रत्येक पृष्ठभाग व फरसबंदी सर्ववेळ चांगल्या स्थितीत व दुरुस्त करुन ठेवण्याची व्यवस्था करील. कारण त्यामुळे त्या भिंतीवर उडणारी द्रवरुप घाण अथवा पडणारा केरकचरा अथवा कोणताही अपकारक अथवा अपायकारक पदार्थ त्या भिंतीत शोषला जाण्यास प्रतिबंध होईल.

(फ) लायसन्सधारक हा, अशा जागेवर अथवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनि:सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्ववेळ चांगल्या स्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(ग) लायसन्सधारक हा, द्रवरुप घाण सार्वजनिक नि:सारण व्यवस्थेत सोडण्यापूर्वी, त्यातून अपकारक अथवा अपायकारक दुर्गंध सुटण्यास प्रतिबंध होईल अशा प्रकारे ती थंड करवण्याची व्यवस्था करील आणि तो कोणताही चिकट अथवा तेलकट पदार्थ असलेली घाण सार्वजनिक जलनि:सारण व्यवस्थेत सोडणार नाही अथवा सोडण्याची व्यवस्था करणार नाही ;

(ह) लायसन्सधारक हा, अशा जागेशी संबंधित असलेल्या धुराड्यातून अथवा इतर ठिकाणाहून निघणाऱ्या धुरामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या उपद्रवांना प्रतिबंध करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात येईल अशा व्यवहार्य साधनांचा अंगीकार करील ;

(आय्) लायसन्सधारक हा, सर्ववेळ, लायसन्स दिलेल्या जागेमध्ये कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीला इजा पोहोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस होणारा उपद्रव किंवा त्रास यास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करण्याच्या किंवा ती कमीत कमी करण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्ताने वेळोवेळी फर्माविली असतील अशी सर्व साधने व उपयंत्रे यांचा वापर करील व ती अशा जागेत सुस्थितीत आणि कार्यक्षम ठेवविण्याची व्यवस्था करील ;

(जे) लायसन्सधारक हा, त्या जागेत अथवा त्या जागेच्या कोणत्याही भागात तात्पुरत्या अथवा कायम मुदतीसाठी कुत्रा पाळणार नाही अथवा कोणताही पशु अथवा इतर जनावर बांधून ठेवणार नाही.

३०. **फटाके, बारुद, आगपेट्या, गंधक, नवसागर, क्लोरेट मिक्स्चर, विस्फोटक पारद, गन कॉटन नायट्रो-ग्लिसरीन, नायट्रो कम्पाऊंड अथवा नायट्रो-मिक्स्चर अथवा गॅस निर्माण अथवा तयार करण्यासाठी वापर करावयाच्या जागेच्या संबंधातील जादा शर्ती.--** (१) ज्या लायसन्सधारकाला, फटाके, बारुद, आगपेट्या, गंधक, नवसागर, क्लोरेट मिक्स्चर, विस्फोटक पारद, गन कॉटन नायट्रो-ग्लिसरीन, नायट्रो कम्पाऊंड अथवा नायट्रो-मिक्स्चर अथवा गॅस कोणत्याही प्रकारच्या प्रक्रियेद्वारा निर्माण अथवा तयार करण्यासाठी वापर करावयाच्या जागेच्या संबंधात लायसन्स देण्यात आलेले असेल असा लायसन्सधारक हा, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) यांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधार शर्तीव्यतिरिक्त, पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, उपरिनिर्दिष्ट प्रयोजनांपैकी कोणत्याही जागेचा वापर :-

(एक) ती दगड-विटांनी अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात येईल अशा इतर टिकाऊ सामग्रीने बांधली नसेल तोपर्यंत,

आणि

(दोन) तिचा प्रत्येक भाग ज्वालाग्राही नसणाऱ्या सामग्रीने बांधण्यात आलेला नसेल तोपर्यंत,-

करणार नाही ;

(ब) लायसन्सधारक हा, अशा जागेच्या प्रत्येक भागाचा तळ फरसबंदी करील अथवा अन्यप्रकारे अभेद्य करील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशाप्रकारे तेथे जलनि:सारणाची व्यवस्था करील आणि अशी फरसबंदी सर्ववेळ चांगल्या स्थितीत व दुरुस्त केलेली ठेवील ;

(क) लायसन्सधारक हा, अशा जागेवर अथवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनि:सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्ववेळ चांगल्या स्थितीत व दुरुस्त करुन ठेवण्याची व्यवस्था करील ;

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागेत कोणत्याही ठिकाणाहून निघणारे सर्व वायू, वाफ, धूर, धूळ किंवा इतर अशुद्ध द्रव्ये निरुपद्रवी व्हावीत यासाठी उत्कृष्ट अशा व्यवहार्य साधनांचा वापर करील ;

(ई) लायसन्सधारक हा, अशा जागी लागणाऱ्या आगीशी मुकाबला करण्यासाठी योग्य अशी साधने व उपयंत्रे यांची तरतूद करील ;

(फ) लायसन्सधारक हा, अशा जागेत अथवा जागेवर, -

(एक) कोणताही विस्तव पेटवणार नाही अथवा पेटवण्यास परवानगी देणार नाही ;

(दोन) कोणत्याही आवरण नसलेल्या दिव्याचा वापर करणार नाही अथवा अशा दिव्याच्या वापरास परवानगी देणार नाही :

282

(तीन) धूम्रपान करणार नाही अथवा धुम्रपान करण्यास परवानगी देणार नाही ;

(ग) लायसन्सधारक हा, सर्ववेळ, लायसन्स दिलेल्या जागेत कामावर नेमलेल्या कोणत्याही श्रमिकाला इजा पोहोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस होणारा उपद्रव किंवा त्रास यास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करण्याच्या किंवा तो कमीत कमी करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याने वेळोवेळी फार्मावली असतील अशी सर्व साधने व उपयंत्रे यांचा वापर करील व ती अशा जागेत सुस्थितीत आणि कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील ;

(ह) लायसन्सधारक हा, आग लागली तर त्यापासून बचाव व्हावा यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात येतील अशा निसटून जाण्याच्या साधनांची तरतूद करील ;

(आय) लायसन्सधारक हा, आपले जेवण अशा जागेत जेवणार नाही अथवा कोणत्याही व्यक्तीला त्या जागी जेवण जेवण्यास परवानगी देणार नाही.

(...) अशा जागेत प्रवेश करणारी कोणतीही व्यक्ती स्वत:जवळ कोणती ही आगपेटी अथवा विस्तव पेटवण्याचे इतर साधन बाळगणार अथवा स्वत:जवळ आगपेटी अथवा आग पेटवण्याचे इतर कोणतेही साधन जवळ बाळगणाऱ्या कोणत्याही व्यक्तील लायसन्सधारक अशा जागेत प्रवेश करण्याची परवानगी देणार नाही.

**३१. कातडे, मऊ कातडे, चामडे व चामड्याच्या वस्तू यांच्या निर्मितीकरिता वापर करावयाच्या जागेच्या संबंधातील जादा शर्ती.**-- (१) कातडे, मऊ कातडे, चामडे व चामड्याच्या वस्तू यांच्या निर्मितीकरिता वापर करावयाच्या जागेच्या संबंधात ज्याला लायसन्स देण्यात आले असेल असा लायसन्सधारक हा, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) यांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण शर्तीव्यतिरिक्त पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, सर्व केस, चामड्याचे काप आणि कातड्याचे टाकाऊ तुकडे, मऊ व जाड कातड्यापासून निघालेले इतर पदार्थ अशा जागेच्या योग्य भागात तेथून दूर नेण्यासाठी जमा करवण्याची व ठेवण्याची व्यवस्था करील. तो जनावरापासून निघालेले सर्व घटक योग्य अशा पाणी न शिरु शकणाऱ्या व शोषण न करणाऱ्या अशा झाकण असलेल्या योग्य पात्रात जमा करुन ठेवण्याची व चोवीस तासांतून निदान एकदातरी ते पात्र रिकामे करण्याची आणि शेवटी आयुक्ताकडून अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता (...) येईल अशा पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील ;

(ब) लायसन्सधारक हा, सर्व केस, चामड्याचे काप आणि कातड्याचे लहान सहान तुकडे व कोणत्याही मऊ कातड्यापासून अथवा जाड कातडीपासून वेगळे केलेले, अशा जागेत, अशा प्रकारे गोळा करण्यात आलेले असतील, परंतु आणखी कोणत्याही धंद्याच्या प्रक्रियेसाठी त्यांच्या वापरात येणार नसेल असे इतर पदार्थ प्रत्येक चोवीस तासांतून निदान एकदा तरी तेथून हलविण्याची आणि आयुक्ताकडून अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात येईल अशा पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील ;

(क) लायसन्सधारक हा, कोणत्याही मऊ अथवा जाड कातड्याचे केस काढणे, काप सोलणे, आकार देणे, ठोकणे अथवा स्टेपलिंग यासाठी अथवा आपल्या धंद्यातील इतर कोणत्याही प्रक्रियेसाठी अशा जागेत वापरण्यात येणारी प्रत्येक तुळई, मेज, बाक, चाकू, हातोडा अथवा इतर अवजार किंवा उपकरण आवश्यक असेल तितक्या वेळा स्वच्छ करुन घेण्याची व्यवस्था करील आणि अशा

तुळईवर, मेजावर, बाकावर, चाकूवर, हातोड्यावर अथवा इतर अवजारावर अथवा उपकरणावर कोणतीही घाण अथवा टाकाऊ पदार्थ साचू देण्यास प्रतिबंध करील ;

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागेत असलेल्या कोणत्याही खड्ड्यातून घेतलेला वाया गेलेला सर्व चुना योग्य अशा भांड्यात अथवा पात्रात अथवा उचित प्रकारे तयार केलेल्या गाडीत अथवा वाहनात तात्काळ जमा करण्याची व्यवस्था करील ;

(ई) लायसनसधारक हा, असे प्रत्येक भांडे, पात्र, गाडी अथवा वाहन भरेल अथवा भरण्यात येईल तेव्हा, त्यातील पदार्थापासून अपकारक अथवा अपायकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा तऱ्हेने ते पदार्थ योग्य रीतीने आच्छादित करवण्याची व्यवस्था करील ;

(फ) लायसन्सधारक हा, चोवीस तासांतून निदान एकदा तरी, वाया गेलेला सर्व चुना अशा जागेतून हलवण्याची व प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील ;

(ग) लायसन्सधारक हा, अशा जागेतील कोणत्याही इमारतीच्या भिंतीच्या आतील पृष्ठभागाच्या प्रत्येक भागावर उडालेली सर्व [redacted]प घाण घासून अथवा चांगला चुना त्यावर सारवून अथवा इतर कोणत्याही परिणामकारक साधनाने, आठवड्यातून निदान एकदातरी अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तसे फर्माविण्यात आले असल्यास अधिक वेळा, काढून टाकण्याची व्यवस्था करील ;

(ह) लायसन्सधारक हा, अशा जागेतील प्रत्येक इमारतीच्या भिंती व छत यांचा आतील पृष्ठभाग, तसेच प्रत्येक तळजमीन किंवा फरसबंदी नेहमी चांगल्या स्थितीत दुरुस्त करुन ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजे त्यामुळे जमिनीवर किंवा भिंतीवर उडणारी कोणतीही द्रवरुप घाण अथवा तेथे पडणारा कोणाताही टाकाऊ पदार्थ अथवा तेथे ठेवलेला कोणताही अपकारक अथवा अपायकारक पदार्थ त्या भिंतीत किंवा जमिनीत शोषला जाण्यास किंवा त्यामधून बाहेर पाझरण्यास प्रतिबंध होईल.

(आय) लायसन्सधारक हा, अशा जागेवर अथवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनि:सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्ववेळ चांगल्या व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील.

(२) उप-खंड (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, योग्यप्रकारे कमावलेल्या अथवा प्रक्रिया केलेल्या चामड्याच्या अथवा मऊ कातड्याच्या साठवणीसाठी असेल अशा कोणत्याही जागेच्या संबंधात लागू होणार नाही.

[redacted] **रंगाईसाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात अतिरिक्त शर्ती.--** रंगाईसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात, लायसन्स देण्यात आलेला लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसामान्य शर्तीखेरीज, पुढील जागा शर्तीचे पालन करील,-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागांत आणण्यात येईल आणि तात्काळ वापरासाठी ज्यांची आवश्यकता नसेल अशा सर्व वस्तू, त्यांपासून अपायकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा जागी ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, वस्तूंवर प्रक्रिया करण्यात येत असेल, त्या वस्तूंपासून किंवा अशा जागांमधील कोणतेही, पिंप, टाकी, कुंड, कढई, हौद, पात्र किंवा भांडे किंवा इतर कोणतेही पात्र यांपासून बाहेर पडणारे सर्व प्रकारचे सर्व वायू, वाफ, धूर धुरळा किंवा इतर अशुद्ध पदार्थ निरुपद्रवी करण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व साधने व उपकरणे यांचा अंगीकार करील व ती सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(क) लायसन्सधारक हा, अशा जागांतील प्रत्येक तळजमीन किंवा फरसबंदी सर्व वेळी सुस्थितीत व दुरुस्त अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील, म्हणजे, त्यामुळे जमिनीवर किंवा फरशीवर पडणारी किंवा तेथे रचून ठेवण्यात येणारी कोणतीही द्रवरुप घाण किंवा टाकाऊ पदार्थ किंवा कोणताही अपायकारक किंवा अपकारक पदार्थ जमिनीत शोषला जाण्यास प्रतिबंध होईल.

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागांमधील सुकविण्याची जागा व जमिनीचा सर्व पृष्ठभाग सपाट व खाच-खळगे किंवा उंच-सखलपणा विरहित ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजे त्यावर कोणताही द्रवरुप टाकाऊ पदार्थ किंवा कचरा साचण्यास प्रतिबंध होईल.

(इ) लायसन्सधारक हा, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनिस्सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्ववेळ चांगल्या व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील. तो, प्राधिकृत अधिकारी मान्य करील अशा रीतीने, रंगीत टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही बाबतीत, असा रंगीत टाकाऊ पदार्थ कोणत्याही सार्वजनिक गटारात जाऊ देणार नाही.

(फ) लायसन्सधारक हा, जो उक्त जागेच्या कोणत्याही भागात पडला किंवा साठविण्यात आला असेल असा सर्व केरकचरा एकत्र [illegible] तो प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने योग्य अशा हवाबंद व ज्यामध्ये शोषण होणार नाही अशा आच्छादित [illegible]त ठेवण्याची व्यवस्था करील. तो प्रत्येक चोवीस तासांतून निदान दोनदा असा केरकचरा अशा जागांतून काढून तो नगरपालिकेच्या कचरापेटीत टाकण्याची व्यवस्था करील;

(ग) लायसन्सधारक हा, अशा जागांमधील वापरात नसलेल्या रंगाच्या भांड्यात किंवा पात्रात पाणी साठवून ठेवण्यास परवानगी देणार नाही.

३३. **लोकर किंवा केस धुण्यासाठी किंवा वाळविण्यासाठी किंवा कापूस, सरकी, टाकाऊ कापूस, शिंगे, खूर, चिंध्या, डांबर, टर्पेन्टाईन, अंबाडी, सण, काथ्या, ताग, राळ व स्पिरिट कोणत्याही प्रक्रियेने तयार करण्यासाठी किंवा त्यांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात अतिरिक्त शर्ती.--** (१) लोकर किंवा केस धुण्यासाठी किंवा वाळविण्यासाठी किंवा कापूस, सरकी, टाकाऊ कापूस, शिंगे, खूर, चिंध्या, डांबर, टर्पेन्टाईन, अंबाडी, सण, काथ्या, ताग, राळ व स्पिरिट कोणत्याही प्रक्रियेने तयार करण्यासाठी किंवा त्यांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात ज्याला लायसन्स मंजूर करण्यात आले असेल असा लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन), मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण [illegible]रीज पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागांत आणण्यात येतील आणि तात्काळ वापरासाठी ज्यांची आवश्यकता नसेल अशा सर्व वस्तू, त्यांपासून अपायकारक किंवा अपकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा जागी ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, ज्या वस्तूंवर प्रक्रिया करण्यात येत असेल त्या वस्तूपासून किंवा अशा जागांमधील कोणतेही पिंप, टाकी, कुंड, कढई, हौद, किंवा इतर कोणतीही पात्रे यांपासून बाहेर पडणारे सर्व प्रकारचे सर्व वायू, वाफ, धूर धुरळा निरुपद्रवी करण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व साधने व उपकरणे यांचा वापर करील व ती सर्ववेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

तुळईवर, मेजावर, बाकावर, चाकूवर, हातोड्यावर अथवा इतर अवजारावर अथवा उपकरणावर कोणतीही घाण अथवा टाकाऊ पदार्थ साचू देण्यास प्रतिबंध करील :

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागेत असलेल्या कोणत्याही खड्ड्यातून घेतलेला वाया गेलेला सर्व चुना योग्य अशा भांड्यात अथवा पात्रात अथवा उचित प्रकारे तयार केलेल्या गाडीत अथवा वाहनात तात्काळ जमा करण्याची व्यवस्था करील ;

(ई) लायसनसधारक हा, असे प्रत्येक भांडे, पात्र, गाडी अथवा वाहन भरेल अथवा भरण्यात येईल तेव्हा, त्यातील पदार्थापासून अपकारक अथवा अपायकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा तऱ्हेने ते पदार्थ योग्य रीतीने आच्छादित करवण्याची व्यवस्था करील ;

(फ) लायसन्सधारक हा, चोवीस तासांतून निदान एकदा तरी, वाया गेलेला सर्व चुना अशा जागेतून हलवण्याची व प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील ;

(ग) लायसन्सधारक हा, अशा जागेतील कोणत्याही इमारतीच्या भिंतीच्या आतील पृष्ठभागाच्या प्रत्येक भागावर उडालेली सर्व द्रवरूप घाण घासून अथवा चांगला चुना त्यावर सारवून अथवा इतर कोणत्याही परिणामकारक साधनाने, आठवड्यातून निदान एकदातरी अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तसे फर्माविण्यात आले असल्यास अधिक वेळा, काढून टाकण्याची व्यवस्था करील ;

(ह) लायसन्सधारक हा, अशा जागेतील प्रत्येक इमारतीच्या भिंती व छत यांचा आतील पृष्ठभाग, तसेच प्रत्येक तळजमीन किंवा फरसबंदी नेहमी चांगल्या स्थितीत दुरुस्त करुन ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजे त्यामुळे जमिनीवर किंवा भिंतीवर उडणारी कोणतीही द्रवरूप घाण अथवा तेथे पडणारा कोणाताही टाकाऊ पदार्थ अथवा तेथे ठेवलेला कोणताही अपकारक अथवा अपायकारक पदार्थ त्या भिंतीत किंवा जमिनीत शोषला जाण्यास किंवा त्यामधून बाहेर पाझरण्यास प्रतिबंध होईल.

(आय) लायसन्सधारक हा, अशा जागेवर अथवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनि:सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्ववेळ चांगल्या व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील.

(२) उप-खंड (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, योग्यप्रकारे कमावलेल्या अथवा प्रक्रिया केलेल्या चामड्याच्या अथवा मऊ चामड्याच्या साठवणीसाठी असेल अशा कोणत्याही जागेच्या संबंधात लागू होणार नाही.

**रंगाईसाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात अतिरिक्त शर्ती.--** रंगाईसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात, लायसन्स देण्यात आलेला लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसामान्य शर्तीखेरीज, पुढील जागा शर्तीचे पालन करील,-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागांत आणण्यात येईल आणि तात्काळ वापरासाठी ज्यांची आवश्यकता नसेल अशा सर्व वस्तू, त्यांपासून अपायकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा जागी ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, वस्तूंवर प्रक्रिया करण्यात येत असेल, त्या वस्तूंपासून किंवा अशा जागांमधील कोणतेही, पिंप, टाकी, कुंड, कढई, हौद, पात्र किंवा भांडे किंवा इतर कोणतेही पात्र यांपासून बाहेर पडणारे सर्व प्रकारचे सर्व वायू, वाफ, धूर धुरळा किंवा इतर अशुद्ध पदार्थ निरुपद्रवी करण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व साधने व उपकरणे यांचा अंगीकार करील व ती सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(क) लायसन्सधारक हा, अशा जागांतील प्रत्येक तळजमीन किंवा फरसबंदी सर्व वेळी सुस्थितीत व दुरुस्त अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील, म्हणजे, त्यामुळे जमिनीवर किंवा फरशीवर पडणारी किंवा तेथे रचून ठेवण्यात येणारी कोणतीही द्रवरुप धाण किंवा टाकाऊ पदार्थ किंवा कोणताही अपायकारक किंवा अपकारक पदार्थ जमिनीत शोषला जाण्यास प्रतिबंध होईल.

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागांमधील सुकविण्याची जागा व जमिनीचा सर्व पृष्ठभाग सपाट व खाच-खळगे किंवा उंच-सखलपणा विरहित ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजे त्यावर कोणताही द्रवरुप टाकाऊ पदार्थ किंवा कचरा साचण्यास प्रतिबंध होईल.

(इ) लायसन्सधारक हा, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनिस्सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्ववेळ चांगल्या व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील. तो, प्राधिकृत अधिकारी मान्य करील अशा रीतीने, रंगीत टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही बाबतीत, असा रंगीत टाकाऊ पदार्थ कोणत्याही सार्वजनिक गटारात जाऊ देणार नाही.

(फ) लायसन्सधारक हा, जो उक्त जागेच्या कोणत्याही भागात पडला किंवा साठविण्यात आला असेल असा सर्व केरकचरा एकत्र तो प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने योग्य अशा हवाबंद व ज्यामध्ये शोषण होणार नाही अशा आच्छादित पात्रात ठेवण्याची व्यवस्था करील. तो प्रत्येक चोवीस तासांतून निदान दोनदा असा केरकचरा अशा जागांतून काढून तो नगरपालिकेच्या कचरापेटीत टाकण्याची व्यवस्था करील;

(ग) लायसन्सधारक हा, अशा जागांमधील वापरात नसलेल्या रंगाच्या भांड्यात किंवा पात्रात पाणी साठवून ठेवण्यास परवानगी देणार नाही.

३३. **लोकर किंवा केस धुण्यासाठी किंवा वाळविण्यासाठी किंवा कापूस, सरकी, टाकाऊ कापूस, शिंगे, खूर, चिंध्या, डांबर, टर्पेन्टाईन, अंबाडी, सण, काथ्या, ताग, राळ व स्पिरिट कोणत्याही प्रक्रियेने तयार करण्यासाठी किंवा त्यांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात अतिरिक्त शर्ती.--** (१) लोकर किंवा केस धुण्यासाठी किंवा वाळविण्यासाठी किंवा कापूस, सरकी, टाकाऊ कापूस, शिंगे, खूर, चिंध्या, डांबर, टर्पेन्टाईन, अंबाडी, सण, काथ्या, ताग, राळ व स्पिरिट कोणत्याही प्रक्रियेने तयार करण्यासाठी किंवा त्यांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात ज्याला लायसन्स मंजूर [illegible]न आले असेल असा लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन), मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण [illegible]रिक्तीज पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागांत आणण्यात येतील आणि तात्काळ वापरासाठी ज्यांची आवश्यकता नसेल अशा सर्व वस्तू, त्यांपासून अपायकारक किंवा अपकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा जागी ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्साधारक हा, ज्या वस्तूंवर प्रक्रिया करण्यात येत असेल त्या वस्तूपासून किंवा अशा जागांमधील कोणतेही पिंप, टाकी, कुंड, कढई, हौद, किंवा इतर कोणतीही पात्रे यांपासून बाहेर पडणारे सर्व प्रकारचे सर्व वायू, वाफ, धूर धुरळा निरुपद्रवी करण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व साधने व उपकरणे यांचा वापर करील व ती सर्ववेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(क) लायसन्सधारक हा, अशा जागेतील भिंतीचा आतील पृष्ठभाग तसेच प्रत्येक तळजमीन किंवा फरसबंदी नेहमी सुस्थितीत दुरुस्त करुन ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजे त्यामुळे जमिनीवर किंवा भिंतीवर उडणारी कोणतीही द्रवरुप घाण अथवा तेथे पडणारा कोणाताही टाकाऊ पदार्थ किंवा तेथे रचून ठेवलेला कोणाताही अपकारक अथवा अपायकारक पदार्थ त्या भिंतीत किंवा जमिनीत शोषला जाण्यास किंवा त्यामधून बाहेर पाझरण्यास प्रतिबंध होईल.

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनिस्सारण साधनांची तरतूद करील आणि ती साधने सर्व वेळ चांगल्या व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील.

(ई) लायसन्सधारक हा, सर्व वेळ, लायसन्स दिलेल्या जागेमध्ये कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस इजा पोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस होणारा उपद्रव किंवा त्रास यास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करणच्या किंवा तो कमीत कमी करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा एखादेवेळी आग लागल्यास आगीशी मुकाबला करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत अधिकारी वेळोवेळी फर्मावील अशी सर्व साधने व उपयंत्रे यांचा वापर करील व ती अशा जागेत सुस्थितीत आणि कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(फ) लायसन्सधारक हा, जो अशा जागेच्या कोणत्याही भागात पडला अथवा साठविण्यात आला असेल असा सर्व केरकचरा किंवा इतर वस्तू एकत्र करुन तो, प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने योग्य अशा कप्पेबंद व ज्यामध्ये शोषण होणार नाही अशा आच्छादित पात्रांत किंवा जागेत ठेवण्याची व्यवस्था करील. तो, प्रत्येक चोवीस तासांतून निदान दोनदा असा केरकचरा अशा जागांतून काढून प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील.

(ग) लायसन्सधारक हा, अशा जागेत किंवा अशा जागेच्या कोणत्याही भागात कायम किंवा तात्पुरता मुदतीसाठी कुत्रा पाळणार नाही किंवा कोणताही पशू अथवा इतर जनावर बांधून ठेवणार नाही.

(ह) लायसन्सधारक हा, अशा जागेत अथवा जागेवर :-

(एक) कोणाताही विस्तव पेटवणार नाही किंवा पेटवण्यास परवानगी देणार नाही ;

(दोन) कोणत्याही आवरण नसलेल्या दिव्याचा वापर करणार नाही किंवा अशा दिव्याच्या वापरास परवानगी देणार नाही;

(तीन) धूम्रपान करणार नाही किंवा धुम्रपान करण्यास परवानगी देणार नाही.

(२) अशा जागेत प्रवेश करणारी कोणतीही व्यक्ती स्वत:जवळ कोणतीही आगपेटी किंवा विस्तव पेटवण्याचे इतर साधन बाळगणार नाही.

३४. **तेल उकळण्यासाठी किंवा तेल काढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात जादा शर्ती.--** ज्याला तेल उकळण्यासाठी व तेल काढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात लायसन्स मंजूर करण्यात आले असेल, असा लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण शर्तीखेरीज पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, जो अशा जागेच्या कोणत्याही भागात पडला किंवा ठेवला असेल असा सर्व केरकचरा किंवा इतर वस्तू एकत्र करुन तो प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा हवाबंद व ज्यामध्ये शोषण होणार नाही अशा आच्छादित पात्रात ठेवण्याची

व्यवस्था करील, तो प्रत्येक चोवीस तासांतून निदान दोनदा असा केरकचरा अशा जागांतून काढून प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, अशा जागांत आणण्यात येतील आणि त्याच्या व्यवसायात तात्काळ वापरासाठी ज्यांची आवश्यकता नसेल अशा सर्व वस्तू त्यांपासून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही उपद्रवास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा जागी ठेवण्याची व्यवस्था करील ;

(क) लायसन्सधारक हा, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात उचित प्रकारच्या जलनिस्सारणाच्या साधनांची तरतूद करील आणि साधने सर्व वेळ सुस्थितीत आणि कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील.

(ड) लायसन्सधारक हा, अशा जागेशी संबंधित असलेल्या कोणत्याही धुराड्यातून किंवा इतर ठिकाणाहून निघणाऱ्या धुरामुळे किंवा दुर्गंधीमुळे उद्‌भवणाऱ्या सर्व प्रकारच्या उपद्रवांना प्रतिबंध करण्यासाठी, प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात येईल अशा सर्व व्यवहार्य साधनांचा वापर करील.

(इ) लायसन्सधारक हा, लायसन्स दिलेल्या जागेचा अवतीभोवतीचा परिसर प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशाप्रकारे फरसबंद करील किंवा त्यावर खडी टाकील आणि त्याच्या जलनिस्सारणाची व्यवस्था करील.

(फ) लायसन्सधारक, तेल उकळणे व तेल काढणे यांच्या संबंधात पाळलेले सर्व प्राणी प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा प्रकारे फरसबंद केलेल्या, लाद्या घातलेल्या आणि जलनिस्सारणाची व्यवस्था केलेल्या अशा योग्य जागामध्ये यथोचितरित्या ठेवील.

(ग) लायसन्सधारक, अशा जागांतून येणाऱ्या आवाजामुळे होणाऱ्या कोणत्याही उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील असे व्यवहार्य उपाय योजील. तो, असे कोणतेही काम, प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीखेरीज संध्याकाळचे ८.३० ते पहाटेच्या ५.३० या दरम्यान करवण्याची व्यवस्था करणार नाही.

३५. **चर्मशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या जागांच्या संबंधात जादा शर्ती.--** चर्मशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या जागांच्या संबंधात ज्याला लायसन्स मंजूर करण्यात आले आहे, असा लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तीखेरीज पुढीलजादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, प्रत्येक चर्मशोधन कुंडासाठी चांगल्या घट्ट बसणाऱ्या झाकणाची तरतूद करील आणि असे झाकण कातडी प्रत्यक्षपणे त्या कुडात भिजत ठेवली असेल त्या वेळेखेरीज इतर सर्व वेळी त्या कुंडावर नीट घट्ट बसेल अशा रीतीने ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, चर्मशोधनाच्या प्रत्येक कुंडातून काढलेली सर्व घाण, रस्त्यात त्यापासून उद्‌भवणाऱ्या दुर्गंधीविरुद्ध आवश्यक ती सावधगिरी घेऊन, तात्काळ नगरपालिकेच्या मैला किंवा कचरा आगाराच्या बंद पात्रात टाकण्याची व्यवस्था करील.

(क) लायसन्सधारक हा, सुकत टाकलेली सर्व कातडी त्यापासून निघणाऱ्या दुर्गंधीस प्रतिबंध व्हावा म्हणून सूर्यास्त ते सूर्योदय या वेळात गवत, गवताच्या काड्या किंवा यांसारख्या इतर साहित्याने आच्छादून टाकण्याची व्यवस्था करील.

(ड) कोणताही लायसन्सधारक , कोणतीही कमावलेली कातडी, किमान एका बाजूने खुली असेल आणि जी किमान १.८३ मीटर उंच आणि खुल्या बाजूपासून किमान ३.०५ मीटर अंतरावर असेल अशा हवाबंद भिंतीने वेढलेली असेल आणि मध्ये कोणतेही बांधकाम नसेल अशा छपरीखेरीज अन्यत्र ठेवणार नाही.

३८. **रंगद्रव्ये निर्माण करण्यासाठा किंवा तयार करण्यासाठी वापरण्यात यावयाच्या जागांच्या संबंधात जादा शर्ती.--** रंगद्रव्ये निर्माण करण्यासाठा किंवा तयार करण्यासाठी वापरण्यात यावयाच्या जागांच्या संबंधात ज्याला लायसन्स मंजूर करण्यात आले आहे, असा लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढीलजादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागांत आणण्यात येतील आणि तात्काळ वापरासाठी ज्यांची आवश्यकता नसेल, अशा सर्व वस्तू, त्यांपासून अपायकारक किंवा अपकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने व अशा जागी ठेवण्याची व्यवस्था करील.

(ब) लायसन्सधारक हा, कोणत्याही प्रक्रियेत ज्या वस्तूंवर प्रक्रिया करण्यात असेल त्या वस्तूंपासून किंवा उक्त जागेवरील कोणतेही पिंप, टाकी, कुंड, कढई, किंवा इतर पात्रे यांमध्ये ठेवलेल्या पदार्थांपासून निघणारी सर्व प्रकारची वाफ निरुपद्रवी करण्यासाठी सर्वांत जास्त व्यवहारी साधनांचा वापर करील.

(क) लायसन्सधारक हा, कामाच्या प्रत्येक दिवसअखेर उक्त जागा संपूर्णपणे स्वच्छ करवण्याची व्यवस्था करील.

(ड) लायसन्सधारक हा, उक्त जागांतील प्रत्येक तळजमीन किंवा फरसबंदी सर्व वेळी सुस्थितीत व दुरुस्त अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजे, त्यामुळे जमिनीवर किंवा फरशीवर पडणारी किंवा तेथे रचून ठेवण्यात येणारी कोणतीही द्रवरुप घाण किंवा टाकाऊ पदार्थ किंवा कोणताही अपायकारक किंवा अपकारक पदार्थ जमिनीत शोषला जाण्यास प्रतिबंध होईल.

(इ) लायसन्सधारक हा, उक्त जागांमधील सुकविण्याची जागा व जमिनीचा सर्व पृष्ठभाग सपाट व खाचखळगे किंवा उंचसखलपणा विरहित ठेवण्यांची व्यवस्था करील. म्हणजे त्यावर कोणताही द्रवरुप टाकाऊ पदार्थ किंवा कचरा साचण्यास प्रतिबंध होईल.

(फ) लायसन्सधारक हा, उक्त जागेवर किंवा उक्त जागेच्या संबधात जलनिस्सारणाचे प्रत्येक साधन सर्व वेळ सुव्यवस्थित व कार्यक्षम अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील.

(ग) लायसन्सधारक हा, जो उक्त जागेच्या कोणत्याही भागात पडला किंवा साठविण्यात आला असेल असा सर्व केरकचरा किंवा इतर पदार्थ एकत्र करुन तो, प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने योग्य अशा पात्रात किंवा जागांत ठेवण्याची व्यवस्था

**सोन्याचा मुलामा देण्यासाठी किंवा विद्युतविलेपनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात जादा शर्ती.--** (१) सोन्याचा मुलामा देण्यासाठी किंवा विद्युतविलेपनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात ज्याला लायसन्स मंजूर करण्यात आले आहे तो लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक हा, अशा जागा आवश्यक असेल तितके वेळा व प्रत्येक चोवीस तासांतून निदान दोनदा पूर्णपणे स्वच्छ करवण्याची व्यवस्था करील आणि कोणतीही घाण किंवा कचरा साचू देण्यास प्रतिबंध करील.

(ब) लायसन्सधारक हा, जो अशा जागेच्या कोणत्याही भागात पडला किंवा साठविण्यात आला असेल असा सर्व केरकचरा किंवा इतर पदार्थ एकत्र करुन तो, प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने योग्य अशा हवाबंद व ज्यामध्ये शोषण होणार नाही

अशा आच्छादित पात्रात ठेवण्याची व्यवस्था करील, तो प्रत्येक चोवीस तासांतून निदान दोनदा असा केरकचरा अशा जागांतून काढून प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील.

(क) लायसन्सधारक हा, अशा जागांत किंवा अशा जागांच्या संबंधात वायुवीजनाच्या साधनाची तरतूद करील व असे प्रत्येक साधन, सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील. अशा जागेत निर्माण झालेले किंवा उत्पन्न झालेले सर्व वायू, वाफ, धूर, धुरळा किंवा इतर अशुद्ध द्रव्ये बाहेर निघून जातील.

(ड) लायसन्सधारक हा, धंद्याच्या प्रक्रियेत ज्या वस्तूवर प्रक्रिया करण्यात येत असेल, त्या वस्तूपासून किंवा अशा जागांतील कोणत्याही पात्रात ठेवलेल्या पदार्थापासून किंवा धंद्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही साधनातून बाहेर पडणारे सर्व प्रकारचे वायू, वाफ, धूर, धुरळा किंवा इतर अशुद्ध पदार्थ निरुपद्रवी करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व साधनांची व उपयंत्रांची तरतूद करील व ती सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील.

(इ) लायसन्सधारक हा, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात जलनिस्सारणाच्या साधनांची तरतूद करील व असे प्रत्येक साधन व सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(फ) लायसन्सधारक हा,सर्व वेळ धुरळा, घाण, वायू, वाफ, धूर किंवा इतर अशुद्ध पदार्थ श्वसनाद्वारे आत जाण्यास, प्रतिबंध करण्यासाठी तसेच तेथे कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस इजा पोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस होणारा उपद्रव किंवा त्रास यास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करण्याच्या किंवा तो कमीत कमी करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत अधिकारी वेळोवेळी फर्मावील अशी सर्व साधने व उपयंत्रे यांचा वापर करील व ती अशा जागेत सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(२) अशा कोणत्याही जागेचा द्वारमार्ग कोणत्याही रहदारीच्या मार्गावर किंवा सार्वजनिक ठिकामामध्ये किंवा त्यावर उघडणार नाही.

३८. **यंत्रमागासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात अतिरिक्त शर्ती.--** यंत्रमागासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या संबंधात ज्याला लायसन्स मंजूर करण्यात आले आहे असा लायसन्सधारक, उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढीलजादा शर्तींचे पालन करील :-

(१) यंत्रमाग चालविण्यासाठी वापरण्यात येणारी प्रत्येक जागा ही, चिरेबंदी कामाची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून मान्य करण्यात येईल अशा इतर टिकाऊ साहित्याची बांधण्यात येईल व त्याचा कोणताही भाग ज्वालाग्राही साहित्याने बांधण्यात येणार नाही.

(२) लायसन्सधारक,अशा जागेच्या प्रत्येक भागाचा तळ फरसबंदी करील किंवा अन्य प्रकारे अभेद्य करील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याने समाधान होईल अशा प्रकारे तेथे जलनिस्सारणाची व्यवस्था करील आणि अशी फरसबंदी सर्व वेळ सुस्थितीत व दुरुस्त केलेली ठेवील.

(३) लायसन्सधारक, अशा यंत्रमागापासून निघणाऱ्या आवाजामुळे होणाऱ्या कोणत्याही उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील असे व्यवहार्य उपाय योजील. रात्री १० ते पहाटे ५.३० या दरम्यान कोणताही यंत्रमाग चालवण्यात येणार नाही.

(४) लायसन्सधारक हा, ज्यामुळे आग लागण्याची शक्यता असेल किंवा अन्य प्रकारे लोकांची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता असेल असे कोणतेही हयगयीचे कृत्य अशा जागेत करणार नाही किंवा करण्याची परवानगी देणार नाही.

(५) लायसन्सधारक हा, अशा जागेमध्ये कामावर नेमलेल्या कोणत्याही श्रमिकास इजा पोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस होणारा कोणताही उपद्रव किंवा त्रास यास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करण्याच्या किंवा तो कमीत कमी करण्याच्या प्रयोजनासाठी अशा जागेवर प्राधिकृत अधिकारी, वेळोवेळी फर्मावील अशां सर्व साधने व उपयंत्रे अंगीकृत करील व ती सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(६) लायसन्सधारक हा, ,अशा जागेच्या कोणत्याही भागात पडला असेल किंवा ठेवला असेल असा सर्व केरकचरा किंवा इतर पदार्थ एकत्र करुन तो, प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा योग्य हवाबंद व ज्यामध्ये शोषण होणार नाही. अशा आच्छादित पात्रात ठेवण्याची व्यवस्था करील, तो असा सर्व केरकचरा अशा जागेतून प्रत्येक चोवीस तासांत निदान दोनदा हलवण्याची व प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील.

३९. **विड्या तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत जादा शर्ती.--** (१) विड्या तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत ज्यास लायसन्स देण्यात आले आहे असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मे विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज, पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) ---

(एक) जागेचे बांधकाम दगड-विटांनी किंवा प्राधिकृत अधिकारी मान्य करील अशा इतर टिकाऊ साहित्याने केलेले असल्याशिवाय ; व

(दोन) अशा जागेच्या प्रत्येक भागाचे बांधकाम ज्वालाग्राही नसलेल्या साहित्याने केलेले असल्याशिवाय ;

कोणताही लायसन्सधारक विड्यांच्या निर्मितीसाठी किंवा विड्या तयार करण्यासाठी कोणत्याही जागेचा वापर करणार नाही किंवा कोणत्याही जागेचा वापर करण्यास परवानगी देणार नाही ;

(ब) लायसन्सधारक ---

(एक) विड्यांची पाने ठेवण्यासाठी ;

(दोन) विड्यांच्या निर्मितीसाठी किंवा त्या तयार करण्यासाठी ; व

(तीन) विड्या ठेवण्यासाठी ;

वेगळ्या जागेची तरतूद करील.

प्रत्येक प्रकरणात तरतूद केलेली जागा ही,प्राधिकृत अधिकाऱ्यास जी योग्य व पुरेशी वाटेल अशी असेल ;

(क) लायसन्सधारक ---

(एक) अशा जागेच्या तळजमीनीचा प्रत्येक भाग, फरसबंदी किंवा अन्य प्रकारे अभेद्य करील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा प्रकारे तेथे जलनिस्सारणाची व्यवस्था करील व अशी तळजमीन व जलनिस्सारणाची व्यवस्था, सर्व वेळी सुस्थितीत व दुरुस्त केलेली ठेवील.

(दोन) अशा जागेवरील किंवा अशा जागेच्या संबंधात असलेली जलनिस्सारणाची प्रत्येक व्यवस्था किंवा साधने, सर्व वेळी, सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(तीन) सर्व केरकचरा टाकण्यासाठी योग्य झाकणे असलेल्या पात्रांची व्यवस्था करील व अशी पात्रे प्रत्येक चोवीस तासांत निदान दोनदा रिकामी करीर व पूर्णपणे स्वच्छ करील.

(चार) अशा जागेत किंवा जागेवर कोणताही विस्तव पेटवण्याची व्यवस्था करणार नाही किंवा पेटवलेला खपवून घेणार नाही. अशा जागेवर कोणत्याही आवरण नसलेल्या ज्यातीचा वापर करणार नाही किंवा केलेला खपवून घेणार नाही, तसेच तीमध्ये कोणत्याही धूम्रपानास परवानगी देणार नाही ;

(पाच) अशा जागेत कोणत्याही ओंगळ, संक्रामक, सांसर्गिक किंवा घातक रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास धंदा चालू ठेवण्याचे बंद करील व अशी जागा, संक्रमण किंवा यथास्थिति संसर्ग यांपासून पूर्णपणे मुक्त होईपर्यंत धंदा पुन्हा चालविणार नाही.

(सहा) तो कुष्ठरोगी असेल किंवा त्यास खुली जखम असेल किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांकर्गिक रोग झाला असेल तर असा धंदा चालू ठेवणार नाही.

(सात) असा धंदा चालविण्यात त्यास सहाय्य करण्यासाठी किंवा अशा जागेच्या कोणत्याही भागात प्रवेश करण्यासाठी कोणत्याही कुष्ठरोग्यास किंवा खुली जखम झालेल्या किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या व्यक्तीस परवानगी देणार नाही.

(२) थुंकण्याच्या प्रयोजनासाठी ठेवली असतील अशी पात्रे अथवा ठिकाणे यांखेरीज अशा जागेत किंवा जागेवर कोणतीही व्यक्ती थुंकणार नाही.

४०. **केश कर्तनालय किंवा न्हाव्याचे दुकान किंवा हमामखाना म्हणून वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत जादा शर्ती.**-- केश कर्तनालय किंवा न्हाव्याचे दुकान किंवा हमामखाना म्हणून वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत ज्यास लायसन्स देण्यात आले आहे असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढीलजादा शर्तींचे पालन करील :-

(अ) कोणताही लायसन्सधारक केश कर्तनालय किंवा न्हाव्याचे दुकान किंवा हमामखाना म्हणून कोणत्याही जागेचा वापर,

(एक) त्या जागेचे बांधकाम दगड-विटांनी किंवा लायसन्स देणारा प्राधिकारी मान्य करील अशा इतर टिकाऊ साहित्याने केलेले असल्याशिवाय ; व

(दोन) जागेच्या प्रत्येक भागाचे बांधकाम ज्वालाग्राही नसलेल्या साहित्याने केलेले असल्याशिवाय करणार नाही;

(ब) लायसन्सधारक, अशा जागेच्या तळजमीनीचा प्रत्येक भाग, फरसबंदी किंवा अन्य प्रकारे अभेद्य करील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा प्रकारे तेथे जलनिस्सारणाची व्यवस्था करील व अशी तळजमीन सर्व वेळ सुस्थितीत व दुरुस्त ठेवील ;

(क) लायसन्सधारक, अशा लायसन्स दिलेल्या जागेवर किंवा त्या जागेच्या संबंधात जलनिस्सारणाच्या योग्य साधनांची तरतूद करील व व ती साधने सर्ववेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील

(ड) लायसन्सधारक, सर्व केरकचरा टाकण्यासाठी अशा लायसन्स दिलेल्या जागेत योग्य ठिकाणी योग्य झाकणे असलेल्या पात्रांची तरतूद करील व अशी पात्रे प्रत्येक चोवीस तासांत निदान एकदा रिकामी करवण्याची व्यवस्था करील.

(इ) लायसन्सधारक, तळजमीन (अ) कामाच्या प्रारंभापूर्वी, (ब) दुपारी, व (क) प्रत्येक दिवसाचे काम संपल्यानंतर अशी दिवसातून किमान तीन वेळा झाडून घेण्याची व्यवस्था करील.

(फ) लायसन्सधारक, अशा लायसन्स दिलेल्या जागेत पुरेशा पाणीपुरवठ्याची तरतूद करील ;

(ग) लायसन्सधारक,

(एक) सर्व टेबलांचा पृष्ठभाग गुळगुळीत व सपाट असून तो रोज साफ करण्यात येतात व त्याव केस साचू दिले जात नाहीत ;

(दोन) कोणत्याही कुष्ठरोग्यास किंवा खुली जखम झालेल्या किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या व्यक्तीस न्हाव्याचा धंदा चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत नाही किंवा अशा धंद्यात किंवा असा धंदा चालविण्यात सहाय्य करण्यास नोकरीवर ठेवण्यात येत नाही ; हे पाहण्यासाठी जबाबदार असेल.

(ह) अशा जागेमध्ये कामावर लावलेला प्रत्येक न्हावी किंवा कारागीर, प्रत्येक ग्राहकाचे काम करण्यापूर्वी व झाल्यानंतर, आपल्या हातांना साबण लावून ते पाण्याने नीट धुवील ; ग्राहकाचे काम करुन झाल्यानंतर न्हावी किंवा कारागीर आपले हात साबणाने व पाण्याने धुण्याव्यतिरिक्त, प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा जंतूनाशकांत दोन मिनिटांपेक्षा कमी नसेल इतक्या वेळेपर्यंत बुडवून ठेवील ;

(आय) ग्राहकासाठी वापरण्यात आलेले वस्तरे व इतर उपकरणे अशा वापरानंतर लगेच पूर्णत: साफ करुन व एका मिनिटासाठी किंवा , प्राधिकृत अधिकाऱ्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशा अधिक वेळेपर्यंत उकळत्या पाण्यात किंवा त्याच्याकडून मान्य करण्यात येईल अशा जंतूनाशकांत जंतुविरहित करुन सुरक्षित करण्यात येतील ;

(जे) दाढीच्या पाण्याची प्रत्येक वाटी व ब्रश, ते वापरुन झाल्याच्या प्रत्येक वेळी गरम पाण्यात नीट विसळून धुण्यात येईल ;

(के) प्रत्येक दिवसाच्या शेवटी, अशा जागेमध्ये वापरण्यात आलेला ब्रश, टॉवेल व कंगवा उकळत्या पाण्यात बुडवून निर्जंतुक करण्यात येईल किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा जंतूनाशकांत बुडवून जंतुविरहित करण्यात येईल

(एल) रक्त प्रवाह थांबविण्यासाठी वापरण्यात येणारी तुरटी किंवा कोणताही तसाच पदार्थ केवळ भुकटीच्या रुपात किंवा द्रवरुपातच वापरण्यात येईल.

(एम) थुंकण्याच्या प्रयोजनार्थ ठेवली असतील अशी पात्रे किंवा ठिकाणे यांखेरीज अशा जागेत कोणतीही व्यक्ती थुंकणार नाही ;

(एन) अशा जागेत, कोणत्याही कुष्ठरोग्यास व कोणत्याही दृश्य चर्मरोग, खुली जखम किंवा कोणत्याही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या व्यक्तीस प्रवेश दिला जाणार नाही किंवा त्याच्या केशकर्तनाचे काम केले जाणार नाही.

(ओ) केशकर्तनालयात किंवा हमामखान्यात न्हावी म्हणून नोकरीवर असेलेली प्रत्येक व्यक्ती, ती रोगमुक्त आहे किंवा कोणत्याही प्रकरच्या संक्रमणापासून मुक्त असून अशा धंद्यात नोकरी करण्यास योग्य आहे अशा अर्थाचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी मिळवील. असे प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याकडून विनामूल्य देण्यात येईल.

४१. **धोबीघाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात जादा शर्ती :--** धोबीघाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात ज्यास लायसन्स लायसन्स देण्यात आले आहे असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढीलजादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक मळलेले व धुतलेले कपडे अशा जागेतील वेगळ्या खोल्यांमध्ये किंवा जागांमध्ये ठेवील ;

(ब) लायसन्सधारक, पाणीपुरवठ्याच्या कोणत्याही साधनामध्ये मळलेले कपडे धुण्यास परवानगी देणार नाही, त्यामधून पाणी काढून त्याचा वापर असे कपडे धुण्यासाठी करील ;

(क) लायसन्सधारक, अशा जागेत पुरेशा व चांगल्या पाणीपुरवठ्याची तरतूद करील ;

(ड) लायसन्सधारक, अशा जागेतील किंवा तिच्यावरील किंवा अशा जागेशी संबंधीत असलेले जलनिस्सारणाचे प्रत्येक साधन सर्व वेळ सुव्यवस्थित व कार्यक्षम अवस्थेत ठेवण्याची व्यवस्था करील.

(ई) लायसन्सधारक, प्रत्येक इमारतीतील, किंवा अशा जागेतील धुण्यासाठी असणाऱ्या चबुतऱ्यावरील किंवा स्टँडवरील जमीन अभेद्य करवण्याची व्यवस्था करील.

(फ) कोणताही लायसन्सधारक, घातक रोग असेल अशा घरामधून जाणूनबुजून मळलेले कपडे घेणार नाही, तसेच अशा घराचा मालक किंवा कोणत्याही भोगवटादार, प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने उक्त कपडे जंतुविरहित करीपर्यंत ते जाणूनबुजून त्यास धुण्यासाठी देणार नाही.

(ग) कोणताही लायसन्सधारक, कोणत्याही कुष्ठरोग्यास किंवा कोणताही उघडी जखम झालेल्या किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस धंदा चालविण्यस किंवा अशा जागेतील अशा धंद्यात अशा व्यक्तीस कामावर ठेवण्यास परवानगी देणार नाही.

(ह) लायसन्सधारक, आपल्या जागेत कोणत्याही घातक रोगाचा प्रदुर्भाव झाला असल्याचे आढळून आल्यावर धंदा चालू ठेवण्याचे बंद करील व जागा संक्रमणमुक्त झाल्याचे प्राधिकृत अधिकाऱ्याकडून घोषित करण्यात येईपर्यंत आपला धंदा चालू करणार नाही ;

(आय) लायसन्सधारक, त्याच्या निदर्शनास येणारी घातक रोगाची सर्व प्रकरणे प्राधिकृत अधिकाऱ्यास कळवील.

(ज) लायसन्सधारक, ह्या त्याच्या जागेत कोणत्याही घातक रोगाचा प्रदुर्भाव झाला असल्याचे आढळून आल्यावर सर्व कपडे त्यांच्या मालकांना परत करण्यास प्राधिकृत अधिकाऱ्याकडून लेखी परवानगी मिळेपर्यंत आपल्या ताब्यात ठेवून घेईल.

४२. **पीठ किंवा मसाले तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात जादा शर्ती :--** पीठ किंवा मसाले तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात ज्यास लायसन्स लायसन्स देण्यात आले आहे असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढीलजादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक, जागेचे बांधकाम दगड-विटांनी केलेले असल्याशिवाय व तिच्या प्रत्येक भागाचे बांधकाम ज्वालाग्राही नसलेल्या साहित्याने केलेले असल्याशिवाय अशा कोणत्याही जागेचा वापर करणार नाही ;

(ब) लायसन्सधारक, अशा जागेत आणलेले व त्याच्या धंद्यात तात्काळ वापरासाठी आवश्यक नसलेले सर्व सामान, त्यापासून अपायकारक किंवा अपकारक दुर्गंध बाहेर पडण्यास प्रतिबंध होईल अशारीतीने व अशा स्थितीत ठेवील ;

(क) लायसन्सधारक. अशा जागेची तळजमीन, फरसबंदी किंवा अन्य प्रकारे अभेद्य करील व प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा प्रकारे तेथे जलनिस्सारणाची व्यवस्था करील व अशी तळजमीन सर्व वेळ सुस्थितीत व दुरुस्त ठेवील.

(ड) लायसन्सधारक, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात योग्य त्या जलनिस्सारणाविषयक साधनांची तरतूद करील व ती साधने सर्ववेळी सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(ई) लायसन्सधारक हा, सर्व केरकचरा साठवण्यासाठी अशा जागेत योग्य त्या शोषक नसणाऱ्या, झाकण असलेल्या हवाबंद पात्रांची तरतूद करील व ती पात्रे कचरापेटीत आवश्यक असेल तिक्या वेळा व प्रत्येक चोवीस तासांत निदान दोनदा रिकामी करवण्याची व्यवस्था करील ;

(फ) लायसन्सधारक, धंद्यात वापरण्यात येणारी सर्व तबके व इतर पात्रे, सर्ववेळी, स्वच्छ व आरोग्यपोषक स्थितीत व सुस्थितीत आणि दुरुस्त ठेवील.

लायसन्सधारक हा, ताबडतोब वापरण्यासाठी आवश्यक नसलेले सर्व पीठ व इतर वस्तू पिशव्यांमध्ये ठेवील व त्या पिशव्या जमिनीवर न ठेवता बाकांवर, मेजांवर किंवा अभेद्य वस्तूंपासून तयार केलेल्या उंच अशा चबुतऱ्यावर ठेवील ;

(ह) लायसन्सधारक हा, अशा जागेत कामावर नेमलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी स्वच्छ ॲप्रनची तरतूद करील :

(आय) लायसन्सधारक हा, अशा जागेत तयार केलेले सर्व पीठ, मसाले व इतर वस्तू, यांचे धुळीपासून व माशांपासून पूर्णतः संरक्षण होईल अशा रीतीने आवेष्टित करुन ठेवील ;

(जे) लायसन्सधारक हा, त्याच्या किंवा अशा जागेत कामावर नेमलेल्या किंवा धंद्यात त्यास सहाय्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या घरात कोणत्याही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आल्यावर असा धंदा चालू ठेवणे तात्पुरते बंद करील व प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय तो तयार केलेल्या किंवा ठेवलेल्या कोणत्याही वस्तूची विक्री करणार नाही किंवा आपला धंदा पुन्हा चालू करणार नाही ;

(के) कोणताही लायसन्सधारक, अशा कोणत्याही जागेत कोणताही कुत्रा किंवा गुरे यांना प्रवेश करु देणार नाही ;

) लायसन्सधारक, दांडे, कप्प्या यांसाठी योग्या त्या संरक्षक साधनांची व सुरक्षित अंतराची तरतूद करील व दोन्ही गोष्टी अपघात ...च्या दृष्टीने असतील ;

(म) लायसन्सधारक, पैसे (आकार) दिल्यावर धान्य दळण्यात येते अशा पिठाच्या गिरणीच्या बाबतीत, प्रमाण तराजू व प्रमाण वजने ठेवील व दळण्यापूर्वी धान्याचे व दळल्यानंतर पिठाचे वजन करील व त्यावेळी उक्त विषयाच्या संबंधात अंमलात असलेल्या अधिनियमात विहित करण्यात आले असेल अशा परिमाणांनुसार दळणातील कमतरता किंवा अपव्यय सोडून पीठ पूर्ण परिमाणात ग्राहकास परत देईल.

(न) लायसन्सधारक, धंदा चालू ठेवण्याच्या दृष्टीने, थुंकण्याच्या प्रयोजनार्थ ठेवलेली पात्रे किंवा जागा यांमध्ये असेल त्याखेरीज, अशा जागेत किंवा जागेवर कोणत्याही व्यक्तीस थुंकू देणार नाही. कोणताही लायसन्सधारक, कुष्ठ रोग्यास किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कामावर नेमणार नाही किंवा असा धंदा चालविण्यास अशा व्यक्तिचे सहाय्य घेणार नाही ;

(ओ) पिठाच्या गिरणीच्या इंजिनास, कोणतेही असल्यास, त्याची घरघर कमी होण्यासाठी कार्यक्षम नि:स्वनक (सायलेन्सर) बसवण्यात येईल.

४३ **साळी उकळण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत जादा शर्ती.--** (१) साळी उकळण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात ज्यास लायसन्स देण्यात आले असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींखेरीज पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक, अशा जागेत पुरेशा पाणीपुरवठ्याची तरतूद करील व अशी जागा दर चोवीस तासांतून निदान एकदा किंवा आवश्यक असेल तर त्यापेक्षा अधिक वेळा पूर्णपणे स्वच्छ करवण्याची व्यवस्था करील व तीमध्ये कोणतीही घाण किंवा केरकचरा साचू देणार नाही ;

(ब) लायसन्सधारक, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात जलनिस्सारणाच्या, योग्य साधनांची तरतूद करील व ती साधने सर्वकाळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(क) लायसन्सधारक, साळी भिजवण्यासाठी योग्य अशी योग्य त्या पात्रांची तरतूद करील. तो, अशा प्रत्येक जागेची तळजमीन फरसबंदी किंवा अन्य प्रकारे अभेद्य करील व प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा प्रकारे तेथे जलनिस्सारणाची व्यवस्था करील. अशी तळजमीन, सर्ववेळ सुस्थितीत व दुरुस्त केलेली ठेवण्यात येईल.

(ड) लायसन्सधारक, साळी सुकविण्यासाठी चबुतरा किंवा फरशी, लादी किंवा सिमेंट यांनी तयार केलेल्या इतर योग्य जागेची तरतूद करील व कोणतीही व्यक्ती, साळी सुकवण्याच्या प्रयोजनार्थ तरतूद केलेल्या अशा चबुतऱ्याशिवाय किंवा इतर जागेशिवाय, इतरत्र साळी सुकवणार नाही ;

(इ) कोणताही लायसन्सधारक, साळी भिजवण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याने मनाई केलेल्या कोणत्याही ठिकाणच्या पाण्याचा वापर करणार नाही किंवा असा वापर करण्यास परवानगी देणार नाही ;

(फ) कोणताही लायसन्सधारक, साळी भिजवण्याच्या प्रयोजनार्थ आधी वापरलेल्या पाण्यात साळी भिजवणार नाही किंवा साळी भिजवण्यास परवानगी देणार नाही, तसेच तो त्या जागेतील कोणत्याही पात्रात असे वापरलेले पाणी राहू देणार नाही व प्राधिकृत अधिकारी निदेश देईल अशा रीतीने त्या पाण्याची विल्हेवाट लावील ;

(ग) लायसन्सधारक, सर्व केरकचरा टाकण्यासाठी त्या जागेत योग्य त्या शोषक नसलेल्या पात्रांची तरतूद करील व तो प्राधिकृत अधिकारी निदेश देईल अशा रीतीने प्रत्येक चोवीस तासांत दोनपेक्षा कमी नसेल इतक्या वेळा, अशा केरकचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील. तसेच कोणताही लायसन्सधारक, प्राधिकृत अधिकाऱ्याने तशी लेखी परवानगी दिली नसेल तर, असा केरकचरा कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा कचरा-पेटीत टाकणार नाही ;

(ह) लायसन्सधारक,त्याच्या किंवा अशा जागेत कामावर नेमलेल्या किंवा धंद्यात त्यास सहाय्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या घरात कुष्ठरोग किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झाल्याचे आढळून आल्यावर असा धंदा चालू ठेवणे तात्पुरते बंद ठेवील व प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय अशा जागेत ठेवलेल्या किंवा तयार केलेल्या कोणत्याही साळीची किंवा तांदळाची विक्री करणार नाही किंवा आपला धंदा पुन्हा चालू करणार नाही ;

(आय) लायसन्सधारक, ठेवण्यात आलेला किंवा विक्रीसाठी मांडण्यात आलेला सर्व तांदूळ किंवा साळी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा झाकण असलेल्या पात्रांत किंवा जागी ठेवील.;

(२) कोणताही लायसन्सधारक, धंदा चालविण्यात त्यास सहाय्य करण्यासाठी कुष्ठरोगी असणाऱ्या किंवा कोणताही ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कामावर नेमणार नाही किंवा अशा व्यक्तीस कामावर नेमण्यास परवानगी देणार नाही.

(३) थुंकण्याच्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या पात्रांशिवाय किंवा ठिकाणांशिवाय अशा जागेत किंवा जागेवर कोणतीही व्यक्ती थुंकणार नाही.

४४. **भात गिरणीसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत जादा शर्ती.--** (१) भात गिरणीसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात ज्यास लायसन्स देण्यात आले असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण शर्तींशिवाय, पुढील शर्तींचे पालन करील :-

(अ) लायसन्सधारक, अशा जागेच्या कोणत्याही भागात पडला किंवा ठेवला असेल असा सर्व केरकचरा किंवा इतर पदार्थ एकत्र करुन प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा योग्य त्या शोषक नसणाऱ्या झाकण असलेल्या हवाबंद पात्रात ठेवण्याची व्यवस्था करील व तो असा सर्व कचरा अशा जागेतून प्रत्येक चोवीस तासांत निदान दोनदा हलवण्याची व प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील ;

(ब) लायसन्सधारक, उक्त जागेवर आणलेले व त्याच्या धंद्यात तात्काळ वापरासाठी आवश्यक नसलेले असे सर्व सामान, त्यापासून कोणताही उपद्रव होणार नाही अशा रीतीने व अशा स्थितीत ठेवण्याची व्यवस्था करील ;

(क) लायसन्सधारक, अशा जागेवर किंवा अशा जागेच्या संबंधात जलनिस्सारणाच्या योग्य साधनांची तरतूद करील व ती साधने सर्ववेळी सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

(ड) लायसन्सधारक, अशा जागेची तळजमीन फरसबंदी किंवा अन्य प्रकारे अभेद्य करील आणि प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा प्रकारे तेथे जलनिस्सारणाची व्यवस्था करील व अशी तळजमीन सर्व वेळी सुस्थितीत व दुरुस्त केलेली ठेवील;

(ई) कोणताही लायसन्सधारक, जागेचे बांधकाम दगड-विटांनी केलेले असल्याशिवाय व तिचा प्रत्येक भाग ज्वालाग्राही नसलेल्या साहित्याने बनवलेला असल्याशिवाय कोणत्याही जागेचा भात गिरणी म्हणून वापर करणार नाही ;

(फ) लायसन्सधारक, हा अशा जागेमध्ये कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तिस इजा पोचण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा आसपासच्या भागास अथवा जनतेस कोणताही उपद्रव किंवा त्रास यांस प्रतिबंध करण्याच्या, त्याचे उपशमन करण्याच्या किंवा तो कमीत कमी करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा आग लागल्यास आगीशी मुकाबला करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत अधिकारी, वेळोवेळी फर्मावील अशी सर्व साधने व उपयंत्रे अंगीकृत करील व ती अशा जागेत सर्व वेळ सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील ;

(ग) कोणताही लायसन्सधारक हा, अशा जागेत किंवा अशा जागेच्या कोणत्याही भागात कायम किंवा तात्पुरत्या मुदतीसाठी कोणताही कुत्रा पाळणार नाही किंवा कोणताही पशू अथवा इतर जनावर बांधून ठेवणार नाही ;

(आय) कोणताही लायसन्सधारक, भरडण्याची प्रत्येक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, अशा जागेवर दोन आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी तूस साचू देणार नाही .

(२) कोणताही लायसन्सधारक, असा धंदा चालवण्यात त्यास सहाय्य करण्यासाठी, उघडी जखम झालेल्या किंवा ओंगळ संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कामावर नेमणार नाही किंवा कामावर नेमण्यास परवानगी देणार नाही किंवा एखाद्या कुष्टरोग्यास किंवा अशा कोणत्याही व्यक्तीस अशा जागेच्या कोणत्याही भागात किंवा भागावर प्रवेश करु देणार नाही किंवा भटकू देणार नाही.

४५. ***लाह्या, कुरमुरे तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या बाबतीत जादा शर्ती.***-- *लाह्या, कुरमुरे तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संबंधात ज्यास लायसन्स देण्यात आले असा लायसन्सधारक उप-विधी ३ ते २६ (दोन्ही धरुन)* यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींशिवाय, पुढील जादा शर्तींचे पालन करील :-

(१) भट्टीच्या जागेच्या अगदी वरचा भाग आणि लायसन्स दिलेल्या जागेच्या छताच्या जवळचा भाग यांमधील अंतर हे कमीत कमी ... असेल.

... लायसन्स दिलेल्या जागेचे छत, भिंती, दारे, खिडक्या व तळजमीन यांचा भट्टीच्या जागेजवळील संपूर्ण पृष्ठभाग लोखंड, वीट, फरशी, प्लास्टर किंवा इतर ज्वालाग्राही नसलेल्या पदार्थांचा असेल व तो लाकडाचा असणार नाही.

(३) (अ) लायसन्सधारक, अशा भट्टी सभोवताली ६ मीटरपेक्षा कमी नसेल, अशी खुली जागा ठेवील ;

(ब) लायसन्सधारक, लाह्या, कुरमुरे तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक जागेत धूर जाण्याच्या योग्य धूम्रमार्गाची तरतूद करील व कोणत्याही धुराड्याच्या किंवा अशा जागेची संबंधित असलेल्या इतर ठिकाणाच्या धुरामुळे होणाऱ्या सर्व उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य करण्यात येईल अशी सर्व व्यवहार्य साधने अंगीकृत करील.

(क) लायसन्सधारक, लाह्या, कुरमुरे तयार करण्यासाठी आवश्यक असलेला कोणताही दगडी कोळसा, कोक किंवा लोणारी कोळसा ठेवण्यासाठी धातूच्या पेटाऱ्याची किंवा आतून धातूचा पत्रा लावलेल्या लाकडी पेटीची तरतूद करील व तिचा वापर करील. असा पेटारा किंवा अशी पेटी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून मान्य केलेल्या जागी ठेवण्यात येईल.

(ड) लायसन्सधारक, अशा जागेच्या प्रत्येक भागाची तळजमीन, फरसबंदी किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा अन्य प्रकारे अभेद्य करील. अशी तळजमीन, सर्व वेळी, सुस्थितीत व दुरुस्त केलेली ठेवील ;

(इ) कोणताही लायसन्सधारक, ज्यामुळे आग लागण्याची शक्यता असेल किंवा अन्य प्रकारे लोकांची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता असेल असे कोणतेही हयगयीचे कृत्य अशा जागेत करणार नाही किंवा असे हयगयीचे कृत्या करण्यास परवानगी देणार नाही ;

(फ) कोणताही लायसन्सधारक, असा धंदा चालवण्यात त्यास सहाय्य करण्यासाठी, कोणताही संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कामावर नेमणार नाही ;

(ग) लायसन्सधारक, लायसन्स दिलेली जागा नेहमीच चांगल्या दुरुस्त स्थितीत व स्वच्छ आणि आरोग्य पोषक स्थितीत ठेवील.

४६. *शास्ती.*-- उप-विधी ३ च्या खंड (अ) अन्वये लायसन्स घेतल्याशिवाय विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागेचा वापर करणारी व्यक्ती, शास्तीच्या रुपाने, या उप-विधींसोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या दुप्पट दरांनी फी देण्यास जबाबदार असेल, अशी जादा फी ही, ज्यासाठी अशी व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा उप-विधींच्या उपबंधान्वये जबाबदार असेल अशा इतर कोणत्याही शास्तीव्यतिरिक्त किंवा दायित्वाव्यतिरिक्त वसुलीयोग्य असेल.

४७. या उप-विधींच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी नगरपालिका क्षेत्रात अंमलात असलेले कोणतेही नियम किंवा उप-विधी, त्यांच्या निरसनापूर्वी अंमलात असलेल्या अशा नियमान्वये किंवा उप-विधींअन्वये केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या बाबतीत असेल त्याशिवाय, निरसित होतील.

## अनुसूची

(उप-विधी ३)

(ज्यांसाठी लायसन्सशिवाय कोणत्याही जागेचा वापर करण्यात येणार नाही ती प्रयोजने व लायसन्स फी चा दर)

| अनुक्रमांक | जागेच्या वापराचे स्वरुप | लायसन्स फी चा वार्षिक दर | लायसन्स फी चा त्रैमासिक दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | रुपये | रुपये |
| १ | शिळे मांस, रक्त, हाडे किंवा चिंध्या उकळवणे किंवा त्यांचा साठा करणे यांसाठी | | |
| २ | माशांत मीठ घालणे, खारवणे, किंवा त्यांचा साठा करणे यांसाठी | | |
| ३ | चर्मशोधनासाठी | | |
| ४ | चामडे किंवा चामडी वस्तू तयार करण्यासाठी | | |
| ५ | रंगाईसाठी | | |
| ६ | चरबी किंवा गंधक वितळविण्यासाठी | | |
| ७ | लोकर किंवा केस धुण्यासाठी किंवा वाळविण्यासाठी | | |
| ८ | वीटा, मातीची भांडी किंवा चुना, लाद्या कोणत्याही प्रक्रियेने बनवण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी | | |
| ९ | साबण तयार करण्यासाठी | | |
| १० | तेल उकळण्यासाठी किंवा तेल काढण्यासाठी | | |
| ११ | साबुदाण्याचा कारखाना म्हणून | | |
| १२ | आसवनी म्हणून | | |
| १३ | तपकिरीचा कारखाना म्हणून | | |
| १४ | फटाक्याच्या निर्मितीसाठी | | |
| १५ | केश कर्तनालय किंवा न्हाव्याचे दुकान किंवा हमामखाना म्हणून | | |
| १६ | लाख किंवा लाखेच्या कांड्या यांच्या निर्मितीसाठी | | |
| १७ | लाद्यांच्या निर्मितीसाठी | | |
| १८ | कापूर तयार करण्यासाठी | | |

१९ चरबी निर्मितीसाठी

२० कॅटगट तयार करण्यासाठी

२१ मेणबत्या तयार करण्यासाठी

२२ शिरस तयार करण्यासाठी

२३ बारुद किंवा गन-कॉटन यांच्या निर्मितीसाठी

२४ आगपेट्या तयार करण्यासाठी

२५ नवसागर निर्मितीसाठी

२६ क्लोरेट मिक्श्चरच्या निर्मितीसाठी

२७ विस्फोटक पारद निर्मितीसाठी

२८ नायट्रो-ग्लिसरीनच्या निर्मितीसाठी

२९ नायट्रो कम्पाउन्डच्या निर्मितीसाठी

३० नायट्रो मिक्श्चरच्या निर्मितीसाठी

३१ गॅस निर्मितीसाठी

३२ सरकी काढण्यासाठी

३३ टाकाऊ कापसाच्या निर्मितीसाठी

३४ शिंगांच्या निर्मितीसाठी

३५ खुरांच्या निर्मितीसाठी

३६ अंबर (पिच) निर्मितीसाठी

३७ डांबर (टार) निर्मितीसाठी

३८ टर्पेंटाईन निर्मितीसाठी

३९ अंबाडी निर्मितीसाठी

४० सण निर्मितीसाठी

४१ काथ्या निर्मितीसाठी

४२ ताग निर्मितीसाठी

४३ राळ निर्मितीसाठी

४४ स्पिरीट निर्मितीसाठी

४५ रंगद्रव्य निर्मितीसाठी

४६ सोन्याचा मुलामा देणे, विद्युतविलेपन यांसाठी

४७ यंत्रमागासाठी

४८ विड्या तयार करण्यासाठी

४९ धोबीघाट म्हणून

५० पीठ किंवा मसाले तयार करण्यासाठी

५१ साळी उकळण्यासाठी

५२ भात गिरणी म्हणून

५३ लाह्या, कुरमुरे तयार करण्यासाठी

५४ ज्यापासून तीव्र वास किंवा दुर्गंधी येते किंवा ज्यामध्ये आगीचा धोका असेल व ज्याच्या वापरामुळे व स्थितीमुळे आसपास उपद्रव होत असेल किंवा उपद्रव होण्याची शक्यता असेल अशा इतर कोणत्याही प्रकारचे निर्माणागार किंवा धंद्याची जागा म्हणून.

स्पष्टीकरण:- बाब (५४) च्या प्रयोजनार्थ, उपद्रव यामध्ये, ज्यामुळे काजळी साठते अशा वातावरणातील कोणत्याही दूषितपणाचा किंवा कोणत्याही यांत्रिक आवाजाचा समावेश असेल.

नमुना

(उप-विधी ३ व ६)

.............................................................. साठी/म्हणून जागेचा वापर करण्यासाठी वार्षिक लायसन्सचा नमुना

.............................................................. नगरपालिका.

श्री. .............................................................. व खाली नावे दिलेले त्यांचे नोकर व एजंट यांना, ................................................ रुपये आगाऊ फी दिल्यावर, उप-विधीत विनिर्दिष्ट केलेल्या व मागील बाजूस मुद्रित केलेल्या शर्तींच्या व निर्बंधाच्या अधीन, ................................................ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी / तिमाहीसाठी .......... ................................................ मधील ................................................ वरील इमारत क्रमांक ...................... मध्ये .............................. साठी / म्हणून* जागेचा वापर करण्यासाठी याद्वारे लायसन्स देण्यात येत आहे. त्या जागेत कामावर नेमण्यात येणाऱ्या व्यक्तींची संख्या ........................ पेक्षा अधिक असणार नाही.

...धींच्या प्रती अवलोकनार्थ नगरपालिका कार्यालयात ठेवण्यात आलेल्या असून त्या त्या कार्यालयातून खरेदी करता येतील.

१. नाव .............................................................. नोकर व अभिकर्ते यांची नावे.

२. पत्ता..............................................................

१. नाव ..............................................................

२. पत्ता..............................................................

व त्याप्रमाणे

---

................................................ वर्षासाठी पावती क्रमांक ................., दिनांक .............................. अन्वये रुपये ................................................ मिळाले.

---

...असेल तर, नवीकरणासाठी अर्ज दिनांक ...............................२० पूर्वी करता येईल.

आयुक्त

मिरा - भाईंदर महानगरपालिका

---

*येथे जागेच्या वापराचे स्वरुप नमूद करावे.

आयुक्त

मिरा - भाईंदर महानगरपालिका

---

प्रकरण : ९९ प्रकरण :- ९९ ३०३

# मिरा-भाईंदर महानगरपालिका (कारखान्यांचे नियमन) नियम २०११

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ –**

(अ) या नियमांना, **"मिरा-भाईंदर महानगरपालिका (कारखान्यांचे नियमन) नियम २०११"** असे म्हणता येईल.

(ब) ते, शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन अंमलात येतील.

२. **व्याख्या :-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमामध्ये,-

**(क)** "अधिनियम " म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९(१९४९ चे ५९)

**(ख)** "महानगरपालिका" म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(ग)** "आयुक्त" म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ नुसार नेमणुक केलेला वा कलम ३९ नुसार आयुक्त म्हणुन कार्यकारी काम पाहणारा अधिकारी,

**(घ)** "प्राधिकृत अधिकारी" म्हणजे आयुक्ताने या उपविधींच्या अंमलबजावणीसाठी अधिकार प्रदान केलेला अधिकारी.

**(च)** "कारखाना" म्हणजे जेथे वाफ, विद्युत, पाणी शक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्तीचा वापर करण्याचे योजिले असेल असा, अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा आणि यामध्ये बेकरीचा समावेश होतो.

**(छ)** "लेखी परवानगी" म्हणजे अधिनियमाच्या कलम ३१३ व ३८६ (१) प्रमाणे या उपविधी खाली आयुक्ताने दिलेली परवानगी.

**(ज)** "नमुना" म्हणजे या उपविधी सोबत जोडलेला नमुना,

**(झ)** "परवानगी शुल्क" म्हणजे आयुक्ताने दिलेल्या प्रत्येक लायसन्ससाठी किंवा लेखी परवानगीसाठी अधिनियमाच्या कलम ३८६(२) प्रमाणे महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क,

**(ट)** "लेखी परवानगीधारक" (ज्याला येथे यापुढे परवानाधारक असे संबोधले जाईल) म्हणजे कारखाना चालविण्यासाठी अधिनियमाचे कलम ३१३ आणि या नियमांचे नियम ३ अन्वये जिला लायसन्स देण्यात आले असेल किंवा नियम ४ अन्वये जिच्या लेखी परवानगीचा नवीकरण करण्यात आले असेल अशी व्यक्ती आणि त्यामध्ये लेखी परवानगीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तिच्या नोकरांचा व अभिकर्त्यांचा समावेश होईल.

(ठ) "अनुसुची" म्हणजे, या नियम सोबत जोडलेली अनुसूची

(ड) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम, व

(ढ) या उप-विधीमध्ये वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांचे किंवा शब्द प्रयोगांचे अर्थ, अनुक्रमे त्यांना अधिनियमात नेमुन दिलेल्या अर्थाप्रमाणेच असतील.

३. **लायसन्स :-**

१) कोणत्याही व्यक्तीला महानगरपालिकेच्या हद्दीत वाफ, पाणी, विद्युत शक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्तीचा वापर होतो असा कारखाना, कार्यशाळा, कामाची जागा अथवा बेकरी आयुक्ताच्या लेखी परवानगी खेरीज सुरु करता येणार नाही. असा कारखाना सुरु करु इच्छिणा-या व्यक्तीने अधिनियमाचे कलम ३१३ व या उपविधीच्या तरतुदिंच्या अधिन या सोबत जोडलेल्या नमुना अ मध्ये आयुक्ताकडे अर्ज करावा लागेल व त्या सोबत नमुना अ-१ मध्ये शपथपत्र व नमुना अ-२ मध्ये माहिती सादर करावी लागेल. मनपाने ठरविलेले फॉर्म शुल्क अर्जासोबत भरावे लागेल. अशा अर्जावर विचार करुन आणि आवश्यक ती चौकशी करुन आयुक्ता ने दिलेल्या लेखी परवानगीची मुदत या उपविधीच्या तरतुदींच्या अधिन १ वर्षे इतकी राहील व ती नुतनीकरण होण्यासाठी पात्र राहील. लेखी परवानगीची मुदत, प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपेल. भरलेले शुल्क कोणलाही परत करता येणार नाही,

२) आयुक्तांस कारखाना चालु नसल्याबद्दलची लेखी नोटिस दिल्याशिवाय महानगरपालिकेमधुन विनिर्दिष्ट केलेल्या फी मध्ये कोणतीही सुट किंवा कोणताही परतावा देण्यात येणार नाही अशी नोटीस दिल्याच्या दिवसाच्या कोणत्याही मागील कालावधीसाठी कोणतीही सुट किंवा कोणताही परतावा लागु असणार नाही. कोणत्याही बाबतीत महानगरपालिकेकडुन तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी सुट किंवा परतावा देण्यात येणार नाही.

परंतु लेखी परवानगी निलंबित ठेवण्यात येईल किंवा रद्द करण्यात येईल किंवा तिच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग करण्यात येईल तेव्हा, कोणताही परतावा अनुज्ञेय असणार नाही.

४. **अर्ज करणे :-**

(अ) नवीन कारखान्याचा लेखी परवानगीसाठी करावयाचा अर्ज हा, असा कारखाना कामासाठी त्या दिवशी सुरु करण्याचे योजिले असेल त्या दिवसापुर्वी ५० दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत करण्यात येईल व अशा लायसन्स नवीकरणासाठी करावयाचा अर्ज हा, प्रत्येक वर्ष संपण्यापुर्वी ३० दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत करण्यात येईल.

**ब)** अधिनियमाच्या कलम ३१३ नुसार आयुक्ताची परवानगी आवश्यक असलेला जो कारखाना, कर्मशाळा कामाची जागा वा बेकरी, हे उपविधी अमंलात येण्याचे तारखेस अस्तित्वात असेल,

त्यासाठीही या नियमांनुसारनुसार तशी लेखी परवानगी मागण्यासाठी, उपविधी १ (ब) च्या तरतुदीनुसार हे उपविधी अमंलात आल्याचे तारखेपासून ६० दिवसांच्या आत या उपविधीद्वारे विहीत करण्यात आलेल्या पध्दतीप्रमाणे अर्ज द्यावा लागेल.

**(क)** असा प्रत्येक अर्ज लेखी असेल व त्यामध्ये कारख्यान्याचे स्वरुप, कारखाना कोणत्या ठिकाणी असेल ती जागा, त्यामध्ये कामावर लावण्यात येतील अशा व्यक्तीचा संख्या, हे नमुद करण्यात येईल व त्या सोबत कारखान्याच्या इमारतींचे आरखडे व महानगरपालिकेस आवयक वाटेल असा इतर तपशील जोडण्यात येईल.

## ५. लायसन्सचे नवीकरण :-

लेखी परवानगी धारकाची वर्तणुक समाधानकारक राहील तोपर्यंत त्यास, त्याच्या कारखान्याची लेखी परवानगी पुढील वर्षासाठी नवीकरण करण्याची अनुज्ञा देण्यात येईल. लेखी परवानगी नवीकरणासाठी वर्ष संपण्यापुर्वी ३० दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत अर्ज करण्यात येईल. सदरचा अर्ज मुदतीत न केल्यास रु. ---- एवढे विलंब शुल्क आकारण्यात येईल. परवानगीच्या नुतणीकरणासाठी अनुसुचीच्या नमुना ब मध्ये अर्ज करावा लागेल.

**स्पष्टीकरण** - लेखी परवानगी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा किंवा या उपविधींपैकी कोणत्याही परवानगी धारकाने भंग केला नसेल तोवर त्याची वर्तणुक समाधानकारक असल्याचे मानण्यात येईल.

## ६. सुचनेची प्रसिध्दी :-

**(अ)** आयुक्त, स्थानिक वृत्तपत्रातून, उपविधी (४) नुसार केलेल्या अशा अर्जाबाबतची माहिती स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करून त्याबाबत आजूबाजूचे रहिवासी व इतरांकडून हरकती व सूचना मागवील.

**(ब)** वरील कंडिका (अ) चे नोटिसी व्यतिरीक्त आयुक्त कारखाना कर्मशाळा, कामाची जागा वा बेकरी उभी राहणार असलेल्या इमारतीवर / जागी योग्य आकाराचा फलक उभा करून त्यावर या सुचनेची प्रसिध्दी करण्यास अर्जदारास भाग पाडील. सूचनेचा मजकूर आयूक्ताच्या मान्यतेने ठरविला जाईल.

**(क)** वरील कंडिका (अ) व (ब) प्रमाणे प्रसिध्द करावयाच्या सूचनांचा संपुर्ण खर्च अर्जदाराला करावा लागेल.

**(ड)** मात्र, उपविधी ४ (ब) च्या तरतुदीनुसार जे कारखाने, कार्मशाळा, कामाची जागा वा बेकरी लेखी परवानगीसाठी अर्ज करतील त्यांच्यासाठी अशा प्रसिध्दीची आवश्यकता राहणार नाही.

परंतु, औद्योगिक प्रयोजनार्थ राखुन ठेवलेल्या किंवा निर्देशित केलेल्या कोणत्याही क्षेत्रात कारखाना उभारण्यात येणार असेल त्याबाबतीत, अशा कोणत्याही क्षेत्रात कारखाना उभारण्यात येणार असेल त्याबाबतीत, अशी कोणतीही नोटिस आवश्यक असणार नाही.

## अर्जाची चौकशी :-

उपविधी ६ प्रमाणे केलेल्या प्रसिध्दी पुढील मुद्यांच्या चौकशीत समावेश असेल.

**(अ)** महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ खाली तयार करण्यात आलेल्या विकास आराखडयातील जमीन वापराबाबत आरक्षण,

**(ब)** प्रस्तावित कारखाना, कार्मशाळा, कामाची जागा वा बेकरी यामुळे होणारे संभाव्य प्रदुषण व त्यावर करण्यात येणार उपाययोजना आणि

**(क)** जागेच्या आजुबाजूचे रहिवासी वा इतरांकडून आलेल्या हरकती व सुचना.

अधिनियमाच्या कलम ३१३ खालील परवानगी देण्यापुर्वी कोणत्याही प्रकारची विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे अशा निर्णयाला आयुक्त आल्यास तसे अर्जदाराला लेखी कळविण्यात येईल.

आयुक्ताने दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही पुर्ण करून अर्जदार तशी सुचना आयुक्ताला देईल व सुचनांची अमंलबजावणी यथायोग्य झाल्याची आयुक्त खात्री करून घेईल.

## लायसन्स हस्तांतरणीय नसणे :-

(१) नियम (३) अन्वये देण्यात आलेले किंवा नियम (५) अन्वये नवीकरण केलेली लेखी परवानगी हस्तांतरणीय असणार नाही, परंतु आयुक्तांच्या मान्यतेने नोकर किंवा अभिकर्ते म्हणुन नियुक्त केलेले व लेखी परवानगीमध्ये नावे दिलेले परवानगी धारकाचे सर्व नोकर व अभिकर्ते हे लखी परवानगी खालील लेखी परवानगी असल्याचे मानण्यात येईल.

परंतु, परवानगी धारक मरण पावला असेल त्याबाबतीत, त्याचा वैध वारस किंवा लेखी परवानगी दिलेली अशी जागा व साधनसामग्री यांची विक्री झाली असेल, ती तारण ठेवली असेल त्याबाबतीत, जिने मालकी हक्क संपादन केला असेल किंवा जिचे उक्त जागेवर व अशा साधनसामग्रीवर नियंत्रण असेल अशा व्यक्तीस, उक्त लेखी परवानगी आपल्या नावे हस्तांतरीत करुन मिळण्याचा हक्क असेल.

आणखी असे कि, परवानगीधारकास, त्याच्या मृत्युनंतर जी वैध वारस होणार असेल त्या व्यक्तीकडे आपलया हयातीत, उक्त लेखी परवानगीचे हस्तांतरण करण्याची मुभा असेल.

(२) कोणत्याही परवानगीधारकास आपला कारखाना किंवा त्याचा कोणताही भाग पोट भाडयाने देता येणार नाही.

(३) या नियमांचे उल्लंघन करुन करण्यात आलेल्या हस्तांतरणाच्या परिणामी लेखी परवानगी रद्द होऊन फी जप्त होईल व त्याच्या मार्फत किंवा त्याच्याव्दारे तीवर दावा सांगणारा हस्तांतरीत किंवा कोणतीही व्यक्ती, ही या अधिनियमान्वये खटला भरला जाण्यास पात्र ठरेल.

## ९. लेखी परवानगी देण्याची कार्यपध्दती :-

(१) अर्जदाराने आवश्यक त्या सर्व गोष्टींची पुर्तता केल्यावर व आयुक्ताने अनुमती देण्याचा निर्णय घेतल्यावर अर्जदारास विहीत परवानगी शुल्क भरावे लागेल.

(२) हे शुल्क अधिनियमाचे कलम ३८६ (२) च्या तरतुदींप्रमाणे महासभेच्या मान्यतेने आयुक्ताने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे असेल.

(३) विहीत शुल्क भरल्यानंतर प्राधिकृत अधिका-यांच्या सही शिक्यानिशी या उपविधीला जोडण्यात आलेल्या नमुना "क" मध्ये लेखी परवानगी देण्यात येईल त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल.

अ) परवानगी कालावधी

ब) परवानगीच्या अटी व शर्ती

क) परवानगीच्या नुतनीकरणाचा दिनांक

(१) नियम (३) अन्वये देण्यात आलेल्या किंवा नियम (५) अन्वये नवीकरण केलेल्या लायसन्समध्ये, लेखी परवानगी धारकाचे नाव, परवानगी धारकाच्या अनुपस्थितीमध्ये कारखाना चालविण्यासाठी जबाबदार असलेला त्याचा व्यवस्थापक किंवा नोकर, कारखान्याचे स्वरुप, जागेचे वर्णन व त्यामध्ये कामावर लावण्यात येणाऱ्या व्यक्तींची कमाल संख्या, यांचा विनिर्देश करण्यात येईल.

(२) परवानगी धारकास, ज्या शर्ती व निर्बंध यांस अधीन राहुन कारखान्याची जागा वापरता येईल त्या शर्ती व निर्बंध व ज्या शर्तीखाली लायसन्स देण्यात आले असेल त्या शर्ती पुढीलप्रमाणे असतील :-

(अ) लेखी परवानगी दिलेली जागा, कारखान्यातील ठळक जागी लावुन ठेवण्यात येईल :-

(ब) लेखी परवानगी दिलेली जागा, लेखी परवानगीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर प्रयोजनांसाठी वारण्यात येणार नाही.

(क) कारखान्यात नेहमीच स्वच्छता ठेवण्यात येईल.

(ड) परवानगीधारक, कारखान्याची तपासणी करण्यासाठी आयुक्तास, सर्व वेळी, सर्व सवलती देईल.

(इ) परवानगीधारक, स्वतः किंवा ज्यांची नावे त्यावेळी लेखी परवानगीमध्ये नमुद करण्यात आली असतील अशा व्यक्तींमार्फत कारखाना चालवील.

(फ) परवानगीधारक, नियम अन्वये आवश्यक असलेल्या सर्व गोष्टिंचे काटेकोरपणे पालन करील.

(३) खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती लेखी परवानगीच्या मागील बाजुवर मुद्रित करण्यात येतील.

## १०. लेखी परवानगीच्या शर्तीचा भंग :-

कोणतीही व्यक्ती, तिला दिलेल्या लेखी परवानगीच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग करील तर, आयुक्तांस योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आयुक्तास तिची लेखी परवानगी निलंबित किंवा रद्द करता येईल व अधिनियमाखाली खटला भरला जाण्यास ती पात्र ठरेल.

परंतु परवानगीधारकास, त्याच्याविरुध्द घेण्याचे योजिलेल्या कारवाईच्या संबधात कारण दाखवण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, त्यावर अशी कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही. आणखी असे की, आयुक्तांचा आदेश मिळाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत सदर निर्णयाविरुध्द स्थायी समितीकडे अपील दाखल करता येईल.

## ११. तपासणी :-

ज्या अटी व शर्तीवर या उपविधींखाली लेखी परवानगी दिली, त्या अटी व शर्तीचे पालन परवानगी धारकांकडून होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आयुक्त वा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास उद्योगाच्या/कारखान्याच्या, कामाच्या जागी वा बेकरीत कोणत्याही पुर्व सुचने शिवाय अथवा पुर्व सुचनेने कोणत्याही वेळी प्रवेश करण्याचा अधिकार राहील.

## १२. कारखान्यात वापरण्यात येणाऱ्या भट्टिमध्ये धुर नाहीसा करण्याची सोय असणे :-

(अ) कारखान्याच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येणारी किंवा वापरण्यात यावयाची प्रत्येक भट्टि ही अशा रितीने बांधण्यात येईल, वाढविण्यात येईल किंवा तिच्यामध्ये फेर फार करण्यात येईल कि त्यामुळे व्यवहार्य असेल तेथवर तीमधील धुर तेथेचे निःशेष करता येईल.

(ब) कोणताही परवानगीधारक, ज्यामुळे कोणत्याही भट्टितील धुर, शक्यतोवर भट्टितच निःशेष होणार नाही अशा प्रकारे कोणतीही भट्टि वापरणार नाही किंवा वापरण्यास परवानगी देणार नाही किंवा निष्काळजीपणे तिचा वापर करणार नाही किंवा वापर करण्यास परवानगी देणार नाही.

## १३. स्वच्छता व सुरक्षविषयक विनिमय :-

आयुक्तांस जेव्हा असे आढळुन येईल कि,

(अ) एखाद्या कारखान्यामध्ये स्वच्छता ठेवलेली नाही किंवा ज्यामुळे, काम चालु असताना उपद्रवकारक ठरेल असा त्यामध्ये निर्माण होणारा कोणताही गॅस, बाष्प, काजळी, धुलीकण किंवा इतर अशुध्दता ही, व्यवहार्य असेल तेथवर अपायकारक ठरणार नाही. अशा रितीने खेळत्या हवेची तरतुद केलेली नाही. किंवा त्यामध्ये कामगारांची गर्दी इतकी आहे कि तो, त्यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्यास धोकादायक व अपयकारक ठरेल किंवा,

(ब) त्यामध्ये एखादे इंजिन, मिल गिअरिंग, उच्चलनयंत्र (हॉईस्ट) किंवा इतर यंत्रसामग्री अशा रितीने बसविण्यात आलेली आहे किंवा असुरक्षितपणे ठरविण्यात आली आहे कि, ती जीवीतास किंवा एखाद्या अवयवास धोकादायक ठरत असेल, तर आयुक्तास लेखी नोटिशीव्दारे, परवानगी धारकास, कारखान्यात स्वच्छता ठेवण्यास किंवा त्यामध्ये खेळती हवा ठेवण्यास, किंवा त्यात गर्दी होऊ नये म्हणुन किंवा अशा नोटिशीत विनिर्दिष्ठ करण्यात येईल त्याप्रमाणे, त्यामधील कोणतेही इंजिन, मिल गिअरींग, उच्चलनयंत्र किंवा इतर यंत्रसामग्री यांपासुन जीवितास किंवा अवयवास धोका होऊ नये म्हणुन, उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल.

## १४. उपद्रव व वायु प्रदुषण कमी करणे :-

(अ) कोणत्याही कारखान्यामध्ये विशिष्ट प्रकारचे इंधन वापरल्याने किंवा कोणत्याही प्रक्रियेमुळे किंवा प्रवर्तनामुळे किंवा आंतरिक व्यवस्था चांगली न ठेवल्यामुळे किंवा आवैंतामुळे किंवा त्यामुळे निर्माण होणाऱ्या कंपनामुळे किंवा इतर कोणत्याही रितीने त्या कारखान्यात उपद्रव आरोग्यविषयक धोके/ वायु प्रदुषण होते असे आयुक्तांचे मत होईल तर त्यास निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी वेळेत, उपद्रव व इतर प्रदुषण कमी करण्यसारठी, त्यास योग्य वाटेल, असा निदेश देता येईल. :

(ब) अशा निदेशांचे अनुपालन करण्यात बुध्दिपरस्सर कसुरी करण्यात आली असेल किंवा उपद्रव कमी करणे अशक्य असल्याचे आढळुन येईल तर, आयुक्तांस आदेशाव्दारे, --

(एक) विशिष्ट प्रकारच्या इंधनाच्या वापरास मनाई करता येईल, किंवा

(दोन) अशा निदेशांचे जोपर्यंत अनुपालन करण्यात येत नाही तोपर्यात, किंवा सायंकाळी ६ वाजेपासुन सकाळी ६ वाजेपर्यंत किंवा अशा वेळेतील कोणत्याही विशिष्ट वेळेच्या किंवा वेळांच्या दरम्यान, कारखान्यातील कामास पुर्णतः मनाई करता येईल.

## १५. माहिती पुरविणे :-

परवानगी धारक, आयुक्तास आवश्यक असेल अशी त्याच्या कारखान्यासंबधीची माहिती, त्यास वेळोवेळी पुरवील.

## १६. पिण्याचे पाणी इ. दुषित होण्यास प्रतिबंध करणे :-

परवानगीधारक, कारखान्यातील टाकाऊ पदार्थ अशा प्रकारे किंवा अशा रितीने ठेवण्याची व्यवस्था करणार नाही, कि ज्यामुळे –

(अ) पिण्याचे किंवा घरगुती प्रयोजनार्थ पुरविण्यात आलेले किंवा पुरविण्यात येणारे किंवा पुरविण्यात येण्याचा संभव असलेले पाणी दुषित होईल किंवा,

(ब) गुरे किवा इतर जनावरे यांसाठी वापरण्यात येणारी भांडी स्वच्छ करण्यासाठी किंवा ती धुण्यासाठी किवा कोणत्याही घरगुती प्रयोजनार्थ वापरावयाचा उद्देश असलेले कोणतेही पाणी दुषीत होईल.

**१७. कार्यक्षम जलनिस्सारणांची व्यवस्था व गटारे :-**

परवानगीधारक, कारखान्यात जलनिस्सारणाची योग्य ती व्यवस्था करील व कारखान्याच्या किंवा कारखान्याशी संबंधित असलेले प्रत्येक गटार किंवा जलनिस्सारणाची साधने आयुक्तांची समाधान होईल अशा रितीने सर्व वेळी सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची व्यवस्था करील.

**१८. परवानगीच्या अटि व शर्तीचा भंग झाल्यास जागेचा वापर बंद करा :-**

अ) या उपविधी खालील अधिकार केवळ आयुक्ताला असतील.

ब) ज्या अटिंवर लेखी परवानगी दिली असेल, त्याचा भंग झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्यास, आयुक्त त्या जागेचा वापर तात्काळ थांबविण्याचा आदेश देऊ शकेल.

क) त्यानंतर परवानगी धारकाला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आयुक्त ज्या अटि व शर्तीचा भंग झाला त्यात योग्य ती सुधारणा करण्याची संधी देउन, तशी सुधारणा झाल्याची खात्री करवून घेतल्यावर जागेचा वापर पुन्हा सुरू करण्याची परवानगी देऊ शकेल किंवा तशी सुधारणा दिलेल्या मुदतीत न केल्यास किंवा सुधारणा करणे शक्यच नाही अशी त्याची खात्री झाल्यास अशी परवानगी रद्द करू शकेल.

ड) जागेचा मालक वा वापर करणा-याने कंडिका (ब) व (क)अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यास आयुक्त स्वतः वा त्यांच्या कनिष्ठ अधिका-यांकरवी खाली नमुद केलेल्या एक वा अनेक मार्गाचा वापर करून असा वापर थांबवू शकेल.

१) लेखी ताकीद देउन वापर थांबविण्याची सुचना देणे.

२) व्यवसायासाठी/कारखान्यासाठी/ कामाच्या जागी, बेकरीसाठी विद्युत शक्ती वापरण्यात येत असेल तर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कार्यालयाकडून विद्युत पुरवठा खंडीत करविणे आणि पाणी पुरवठा देण्यात आला असेल तर पाणी पुरवठा खंडीत करविणे.

३) कोणतीही यंत्रे वापरण्यात येत असतील तर ती यंत्रे सील लावून बंद करणे.

४) यंत्राचा महत्वाचा भाग वा पुर्ण यंत्र काढून घेणे.

५) प्रवेशद्वारास सील लावणे.

परंतू यंत्र अथवा तांत्रिक मांडणीचा सुटा भाग अथवा पुर्ण यंत्र काढावयाचे असेल तर त्यावेळी पंचनामा केला जाईल. या सर्व कारवाईसाठी येणारा खर्च लेखी परवानगी धारकांकडून वसूल करण्यात येईल.

१९. **शास्ती :-**

लेखी परवानगीशिवाय कारखाना चालविणारी प्रत्येक व्यक्ति, शास्तीच्या रुपाने मनपाने विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या दुप्पट दराने फी देण्यास पात्र ठरेल. ही अधिक फी या अधिनियमाच्या किंवा याखाली केलेल्या कोणत्याही शास्तीस किंवा दायित्वास अशी व्यक्ती पात्र ठरेल, त्याशिवाय बसविण्यात येईल.

२१. **निरसन आणि व्यावृत्ती :-**

या नियमाच्या प्रारंभाच्या लगतपुर्वी महानगरपालिका क्षेत्रात अंमलात असलेले कोणतेही तत्सम नियम, अशा निरसनापुर्वी, त्याअन्वये केलेल्या गोष्टी किंवा त्याखाली करावयाचे वर्जिलेल्या गोष्टी यासंबंधात असेल ते खेरीज करुन रद्द होतील.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

३१२

अनुसुचि
मिरा भाईदर महानगरपालिका

(नमुना -अ)

कारखाना/बेकरी सुरू करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अर्ज –

१. **अर्जदाराची संपुर्ण माहिती**

अ) संपुर्ण नाव :-

ब) कार्यालयाचा पत्ता :-
दुरध्वनी क्रमांक :-

क) घरचा संपुर्ण पत्ता :-
दुरध्वनी क्रमांक :-

२. **कारखान्याची संपूर्ण माहिती**

अ) कारखान्याचे नाव :-
दुरध्वनी क्रमांक :-
कारखान्याचा पत्ता :-

ब) राज्य शासनसकडून **"ना हरकत प्रमाणपत्र"** मिळाले आहे का ?
(असल्यास प्रत जोडावी) होय नाही

क) महानगरपालिकेच्या जागेवर कारखाना आहे का ?
प्रस्तावित जागा शहर विकास योजनेतील कारखान्यासाठी आरक्षित जागा आहे का ?
असल्यास नमुद करा (जागा वापरण्याबाबतचे कागदपत्र)
स्की. क्र. प्लॉट क्र.

ड) बांधकाम अस्तित्वात आहे का ? होय नाही

अ) असल्यास अधिकृत आहे का ? होय नाही

ब) नसल्यास नकाशे मंजूरीसाठी देण्याची तारीख
जर नकाशे मंजूर असल्यास क्र. तारीख

ई) कारखान्यात येण्यासाठी वापरण्यात येणारा रस्ता असल्यास त्याचे मोजमाप.



फ) शहर विकास आराखडयाप्रमाणे रहिवास विभागात कारखाना आहे का अथवा त्या

D:\...\DATA\UPVIDHI\General Meeting dt - 26-04-2010 madhil UPVIDHI\KARKHANYACHE NIYAM.doc

लगत रहिवासी विभाग आहे का व तो वापरात आहे काय?

ग) एकूण मनुष्य बळाबाबतची माहिती पुरुष स्त्रिया.

१ ली पाळी

२ री पाळी

३ री पाळी

ह) स्वछता गृहांबाबतची माहिती पुरुषांसाठी/स्त्रियांसाठी

धुण्यासाठी जागा

संडास (सेप्टीक टॅक)

मुत्र्या

ज) कारखान्याबाबतची तांत्रिक माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणे (तीन प्रतींत)

**३. कारखान्याचे कार्याबाबत.**

अ) कारखान्याचे वर्गीकरण (उदा.कार्यशाळा वैगरे)

ब) १) उत्पादन प्रक्रियेबाबत संपुर्ण माहिती ज्यामुळे सार्वजनिक आरोग्यावरील परिणामाबाबत माहिती मिळू शकेल.

२) पूर्नवापर प्रक्रियांबाबत ची माहिती

क) कच्चा माल साठवणी बाबत (प्रकार/परिणाम)

| | | | |
|---|---|---|---|
| ड) यांत्रिक शक्तीवापर (अंदाजे अश्वशक्ती) | विद्युत बाष्प | पेट्रोल/डिझेल पाणी | तेल व इतर |



D:\Tanmmd OTKD DATA\UPVIDHI\General Meeting dtd - 20-04-2010 mdhi UPVIDHINKARKHANYACHE NIYAM.doc

इ) एकंदर विजेचा वापर कि.वॅट. अश्वशक्ती

फ) ब्लास्ट, फर्नेस, बॉयलर वापरण्यात येतात का? होय नाही

ग) कारखान्यातील टाकाऊ पदार्थाबाबत (प्रकार) वायू द्रव घन

परिणाम

विल्हेवाटीची

पध्दत

४. **परवानगीधारकाचे गैरहजेरीत परवानगीप्रमाणे जागेचा वापर ज्यांचे मार्फत केला जाईल त्या सहाय्यक/नोकर/दलाल यांची माहिती**

अ) १) नाव :-

२) परवानगीधारकाचा सहाय्यक/नोकर/दलाल

३) राहण्याचे ठिकाण :-

ब) १) नाव :-

२) परवानगीधारकाचा सहाय्यक/नोकर/दलाल

३) राहण्याचे ठिकाण :-

क) १) नाव :-

२) परवानगीधारकाचा सहाय्यक/नोकर/दलाल

३) राहण्याचे ठिकाण :-

ड) १) नाव :-

२) परवानगीधारकाचा सहाय्यक/नोकर/दलाल

३) राहण्याचे ठिकाण :-

अर्जासोबत रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर नमुना अ-१ प्रमाणे शपथपत्र सादर करीत आहे.

अर्जदाराची /अर्जदारांच्या
सही/सह्या

# मिरा भाईदर महानगरपालिका

## नमुना-अ-मधील अर्जासोबत द्यावयाचे प्रपत्र

नमुना अ-१ (रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर)

शपथपत्र

१) मी. श्री / श्रीमती :- --------------------------------------------------

वय : ---------- राहणार :- ------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

**सत्य प्रतिज्ञाचर असे लिहुन देतो की,**

१) मी नमुना 'अ' मध्ये कारखाना/बेकरी सुरु करण्यासाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प.) जि. ठाणे, यांचेकडे सादर करीत असलेल्या अर्जात देण्यात आलेली माहिती पुर्णपणे खरी आहे व ती चुकीची वा खोटी निघाल्यास मला देण्यात आलेलीपरवानगी रद्द केली जाऊ शकेल याची व सदर परवानगीमुळे उद्भवणा-या परिणामांसाठी कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील.

(२) मी परवानगी मागीत असलेला कारखाना **(दोहोपैकी जे लागु नाही ते खोडावे)** बेकरी मध्ये बनविल्या जाणा-या अगर प्रक्रिया केल्या जाण-या पदार्थ / वस्तु या साठी शासनाच्या संबधीत विभागाची आवश्यक असलेली परवानगी दोहोपैकी जे लागु नाही ते खोडावे परवाना, मी प्राप्त केला आहे प्राप्त करीत आहे व त्या परवानगी दोहोपैकी जे लागु नाही ते खोडावे परवान्यामध्ये दिलेल्या अटीशर्तीचे पालन करण्याची जाबाबदारी माझी स्वत: ची असेल.

**(स्वाक्षरी)**

**(दंडाधिकारी नोटीस समोर)**

**बेकरी/कारखान्याबाबतची माहिती**
**(तीन प्रतींमध्ये सादर करावी)**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

बेकरी / कारखान्या बाबतची माहिती नमुना 'अ' मधील अर्जासोबत घ्यावयाचे प्रपत्र.

अर्जदाराचे नाव व पत्ता :-

१) उद्योगधंद्याचे नाव व प्रस्तावीत कारखाना व बेकरीचा पत्ता :-

दुरध्वनी क्रमांक :-

२) एकूण चटईक्षेत्र
(कार्यालय, कोठार इ. समावेत)
चौ.मी.

३) एकंदरीत यांत्रिक शक्ती H.P (अश्वशक्ती) K.W (किलोवॅट)

प्रत्येक इंजिनची अश्वशक्ती व एकूण संख्या — संख्या (अश्वशक्ती)

विद्युत मोटरींची संख्या व प्रत्येकाची अश्वशक्ती — संख्या (अश्वशक्ती)

बॉयलरची संख्या/अश्वशक्ती बाष्प (शक्ती)दाब प्रत्येकाचा — संख्या (अश्वशक्ती)

उष्णता तयार करण्याची अथवा कोरडी करणारे सयंत्रे (कि.वॅट) — संख्या कि.वॅट

फर्नेस, ब्लोअर्स,ओव्हन इ. ची संख्या — फर्नेस, ब्लोअर्स, ओव्हन

संख्या

इंधन

कमाल तपमान

| ४. उत्पादने व त्यासाठी लागणारा कच्चा माल | सामान/उत्पादने | एकाच वेळी जास्तीत जास्त साठविण्यात येणारे परिणाम |
|---|---|---|

| ५. अपशिष्टाचा प्रकार | नाव व जास्तीत जास्त साठविण्याचे परिणाम | विल्हेवाट लावण्याचा प्रकार प्रकार | ठिकाण |
|---|---|---|---|
| टाकाऊ पदार्थ (घन) | | | |
| (द्रव) | | | |
| (वायू) | | | |

**सुचना :- कारखान्यातील अंतर्गत रचना दर्शविणारा नकाशा तीन प्रतित जोडा**

✱ १ सेमी. = १ मीटर हया प्रमाणे माप वापरुन अंतर्गत यांत्रिक मांडणी व तसेच प्रत्येक खोलीत वापरण्यात येणारे मनुष्यबळ यांची संपुर्ण माहिती सोबत जोडणे आवश्यक (यांत्रिक मांडणी मध्ये बॉयलर, फर्जस, ओव्हन इ. जागा नमुद करावी)आहे.

**तारीख** **अर्जदाराची स्वाक्षरी.**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## (नमुना ब)

## अर्ज प्रकार- नुतनीकरणाची परवानगी

**अटी** :- अर्जात संपुर्ण तपशिलवार माहिती नमुद केलेली असावी. तसेच महाराष्ट्र राज्य सरकारचे उद्योगधंदे विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

१) **अर्जदाराची माहिती**

नाव :-

पत्ता :-

२) **कारखान्याबाबतची माहिती :-**

नाव व ठिकाण :-

महानगरपालिकेची कारखान्याची परवानगी क्र. वर्ष

३) **कारखान्याचे क्षेत्रफळ** सध्याचे क्षेत्रफळ (चौ.मी.)

वाढीव क्षेत्र (चौ.मी.)
क्र. व तारीख (इमारती मंजूरी बाबत)

४) **कारखान्यातील कामगार**

| | १ ली पाळी<br>पुरुष/स्त्रिया | २ री पाळी<br>पुरुष/स्त्रिया | ३ री पाळी<br>पुरुष/स्त्रिया |
|---|---|---|---|
| अस्तित्वात असलेले | | | |
| विस्तारानंतरचे वाढीव | | | |

५) **स्वच्छता गृहे**

| | संडास<br>पुरुष/स्त्रिया | स्नानगृहे<br>पुरुष/स्त्रिया | मुता-या<br>पुरुष/स्त्रिया |
|---|---|---|---|
| सध्या अस्तित्वात असलेले | | | |

विस्तारानंतरचे वाढीव

६) **निर्मिती प्रक्रिया**

अस्तित्वात असलेली (मुख्य व पुर्नवापर) विस्तारात बदल असल्यास

७) **यांत्रिक शक्ती वापराबाबत**

| | सध्या अस्तित्वात असलेले | | | विस्तारानंतरचे | |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अश्वशक्ती | एकुण | संख्या | अश्वशक्ती |
| एकूण | | | | | |
| | प्रत्येकी | | | प्रत्येकी | |
| इंजिन | | | | | |
| विद्युत मिटर | | | | | |
| उष्णता निर्माण करणारी यंत्रे ओव्हन इ. | | | | | |
| फर्नेस/ब्लोअर्स | | | | | |
| बायलर्स | | | | | |

८) **कच्चामाल व उत्पादनाबद्दल माहिती (विस्तारानंतर)**

| अनु. | मालाचे वर्णन | एकाच वेळी साठविण्यात येणारी कमाल परिणाम |
|---|---|---|

९) **औद्योगिक अपशिष्टे**

| प्रकार | परिणाम | विल्हेवाटीचा प्रकार |
|---|---|---|

१०) ***खालील प्रमाणे नकाशे अर्जाबरोबर जोडावेत.जागा व त्यातील होणारे बदल.***

५ मी. = १ सेमी मापाने सध्याची व नविन दर्शविणारा आराखडा त्यामध्ये विविध रंगानी उघडया जागा व जवळील जागा दर्शविण्यात याव्यात.
१ मी. = १ सेमी या मापाने कारखान्यातील चटईक्षेत्र दर्शविणारा नकाशा त्यामध्ये विद्युत मोटार, इंजिन, बॉयलर यांची स्थाने दर्शविण्यात यावीत. तसेच मनुष्यबळ जे प्रत्येक खोलीत वापरण्यात येईल ते नमूद करण्यात यावे.

तारीख अर्जदाराची स्वाक्षरी



# अनुसूची
# मिरा भाईदर महानगरपालिका
## (नमुना-क)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१३ अन्वये देण्यात आलेली

क्रमांक :-

दिनांक :-

## लेखी परवानगी

१) परवानगीधारकाचे नाव/नावे :-

२) कारखाना / बेकरीचा पत्ता व
दुरध्वनी क्रमांक :-

३) कारखाना / बेकरीचे नोंदणीकरण कार्यालय वेगळ्या
ठिकाणी असल्यास त्याचा पत्ता :-

दुरध्वनी क्रमांक :-

४) परवानगीधारकाचा घरचा
संपुर्ण पत्ता/पत्ते व दुरध्वनी क्र :-

५) अ) परवानगीचा कालावधी :-
ब) परवानगीच्या नूतनीकरणाचा दिनांक :-
क) परवानगीचे स्वरुप (तपशील द्यावा)

६) परवानगीधारकाच्या गैरहजेरीत परवानगीच्या अटी व शर्ती पालन करण्यासाठी परवानगीधारकाने प्राधिकृत केलेल्या सहायक,नोकर,दलाल यांचा तपशिल.

१)

२)

३)

४)

ही लेखी परवानगी या जोडलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. त्यातील अटी व शर्ती पालन करण्याची जबाबदारी परवानगीधारकाची असेल.

आयुक्त,

D:\Transcend (H)D DATA\UPVIDHI\General Meeting dtd - 20-04-2010 madhil UPVIDHINKARKHANYACHE NIYAM.doc

मिरा भाईंदर महानगरपालिका.

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१३ खालील देण्यात आलेल्या परवानगीच्या अटी व शर्ती :-

१) **सर्वसाधारण :-**

अ) ही लिखीत परवानगी कामाच्या ठिकाणी दर्शनी भागात लावण्यात येईल.

ब) परवानगीधारक परवानगी मिळालेल्या कामासाठीच जागेचा वापर करील.

क) परवानगीधारक व्यवसाय/कारखान्याची जागा नेहमी स्वच्छ ठेवील.

ड) सदर जागेचा वापर, परवानगीधारकास स्वतः, त्याचे सहाय्यक, नोकर वा दलाल ज्यांची नावे परवानगीत समाविष्ट असतील त्यांचे मार्फत करता येईल. अशा सहाय्यक, दलाल वा नोकरांना परवानगीधारकावर बंधनकारक असणा-या सर्व नियम व अटींचे पालन करण्याची प्राथमिक जबाबदारी परवानगीधारकाची असेल. त्यांचेकडून कोणत्याही अटींचा भंग झाल्यास तो परवानगीधारकाने केला आहे असे समजण्यात येईल व परवानगीधारक उपविधीच्या तरतुदीप्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील.

इ) परवानगीधारक अधिनियम, त्याखालील नियम, उपविधींच्या तरतुदी तसेच आयुक्त व प्राधिकृत अधिका-याने दिलेल्या सुचनांचे पालन करील.

फ) कारखाना/उद्योगांतून निर्माण होणारी धूळ, वाफ, वायू,द्रव इत्यादींचे प्रमाण सार्वजनिक आरोग्याला विघातक होत आहे की काय याची तपासणी करण्यासाठी आयुक्त व प्राधिकृत अधिकारी किमान तीन महिन्यातून एकदा (आवश्यक) नमुने गोळा करून व त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करून घेईल. नमुने गोळा करणे व त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यासाठी येणारा खर्च आयुक्त कलम ३८६ च्या तरतुदीप्रमाणे ठरवील व हा खर्च परवानगीधारकाला करावा लागेल. तपासणी नंतर आयुक्त वा प्राधिकृत अधिकारी ज्या सूचना देतील त्यांचे दिलेल्या मुदतीत पालन करणे परवानगीधारकावर बंधनकारक राहील.

२) **पेयजलाचे प्रदुषण थांबवण्याबाबत :-**

परवानगीधारक त्याचे आवारात निर्माण होणा-या टाकाऊ पदार्थाच्या साठवणुकीमुळे मानवी वस्तीस अथवा प्राण्यांकरिता होणारा पाणीपुरवठा दुषित होणार नाही याची काळजी घेईल, मानवी वस्त्यांकरिता घरगुती पाणीपुरवठा तसेच प्राण्यांसाठी पाणी पुरवठा, तसेच प्राण्यांची (घोडे व इतर चतुष्पाद प्राणी) साफसफाई, दुध व अन्न साठविण्याची भांडी वा धुण्याच्या पाण्यात वरील टाकाऊ पदार्थ मिसळणार नाहीत याची त्याला काळजी घ्यावी लागेल.

३२१

३) <u>ड्रेनेज कार्यान्वित ठेवणेबाबत :-</u>
परवानगीधारक आपल्या आवरातील सांडपाण्याची व्यवस्था आयुक्त वा प्राधिकृत अधिका-याच्या सूचनांप्रमाणे कार्यान्वित ठेवील.

४) <u>अग्निशमन साधने :-</u>
परवानगीधारक आपल्या जागेत आवश्यक ती अग्निशमन व्यवस्था सतत कार्यरत ठेवील व त्यासाठीची उपकरणे सुस्थितीत ठेवील. सुरक्षा साधनांचा वापर व अग्निशमन व्यवस्था महापालिका
आयुक्त वा प्राधिका-याने निर्देशित केल्याप्रमाणे असतील.

५) <u>परवानगीधारकाची गैरहजेरी :-</u>
परवानगीधारकास लागोपाठ चौदा दिवसांपेक्षा अधिक काळ गैरहजर रहावे लागणार असल्यास शर्त क्र.१ (ड)च्या तरतुदीनुसार त्याने नमुद केलेल्या व्यक्तीला त्यांच्या वतीने कारभार चालविण्यास परवानगीधारक सांगू शकेल.



६) <u>वस्तीसाठी वा अनुषंगिक कारणासाठी जागेचा वापर न करणे :-</u>
परवानगीधारकास परवानगी दिलेल्या जागेच्या चतु:सीमेतील कोणताही भाग ती कामाची जागा अन्न
तयार करण्याचा व्यवसायातील अगर बेकरीसाठी असेल त्या खेरीज मानवी वस्तीसाठी, अन्न तयार
करण्यासाठी व अन्य कोणत्याही प्रकारे आगीचा वापर होईल अशा कारणासाठी उपयोगात आणता
*येणार नाही. मात्र व्यवसाय व कारखान्यासाठी आगीचा वापर प्राधिकृत असल्यास* केवळ तेवढाच वापर करता येईल.

७) <u>स्वच्छता :-</u>
१) परवानगीधारक ,आपल्या आवारात स्वच्छता वा साफसफाई राखील. साफसफाई राखण्यासाठी
योग्य रितीने बंद होणा-या घट्ट झाकणाच्या कचराकुंडयांची व्यवस्था करील व त्या साफ ठेवील.
२) परवानगी धारक आयुक्ताने निर्देशित केलेल्या मोकळया जागावंरच (डंपिंग साईटस) कचरा टाकील व नियमीतपणे ती जागा स्वच्छ करील.

८) <u>वस्तुंवर चिठ्ठया लावणे :-</u>
परवानगीधारक, वापरातील विविध वस्तूंवर त्यांच्या नावांच्या चिठ्ठया लावील तसेच उत्पादनाचे वा कच्चा माल म्हणून साठवलेल्या पदार्थाचे गुणधर्म घातक असल्यास त्यावर तसे नमूद करील.

९) अ) <u>व्यवसायासाठी/कारखान्यासाठी केलेल्या उभारणीस आयुक्ताची मान्यता घ्यावी लागेल.</u>

९) ब) <u>मंजूर आराखडयातील बदला बाबत :-</u>

३८२

परवानगीधारकास वरील मंजूर शर्त क्र.९ (अ) नुसार मान्य केलेल्या उभारणीस वा मंजूर आराखडयास अथवा जागेच्या वापराच्या रचनेत आयुक्ताचे परवानगीशिवाय बदल अथवा वाढ करता येणार नाही.

१०) **कंपनी आवारात कार्यपध्दती बाबतचा सूचना फलक लावणे :-**

परवानगीधारक त्याच्या हद्दीत निर्माण होणा-या उत्पादनाच्या कार्यपध्दतीबाबत तसेच आयुक्तांकडून मिळालेल्या अनुमतीचा तपशिल दर्शविणारा एक फलक आवारात लावील.

११) **हानीकारक इंधनास बंदी :-**

सार्वजनिक आरोग्यास व मालमत्तेस धोकादायक अशा कोणत्याही वस्तूंचा इंधनाचा वापर परवानगीधारकास करता येणार नाही. सदर वस्तूत आरोग्यास घातक अशी धूर सोडणारी इंधने व रसायने यांचा समावेश नसेल.

१२) **स्वच्छ पेयजलाचा पुरवठा करणेबाबत :-**

परवानगीधारकास आवारातील साफसफाईसाठी स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा करावा लागेल.

१३) **उजेड व वातायन :-**

परवानगीधारकास आपल्या आवारात स्वच्छ उजेड व खेळती हवा चालू राहण्यासाठी योग्य व्यवस्था करावी लागेल.

१४) **काम बंद करण्यापुर्वी आयुक्तास कळविण्याबाबत :-**

परवान्याची मुदत संपण्यापुर्वी सदर जागा रिकामी करावयाची असेल वा काम बंद करावयाचे असेल तर ती बाब परवानगीधारकाने जागा रिकामी करण्यापूर्वी वा कामकाज बंद करण्यापुर्वी किमान ७ दिवस अगोदर लेखी अर्जाद्वारे आयुक्तांचे निदर्शनास आणावी.



१५) **लेखी परवानगीचे नुतनीकरण :-**

परवानगीधारकास परवानगीची मुदत संपण्यापूर्वी एक महिना अगोदर विहीत शुल्कासोबत नुतनीकरणाचा अर्ज करावा लागेल.

१६) **विशेष अटी :-**

१) महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, लघु उद्योग विभाग महाराष्ट्र राज्य, प्रदुषण नियंत्रण मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्याकडील विना हरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल.

२) परवानगीधारकांना आपल्या आवारात कंपनी परिशिष्ट प्रक्रीयेसाठी प्रक्रिया प्रकल्प सुरु करावा लागेल व कंपनी अपशिष्ट उत्सर्जित करताना सदर अपशिष्टांची मानके ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशित प्रमाणातच असणे त्यांचेवर बंधनकारक असेल.

३) ध्वनी मापनाबाबत :- पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ नुसार विहीत केलेल्या औद्योगिक क्षेत्र व परिसरात नमुद केलेल्या प्रमाणातच ध्वनी तीव्रता असली पाहिजे.

४) परवानगीधारकाने उभारलेली इंधनज्वलन चिमणीची (धुराडी) उंची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने नमुद केलल्या मानकांप्रमाणे असेल.

५) चिमणी (धुराडे) व त्यातुन उत्सर्जित होणा-या वायूची चाचणी ठराविक कालमर्यादेनंतर मंडळाने वा शासनाने प्राधिकृत केलेल्या संस्थेकडून करुन घेणे बंधनकारक असेल. व त्या परिक्षण अहवालाची व एक प्रत आयुक्ताकडे एक आठवडयात देण्यात यावी.

६) सार्वजनिक उपद्रव प्रदुषणाबाबत परवानगी आयुक्त निर्देश वा प्राधिकृत अधिका-यांनी निर्देश केल्याप्रमाणे योग्य ती काळजी घ्यावी लागेल व उपाययोजना अमंलात आणाव्या लागतील.

आयुक्त,
मिरा भाईदर महानगरपालिका

## ( नमुना क्रमांक १ )
## उपविधी क्रमांक ३

अनुक्रमांक - अर्जाची किंमत -

## मिरा भाईंदर महानगरपालिका ( परवाना विभाग )

"मिरा-भाईंदर महानगरपालिका (मुं.प्रां.म.अ. १९४९ च्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरण्याचे) उपविधी २०१० प्रमाणे परवान्यासाठी वा परवान्याचे नुतनीकरणासाठी करावयाचा अर्ज."

( सुवाच्य अक्षरात तपशिल लिहावा )

१) (अ) अर्जदाराचे पुर्ण नाव :-

(ब) व्यापारी संस्थेचे नाव :-

(क) अर्जदाराचा संस्थेशी संबंध :-
( मालक/भागीदार/इतर )

२) अर्जदाराचा निवासी पत्ता :-
रहाते जागेचा
टे.नं. (असल्यास)

३) विनिर्दिष्ट उपयोग करावायाचा :-
आहे त्या जागेचा पत्ता

४) वरील ३ मधील जागा
मिरा-भाईंदर महानगरपालिका अथवा शासकीय :-
मालकीची आहे काय
असल्यास संबंधित वॉर्ड ऑफीसर
अथवा शासकीय अधिकाऱ्याचे
"ना हरकत प्रमाणपत्र" जोडावे.

५) ज्या वस्तुंचे साठवणुकीसाठी/ :-
धंदा वा व्यवसाय करणेसाठी
परवाना मागण्यात येत आहे.
त्या वस्तुंचे नाव व साठवणुकीची
मर्यादा (कि.ग्रॅ.मध्ये) किंवा धंदा/
व्यवसायाचे नांव.

६) साठवणुकीसाठी/धंदा व्यवसायासाठी :-
वापर करावयाच्या जागेची लांबी,
रूंदी, उंची (मिटरमध्ये )



७) जागेचा प्रकार उदा. शेड, :-
दुकान, गोदाम, कार्यशाळा,
वा मोकळी जागा.

८) इमारत अधिकृत आहे काय :-
असल्यास महानगरपालिकेकडील
वापर प्रमाणपत्राचा तपशिल.

९) परवान्याप्रमाणे साठवणुक वा :-
धंदा व व्यवसाय केव्हा सुरू
करावयाचा आहे.

(अंदाजित दिनांक )

१०) यापुर्वी या कामासाठी परवाना :- क्रमांक
घेतला असल्यास परवान्याचा तपशिल :- दिनांक

११) अर्ज केवळ नुतनीकरणासाठी :- क्रमांक
असल्यास पुर्वीच्या परवान्याच्या मुदत :- मुदत
तपशिल

१२) (अ) विस्फोटक अधिनियम १८८५ नुसार घेतलेल्या परवान्याच्या तपशिल — क्रमांक, परवान्याचा दिनांक/मुदत

(ब) पेट्रोलिन्यम अधिनियम १९३४ नुसार घेतलेल्या परवान्याचा तपशिल — क्रमांक, परवान्याचा दिनांक/मुदत

१३) अर्जदारास महापालिकेची कोणत्याही प्रकारची बाकी देणे आहे काय

१४) वरील (क्र.३) मध्ये दर्शविलेल्या जागेत साठवणुकीच्या वा धंदा वा व्यवसायाच्या परवान्यासाठी यापुर्वी अर्ज नांमजुर झाला असल्यास त्याचा तपशिल.

## अर्जदाराचे प्रतिज्ञापन

वर देण्यात आलेला तपशिल माझ्या माहीती व समजुतीप्रमाणे बरोबर असुन खरा आहे. अर्जातील तपशिल चूक आढळून आल्यास परवाना रद्द केला जाईल याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराची**
**सही/-**

**दिनांक –**



## अर्जदारास सूचना –

१) अर्जातील सर्व रकान्यात सुवाच्च अक्षरात/टंकलिखित करुन माहिती भरावी.
(महापालिका कार्यालयातून पुरविलेलाच अर्जाचा नमुना वापरावा लागेल.)

२) अर्जासोबत परवाना नुतनीकरण फी भरल्याची पावती जोडावी लागेल.

D:\...DATA\UPVIDHI\General Meeting ... UPVIDHI KARKHANYACHE NIYAM.doc

३) अर्जात दिलेला कोणताही तपशील चूक किंवा खोटा असल्याचे निर्देशनास आल्यास उपविधी ३ (८) चे तरतुदीनुसार परवाना रद्द केला जाईल व परवाना फी परत दिली जाणार नाही.

४) हा अर्ज भरुन सादर करणे ही परवाना दिला जाईल या बाबतची हमी समजता येणार नाही. कायदेशीर परवान्याशिवाय साठा करता न येणाऱ्या वस्तूचा साठा करणे तसेच परवान्याशिवाय जो धंदा वा व्यवसाय करणे बेकायदेशीर आहे, तो करणे याबाबच्या नियमांच्या उल्लंघनाच्या कार्यवाहीस अर्जदार पात्र ठरेल.

५) देण्यात येणारा परवाना ‘मिरा भाईंदर महानगरपालिका ( विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी जागा वापरण्याचे) उपविधी २००५” च्या तरतुदीनुसार असेल.

६) संस्था, कंपन्या, सहकारी संस्था वगैरेना संस्था प्रमुखांची माहिती द्यावी लागेल.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पोचपावती

क्रमांक :-

दिनांक ------------------------ रोजी -----------------------------------
श्री./श्रीम.-----------------------------------------------------------------
राहणार ----------------------------------------------------------------------
यांचेकडून ------------------------------------परवान्यासाठी दिलेला अर्ज मिळाला.

अर्ज स्विकारणाराची सही,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी द्यावयाचा

## परवाना

### (उपविधी ३ (५))

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा ५९) च्या कलम ३७६ पोटकलम (१) कंडिका (अ) व कलम ३८६ (१) तरतुदीनुसार

श्री. ---------------------------------------- राहणार ---------------------------
------------------------------------------- यांना (परवाना दिलेल्या जागेचा पत्ता) या ठिकाणी

* खाली नमूद केलेल्या वस्तू त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत साठविण्यासाठी –
* मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३७६ च्या पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या खालील धंद्यासाठी/व्यवसायासाठी (* वरीलपैकी नको असलेला मजकूर खोडावा )

मिरा भाईंदर महानगरपालिका ( विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी जागा वापरणे) उपविधी २००५ च्या तरतुदीनुसार हा परवाना खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

### ।। अटी व शर्ती ।।

१) या परवान्याची मुदत दि. पर्यंत असेल. परवानाधारकाला " मिरा - भाईंदर महानगरपालिका (विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी जागा वापरण्याचे) उपविधी २००५ च्या तरतुदींचे पालन करावे लागेल.

२) परवान्यात नमूद केलेल्या वस्तूशिवाय इतर कोणतीही वस्तू परवाना दिलेल्या जागेत ठेवता वा साठवता येणार नाही.

३) नागरिकांचे त्यांच्या मिळकतीचे संरक्षण करण्याचे उद्देशाने व नागरिकांना उपद्रव होऊ नये यासाठी परवान्यातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

४) यंदा कदाचित आगीचा प्रादुर्भाव झाल्यास अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या सुचनांचे पालन करून परवानाधारक तो आग विझविण्यासाठी व इतरत्र पसरु न देण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना तात्काळ अवलंबील.

५) परवाना दिलेल्या जागेचा उपयोग मानवी वस्तीसाठी वा जनावरे वा पक्षी ठेवण्यासाठी करता येणार नाही.

६) आग पेटविणे वा ज्यामुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होईल अशी कोणतीही कृती परवानाधारक परवाना दिलेल्या जागी करणार नाही.

७) परवाना दिलेल्या जागेच्या बाहेर ठळक जागी खालील तपशिल दर्शविणारा फलक लावणे परवाना धारकावर बंधनकारक राहील.

१) परवानाधारकाचे नाव व पत्ता

२) परवान्याचा क्रमांक व त्याची मुदत

३) साठी करण्यात आलेल्या वस्तुंची नावे

४) परवानाधारकाच्या गैरहजेरीत नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तीने नाव पत्ता

८) साठा करावयाच्या वस्तुंची व्यवस्थित पुडकी/पॅकिंग बनवून त्या प्रत्येक पुडक्यावर आतील वस्तुंचे नाव/व्यापारी नाव व वजन लिहिण्याचे बंधन परवानाधारकावर असेल.

९) परवाना दिलेल्या जागेत कोणतेही संरचनात्मक बदल करण्यापुर्वी परवानाधारकाला आयुक्तांची लेखी परवानगी घ्यावी लागेल.

१०) परवाना मिळालेल्या वस्तुंच्या साठ्याच्या हिशोबाचे रजीस्टर (नमुना क्र.३) अद्यावत ठेवण्याची जबाबदारी परवानाधारकांवर राहील. आयुक्त/प्राधिकारी अधिकाऱ्याने/ कर्मचाऱ्याने तपासणीसाठी मागणी केल्यास ते हजर करावे लागेल.

११) महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी भेट दिल्यावर परवानाधारकाला द्यावयाच्या सुचनांसाठी नमुना क्र. ४ मध्ये "भेट/सुचना रजीस्टर" परवानाधारकाला ठेवावे लागेल.

१२) नमुना क्र. ३ व ४ ची रजीस्टरे वापरण्यापुर्वी परवाना विभागाकडून प्रत्येक पानाचे जोडावर शिक्का मारुन घेवून रजीस्टर मध्ये एकूण किती पाने आहेत त्यांचे प्रमाणपत्र नोंदवून घ्यावे लागेल.

१३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३७६ त्या तरतुदीनुसार दिलेल्या या परवान्याव्यतिरिक्त अन्य कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने कोणत्याही अधिनियमाखाली घ्याव्या लागणाऱ्या परवान्याची जबाबदारी परवानाधारकावर असेल.

१४) परवानाधारकाने खालील नावे दर्शविलेल्या व्यक्तींना हा परवाना दिलेल्या जागेसाठी उपविधी ७ (१)
(अ) प्रमाणे प्राधिकृत केले आहे.

१)

२)

३)

४)

५)

परवाना देणाऱ्या सक्षम
प्राधिकाऱ्याची सही व पदनामाचा
शिक्का.

महापालिकेचा शिक्का दिनांक

| अ.क्र. | परवाना फी वसुलीचा पावती क्र. | दिनांक | नुतनीकरण मुदत | नुतनीकरण करणाऱ्या अधिकाऱ्याची सही व पदनामाचा शिक्का |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |

टिप :- १) नुतनीकरणासाठी द्यावयाचा अर्ज मुदत संपण्यापुर्वी किमान एक महिना अगोदर द्यावा लागेल.

२. नमुन क्र. १ मध्ये देवून त्यासोबत नुतनीकरणाची फी जमा केल्याची पावती जोडावी लागेल.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

329

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र.: (१००) "महानगरपालिकेच्या जागेतुन काढुन टाकणे विनिमय २०११" मसुद्यास अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

ठराव क्र :- (१०४)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "महानगरपालिकेच्या जागेतुन काढुन टाकणे विनिमय २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर नियमांबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर नियमांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- (सौ. प्रभात पाटील) अनुमोदक :- (डॉ. आशिष शेट्ये)

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

330

100

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे विनियम २०१०

B37

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८१ - आय च्या तरतूदीप्रमाणे करण्यात आलेले विनियम

## प्रारूप विनियम

१. **संक्षिप्त नामाभिधान व लागू होण्याची तारीख**

१) हया विनियमांना "मिरा-भाईंदर महानगरपालिका (महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१०" असे संबोधण्यात येईल.

२) हे विनियम दि. / / २०११ पासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :-**

१) संदर्भात व विषयांत काहीही प्रतिकूल नसल्यास या विनियमात

अ) "महानगरपालिकेच्या जागा" म्हणजे महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा तिच्याकडे विहित असलेल्या किंवा महानगरपालिकेने पट्टयाने घेतलेल्या कोणत्याही जागा

ब) "अनधिकृत भोगवटा" म्हणजे महानगरपालिकेच्या जागेच्या बाबतीत भोगवटा करण्याचा अधिकार नसताना त्या जागांचा कोणत्याही व्यक्तीने केलेला भोगवटा यामध्ये ज्या प्राधिकारान्वये जागेचा भोगवटा करण्याची परवानगी देण्यात आली असेल तो प्राधिकार संपल्यानंतर किंवा तो रीतसर समाप्त करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने जागांचा भोगवटा चालू ठेवणे यांचा समावेश असेल.

क) "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा ५९)

ड) "आयुक्त" म्हणजे अधिनियमाचे कलम ३६ अन्वये नेमलेला अधिकारी यात, कलम ३९ अन्वये नेमलेल्या हंगामी अधिकाऱ्याचा वा या विनियमांखालील अधिकार प्रदान केलेल्या अन्य अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

इ) "नमुना" म्हणजे या विनियमांना जोडण्यात आलेला नमुना.

३. **अधिनियमाच्या कलम ८१ - ब व ८१ – क प्रमाणे द्यावयाच्या नोटीसींचा नमुना**

१) अधिनियमाच्या कलम ८१ - ब च्या पोटकलम (२) प्रमाणे द्यावयाच्या कारणे दाखवा नोटीसा नमुना क्र. (१ - अ) वा (१ - ब) वा ( १ – क) मधील नमुन्यात देण्यात येईल.

332

२) अधिनियमाच्या कलम ८१ - ब च्या पोटकलम (१) च्या तरतूदीप्रमाणे द्यावयाची नोटीस नमुना क्र. २ मधील नमुन्यात देण्यांत येईल.

३) अधिनियमाच्या कलम ८१ – क च्या पोटकलम (१) च्या तरतूदीनुसार द्यावयाची नोटीस नमुना क्र. ३ मधील नमुन्यात देण्यात येईल.

४) अधिनियमाच्या कलम ८१ – क च्या पोटकलम (२) च्या तरतुदीनुसार द्यावयाची नोटीस नमुना क्र. ४ मधील नमुन्यात देण्यात येईल.

५) अधिनियमाच्या कलम ८१ – क च्या पोटकलम (४) च्या तरतुदीनुसार द्यावयाची कारणे दाखवा नोटीस नमुना क्र. ५ मधील नमुन्यात देण्यात येईल.

४. **नोटीस बजावण्याची रीत :-**

विनियम ३ मध्ये उल्लेख केलेल्या सर्व नोटीसा अधिनियमाचे कलम ४७४ च्या तरतूदीनुसार बजावण्यात येतील.

५. **चौकशीची कार्यपध्दती**

१) अधिनियमाच्या कलम ८१ - ब च्या पोटकलम (२) अन्वये नमुना क्र. १ च्या नोटीसीची विनियम ४ च्या तरतूदीप्रमाणे बजावणी केल्यानंतर, त्या नोटीसचे विहीत मुदतीत उत्तर देणे शक्य होत नसल्यास संबधित व्यक्ती त्याबाबतची कारणे नमुद करून ती मुदत वाढवून देण्याबाबत अर्ज करु शकेल.

२) पोटविनिमय (१) च्या तरतूदीनुसार आलेल्या अर्जाचा विचार करून आयुक्त ती मुदत वाढवून देऊ शकेल.

माञ नमुना क्र. १ ची नोटीस मागणी केलेल्या रक्कमेसंबधी असल्यास आयुक्तास त्याला योग्य वाटतील त्या अटींवर असा अर्ज मंजूर करता येईल.

३) नोटीस दिलेल्या व्यक्तीने सादर केलेले अर्ज व अन्य कागदपत्र हे त्या प्रकरणाच्या कागदपत्रांत दाखल करून घेण्यात येतील व अशा व्यक्तीस त्याने लेखी प्राधिकार दिलेल्या विधीव्यवसायी वा अधिवक्त्यामार्फत चौकशी प्रकरणात हजर राहता येईल.

४) अधिनियमाच्या कलम ८१ - इ च्या तरतूदीप्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार आयुक्त संबधित व्यक्तीस तिचे म्हणणे मांडण्याची व पुरावा देण्याची संधी येईल.

५) संबधीत व्यक्ती व साक्षीदार यांनी दिलेले जवाब शपथेवर असतील व ते लेखी नोंदविले जातील.

माञ जवाबातील एखाद्या विधानाबाबत अधिक स्पष्टता येणे आवश्यक आहे असे आयुक्तांचे मत झाल्यास असा जवाब संपल्यानंतर आयुक्तांस त्यासंबधी प्रश्न विचारता येतील ते प्रश्न व त्यांची उत्तरे दोन्ही लेखी नोंदविले जातील.

६) चौकशी पूर्ण झाल्यावर आयुक्त आपला निर्णय लेखी स्वरूपात व त्याबाबतच्या कारणांची नोंद करून येईल.

७) या निर्णयाद्वारे संबधित व्यक्तीचे म्हणणे आयुक्ताने मान्य न केल्यास संबधित व्यक्तिविरूध्द कलम ८१ - ब च्या पोट कलम (१) नुसार पुढील कार्यवाही आयुक्त चालु ठेवील.

६. **महानगरपालिकेच्या जागेचा ताबा घेणे.**

१) अधिनियमांच्या कलम ८१ - ब च्या पोटकलम (१) अन्वये दिलेल्या नमुना क्र. २ मधील आदेशांचे पालन करण्याचे संबधित व्यक्ती नाकारील किंवा पालन करण्यात कसूर करील तर अशा व्यक्तींस वा अडथळा करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीस त्या जागेतून काढून टाकण्याचा व त्यासाठी आवश्यक त्या बळाचा वापर करण्याचा आयुक्तास अधिकार असेल. आवश्यकता भासल्यास अधिनियमाच्या कलम ४८३ च्या तरतूदीप्रमाणे त्याला पोलिसांचे सहकार्यही घेता येईल.

२) ताबा घेण्यात आलेल्या जागेत संबंधित व्यक्तीची मालमत्ता असल्यास अधिनियमाच्या कलम ८१ - ब च्या पोटकलम (४) व (५) च्या तरतूदीप्रमाणे आयुक्त पुढील कार्यवाही करील.

७. **कलम ८१ – क अन्वये नुकसान निर्धारीत करण्याची रीत.**

१) कलम ८१ – क च्या पोटकलम (२) अन्वये नुकसान भरपाई निर्धारीत करताना खालील तत्वे विचारात घेतली जाईल.

**अ)** वापरलेल्या जागेचे क्षेत्रफळ,

**ब)** अनाधिकाराने जागेचा वापर केल्याचा कालावधी,

**क)** जागेचे निश्चित ठिकाण,

**ड)** विकास आराखडयाचे तरतूदीप्रमाणे जागेचा किंवा आजूबाजूचे परिसरातील जागेच्या वापराचा प्रकार (उदा. निवासी / व्यापारी / औद्यौगिक वगैरे)

२) वरील तत्वांवर आधारीत नुकसान भरपाईची किमान रक्कम वरील उपविनियमाच्या खंड (इ) च्या दुप्पट असेल व खंड (फ) चे उत्तर होकारार्थी असल्यास ती पांचपट असेल.

८. **अपील दाखल करण्याची रीत**

अपीलासाठी कलम ८१ - फ नुसार निर्धारीत केलेली मुदत व रीत पाळण्यांत येईल.

९. **शिक्षेची तरतूद**

३३५

या विनियमानुसार आयुक्ताला देण्यात आलेल्या कायदेशीर अधिकारांचा वापर करण्यात अडथळा आणणारी व्यक्ती सिध्दापराधानंतर अधिनियमाच्या कलम ८१ – ज नुसार तसेच कलम ४६८ च्या तरतूदीनुसार शिक्षेस पात्र होईल.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**नमुना क्र. १ अ**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ - ब खालील "मिरा-भाईंदर महानगरपालिका (महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१०" च्या विनियम ३ (१) नुसार

क्रमांक ----------

**// कारणे दाखवा नोटीस //**

**प्रति,**
श्री./श्रीमती ---------------------
-----------------------------------
-----------------------------------

**विषय :-** ----------------------------------------------------------------

**वर्णनाच्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जागेबाबत.**

दिनांक / / अन्वये ------------------------ (उक्त जागा) --------------------उपयोगासाठी
ात आली होती. दि. / / रोजी त्यासंबंधीच्या अटी व शर्तीचा करारनामा आपण करून दिला व त्यानंतर या
चा ताबा आपणांस दि. / / रोजी देण्यांत आला.

" करारनाम्याची अट क्र. --------------- खालीलप्रमाणे आहे. ----------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

----------- परंतू याबाबत आलेल्या माहितीवरून माझी अशी खात्री झाली आहे की आपण वरील अटीचा खाली
: केल्याप्रमाणे भंग केला आहे.

--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------

आपले हे कृत्य करारनाम्याचे शर्तीविरूध्द असल्याने अधिनियमाच्या कलम ८१ - ब (१) (अ) च्या तरतूदीनुसार
णांस त्या जागेतून काढून टाकून जागा रिकामी करून घेण्याचा निम्नस्वाक्षरीत यांना अधिकार आहे.

मात्र असे अंतिम आदेश देण्यापूर्वी अधिनियमाच्या कलम ८१ - ब (२) च्या तरतूदीनुसार ही कारणे दाखवा
स देण्यात येत आहे. आपणांस त्यासंबधी लेखी निवेदन देता येईल व दस्तैवज दाखल करता येतील. तसेच
लामार्फत वा प्राधिकृत व्यक्तीमार्फत आपणांस चौकशी कामी हजर राहण्याची परवानगी असेल. या चौकशीचे कामी
स्वाक्षरीत अधिनियमाचे कलम ८१ - इ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार काम पाहतील.

या कारणे दाखवा नोटीसीचे उत्तर ही नोटीस प्राप्त झाल्याचे दिनांकापासून पंधरा दिवसात निम्नस्वाक्षरीताकडे
र न झाल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

नोटीसची एक प्रत घेवुन दुसरी प्रत सही करून परत करावी.

महापालिकेचा शिक्का

दिनांक :-

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

(नमुना १ - ब)

**(अधिनियमाचे कलम ८१ - ब (२) व मिरा-भाईंदर महानगरपालिका (महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१० च्या विनियम ३ (१) अनुसार**

क्रमांक ------------------

## कारणे दाखवा नोटीस

श्री. -------------------------

-------------------------------

-------------------------------

**विषय :-** ------------------------------------------------------------

वरील वर्णन केलेली जागा मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा मालकीची आहे. तथापि, मला मिळालेल्या माहितीवरून माझी अशी खात्री झाली आहे की या जागेचा आपण --------------------------------------------------------------------------------------- कारणासाठी अनधिकृतपणे व अनधिकाराने भोगवटा करीत आहात.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा असेल) च्या कलम ८१ - ब (१) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार त्याबाबत नोटीस दिल्यापासून आपणांस एक महिन्यात ती जागा रिकामी करावी लागेल.

मात्र असे अंतिम आदेश देण्यापूर्वी उक्त अधिनियमाचे कलम ८१ - ब (२) च्या तरतूदीनुसार ही कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे. आपणांस यासंबधी लेखी निवेदन देता येईल व दस्तैवजही दाखल करता येतील. तसेच चौकशीचे कामी आपण स्वतः अगर विधी व्यवसायी वा वकिलामार्फत हजर राहण्याची आपणास परवानगी असेल. चौकशीचे काम उक्त अधिनियमाचे कलम ८१ - ई अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निम्नस्वाक्षरीत चालवतील.

या कारणे दाखवा नोटीसचे उत्तर हि नोटीस प्राप्त झाल्याचे दिनांकापासून पंधरा दिवसांत निम्नस्वाक्षरीताकडे सादर न झाल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

नोटीसची एक प्रत घेउन दुसरी सही करून परत करावी.

महापालिकेचा शिक्का

दिनांक :-

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

३३७

मिरा भाईंदर महानगरपालिका

नमुना क्र. १ (क)

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१-ब (२) व मिरा भाईंदर महानगरपालिका ( महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१० च्या विनियम ३(१) नुसार.

क्रमांक. ---------------

## कारणे दाखवा नोटीस

प्रति
श्री./ श्रीमती ------------------------------
------------------------------------------,
------------------------------------------.

**विषय :-** --------------- या वर्णनाची मिरा भाईंदर महानगरपालिकेची जागा.

वरील वर्णनाची मिरा भाईंदर महानगरपालिकेची जागा आपणास --------------- उपयोगाकरिता व मुदतीकरीता ----------------- तत्वावर देण्यात आली होती. याबाबतचा करारनामा आपण दिनांक --------------- रोजी करुन दिला होता व त्यानंतर आपणांस जागेचा रितसर ताबा दि.--------------- रोजी देण्यात आला. करारनाम्यातील अट क्र. ------------------ नुसार सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास आपणास --------------- कालावधीची नोटीस देउन ही जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ताब्यात घेण्याची तरतुद आहे. ही जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेस आता ------------------------------------------ या सार्वजनिक हिताचे प्रयोजनासाठी या जागेची आवश्यकता निर्माण झाल्याने अधिनियमाचे कलम ८१-ब (१) (क) च्या तरतुदीनुसार ही जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेला परत करण्यासंबंधीचे आदेश काढण्याचा निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले होते.

तथापि, उपरोक्त आदेश अंतिमतः देण्यापूर्वी अधिनियमाचे कलम ८१-ब(२) च्या तरतुदीनुसार ही कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे. आपणांस त्यासंबंधी लेखी निवेदन देता येईल व दस्तैवजही दाखल करता येतील. तसेच चौकशीचे कामी आपणांस विधी व्यवसायी वकिलांमार्फत हजर राहण्याची परवानगी असेल. चौकशीचे काम अधिनियमाचे कलम ८१-ई अन्वये झालेल्या अधिकारानुसार निम्नस्वाक्षरीत चालवतील.

या कारणे दाखवा नोटीसचे उत्तर ही नोटीस प्राप्त झाल्याचे दिनांकापासून पंधरा दिवसात निम्नस्वाक्षरीताकडे सादर न झाल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यास येईल.

नोटीसची एक प्रत घेउन दुसरी सही करुन परत करावी.

महापालिकेचा शिक्का

दिनांक :-

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

338

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## (नमुना क्र. २ )

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ चे कलम ८१ (ब) १.

२) मिरा भाईंदर महानगरपालिका (महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१० चा विनियम ३(२).

क्रमांक :- ------------------------
दिनांक :- ------------------------

**आदेश**

संदर्भ :- १) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. ------------------------, दि. ------------
२) अधिनियमाच्या ८१ (ब)(२) व ८१-ई नुसार झालेल्या चौकशीतील आदेश.

श्री. --------------------------------------------------------------------------------

यांना या कार्यालयाच्या संदर्भ क्र.१ नुसार त्यांच्या भोगवटयात असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ------------------------------------------------------------ या वर्णनाच्या जागेसंबंधात ------------------------------------------------------------------------ ---------------------------- ------------------------------------------------------ ---------------------------- कारणे दाखवा नोटीस दि. -------------- रोजी बजावण्यात आली होती. या नोटीसचे उत्तर देण्यासाठी व त्यांची बाजू मांडण्यासाठी श्री. -------------------- -------------- यांना पंधरा दिवसाची मुदत देण्यात आली होती.

श्री. ------------------------------------------------------------------------ यांना नोटीसच्या उत्तरात त्यांचे म्हणण्याच्या पुष्टयर्थ कोणतेही लेखी अभिवेदन दिले नाही.

श्री. ------------------------------------------------------------------------ यांना दिलेल्या दि. -------------------- च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये त्यांचे विरुध्द निदर्शनास आलेल्या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. त्यांनी त्याबाबत कोणताही खुलासा केला नसल्याने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिनियमाचे कलम ८१ ब(१) अन्वये श्री. ------------------------------ ------------------------ यांनी संबंधीत जागा ही नोटीस रीतसर बजावल्यापासून एक महिन्याचे आत रिकामी करुन महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावी.

आयुक्त
*मिरा भाईंदर महानगरपालिका*

प्रति,
------------------------------
------------------------------

339

## मिरा भाईंदर महानगरपालिका
## (नमुना क्र. ३ )

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ (ब) १.

२) "मिरा भाईंदर महानगरपालिका (महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१०" चा विनियम.

**क्रमांक :-** ----------------------------
**दिनांक :-** ----------------------------

**आदेश**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. --------------------, दि. ------------
२) अधिनियमाच्या ८१ (ब)(२) व ८१-ई नुसार झालेल्या चौकशीतील आदेश.

श्री. ----------------------------------------------------------------------------------------

यांना या कार्यालयाच्या संदर्भ क्र.१ नुसार त्यांच्या भोगवटयात असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ---------------------------------------------------------------------------- या वर्णनाच्या जागेसंबंधात ----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------- कारणे दाखवा नोटीस दि. ---------- रोजी बजावण्यात आली होती. या नोटीसचे उत्तर देण्यासाठी व त्यांची बाजू मांडण्यासाठी श्री. ------------------------------------------------------- यांना पंधरा दिवसाची मुदत देण्यात आली होती.

ज्याअर्थी श्री. ---------------------------------------------------------------------------

यांनी नोटीसचे उत्तर दिल्यानंतर त्या संबंधीची रितसर चौकशी नस्ती क्र. ------------------- मध्ये होउुन निम्नस्वाक्षरी यांनी श्री. ------------------------------------------------यांचे म्हणणे अमान्य केले आहे व श्री. ------------------------------------------------यांनी तो जागा रिकामी करुन महापालिकेचे ताब्यात द्यावी असा आदेश क्र. ---------------- दि. ------------------ प्रमाणे दिला आहे.

त्याअर्थी श्री. ------------------------------------------------------ यांना संबंधीत जागा दि. --------------------- पर्यंत स्वतःहुन खाली करुन महापालिकेच्या ताब्यात न दिल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही करुन जागेचा ताबा घेण्यात येईल.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
------------------------------
------------------------------

340

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नमुना क्र. ४

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ (क) १ व "मिरा भाईंदर महानगरपालिका (महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे) विनियम २०१०" च्या विनियम ३(३).

क्रमांक. ----------------

दिनांक:- ----------------

**आदेश**

संदर्भ :- १) या कार्यालयाची क्र. ------------ दि. ----------- ची कारणे दाखवा नोटीस.

**विषय** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेस देय भाडयाची थकबाकी.

श्री. ------------------------------------------------------------------------

राहणार ------------------------------------------------------------------------ यांना

मिरा भाईंदर महानगरपालिकेची ---------------------------------------------------- जागा

क्र. ------------------------------------------------ दि. ------------------उपयोगाकरिता देण्यात आली होती. त्यासाठी त्यांनी करारनामा करुन दिला होता. करारनाम्याची अट क्र. ------------- ------------------- प्रमाणे त्यांनी देय असलेली दरमहा भाडयाची/कराची रक्कम ------------------ तारखेपर्यंत देणे आवश्यक होते.

मात्र कार्यालयात ठेवलेल्या हिशेब पुस्तकानुसार त्याची रु. --------------- इतकी महिन्याच्या भाडयाची/कराची बाकी देय असल्याचे दिसते.

श्री. -----------------------------------------------यांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की ही थकित रक्कम त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासून दहा दिवसात महापालिका कार्यालयात जमा करुन पावती घ्यावी.

तसे न केल्यास ही रक्कम सर्वसाधारण कराची/मालमत्ता कराची बाकी ज्या पध्दतीने वसुल केली जाते त्या पध्दतीने वसुल करण्याचे आदेश का देण्यात येवू नयेत? याची कारणे ही नोटीस मिळाल्यापासून दहा दिवसात निम्नस्वाक्षरीताकडे लेखी कळवावी.

आपण असे न केल्यास आपणास काहीच म्हणावयाचे नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८१ (ब) च्या तरतुदीनुसार आपल्याला त्या जागेतून काढून टाकण्याची कारवाईही केली जाऊ शकेल याची नोंद घ्यावी.

आदेशाची एक प्रत घेउन दुसरी सही करुन परत करावी.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति,

-----------------------------

-----------------------------

३५१

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र. :- (१०१) "कुत्र्यांवरील कर विषयक नियम २०११" मसुद्यास अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

**ठराव क्र :-** (१०५)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "कुत्र्यांवरील कर विषयक नियम २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर नियमांबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर नियमांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन सदरचे नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे. तसेच वार्षिक दर पाळीव कुत्र्यांसाठी फक्त शंभर रुपये इतकाच आकारण्यात यावा.

**सुचक :-** ____________________
(स्टी. प्रभात पाटिल)

**अनुमोदक :-** ____________________
(डॉ. आसिफ शेख)

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## कुत्र्यांवरील कर नियम २०११

------------------------- दिनांक -------------------------

## प्रारुप नियम

१. **संक्षिप्त नाव :-** या नियमांना, "मिरा भाईदर महानगरपालिका (कुत्र्यांवरील कर) नियम, २०११ असे म्हणावे"

२. **व्याख्या :-** (i) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (मुंबई सन १९४९ चा ५९),

(ख) "महानगरपालिका" म्हणजे मिरा-भाईदर महानगरपालिका,

(ग) " आयुक्त" या संज्ञेत आयुक्त यांनी अधिनियमाच्या कलम ६९ (१) अन्वये अधिनियमांच्या प्रयोजनासाठी कर्तव्ये पार पाडण्याकरिता प्राधिकृत केलेला महानगरपलिकेचा कोणत्याही अधिकारीचा समावेश असेल,

(घ) "कुत्रा" या संज्ञेत कुत्री व तीन महिने किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या कुत्रीच्या पिलांचा समावेश होईल.

(ड) "नमुना" याचा अर्थ, या नियमासोबत जोडलेला नमुना,

(च) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम,

(छ) "कर" म्हणजे अधिनियमाच्या कलम १२७ चे पोट – कलम (२) खंड (क) अन्वये कुत्र्यावर बसविण्यायोग्य कर,

(ज) "वर्ष" म्हणजे १ एप्रिल रोजी सुरू होणारे आणि ३१ मार्च रोजी संपणारे वर्ष,

(झ) "झूनोटीक रोग"म्हणजे जनावरे आणि मनुष्यप्राणी यांच्यातील परस्पर संपर्कामुळे होणारे रोग,

(ii) यात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले अधिनियमात त्यांना नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे अर्थ असतील.

३. **कर भरण्यास पात्र असणारी व्यक्ती :-** नियम १४ च्या तरतुदीच्या अधीन राहुन, जी व्यक्ती महानगरपालिका क्षेत्रात आपल्या ताब्यात एखादा कुत्रा ठेवील अशी प्रत्येक व्यक्ती कर भरण्यास पात्र असेल.

४. **कराचा दर :-** प्रत्येक कुत्र्यास दरवर्षी रु. १२००/- किंवा वेळोवेळी महानगरपालिकेने ठरविलेला कर बसवण्यात येईल.

५. **कर आगाऊ भरणे :-** प्रत्येक वर्षाच्या एप्रिल महिन्यामध्ये, त्या वर्षाचा पूर्ण कर आगाऊ भरण्यात येईल.

६. परवानगीसाठी अर्ज करणे आणि कर भरण्याची पध्दत :-

(१) कोणत्याही वर्षात महानगरपालिकेच्या क्षेत्रात जिला आपल्या ताब्यात कुत्रा ठेवायची इच्छा आहे अशी कोणतीही व्यक्ती त्या वर्षाचा एप्रिल महिना संपण्यापूर्वी आपल्या ताब्यात कुत्रा ठेवण्याच्या परवानगीसाठी आयुक्ताकडे नमुना "क" मध्ये अर्ज करील.

परंतु, त्या वर्षाचा एप्रिल महिना संपल्यानंतर कोणत्याही वेळी कुत्रा ठेवण्याची इच्छा असणारी कोणतीही व्यक्ती, कुत्रा ताब्यात घेतल्यापासून सात दिवसांचे आत आयुक्तांकडे अर्ज करील.

(२) अशा प्रत्येक अर्जासोबत कराची रक्कम आणि पोट नियम (३) मध्ये निर्देशिलेला बिल्ला देण्यासाठी देय असणारी फी असेल.

(३) असा अर्ज मिळाल्यानंतर, आयुक्त त्या अर्जाची पडताळणी करेल आणि कुत्र्याची तपासणी करेल आणि नमुना "ख" मध्ये परवानगी देईल. त्यानंतर आयुक्त कुत्र्याचा अनुक्रमांक असणारा एक बिल्ला देईल.

७. **कुत्र्याचा मृत्यू, तो हरविणे, त्याला झूनोटीक रोग होणे इत्यादी बाबतची माहिती देणे :-** ज्या कुत्र्याच्या बाबतीत कोणतीही व्यक्ती कर भरण्यास जबाबदार आहे अशा व्यक्तीचा कुत्रा जर हरविला किंवा तो अन्य व्यक्तीच्या हवाली करण्यात आला किंवा त्याचे स्थलांतर करण्यात आले किंवा त्याला कोणताही झूनोटिक रोग झाला किंवा तो मृत्यू पावला तर, लायसनधारक, त्यासंबंधिची लेखी सूचना तात्काळ आयुक्तांना देईल, अशी सुचना मिळाल्यानंतर अशा कुत्र्याच्या संबंधात कर देण्याचे दायित्व नंतरच्या वर्षाच्या आरंभापासून बंद होईल. अशी सूचना न मिळाल्यास अशा व्यक्तीकडून कर वसूली करणे चालू राहील.

८. **पुढील विविक्षत प्रकरणामध्ये आणखी कर देणे आवश्यक नसेल :-**

जर कर अगोदरच भरला असेल तर, एखाद्या कुत्र्याचा ताबा ठेवण्यात कोणताही बदल झाला तर त्या वर्षात कर देय होणार नाही.

परंतु, जिच्या ताब्यात कुत्रा आला अशा व्यक्तीने, त्या कुत्र्याचा मालक म्हणून अशा व्यक्तीची नोंदणी करण्यासाठी त्या कुत्र्याच्या पूर्वीच्या मालकाला मिळालेली लेखी परवानगी आयुक्तास सादर केली तर त्या वर्षी कोणताही कर देय होणार नाही.

९. **बिल्ल्याच्या संबंधतील तरतूद :-**

(१) नियम ६, पोट – नियम (३) अन्वये पुरविण्यात आलेला बिल्ला ज्या कुत्र्याच्या बाबतीत देण्यात आलेला आहे त्या कुत्र्याच्या गळयात बांधण्यात येईल.

(२) जर असा बिल्ला हरविला तर, आयुक्त आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, आवश्यक ती फी भरल्यावर एक नवीन बिल्ला देईल.

१०. **तपासणीसाठी कुत्रा हजर करणे :-** लायसनधारक, जेव्हा केव्हा हजर करण्यास फर्माविण्यात येईल तेव्हा आयुक्तापुढे किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यापुढे कोणत्याही वाजवी वेळी, तपासणीसाठी आणि पडताळणीसाठी कुत्रा हजर करेल.

**११. कुत्र्याचे लसीकरण :-**

(१) मालक किंवा कुत्रा ताब्यात असलेली व्यक्ती तिच्या कुत्र्याला रेबीज, कॅनाइन गॅस्ट्रोएंट्राईटिस, इनफेकशिअस कॅनाइल हिपाटायसिस, डिस्टेंपर, लेप्टोस्पिरोसिस इत्यादी रोग व आयुक्ताकडून निश्चित करण्यात येतील अशा अन्य रोगांच्या संबंधात कुत्र्याला लस टोचून घेणे या प्रयोजनास्तव महानगरपालिकेकडून निश्चित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर अशी व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यात आली असेल त्या ठिकाणी आणून लस टोचून घेईल अथवा एखाद्या नोंदणीकृत पशुवैद्यकीय शल्यचिकित्सकाकडून त्या कुत्र्याला लस टोचून घेईल आणि त्या कुत्र्याला अशा प्रकारे लस टोचण्यात आली आहे असे प्रमाणपत्र नियम ६ च्या खंड (१) खालील अर्जासोबत जोडेल.

(२) तपासणी आणि पडताळणी दरम्यान निर्देश दिले असतील तेव्हा मालक कुत्र्याला लस टोचून घेईल.

**१२. तपासणी, जप्ती इत्यादी :-**

१) जर एखादा कुत्रा, कोणत्याही इमारतीतील किंवा वसाहतीतील रहिवाशांना उपद्रव देत आहे असे आढळून आले किंवा तसे कळविण्यात आले असेल तर, आयुक्त किंवा त्याने याबाबत योग्यरित्या प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, तपासणीच्या प्रयोजनासाठी कोणत्याही जागेत प्रवेश करेल आणि कुत्र्याला जप्त करु शकेल.

२) असा जप्त केलेला कोणताही कुत्रा, महानगरपालिकेच्या श्वानगृहात ठेवण्यात येईल आणि अशा जप्तीच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आत, जर कोणतीही व्यक्ती अशा कुत्र्याचा मालक आहे किंवा तो त्याच्या ताब्यातील कुत्रा आहे याबाबत आयुक्ताचे समाधान झाले तर, आयुक्त जर कोणता कर देय असेल तर तो कर भरल्यावर आणि कुत्रा पकडून ठेवल्यामुळे आयुक्ताला आलेला कोणताही खर्च दिल्यावर आणि यानंतर कुत्र्याला लायसन्सच्या शर्तीनुसार ठेवण्यात येईल आणि इमारत किंवा वसाहतीतील रहिवाशांना त्याचा उपद्रव होणार नाही अशी हमी त्या व्यक्तीने दिल्यावर, तो कुत्रा त्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्याचा आदेश देऊ शकेल.

३) कोणत्याही व्यक्तीला चावला आहे असा एखादा लायसनधारी कुत्रा जर महानगरपालिकेच्या श्वानगृहात आणला असेल तर, कुत्र्याच्या मालकाची किंवा असा कुत्रा ज्याच्या ताब्यात आहे अशा व्यक्तीची किंवा तो कुत्रा जिला चावला आहे त्या व्यक्तीची, तिच्या उबवणीच्या कालावधीत त्याला तिथे अडकवून ठेवण्याचा खर्च दिल्यानंतर, आयुक्त त्या कुत्र्याला तिथे ठेवण्याचा आदेश देऊ शकेल. कुत्र्याला अडकवून ठेवण्याची इच्छा ज्या व्यक्तीची असेल त्याने असा खर्च भरावा.

१३. नियम ७ नुसार कळविल्याप्रमाणे अगर नियम १० अंतर्गत तपासणीत अगर नियम १२ अन्वये कोणताही कुत्रा अडकवून ठेवला असताना, त्याच्या तपासणीत त्या कुत्र्याला कोणताही झुनोटीक रोग झाला असल्याचे

३५५ (४)

*आढळून आले तर, आयुक्त मालकाच्या किंवा कुत्र्याचा ताबा असलेल्या व्यक्तीच्या खर्चाने त्या कुत्र्याला* नष्ट करण्याचा आदेश देऊ शकेल.

१४. **सूट :-**

या नियमातील कोणतीही गोष्ट महानगरपालिका क्षेत्रातून जाणाऱ्या खऱ्याखुऱ्या प्रवाशांच्या जवळ असलेल्या कोणत्याही कुत्र्याला किंवा एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक नाही अशा कालावधीसाठी महानगरपालिका क्षेत्रात प्रासंगिक सातत्याने पाळण्यात येणाऱ्या कोणत्याही कुत्र्याला लागु होणार नाही.

१५. हे नियम अधिनियमच्या अनुसूचिमधील नियमांस (असल्यास) अतिरिक्त नियम होतील.

१६. **निरसन व व्यावृत्ती :-** महानगरपालिकाकडून कर बसविण्यास आरंभ झाल्यापासून अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी महानगरपालिका क्षेत्रात अंमलात असतील असे महानगरपालिकाकडून असा कर बसविण्यासंबंधातील कोणत्याही नावांने संबोधण्यात येणारे नियम अथवा उप-विधी निरसित होण्यापूर्वी त्या अन्वये केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टी संबंधात असेल ते खारीज करुन त्या क्षेत्रात निरसित होतील.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

5

346

# नमुना 'क'

प्रति,

मा. आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका
भाईंदर, यांस.

अर्जदाराचे नाव :-

**राहणार (ठिकाणाचे नांव) :-**

महोदय,

मी ब्लॉक क्रमांक ------------------------------ वॉर्ड क्रमांक ----------------------------------------
---------------------------------------- येथे रहात असून ----------------------------------------
-------------------- या वर्षात नगरपालिका क्षेत्रात पुढील वर्णनाचा कुत्रा माझ्याजवळ बाळगण्याची माझी इच्छा आहे.

वर्णन :

कुत्रा / कुत्री :

वय :

**जात :**

**रंग आणि ओळख चिन्हे, कोणतीही असल्यास :**

कुत्र्यांवरील करासंबंधी नगरपालिकेचे उपविधी मी वाचलेले आहेत. मी त्यांचे पालन करीन, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे उपबंधसुध्दा विशेषत: कलम १२७, अनुसूचि 'ड', प्रकरण ८ मधील नियम २२ व २३ मी वाचले आहेत. उक्त कुत्र्याच्या संबंधातील कर रुपये -------------------- रक्कम मी याद्वारे आगाऊ जमा करीत आहे आणि ३१ मार्च २०------------- ला संपणाऱ्या वर्षात नगरपालिका क्षेत्रात माझ्याजवळ कुत्रा बाळगण्यासाठी मला उपरोक्त उपविधीखालील आवश्यक ती परवानगी देण्यात यावी अशी विनंती करीत आहे.

दिनांक

अर्जदाराची सही

३४७

# नमुना 'ख'

श्री / श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------ यांस, उक्त नियमान्वये त्यांना पुरवण्यात आलेला बिल्ला, कुत्र्याच्या गळयातील पटयात नेहमी अडकवून ठेवण्यात येईल आणि अधिनिमय व त्यातील नियमातील आवश्यक त्या शर्तीचे यथोचितरीत्या पालन करण्यात येईल, या शर्तीस अधीन राहून ------------------------ २०११ पासून प्रारंभ होणाऱ्या वर्षाच्या मुदतीत, खाली देण्यात आलेल्या वर्णनाचा कुत्रा, ---------------------------------------- महानगरपालिकेच्या क्षेत्रात जवळ बाळगण्यासाठी याद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

वर्णन :

कुत्रा / कुत्री :

वय :

जात :

रंग :

बिल्ला क्र. :

श्री / श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------ यांस याद्वारे असा आदेश देण्यात येत आहे की, आयुक्त, मिरा भाईंदर महानगपालिका याजकडून अथवा या बाबतीत त्याच्याकडून यथोचित प्रकारे लेखी प्राधिकृत करण्यात येईल अशा कोणत्याही व्यक्तीकडून उक्त वर्षाच्या मुदतीत मागणी करण्यात आल्यावर, हे परवाना पत्र सादर करण्यात यावे.

दिनांक

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

358

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

प्रकरण क्र.: (१०२) मिरा-भाईंदर महानगरपालिका (परवानाधारक सर्वेक्षक, वास्तु शास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, संरचना संकल्प-चित्रकार, बांधकाम लिपिक व नळकारागिर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे ) या संबंधी उपविधी २०११ " मसुद्यास अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.

ठराव क्र :- (१०६)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "मिरा-भाईंदर महानगरपालिका परवानाधारक सर्वेक्षक, वास्तु शास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, संरचना संकल्प-चित्रकार, बांधकाम लिपिक व नळकारागिर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे या संबंधी उपविधी २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदर उपविधीमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- (सौ. प्रभात पाटील)

अनुमोदक :- (डॉ. आसिफ शेख)

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

मा. महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

३५९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

"परवानाधारक सर्वेक्षक,वास्तु शास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, संरचना संकल्प-चित्रकार, बांधकाम लिपिक व नळकारागीर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे" यासंबधी उपविधी २०११

३५० ②

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८ (१८) अंतर्गत परवानाधारक (सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, संरचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळ कारगीर यांच्या अहर्ता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे याबाबतचे उपविधी) २०११

१. **शिर्षक व आरंभ :-**

(१) या उपविधीला **"मिरा-भाईंदर महानगरपालिका परवानाधारक (सर्वेक्षक,वास्तु शास्त्रज्ञ, स्थापत्या अभियंता, रचना संकल्प-चित्रकार बांधकाम लिपिक व नळकारागीर यांची अहर्ता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे) यासंबधी उपविधी २०११"** असे म्हणण्यात येईल.

(२) हे उपविधी राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन अंमलात येतील.

२. **व्याख्या :**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधिमध्ये –

(१) (अ) **"अधिनियम"** म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९,

(ब) "महानगरपालिका" म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका,

(क) "आयुक्त" म्हणजे महानगरपालिकेचे आयुक्त,

(ड) "महानगरपालिका" म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका,

(ई) "परवानाधारक सर्वेक्षक" म्हणजे परवानाधारक अभियंता, परवानाधारक वास्तुशास्त्रज्ञ, परवानाधारक संरचना संकल्प चित्रकार, परवानाधारक बांधकाम लिपिक, परवानाधारक बांधकाम लिपिक, परवानधारक नळ कारगीर, (या उपविधीमध्ये संक्षित्पात परवानाधारक म्हणून देखील संबोधलेले) म्हणजे अशी व्यक्ती जिच्याकडे उपविधी मध्ये नमूद केलेली

अशी अर्हता आणि अनुभव असेल आणि जिला या उपविधी अंतर्गत परवाना देण्यात आलेला अगर परवान्याचे नवीकरण करण्यात आले असेल.

(फ) *"शासन मान्य विद्यापीठ" या संज्ञेत केंद्र शासन, प्रांतिक शासन अथवा* राज्य शासन यांच्या अधिनियमाव्दारे स्थापित करण्यात आलेले विद्यापीठ, मुक्त विद्यापीठ, अथवा उच्च शिक्षण देणारी स्वायत्त संस्था अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठ आयोग अधिनियम १९५६ च्या कलम २ (एफ) अंतर्गत मान्यता दिलेले विद्यापीठ अथवा उक्त अधिनियमांच्या *कलम ३ अंतर्गत* केंद्र शासनाला शिफारस केल्यानुसार केंद्र शासनाने मान्यता दिलेले मानीव विद्यापीठ, उच्च शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था अथवा शासनाच्या ओदश/अधिसूचना अन्वये मान्यता अगर स्वायत्तता दिलेल्या उच्च शैक्षणिक संस्था अथवा राष्ट्रीय संस्थेच्या दर्जा दिलेल्या संस्था अथवा परदेशातील विद्यापीठ जिची पदवी/पदविका भारतातील शासन मान्य विद्यापीठाच्या पदवी/ पदविकेशी समतुल्य असल्याबाबत केंद्र शासनाची मान्यता असेल.

(२) या उपविधी मध्ये वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न दिलेल्या शब्दांना किंवा शब्द प्रयोगांना अनुक्रमे अधिनियमात नेमुन दिलेले अर्थ असतील.

**३. परवानाधारक सर्वेक्षकाची शैक्षणिक पात्रता व अनुभव :-**

(१) अधिनियमांच्या कलम ३७२ अन्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणीही व्यक्तीची खालील प्रमाणे ठरविण्यात आलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असल्यशिवाय तिला सर्वेक्षक म्हणुन आयुक्तांकडुन परवाना दिला जाणार नाही.

(अ) *कोणत्याही शासनमान्य विद्यापीठ स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी आणि* परवानधारक सर्वेक्षक संस्थेमध्ये इमारतीचे बांधकाम आणि नकाशे बनविण्याचा किमान १ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.

अथवा

(ब) भारतीय अभियांत्रिकी संस्था (Institute of Architects) अथवा भारतीय वास्तुशास्त्रज्ञ संस्था (Indian Institute of Architects) जिचे पदवी समान मानले जाणारे सहायोगी (Associates) सदस्यत्व प्राप्त आणि इमारतीचे बांधकामाचा व नकाशे बनविण्याचा किमान १ वर्षांचा अनुभव

अथवा

(क) कोणत्याही शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकांची पदविका आणि परवानाधारक सर्वेक्षक संस्थेमध्ये बांधकामाचा व नकाशे बनविण्याचा किमान ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.

अथवा

(२) कोणीही सर्वेक्षक ज्यास हे उपविधी अंमलात आल्याच्या दिनांकापुर्वी सलग पाच वर्षे मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडुन सर्वेक्षक म्हणुन परवाना देण्यात आला आहे, अथवा ज्याच्याकडे सर्वेक्षण आणि बांधकामाचा किमान पाच वर्षाचा प्रत्यक्ष अनुभवा आहे, अशा व्यक्तीस जर तिने महानगरपालिकेचे शहर अभियंता यांनी घेतलेल्या प्रात्यक्षिक परीक्षा उत्तीर्ण केल्यास, आयुक्त तिला सर्वेक्षकाचा परवाना देऊ शकेल.

**४. परवानधारक वास्तुशास्त्रज्ञ :-**

अधिनियमातील कलम ३७२ अन्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणीही व्यक्तीची खालील प्रमाणे ठरविलेली शैक्षणिक अर्हता असल्याशिवाय आयुक्तंकडफन वास्तुशास्त्रज्ञ म्हणून परवाना दिला जाणार नाही.

भारताची वास्तुशास्त्रज्ञ परिषद, नवी दिल्ली (Council of Architecture) कडे वास्तुशास्त्रज्ञ म्हणुन नोंदविलेली व्यक्ती.

**५. परवानाधारक स्थापत्य अभियंता :-**

अधिनियमातील कलम ३७२ अन्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणीही व्यक्तीची खालील प्रमाणे ठरविलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असल्याशिवाय आयुक्तांकडून स्थापत्य अभियंता म्हणुन परवाना दिला जाणार नाही.

(अ) कोणत्याही शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी आणि बांधकाम/संरचना कामाचा किमान १ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.

अथवा

(ब) भारतीय अभियांत्रिकी संस्था (Institution of Engineers जिचे पदवीसमान मानले जाणारे सहयोगी (Associate) सदस्यत्व मिळालेले आहे आणि बांधकाम / संरचना कामाचा किमान १ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.

अथवा

(क) कोणत्याही शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीची पदविका आणि बांधकाम/संरचना कामाचा १० वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.

६. **परवानाधारक संरचनासंकल्प - चित्रकार :-**

अधिनियमाच्या कलम ३७२ अन्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणीही व्यक्तीस आर.सी.सी. व स्टील संरचनेचे रचना संकल्प चित्रकार म्हणून काम करण्यास खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असल्याशिवाय आयुक्तांकडून परवाना दिला जाणार नाही.

(अ) कोणत्याही शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य अथवा रचनाकार अभियांत्रिकी पदवी आणि आर.सी.सी रचना संकल्पचित्र बनविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

अथवा

(ब) भारतातील अभियांत्रिकी संस्थांचे (Institution of Engineers) संरचनाकार अभियांत्रिकी हा विशेष विषय घेवुन परिक्षा उत्तीर्ण करून प्राप्त केलेला सहयोगी (Associate) सदस्यत्व आणि रचनाकार संकल्पचित्रे बनविण्याचा आणि आर सी सी संरचनाच्या कामाचा किमान ३ वर्षाचा पुरावा प्रत्यक्ष अनुभव.

७. **बांधकाम लिपिक :-**

बांधकाम लिपिक म्हणून काम करू इच्छिणाऱ्या कोणीही व्यक्तीने जर अधिनियमाच्या कलम ३७२ अन्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणीही व्यक्ती

३५१ (६)

जर परवानाधारक सर्वेक्षकाकडे किमान पाच वर्षे संबंधित सर्वेक्षकाचा समाधान झाले असे काम केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास आणि जो किमान एस एस सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता धारण करणारा असेल तर आयुक्त तिला बांधकाम लिपिक म्हणून परवाना देवु शकेल.

**८. परवानधारक नळ कारागीर :-**

(१) अधिनियमाच्या कलम ३७२ अन्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणीही व्यक्तीस नळ कारागीर म्हणून काम करण्यासाठी आयुक्ताकडून परवाना दिला जाणार नाही, जोपर्यंत त्या व्यक्तीकडे कोणत्याही शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीची अथवा सॅनिटरी अभियांत्रिकीची पदवी अथवा पदविका असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीकडे खंड (१) मध्ये अर्हता नसल्यास तिला आयुक्त नळ कारागीर म्हणून परवाना देवु शकेल,

जर –

(अ) हे उपविधी अंमलात येण्याच्या लगतपूर्वी त्या व्यक्तीला महानगरपालिकेकडून सलग तीन वर्षे नळ कारागीचा परवाना दिला गेला असेल,

(ब) तिच्याकडे किमान तीन वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा व्यापक अनुभव असेल आणि तिच्याकडे स्थानिक संस्था अथवा शासनाच्या आरोग्य विभागाने दिलेला परवाना असेल परंतू असे की आयुक्त त्या व्यक्तीला परवाना देण्यापूर्वी सौध्दान्तिक चाचणी - उत्तीर्ण करण्यास सांगेल.

**९. परवान्याकरीता करावयाचे अर्ज :-**

(१) परवानाधारक सर्वेक्षक अथवा परवानाधारक स्थापत्य अभियंता अथवा परवानाधारक वास्तुशास्त्रज्ञ अथवा परवानाधारक संरचना संकल्प - चित्रकार अथवा परवानाधारक बांधकाम लिपिक अथवा परवानाधारक नळ कारागीर म्हणून म्हणून काम करण्यास व यासाठी परवाना घेवु इच्छिणाऱ्या व्यक्तीने

खालीलप्रमाणे माहीती भरून व त्या सोबत लागणाऱ्या कागदपत्रांसह आयुक्त यांना लेखी अर्ज सादर केला पाहीजे.

(अ) अर्जदाराचे पूर्ण नाव, पत्ता आणि शैक्षणिक अहर्तेचा तपशिल,

(ब) ज्या कामासाठी परवाना हवे आहे त्या करीता उपविधीनूसार लागणाऱ्या अनुभवाबाबतचा पुरावा.,

(क) अर्जदाराचे कार्यालयाचे स्थान,

(ड) अर्जदाराने किंवा त्याच्या कार्यालयाने नेमणूक केलेल्या (अ) आरेखक (ब) अनुरेखक (क) कामनिरिक्षक (ड) मिस्त्री यांनी करावयाच्या कामासंबंधीच्या अर्हेतसह माहीती.

(२) अर्जदाराने त्यांच्या अर्जासोबत रू. ________ चे परवाना शुल्क महानगरपालिका कार्यालयात भरणे आवश्यक राहील.

## १०. परवाना देणे व परवान्याची मुदत :-

(१) आयुक्त अर्जाची व त्या सोबतच्या दस्तऐवजाची छाननी करून व अर्जावर विचार केल्यावर आयुक्तांचे समाधान झाल्यास सोबत जोडलेला नमुना "अ" मध्ये परवाना देवु शकेल.

(२) या उपविधी अंतर्गत दिल्या जाणाऱ्या परवान्याची मुदत १ वर्षाची अगर त्यथास्थिती त्या वर्षात/पुढील वर्षात ३१ मार्च पर्यंतची राहील.

## ११. परवान्याचे नुतनीकरण :-

(१) परवानाधारकाने प्रत्येक वर्षी १५ मार्च नुतनीकरणाचे शुल्क रू.________ आयुक्ताकडे भरून नुतनीकरण करण्याचा अर्ज केला पाहीजे.

(२) परवान्याचे नवीकरणाचा अर्ज प्राप्त झाल्यावर, जर आयुक्तांच्या मते परवानाधारकाने, परवान्याच्या मुदतीत परवान्याच्या अटी व शर्ती प्रमाणे काम केले असेल तर आयुक्त परवान्याचे नुतनीकरण करू शकेल.

356 (८)

(३) परवानाधारकाने परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी आवश्यक शुल्कासह अर्ज केला असल्यास आयुक्ताकडून परवाना दिले जाईपर्यंत अगर नाकारले जाईपर्यंत तो परवान्यासह काम करीत असल्याचे मानले जाईल.

१२. **परवान्याची दुसरी प्रत :-**

रु. _________ ते शुल्क भरल्यावर नवीकरण आणि मुळ परवाना हरवल्याच्या कारणांची नोंद घेउन परवान्याची दुसरी प्रत (Duplicate Copy) देता येईल.

१३. **परवान्याच्या अटी :-**

(१) परवाना या अटीच्या अधीन दिला जाईल की, परवाना धारकाने आयुक्ताला अधिनियम आणि बांधकाम परवानगीच्या अटींची पुर्तता करण्यास त्याच्याकडून आवश्यक असे सहाय्य करणे आवश्क राहील.

(२) जर आयुक्ताच्या मते परवानाधारक गैरव्यवहार अगर व्यावसायिक दृष्टया दुर्लक्ष करीत असल्याचे आढळल्या गेल्यास, आयुक्त त्यांना सुनावणीची योग्य ती संधी देउन त्याचा परवाना

**(अ)** रद्द करू शकेल.

**(ब)** परवान्याची मुदत चालू असता उर्वरित कालावधी करीता तो निलंबित करू शकेल आणि तद्नंतर त्याचा परवान्यचे नुतनीकरण करण्यास नाकारू शकेल.

१४. **परवान्याशिवाय परवान्याचे आवश्यक असलेली कामे करण्यास प्रतिबंध :-**

अधिनियम अगर महानगरपालिकेच्या बांधकाम नियमावली अंतर्गत ज्या बाबींसाठी परवानाधारक सर्वेक्षक, परवानाधारक वास्तुशास्त्रज्ञ, परवानधारक स्थापत्य अभियंता, परवानाधारक रचना संकल्प चित्रकार आणि परवानधारक नळ कारागीर यांनी काही कृती करावयाचे आवश्यक असेल असे काम या उपविधी अंतर्गत परवाना न घेतलेल्या व्यक्तीकडून करता येणार नाही.

३५७

१५. **निरसन व व्यावृत्ति :-**

महानगरपालिकेकडून अथवा या पूर्वीच्या नगरपालिकेकडून यापूर्वी या उपविधी मधील विषयासंबंधीचे अमलात असलेल्या उपविधी, या उपविधी अमलात आल्यावर निरसित होतील. परंतू त्यामुळे पूर्वीच्या उपविधी अंतर्गत करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीवर किंवा कार्यवाहीवर परिणाम होणार नाही.

## नमुना "अ"

३१ मार्च ____________ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी परवाना क्र. ________

मिरा भाईंदर महानगरपालिका याद्वारे खाली नमुद केलेल्या व्यक्ती/व्यवसाय संस्थेस ____________________ (सर्वेक्षक, अभियंता, वास्तुशास्त्रज्ञ, रचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपिक, नळ कारागीर जो लागू असेल तो नमुद करावा)

चा व्यवसाय करण्यासाठी महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ (१८) अन्वये बनवलेल्या उपविधींनूसार, परवाना देत आहे.

हा परवाना ३१ मार्च ________ पर्यंत वैध राहील. उपविधीच्या शर्तीचा भंग करण्यास आल्यास हा परवाना रद्द केला जाउु शकतो.

(अ) हा परवाना परवानाधारक ________________________ (येथे सर्वेक्षक इ. ________ नमुद करावे) व्यक्ती/व्यवसाय संस्थेने नेहमी सोबत बाळगावा व मागणी करण्यास आल्यावर दाखवावा.

(ब) जेव्हा परवानाधाक आपला व्यवसाय बंद केले असेल तसेच नवीकरण अथवा रद्द करतेवेळी महानगरपालिकेस हवाली करावा.

परवानधारक व्यक्ती/व्यवसाय संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता :-

परवानाधारक व्यक्ती/व्यवसाय संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशील.

(१) आरेखक

(२) अनुरेखक

(३) काम निरिक्षक

(४) मिस्त्री

358 (50)

परवाना जारी केल्याची तारीख

या परवान्याचे ____________________ पर्यंत नवीकरण करण्यात आले.

नवीकरण करणाऱ्या प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी

१. ३१ मार्च ____________________

२. ३१ मार्च ____________________

३. ३१ मार्च ____________________

४. ३१ मार्च ____________________

५. ३१ मार्च ____________________

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

359

## // ठराव //

**प्रकरण क्रमांक (१०३)** :- दहिसर चेकनाका येथे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत मुख्य हायवेवर अतिरिक्त कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक** (१०८)

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतलगत मुंबई महानगरपालिका हद्दीत असलेल्या कल्वर्ट मधून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून पाणी येऊन सृष्टी जाफरी खाडीत जातो. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून महाविष्णू मंदीर जवळील नाल्यात येणारे पाणी दहीसर चेकनाका येथील नाल्यात वळविल्यास पंजाब फाऊंडी, मिरागाव येथील नाल्यावरचा ताण कमी होईल. तथापी हायवेवर दहीसर चेकनाका येथील कल्वर्ट शेजारी अतिरिक्त कल्वर्ट बांधावे लागेल. सदर कल्वर्ट बांधण्याकरिता रु. ८२,१३,९५०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कल्वर्ट बांधण्यास मुंबई महानगरपालिकेची परवानगी मिळालेली आहे. सदर कल्वर्ट मधून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून येणारे पावसाचे पाणी वाहून राजू इंडस्ट्रीयल इस्टेटच्या नाल्यातून पुढे जाफरीकडे जाऊन मिळतो. सदर खर्चाकरीता तरतूद उपलबध असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- (सही) सौ. प्रभात पाटिल

अनुमोदन :- (सही) श्री. राजेश म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

(सही)

**पिठासन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि.३०/१२/२०११

360

**प्रकरण क्र. ( १०४ )** छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर पंजाब फाउंड्री (झंकार कंपनी) येथे वाढीव कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्रमांक ( १०८ )

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरागावठण, महाजनवाडी या भागातून पावसाचे पाणी कच्या नाल्यामार्फत रा.म.क्र. ०८ येथून मुन्शीकंपाउंड व कृष्णस्थळ मार्गे काशिमिरा रोडवरील झंकार उघाडी येथून पुढे खाडीकडे वाहते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, डोंगराळ भागातील पावसाचे पाणी मोठया प्रमाणात मुन्शींकंपाउंड व कृष्णस्थळ येथिल सखल भागात साचून दरवर्षी येथिल नागरिकांना पुरजन्य परिस्थिती व मोठया समस्यांना सामोरे जावे लागते. या भागातील मोकळया जागेत मातीभराव झालेला असून कच्चे नाले कमी रुंदीचे आहेत. सदर ठिकाणी पावसाळयात साठणारे पावसाचे पाणी सहज निचरा होणे करीता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाउंड्री येथिल कल्वर्टची कमी असलेली क्षमता वाढवणे आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी अतिरीक्त कल्वर्ट बांधणे आवश्यक आहे.

वरील कामाकरीता रु.७३,२५,३००/- एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- प्रशांत दळवी

अनुमोदन :- ~~आनंद पाटील~~ वंदना चक्रे

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

१०३ 261

# मिराभाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०.१२.२०११

प्रकरण क्रं. (१०५) मिरा भाईदर महानगरपालिकात भरत्या प्रकरण दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे बाबत.

ठराव क्रं. (१०९)

मिराभाईदर महानगरपालिकेत मोठया प्रमाणात सन २०११ मध्ये वैद्यकिय, कर्मचारी व अग्निशमन विभागात अधिकारी व कर्मचारी अशा भरत्या (New Appointment) करण्यात आलेल्या आहेत व तसेच मोठया प्रमाणात पदोन्नत्या देण्यात आलेल्या आहेत.

वरील सर्व नेमणुका, भरत्या व पदोन्नत्या बेकायदेशिररीत्या करण्यात आलेल्या आहेत. शासनाचे नियम व उमेदवारीसाठी वर्तमान पत्रात काढलेली जाहिरातीचे पालन केले गेले नाही. मा. महासभापुढे खोटी माहिती सादर करून मा. महासभेचा अपमान केला आहे. मा. आयुक्तांनी सर्व भरत्या व पदोन्नत्याची संपुर्ण चौकशी करून माहिती दयावी असा मी ठराव मांडत आहे.

**सूचक :** **अनुमोदक :**

[signature]

श्री. नरेंद्र मेहता

ठराव कायम करणेपुर्वी आहे ... ठराव ... (ओमप्रकाश ... अग्रवाल)

[signature]

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र. १०६ :-** **सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांचे दिनांक २६/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरारोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय चालू करणेबाबत.**

**ठराव क्र. ११० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे मिरा रोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय बांधले आहे. सदर रुग्णालयाची इमारत बांधून सुमारे ३ वर्षे झाली आहेत. तसेच सदर रुग्णालय एक वर्षापूर्वी सुरु करण्यात आले आहे. परंतु ५० खाटांच्या रुग्णालयात अजुनही रुग्ण ॲडमीट न करता केवळ ओ.पी.डी. चालवली जाते. सदर रुग्णालयासाठी ऑपरेशन थिअेटर, लेबर रुम, एक्स-रे मशीन, सोनोग्राफी मशीन, डायलिसिस मशीन इत्यादी लाखो रुपयांची उपकरणे खरेदी केलेली आहेत. परंतु अद्याप एकही सुविधा सुरु करण्यात न आल्याने सदरची सर्व उपकरणे धुळ खात पडलेली असल्याने सदरची उपकरणे खराब होण्याची व गंजल्या जाण्याची शक्यता आहे. तसेच अशा परिस्थितीत सदरची उपकरणे भंगारमध्ये काढण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

सदर रुग्णालयासाठी मा. महासभेने वाढीव पदे मंजूर केली आहेत. परंतु अजुनही सदर पदांवर नेमणुका झालेल्या नाहीत. सदर रुग्णालयासाठी नेमण्यात आलेले तज्ञ डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचा-यांच्या वेतनापोटी महानगरपालिकेस वार्षिक १ कोटी रुपयांचा खर्च सोसावा लागत आहे. तरीही नागरिकांना वैद्यकीय सुविधा मात्र मिळत नाहीत. सदर रुग्णालयास मा.महासभा दि. २०/९/२०११ तहकुब सभा दि .२०/०८/२०११ अन्वये पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत वैद्यकीय अधिकारी-२, अधिपरिचारिका-१६, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर-२ सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे करीता महासभेने मंजुरी दिली. त्या ही गोष्टीला आज पुर्ण ३ महिने झाले आहेत. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. तरी महासभा दि. २०/९/२०११ व तहकुब सभा दि. २०/८/२०११ ठराव क्र. ५४ अन्वये कारवाही करणे व स्थायी समिती सभा दि. ३१/०१/२०१० ठराव क्रमांक ४३ टेंभा हॉस्पिटल करीता नेमण्यात आलेल्या हॉस्पिटल कंसल्टन्ट प्रमाणे इंदिरा गांधी रुग्णालयसाठी एक स्वतंत्र हेल्थ कंसल्टन्ट कडून हॉस्पिटल अंतर्गत फर्निचर लेआऊट व त्या संबंधी कामे हॉस्पिटलसाठी लागणारी मशिनचे स्पेसिफीकेशन तयार करणे व हॉस्पिटल कर्मचारी प्रशिक्षित करणे कामी अनुभवी अशा हॉस्पिटल कंसल्टन्टची नेमणुक करणे गरजेचे आहे. तरी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय एक स्वतंत्र मेडीकल कन्सल्टंट कडून Flexibility अहवाल बनविण्यास हॉस्पिटल कंसल्टन्ट नेमणेकरीता ५ लाखांची तरतूद करण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री.ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- डॉ.आसिफ शेख**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | पाटील उमाताई शाम | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | नलावडे दिनेश दगडू | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | सपार उमा विश्वनाथ | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | पुजारी कांचन शेखर | |
| १३ | राजेंद्र भंवरलाल जैन | १३ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | शफीक अहमद सादत खान | |
| १५ | चक्रे वंदना रामदास | १५ | प्रमोद जयराम सामंत | |
| १६ | माळी हेमा रविंद्र | १६ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १७ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १७ | विजया हेमचंद्र वैती | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | टेरी पॉल परेरा | १९ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २० | मेहता नरेंद्र लालचंद्र | २० | भट दिप्ती शेखर | |
| २१ | वर्षा गिरधर भानुशाली | २१ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २२ | राजु यशवंत भोईर | २२ | अनिल दिवाकर सावंत | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | पुरोहित मधुसूदन मनोहरलाल | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | | | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | | | |
| २६ | पाटील शरद केशव | | | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३० | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३७ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३८ | धनेश परशुराम पाटील | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

369

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**दुःखवटा ठराव क्र. १११ :-**

खारीगांव येथील रहिवासी किशोर पाटील ह्यांचे वयाच्या ३६ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने बुधवारी दि.२८/१२/२०११ रोजी निधन झाले तसेच आपल्या महापालिकेचे इंजिनिअर निशांत जाधव ह्यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच भाईंदर वेस्टचे जैन मंदीराचे ट्रस्टी राजुभाई शहा ह्यांचेही निधन झाले आहे. त्यांचाही शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०२/२०१२.

**प्रकरण क्र. १०६ :- दि. ३१/१०/२०११ व दि. ११/११/२०११ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १३२ :-**

दि. ३१/१०/२०११ व दि. ११/११/२०११ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** सौ. प्रभात पाटील

**अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०२/२०१२

**प्रकरण क्र. १०७ :-** **मालमत्तेची मलनिःसारण जोडणी (Sewerage Property Connection) महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील Sewer line ला जोडणी करणेबाबत. (दि. ०१/०२/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ११५)**

**ठराव क्र. ११३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा भुयारी गटार योजनेतील Sewer line ला सोसायटीची मलनिःसारण जोडणीकरीता मा. स्थायी समितीने मा. महासभेत अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु मा. महासभा सदस्यांनी स्थायी समितीचा ठरावास आक्षेप घेतला आहे म्हणून प्रशासनाने मिरारोड शांतीपार्क या भागातील सोसायटींचे मलनिःसारण जोडणी भुयारी गटारला जोडण्याची अंतिम तयारी केली आहे. म्हणून प्रशासनाने एकूण स्थायी समितीने ठरवलेली जोडणी शुल्क प्रमाणे किती रक्कम शांतीपार्क भागातून प्राप्त होईल व शांतीनगर भागात महानगरपालिकेचा एकूण किती खर्च होईल. या संदर्भात प्रशासनाने सोसायटी किंवा महानगरपालिकेवर आर्थिक भार पडू नये म्हणून येणाऱ्या संपूर्ण उत्पन्न व खर्चाबाबतचा शांतीपार्कचे सर्वेक्षण करुन प्रस्ताव फेरसादर करावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र एल. मेहता    अनुमोदन :- श्री. मिलन पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. बर्नड डिमेलो यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली**

सिव्हरेज प्रकल्पात मुर्धा, राई, मोर्वा, उत्तन, पाली, चौक या परिसरात येत नाहीत म्हणून प्रकल्पाच्या ५०० कोटी खर्चामध्ये एकही पैसा सदर गावात खर्च होत नाही. तसेच कर लावताना वरील गावातसुध्दा कर लावला आहे.

तसेच ५०० कोटीच्या हिशोबाने सदर प्रभागावर ४० कोटीचा भार पडणार आहे. करिता वरील प्रभागात विशेष विकासाकरीता विशेष निधी मंजूर करावे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | पाटील उमाताई शाम | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | नलावडे दिनेश दगडू | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | सुनिता कैलास पाटील | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| ११ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | ११ | जंगम लक्ष्मण गणपत | |
| १२ | प्रकाश पांडुरंग ठाकुर | १२ | सपार उमा विश्वनाथ | |
| १३ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १३ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १६ | चक्रे वंदना रामदास | १६ | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| १७ | माळी हेमा रविंद्र | १७ | शेख नुर मोहम्मद अहमद | |
| १८ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १८ | शफीक अहमद सादत खान | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | प्रमोद जयराम सामंत | |
| २० | मेहता नरेंद्र लालचंद्र | २० | मर्लिन मर्विन डिसा | |
| २१ | वर्षा गिरधर भानुशाली | २१ | विजया हेमचंद्र वैती | |
| २२ | राजु यशवंत भोईर | २२ | ठाकुर कल्पना हरीहर | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | २४ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | २५ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २६ | पाटील शरद केशव | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २७ | शेख सलिम दाऊद | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ३० | पाडे स्नेहा शैलेश | ३० | नयना गजानन म्हात्रे | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाल | | | |
| ३८ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३९ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४० | व्यास सुधा वासुदेव | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

३६८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०२/२०१२

प्रकरण क्र. १०८ :- सन २०११-१२ चा सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१२-१३ चा अर्थसंकल्प बनविणेबाबत अग्निशमन दलाकडील विविध महसुली उत्पन्नाचा सुधारीत दराचा प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (दि. ०१/०२/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ११६)

राव क्र. ११४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मागील वर्षात महानगरपालिका क्षेत्रात विविध कर लागु केले ाहेत व सदर कराचा भार नागरीकांवर पडत आहे. त्यामुळे नागरीकांवर अतिरिक्त कराचा भार पडू नये म्हणून ग्निशमन दलाने सादर केलेल्या विविध महसुली उत्पन्नाचा (कॅपीटेशन फी, विविध दाखला फी व दाखला तनीकरण फी) सुधारीत दर वाढीच्या प्रस्तावास पूर्णपणे मान्यता न देता मा. महासभा दि. १७/०३/२००७ ठराव ़. ९३, प्रकरण क्र. १२२ मधील दरात तसेच ठराव क्र. ९३ मध्ये समाविष्ठ नसलेल्या परंतु महाराष्ट्र आग तिबंधक व जीवसंरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ मध्ये शासनाने सुचविलेल्या दरात १० टक्के वाढ ्रणेस व अग्निशमन सेवाकर हा मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर १ टक्के या प्रमाणे कायम ठेवण्यास ही ा. महासभा मंजुरी देत आहे. तसेच अग्निशमन दलाकडील कोणतेही साहित्य भाड्याने देण्यात येऊ नये असा राव ही महासभा मंजुर करीत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. मदन उदितनारायण सिंह

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | पाटील उमाताई शाम | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | नलावडे दिनेश दगडू | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | जंगम लक्ष्मण गणपत | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | सपार उमा विश्वनाथ | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १३ | शर्मा भगवती तुगनचंद | १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १४ | पाटील वंदना मंगेश | १४ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १५ | चक्रे वंदना रामदास | १५ | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| १६ | माळी हेमा रविंद्र | १६ | शफीक अहमद सादत खान | |
| १७ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १७ | प्रमोद जयराम सामंत | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद्र | १९ | ठाकुर कल्पना हरीहर | |
| २० | वर्षा गिरधर भानुशाली | २० | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | जाधव मोहन महादेव | २१ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २२ | सिंह मदन उदितनारायण | २२ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २३ | म्हात्रे कल्पना महेश | २३ | अनिल दिवाकर सावंत | |

369

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | पाटील शरद केशव | २४ | शेख सलिम दाऊद | |
| २५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २५ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २६ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| २७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २८ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| २९ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३० | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३१ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३२ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३३ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३४ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३५ | म्हात्रे मोहन गोपाल | | | |
| ३६ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३७ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३८ | व्यास सुधा वासुदेव | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

महापौर
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १८/०२/२०१२

३७०

**प्रकरण क्र. ( १०९ )** भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान देखभाल दुरुस्ती व संचलनाचे खाजगीकरण करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ( ११५ )

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयात आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम करीता राखीव आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र १८.०० हेक्टर असून सदर जागा मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण एस आर-०४/२०१० दि.७/१०/२०१० च्या आदेशाच्या अन्वये महानगरपालिकेकडे हस्तांतर केलेले आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत कचरा माती भरावावर मुरुम व लाल माती टाकून ६ एकर जागेत मैदान विकसित करण्यात आलेले आहे. भाईंदर (प.) भागात सदरचे एकमेव मैदान आहे. सदर मैदानावर महानगरपालिकेमार्फत सरावाकरीता मॅट विकेट / टेनिस खेळपट्टी / साधी खेळपट्टी तयार करण्यात आलेल्या आहेत. सदर खेळपट्टया व मैदान खेळण्यासाठी भाडयाने देण्यात येते. तसेच शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा करीता भाडयाने देण्यात येते व त्यामधुन महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळत आहे. तसेच भाईंदर (प.) भागात सुभाषचंद्र बोस हे एकमेव मैदान आहे. सदर मैदानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून हेमा भंगा सारखे खेळाडू या मैदानात तयार होऊन जागतिक पातळीवर पोहोचलेले आहेत.

तरी सदर मैदानाचे खाजगीकरण करणे योग्य होणार नाही. तरी सदर मैदानाची देखभाल दुरुस्ती व संचलन महानगरपालिकेमार्फतच करण्यात यावे. कोणत्याही संस्थेस देण्यात येऊ नये असा ठराव मांडीत आहे.

**सुचक :-** 

(प्रविण मो. पाटील)

**अनुमोदन :-**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०२/२०११

८१

**प्रकरण क्र. ११० :-** **<u>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर विकास नियंत्रण</u> नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.**

**ठराव क्र. ११६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ मधील विद्यमान तरतूदीनुसार शहरातील विकास योजना आरक्षणे व विकास योजना रस्त्याखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्यात येतात. मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार भुखंड क्षेत्राच्या ८०% च्या मर्यादेत विकास हक्क वापरता येतो. तथापि ४०% रस्त्याखालील विकास हक्क व ४०% आरक्षणाखालील विकास हक्क असणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रालगत बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, यांमधील मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारत बांधकाम प्रस्तावात विकास हक्क प्रमाणपत्रामधील विकास योजना आरक्षणाचे किंवा विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र हे भूखंड क्षेत्राच्या ८०% क्षेत्राच्या मर्यादेत वापरास अनुज्ञेय करण्यात येते.

